दक्षिण महाराष्ट्रांतील

संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा

वि. अ. पटवर्धन

दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा

लेखक

विश्वनाथ अनंत पटवर्धन

मूल्य तीन रुपये

१९६६

प्रकाशक :
विश्वनाथ अनंत पटवर्धन
१२२६/५, शिवाजीनगर,
पुणें ४.

मुद्रक :
दत्तात्रय वासुदेव आंबेकर,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१, शिवाजीनगर,
पुणें ४.

प्रस्तावना

दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांच्या चळवळीची मुहूर्तमेढ माझे परमपूज्य पिताजी कै. ती. अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन यांनी १९२१ मध्ये रोवली, आणि हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर दीड वर्षाच्या आंत म्हणजे १९४८–१९४९ मध्ये हीं सर्व संस्थानें नजिकच्या मुंबई प्रांतांत विलीन झालीं. या अठ्ठावीस वर्षांच्या संस्थानी चळवळीच्या काळापैकी सुमारे बारा वर्षें (१९३६–१९४८) प्रस्तुत लेखकाचा दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानी चळवळीशीं कमी जास्त प्रमाणांत संबंध आलेला होता. कै. ती. वामनराव पटवर्धन ता. १४–२–१९३९ रोजीं निधन पावले. त्यांच्या स्मरणार्थ १९४० मध्ये द. म. संस्थानी चळवळीचा इतिहास ग्रथित करणारें एक पुस्तक 'संस्थानांतील लोकशाहीचा लढा' या नांवाने प्रसिद्ध केलें होतें. आता प्रकाशित करीत असलेलें हें पुस्तक १९४० ते १९४८–४९ पर्यंतच्या घटनात्मक चळवळीच्या इतिहासाचें आहे.

१९४२ नंतरच्या काळांत संघराज्य व समाईक हायकोर्ट या चळवळीचें धुरीणत्व जमखिंडीचे सत्त्वस्थ आणि संघटनाकुशल कार्यकर्ते कै. अनंत वासुदेव साबडे यांच्याकडे होतें. १९४२ च्या अखेरीस जी साबडे समिति नेमण्यांत आली होती, त्या समितीचा एक सदस्य या नात्याने, कै. साबडे यांच्याबरोबर अल्पस्वल्प काम करण्याची संधि मला मिळाली होती. ता. २५-५-१९४७ रोजीं साबडे खुनी हल्ल्यास बळी पडले. मरणा-पूर्वीच्या एक वर्षाच्या काळांत साबडे यांनी संस्थानांच्या विलिनीकरणाचा यशस्वी प्रचार केला होता. हा प्रचार इतका प्रभावी ठरला की, डॉ. पट्टाभिसीतारामय्या, पं. नेहरू, श्री. शंकरराव देव, आदि मान्यवर कॉंग्रेस पुढाऱ्यांचा संस्थानिकप्रणीत द. सं. संघराज्यास आशीर्वाद मिळूनहि, हें संघराज्य जागृत लोकमतापुढे टिकाव धरूं शकलें नाही. समाईक हायकोर्ट, संघराज्य व विलिनीकरण या चढत्या पायऱ्या संस्थानी प्रजापरिषदा व कार्यकर्ते कसे चढत गेले, त्याचें कथन या पुस्तकांत करण्यांत आलें आहे. माझे परम स्नेही कै. अनंतराव साबडे यांनी या चळवळीसाठी शारीरिक, मानसिक व आर्थिक झीज किती प्रमाणांत सोसली याचें ज्ञान फारच थोड्यांना असेल; इतकेंच नव्हे तर, त्यांना शेवटीं मारेकऱ्यांच्या कुऱ्हाडीस बळी पडावें लागलें. साबडे हुतात्मा झाले, पण त्यांनी केलेलें कार्य जर सम्यक् रीतीने प्रकाशांत आलें नाही, तर तें पुढील पिढीला तरी कसें कळणार? या कामीं संस्थानी कार्यकर्त्यांनी दाखविलेलें दूरदर्शित्व व राष्ट्रीयत्व सर्वांच्या पुढे यावें, एवढयाच हेतूने एक मित्रऋण म्हणून प्रस्तुतची संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा लिहिली आहे. दक्षिणी संस्थानांच्या विलिनीकरणासाठी हिंदुस्थान सरकारच्या संस्थान खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल यांना कसलीच तकलीफ पडली नाही, अगर महात्माजींच्या वधानंतर जी गुंडगिरी संस्थानांत माजली तिचा इकडील संस्थानांच्या विलिनीकरणाशीं काडीचाहि संबंध नाही, हें या कथेच्या वाचनाने वाचकांच्या ध्यानीं येईल, अशी आशा आहे.

ही कथा मर्यादित स्वरूपाची आहे. संस्थानांतील इतर चळवळींचा ऊहापोह अगर परामर्श येथे घेण्यात आलेला नाही. गंगार्पण केल्याने सर्व पापांचें क्षालन होतें म्हणतात, त्याप्रमाणे संस्थानी मुलूख भारतांत विलीन होऊन एक समर्थ एकजिनसी राष्ट्र होण्यास मदत झाली. आता संस्थानांतून घडलेल्या पापांचा उच्चार कशाला ? नाही तर, कोल्हापूर, अक्कलकोट, जंजिरा संस्थानांतील दडपशाहीच्या प्रकारांचीं सुरस वर्णनें देता आलीं असतीं; भोरांतील सचिवांच्या सावकारशाहीचा स्फोट करतां आला असता; वृत्तपत्रांच्याकडून मागण्यांत आलेल्या व जप्त केलेल्या जामीनक्यांचा पाढा वाचतां आला असता; लोकपक्षीय मंत्री कसोटीस उतरूं शकतात काय, याची चिकित्सा करतां आली असती. पण तशी कोणतीच माहिती प्रस्तुतच्या पुस्तकांत देण्यांत आली नाही. ही केवळ विलिनीकरणाची कथा आहे आणि जर कधीं काळीं भारतीय संस्थानी चळवळीचा वृत्तान्त, स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाप्रमाणे, प्रसिद्ध करण्याचें भारत सरकारने ठरविलें, तर त्यांस दक्षिणी संस्थानांच्या सनदशीर चळवळीचें स्वरूप, या पुस्तकांत पाहावयास मिळेल असा भरवसा वाटतो.

संस्थानांचा अवतार संपून आता सतरा वर्षांचा काळ लोटला. संस्थानी चळवळींमध्ये ज्यांच्याशीं प्रस्तुत लेखकाचा घनिष्ट संबंध आला, त्यांपैकी कांही देवाघरीं गेले, कांही निवृत्त झाले आणि कांहींनी जीवनाचा निराळा मार्ग स्वीकारला. त्यामुळे प्रस्तुतची कथा लिहितांना 'चक्षुर्वै सत्यम्' माहिती मिळण्याच्या बाबतींत फार अडचण झाली व त्यामुळे कांही उल्लेख लिहावयाचे राहिले गेले असल्यास, संबंधितांनी त्याबद्दल क्षमा करावी. या पुस्तकाकरता माहिती गोळा करण्याच्या कामीं "दैनिक ज्ञानप्रकाश" आणि 'दक्षिण महाराष्ट्र' व 'विजय' (सांगलीचीं दोन साप्ताहिकें) यांच्या जुन्या फायलींचा उपयोग करून दिल्याबद्दल त्या वृत्तपत्रांचे संपादक श्री. शंकरराव गोखले, हरिभाऊ टिळक व सदाशिवराव फडके यांचा मी फार आभारी आहें. या पुस्तकाचें हस्तलिखित माझे स्नेही श्री. मामाराव दाते (पुणें), के. जी. शिराळकर (सांगली), प्रा. न. र. फाटक (मुंबई), बाबूराव गोखले (कराड) व भाऊराव आपटे (जमखिंडी) यांनीं पाहून ज्या सूचना केल्या, त्यांबद्दल फार आभारी आहें. वेदमहर्षि पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर हे गांधीवधापूर्वीच्या काळांत औंधास राहात असतांना, त्यांनी समाईक हायकोर्ट, संघराज्य व विलिनीकरण या सर्व चळवळींत प्रामुख्याने भाग घेतला होता. वयाचें शंभरावें वर्ष असूनहि, त्यांनी हस्तलिखित वाचण्याची तसदी घेतली आणि जो बहुमोल आशीर्वाद लिहून पाठविला त्याबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा अत्यंत कृतज्ञ आहे. या पुस्तकांत घालण्याकरता कांही कारखान्यांनी व बँकांनी जाहिराती देऊन प्रस्तुतच्या प्रकाशनकार्यास विधायक मदत केली, त्याबद्दल त्या सर्व जाहिरातदारांचा मी ऋणी आहें. शेवटीं आर्यभूषण मुद्रणालयाने अल्प मुदतींत पुस्तक छापून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्यच आहे.

दि. १४-२-१९६६

वि. अ. पटवर्धन

वेदमहर्षि पं. सातवळेकर यांचा अभिप्राय

" **दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा** " या नांवाचा एक उत्तम निबंध श्रीयुत वि. अ. पटवर्धन यांनी लिहिला आहे. तो सर्व मीं वाचून पाहिला आहे व त्यांत त्यांनी विचारांत घेतलेले मुद्दे फारच उत्तम आहेत. " दक्षिणी संस्थानें " विलीन झालीं, आता त्यांतील एकहि संस्थान राहिलेलें नाही, अशा वेळीं दक्षिणी संस्थानांचा प्रश्न पुनः उकरून काढण्याचें कारण काय असें कोणीहि म्हणेल. पण आपण " मोंगल साम्राज्य " " मराठी साम्राज्य " वगैरेंचा विचार करीतच असतों; त्याचप्रमाणे " दक्षिणी संस्थानें " हा प्रश्नहि विचार करण्यासारखा आहे. तो तसा विचारहि करण्यासारखा नाही असें इतिहासदृष्टि असणारा माणूस कधीहि म्हणणार नाही. अर्थात् दक्षिण महाराष्ट्रांत किती संस्थानें होतीं, त्यांचा कारभार कसा काय चालत असे, तेथील प्रजा संतुष्ट होती कीं असंतुष्ट होती, ती प्रजा कोणत्या चळवळी करीत असे इत्यादि प्रश्न आजहि विचार करण्यासारखे आहेत.

संस्थानी राज्यें निरंकुश होतीं व त्या निरंकुशतेचा वाईटपणा जनतेस कळून चुकला होता. ही संस्थानिकांची निरंकुशता कमी व्हावी व प्रजेच्या पुढाऱ्यांना राज्य-कारभारामध्ये कांही अधिकार मिळावे यासाठी संस्थानी प्रजेमध्ये चळवळीहि चालू होत्या. त्या चळवळींचा जो परिणाम औंध संस्थानांत घडून आला, तो विशेष लक्ष्यपूर्वक पाहण्यासारखा होता.

औंध संस्थानांतील चळवळीचा रागरंग पाहून औंधच्या विचारशील श्रीमंत राजे-साहेबांनी आपल्या प्रजेस जे हक्क दिले ते असे—

१ प्रत्येक गावांत लोकनियुक्त " **ग्रामपंचायत** " असावी.

२ या ग्रामपंचायतींत गावांतील सर्व खटल्यांचा निवाडा करावा.

३ " **ग्रामसंरक्षक दल** " प्रत्येक गावांत स्थापावें व त्या दलाने प्रत्येक रात्रौ गावांत पहारा करावा व ग्रामसंरक्षण करावें.

४ गावांची स्वच्छता व इतर आरोग्य-साधनांसाठी करावयाचीं कामें या ग्राम-रक्षकांनी करावी.

५ गावाचे सर्व खटले व इतर सर्व कामे यथायोग्य करण्याचा अधिकार या संरक्षक दलाला असावा.

याप्रमाणे औंध संस्थानांत प्रत्येक गावांत ग्रामरक्षक दल स्थापन झालें व ते दल ग्रामाचें कार्य पाहूं लागलें.

गावांतील २० ते ४० वर्षांचे लोक या दलांत असत व ते रात्रौ जागून गावाचें संरक्षण करीत. त्यामुळे गावांत विलक्षण समाधान उत्पन्न झालें. गावांत चोऱ्या वगैरे

होणें बंद झालें, गावांतील ग्रामस्थांना स्वस्थता लाभू लागली व गावाची स्वच्छता वाढल्यामुळे मच्छर आदि कमी झाले व लोकांना आपलें गाव हें सुखाचें स्थान आहे असें वाटूं लागलें.

यामुळे एक उत्तम परिणाम झाला व तो असा की, जवळच्या इंग्रजी राज्यांतील प्रजा औंध संस्थानच्या राज्यांत येऊन राहूं लागली. या कारणांमुळे औंध संस्थानाची प्रजा संख्येने वाढूं लागली.

इंग्रजी राज्यांतील गावांतील प्रजा संस्थानांतील गावांत येऊन राहूं लागली ही बातमी त्यावेळच्या व्हाइसरायाला समजली; तेव्हा त्यांनी आपला मिलिटरी सेक्रेटरी हें प्रत्यक्ष पाहावयास औंध संस्थानांत गावांमध्ये पाठवला. तो मोटारींतून आला. ४१५ गावे हिंडला व त्याने हे खरे आहे असा रिपोर्ट केला. येथपर्यंत औंध संस्थानांतील गावांची प्रगति झालेली होती.

अशीच प्रगति चालू राहिली तर संस्थानें वाढतील व इंग्रजी राज्य कमी होईल; हें जरी खरें असलें, तरी सर्व संस्थानांची प्रगति अशी होणें हें फारच कठीण हेंहि तेवढेंच खरें !

इकडे सरदार वल्लभभाईंनी सर्व संस्थाने विनष्ट केलीं, तेव्हा जें काय औंध संस्थानने केलें तेंहि राहिलें नाही. हें योग्यच झालें. कारण संस्थानें टिकवून त्यांची प्रगति करणें हें कार्य फारच कठीण होतें.

औंध संस्थानने जें केलें तें तरी किती टिकलें असतें हाहि एक प्रश्नच आहे. तेव्हा श्री. सरदार पटेलांनी जें केलें तेंच योग्य केलें असें म्हणावें लागतें.

या दृष्टीने संस्थानें होतीं तीं कशीं होतीं, त्यांची उन्नति होणें शक्य होतें कीं नाही, हे प्रश्न आज आपण विचार करीत बसण्याचें आता कांही एक कारण नाही. आज संस्थानें राहिलीं नाहीत. तीं इतिहासांत जमा झालीं आहेत. असें मानूनच आज चालावें हें उत्तम होय.

याचा उत्तम विचार श्रीयुत वि. अ. पटवर्धन यांनी या ग्रंथामध्ये केला आहे, तो उत्तम सांगोपांग झाला आहे याकडे मी वाचकांचें लक्ष वेधवूं इच्छितों. यांच्या या परिश्रमाबद्दल वाचकांतर्फे मी श्रीयुत वि. अ. पटवर्धन यांचे मनःपूर्वक आभार मानतों व या पुस्तकाचें अभीष्ट उत्तम प्रकारें सिद्ध होवो असें इच्छितों.

श्री. दा. सातवळेकर
अध्यक्ष–स्वाध्याय मंडळ
पारडी जि. बलसाड.

पारडी
२३।१।६६

उपोद्घात

दक्षिण महाराष्ट्रांत जीं अठरा संस्थानें होतीं, त्यांपैकी सतरा संस्थानांचें ता. ८ मार्च १९४८ रोजीं मुंबई प्रांतांत विलिनीकरण झालें, आणि नंतर एका वर्षानें राहिलेल्या एका संस्थानाचें म्हणजे कोल्हापूरचें मुंबई प्रांतांत ता. १ मार्च १९४९ रोजीं विलिनीकरण झालें. ही घटना घडून आल्याला आता सतरा वर्षांचा काळ लोटला असून संस्थानांचा म्हणून पूर्वी कांही राजकीय प्रश्न होता, आणि संस्थानें म्हणून कांही एक चीज होती, याची आजच्या पिढीला कल्पनाहि असणार नाही. भारत स्वतंत्र झाल्या-वेळीं, देशांत कमी जास्त अधिकारांचीं ५५४ संस्थानें होतीं. या संस्थानांची राजवट, कांही अपवाद सोडल्यास, मानव्रतेला न शोभणारी होती आणि त्यामुळे संस्थानांचा राज्यकारभार हा एक टीकेचा व उपहासाचा विषय झालेला होता. त्यावेळीं ब्रिटिश राजवटीखालील खालसा म्हटला जाणारा मुलूख व संस्थानिकांच्या अमलाखाली असणारा संस्थानी मुलूख यांच्या राज्यकारभारपद्धतींत जमीनअस्मानाचा फरक होता. खालसा मुलखांत राजकीय प्रातिनिधिक संस्थांची स्थापना व वाढ होत होती, तर संस्थानी मुलखामध्ये या बाबतींत सर्व तऱ्हेने अंधार होता. संस्थानिक आपल्या संस्थानांत सार्वभौम राजे होते, पण ब्रिटिश सरकारपुढे सतत लांगूलचालन करून आपला एकतंत्री कारभार चालू राहण्याच्या कामीं मात्र ते फार दक्ष असत. हिंदुस्थानचा ⅔ मुलूख व ¾ प्रजा ही खालसा राजवटीखाली नांदत होती, तर बाकी राहिलेला भारताचा एक-तृतीयांश मुलूख व लोकसंख्येपैकी एक-चतुर्थांश प्रजा ही संस्थानिकांच्या अमलाखाली भरडली जात होती. सन १८८५ मध्ये अखिल भारतीय कॉंग्रेसची स्थापना होऊन आपापल्या हक्कांबाबत देशांतील पुढारी ब्रिटिश सरकारकडे दाद मागत, पण संस्थानांतील बांधवांच्याबद्दल ते अगदी उदासीन असत. खालसांतील प्रजेच्या निरनिराळ्या तक्रारींबद्दल अनेक ठराव कॉंग्रेसच्या पीठावरून पास करण्यांत आले, परंतु संस्थानांतील मागासलेल्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अगर आर्थिक परिस्थितीकडे राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांचें लक्ष गेलें नव्हतें. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास संस्थानी प्रजेपैकी कांही लोक हजर राहात, पण त्यांनीहि आपल्या संस्थानांतील बांधवांच्या हालअपेष्टांबद्दल कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून फारशी दाद मागितलेली दिसत नाही. ही स्थिति किती तरी वर्षे अव्याहत चालू होती.

सन १९२१ पर्यंत संस्थानी प्रजेच्या आकांक्षांना वाचा फोडणारी एकहि सार्वजनिक संस्था संस्थानांत अगर खालसा मुलखांत नव्हती. यावर्षीं मात्र द. महाराष्ट्रांतील संस्थानी प्रजेच्या हितसंवर्धनाकडे लक्ष देण्याकरता कै. वामनराव पटवर्धन, कै. नरसिंह चिंतामण केळकर व कै. प्रो. ग. र. अभ्यंकर यांनी पुण्यांत दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा स्थापन करून संस्थानी प्रजेच्या गाऱ्हाण्यांना आणि आकांक्षांना वाचा फोडणारें व्यासपीठ निर्माण केलें. संस्थानी प्रजेच्या याच मुखंडांच्या खटपटीने पुढे अखिल भारतीय संस्थान प्रजापरिषदेची स्थापना झाली. दक्षिण महाराष्ट्रांतील अठरा संस्थानांपैकी बऱ्याच संस्थानांतून द. सं. हितवर्धक सभेच्या खटपटीने लोकजागृति होण्यास मोठी मदत झाली. भारतीय संस्थानी चळवळीचा इतिहास जर लिहिला गेला, तर दाक्षिण महाराष्ट्रीय संस्थानांत जशी पद्धतशीर चळवळ झाली, तशी इतरत्र कुठेहि न झाल्याचें नमूद करावें लागेल. सनदशीर चळवळ, प्रतिसहकारात्मक चळवळ, कायदेभंगाची चळवळ वगैरे चळवळींचे सर्व प्रकार दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांत कोठे ना कोठे तरी घडून आल्याचें दिसून येतें.

भारताच्या पारतंत्र्याच्या काळांत संस्थानांचा प्रश्न इतका बिकट झाला होता कीं, तो भारताच्या स्वातंत्र्याच्या आड येण्याची भीति नेहमी बाळगली जाई. ब्रिटिश राजसत्तेचे जे चार आधारस्तंभ महात्मा गांधींनी कल्पिले होते, त्यांपैकी एका आधारस्तंभाचा मान महात्मा गांधींनी संस्थानांना दिला होता; व त्यांनाहि संस्थानांतील प्रजा ही गुलामांची गुलाम असल्याचें मान्य होतें; असें असूनहि त्यांनी संस्थानी चळवळींत फार मोठा भाग घेतल्याचें अगर संस्थानांतील चळवळीला फार मोठा पाठिंबा दिलेला असल्याचें सापडणार नाही. सन १९३८ नंतर मात्र या परिस्थितीमध्ये बराच बदल घडून आला आणि पुढील काळांत द. महाराष्ट्रांतील संस्थानी चळवळींत कै. न. वि. गाडगीळ, श्री. शंकरराव देव, श्री. बापूसाहेब गुप्ते, कै. बाळासाहेब खेर, कै. केशवराव जेधे, श्री. रावसाहेब पटवर्धन, श्री. निजलिंगाप्पा, श्री. दोडमेट्टी वगैरे काँग्रेस पुढाऱ्यांनी भाग घेतला होता. प्रसिद्ध काँग्रेस पुढारी कै. डॉ. पट्टाभिसीतारामय्या हे भारतीय संस्थान लोकपरिषदेचे १९३६ सालीं अध्यक्ष झाल्यानंतर मात्र, काँग्रेसचें जास्त प्रमाणांत संस्थानी चळवळीकडे लक्ष वेधलें गेलें.

दक्षिणी संस्थानी चळवळीचें पुरोगामी धोरण

भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या स्थापनेच्या कामीं दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानी कार्यकर्त्यांनी विशेष भाग घेतला होता, याचा उल्लेख वर केलाच

आहे. संस्थानी प्रश्न सोडविण्याबाबत परिस्थितीप्रमाणे फरक करण्याच्या बाबतींत दाक्षिणी संस्थानांतील कार्यकर्त्यांनी घेतलेला पुढाकार विसरून चालणार नाही. प्रत्येक संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचा आग्रह धरला जात असतांना छोटच्या संस्थानांचा कारभार, त्यांचें संघराज्य केल्यासच आधुनिक लोकशाही शासनपद्धतीला अनुरूप असा होऊं शकेल, असें वाटल्याबरोबर दक्षिणी संस्थानांचें संघराज्य करण्याची खटपट सावडे समितीनें सन १९४३-४५ च्या काळांत केली आणि संघराज्याचा पुरस्कार प्रथमच दक्षिणी संस्थानांत झाला. त्याचप्रमाणे हिंदुस्थान राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होणार असें दिसल्याबरोबर संस्थानांचें नजिकच्या प्रांतांत विलिनीकरण होणें हेंच भारताच्या एकात्मतेच्या दृष्टीने आवश्यक असल्याचा पुकारा येथील संस्थानी पुढाऱ्यांनी प्रथम केला आणि त्या दृष्टीने चळवळ केली. भारत स्वतंत्र झाल्यावर संस्थान खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल यांनी कांही संस्थानी मुलखांत, संघराज्यें करून व कांही विलीन करून भारत एकसंधि केला असला, तरी त्यांनी जें धोरण स्वीकारलें त्याचें बीज भारत स्वतंत्र होण्याच्या अगोदर पांच वर्षें दक्षिणी संस्थानांत रोवलें गेलं होतें व त्यामुळे दक्षिणी संस्थानांचें विलिनीकरण करणें अगदी सोपें झालें. असें असूनहि या चळवळीची योग्य दखल सरदार वल्लभभाई पटेल यांच्या संस्थान खात्याचे चिटणीस कै. व्ही. पी. मेनन यांनी सन १९५५ मध्ये लिहिलेल्या "संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा" (The Story of the Integration of Indian States) या पुस्तकांत नसावी याबद्दल खेद वाटतो.

असा अनुल्लेख कां ?

श्री. व्ही. पी. मेनन हे अत्यंत हुशार व कर्तबगार असून सरदार पटेलांच्या विश्वासांतील असे संस्थान खात्याचे सचिव होते. संस्थानांचें विलिनीकरण करण्याच्या कामीं मेनन यांची मुत्सद्देगिरी कशी उपयोगी पडली याचें यथार्थ चित्र त्यांच्या पुस्तकाच्या वाचनाने सतत डोळ्यासमोर उभें राहतें. भारताशीं संस्थानांचें एकात्म्य घडवून आणण्याच्या कामीं व्हॉईसरॉय लॉर्ड मौंटबॅटन यांनी आपल्या वजनाचा आणि मुत्सद्देगिरीचा भरपूर उपयोग कसा केला याचें यथार्थ ज्ञान मेननांच्या पुस्तकावरून होतें. पण दक्षिणी संस्थानांच्या बाबतींत सरदार पटेल काय, अगर व्ही. पी. मेनन काय, अगर लॉर्ड मौंटबॅटन काय, यांपैकी कोणालाच, हीं संस्थानें विलीन करून घेण्याबाबत कसलीच

तकलीफ पडलेली नाही. उलट, आमचीं संस्थानें भारतांत विलीन करा, असें मागणें संस्थानी प्रजेचेंच होतें असें नव्हे तर, इकडील एका तरुण अधिपतीने– जमाखिंडीचे राजे–यांनी विलिनीकरणाची मागणी करून, भारतांतील इतर संस्थानिकांना एक आदर्श धडा घालून दिला होता. असें असूनहि दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांच्या विलिनीकरणाच्या चळवळीचें योग्य मूल्यमापन मेनन यांच्या पुस्तकांत झालें नाही, असें दुर्दैवाने म्हणावें लागतें. जें अनायासाने उपलब्ध असतें, त्याची किंमत कळत नाही, असा जो अनुभव येतो तोच प्रकार द. संस्थानांच्या विलिनीकरणाबद्दल झालेला असावा असें या पुस्तकावरून वाटावयास लागतें.

अकारण गैरसमज

ज्याचें ऋण असेल, त्याचा निर्देश इतिहासासारख्या पुस्तकांत असणें इष्ट व आवश्यक आहे. तसा निर्देश नसल्याने द. म. संस्थानांचें विलिनीकरण होण्याच्या कामीं संस्थानी प्रजेने अगर संस्थानाधिपतींनी आपण होऊन कांहीच हालचाल केली नव्हती, असा अकारण गैरसमज होण्यास जागा उत्पन्न होते, पण तशी वस्तुस्थिति नाही. येथील संस्थानी प्रजा विलिनीकरणासाठी उत्सुक होती व त्या उत्सुकतेला संस्थानिकांची साथहि पण मिळालेली होती, हें विसरून चालणार नाही. या गैरसमजाबरोबरच महात्माजींच्या वधानंतर दक्षिणी संस्थानांत जी जाळपोळ झाली, त्यामुळे विलिनीकरण झालें असाहि एक गैरसमज आहे. पण हे दोन्हीहि गैरसमजच आहेत, हें या पुस्तकांत दिलेल्या माहितीवरून लक्षांत येईल, असा विश्वास वाटतो.

ता. १५ आगस्ट १९४७ रोजीं जसा भारत स्वतंत्र झाला, त्याच-प्रमाणे ब्रिटिशांची संस्थानावर असलेली सार्वभौम सत्ता नष्ट होऊन संस्थानेंहि पूर्ण स्वतंत्र झालीं. ब्रिटिशांचें सार्वभौमत्व असतांना अंतर्गत शत्रूपासून संस्थानिकाचें संरक्षण करण्याची हमी ब्रिटिश सरकारने घेतलेली होती व त्यामुळे राजेरजवाड्यांना आपल्या प्रजेच्या सद्भावाची कदर करण्याची आवश्यकता वाटत नव्हती. ता. १५–८–१९४७ पासून इतर संस्थानिकांप्रमाणे ओरिसांतील संस्थानिक स्वतंत्र झाले खरे, पण त्यांच्याजवळ संस्थानचें व स्वतःचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य आलेलें नव्हतें. १९४७ च्या डिसेंबरमध्ये ओरिसा प्रांतांतील कांही संस्थानांत जेव्हा बंडाळी माजली, तेव्हा शांतता प्रस्थापित करण्यासाठी या संस्थानी दरबारांनी भारत सरकारकडे मदत मागितली आणि ती विलिनीकरणाच्या

मोबदल्यांत देण्यात आली. संस्थानें नष्ट करण्याचें काँग्रेसचें धोरण नसल्याचें पूर्वी अनेक वेळां जाहीर करण्यांत आलें होतें; पण भारत स्वतंत्र झाल्यावर, सरदार पटेलांना भारताची एकात्मता राखण्यासाठी, संस्थानांच्या विलिनीकरणाची आवश्यकता वाटली असावी. ओरिसांतील संस्थानांत अशांतता माजल्यावर त्यांनी विलिनीकरणाच्या मात्रेचा वळसा तेथील संस्थानिकांना दिला. याकरता भारताचे गृहमंत्री सरदार पटेल व श्री. मेनन यांनी ओरिसा प्रांतांतील संस्थानिकांच्या कटक येथे गाठी घेऊन, विलिनीकरणास त्यांनीं संमति देणें हें त्यांच्या हिताचें कसें आहे हें पटेलांना पटवून द्यावें लागलें. संस्थानांतर्गत शांतता निर्माण करण्याचें सामर्थ्य नसल्याने या संस्थानिकांजवळ दुसरा कांही पर्याय नव्हता व म्हणून त्यांनी विलिनीकरणाच्या करारनाम्यावर सह्या केल्या आणि ओरिसा प्रांताकडे तेथील संस्थानांचा कारभार सोपवून तो प्रश्न मिटविण्यांत आला. ओरिसांतील कांही संस्थानिकांनी आपलें संघराज्य या घटनेपूर्वी कांही महिने स्थापन केलें होतें, पण तेंहि शांतता राखण्यास प्रभावी ठरूं शकत नव्हतें. ओरिसांतील संस्थानिकांच्या विलिनीकरणाच्या करारनाम्यावर सह्या घेतांना, सरदारांनी प्रजेच्या संमतीची दखल घेतली नव्हती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

द. सं. प्रजेचा विलिनीकरणाबद्दल आग्रह

ओरिसा प्रांतांतील संस्थानांचें विलिनीकरण झाल्यानंतर दक्षिणी संस्थानांचें विलिनीकरण मुंबई प्रांतांत झालें. ओरिसा संस्थानांप्रमाणे दक्षिणी संस्थानांत अशांतता निर्माण झालेली नव्हती; द. महाराष्ट्रांतील संस्थानांचा दर्जा ओरिसा संस्थानांपेक्षा मोठा असून हीं सर्व पूर्ण सत्ताधारी संस्थानें होतीं. येथील बहुतेक संस्थानांतून जबाबदार राज्यपद्धति स्थापन झालेली होती आणि आठ संस्थानांचें संघराज्य स्थापन होऊं पाहात होतें. या दक्षिणी संस्थानांच्या संघराज्यास पं. नेहरू, डॉ. पट्टाभिसीतारामय्या, श्री. शंकरराव देव वगैरे काँग्रेस पुढाऱ्यांचा आणि भारतीय संस्थान लोकपरिषदेचा आशीर्वाद मिळालेला होता. पण संस्थानिक प्रणीत संघराज्यास प्रजेचा पाठिंबा मात्र नव्हता आणि तिला विलिनीकरणच जास्त पसंत होतें. निरनिराळ्या संस्थानांतील प्रजापक्षीय मंत्रिमंडळांनी आपला स्वार्थ बाजूस ठेवून आणि हिंदुस्थानची एकात्मकता महत्त्वाची समजून आणि जनमत लक्षांत घेऊन विलिनीकरणाच्या बाजूने आपला अभिप्राय व्यक्त केलेला होता. आपल्या संस्थानांतील लोकमत लक्षांत घेऊन संघराज्याचा आग्रह

धरणाऱ्या आठ संस्थानिकांनीसुद्धा विलिनीकरणास आपली संमति दिली होती. दक्षिण महाराष्ट्रांतील बहुतेक संस्थानांचें विलिनीकरण हें जनतेच्या मागणीवरून व संस्थानाधिपतींच्या संमतीने झालेलें आहे. असा आपखुशीचा मामला भारतांतील कोणत्याहि संस्थानांच्या बाबतींत झालेला दिसत नाही. १९४६ पासून संस्थानांच्या विलिनीकरणाचे वारे दक्षिणी संस्थानांत वाहात होते. या सर्व घटना लक्षांत घेतां, ओरिसा प्रांतांतील संस्थानांच्या विलिनीकरणाचा परिणाम द. महाराष्ट्राच्या संस्थानी राजकारणावर झाला असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें होय. महात्माजींचा खून होण्यापूर्वी अगोदर एक महिना विलिनीकरणाचा निर्णय प्रजापुढारी व राजांनी घेतलेला होता. अशा तऱ्हेचा निर्णय घेतला जाण्यासाठी संस्थानखातें अगर सरदार पटेल अगर श्री व्ही. पी. मेनन यांना दक्षिणी संस्थानिकांचें मतपरिवर्तन करण्याची पाळी आली नव्हती. असें असूनहि मेननांच्या वरील पुस्तकांत द. महाराष्ट्रांतील संस्थानी चळवळीबद्दल योग्य उल्लेख आलेला नाही. प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनाने द. महाराष्ट्रांतील संस्थानी चळवळीची उत्क्रांति कशी होत गेली आणि शेवटीं तिचें पर्यवसान विलिनीकरणाच्या चळवळींत कसें परिणत झालें, याची यथार्थ कल्पना येईल अशी अपेक्षा आहे. येथील चळवळ ही योग्य प्रसिद्धीच्या अभावीं काळाच्या उदरांत गडप व्हावी आणि प्रजा व संस्थानिक यांच्या त्यागाचें यथार्थ चित्र उजेडांत न यावे, हें इष्ट न वाटल्याने ही दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा लिहिली गेली आहे.

मुत्सद्देगिरीचा एक नमुना

सरदार पटेलांना भारत एकसंधी राष्ट्र निर्माण करावयाचें होतें, आणि त्यासाठी त्यांनी सर्व प्रकारच्या मार्गांचा अवलंब केला. ओरिसांत अस्वस्थता माजली म्हणून तेथील संस्थानांचें विलिनीकरण झालें, तर द. म. संस्थानांचें विलिनीकरण प्रजा व राजा यांच्या संमतीने सामान्यतः झालें. एक सक्तीचा मामला, तर दुसरा राजीखुषीचा मामला. इतर संस्थानांचें विलिनीकरण करतांना, संस्थानांत शांतता असली अगर प्रजेची मागणी नसली, तरीसुद्धा संस्थानिकांवर दडपण आणून सरदारांनी त्यांची संमति घेतली. यासंबंधांत सरदार पटेलांचे चरित्रलेखक श्री. पंजाबी आपल्या पुस्तकांत म्हणतातः—In pursuit of this (there should be one India and one Government throughout the country), he (Patel) used every means possible. He coarsed

the rulers, cajoled them and even threatened them with dire consequences." यावरून संस्थानांचें विलिनीकरण करतांना, सरदारांनी कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला असेल, त्याची कल्पनाच केलेली बरी. पटेलांनी अगर संस्थान खात्याने संस्थानांतून जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचा आग्रह ता. १५ ऑगस्ट १९४७ नंतर केला नसल्याचें दिसतें. जबाबदार राज्यपद्धति स्थापन झाल्यास स्थानिक अभिनिवेश प्रजापुढाऱ्यांमध्ये उत्पन्न होऊं शकतो आणि असें झाल्यास संस्थानें विलीन करणें अवघड असतें. संस्थानिकांना भरपूर खासगी खर्चाची रक्कम देण्याचें आमिष दाखवून त्यांची विलिनीकरणास संमति घेणें सोपें होतें; पण तसें आकर्षण संस्थानी मंत्रिमंडळाला दाखवून, त्याची विलिनीकरणाला संमति घेता आली असतीच असें नाही. विलिनीकरणाच्या मोबदल्यांत संस्थानिकांना योग्य तनखा देण्याचें व त्यांचे मानमरातब आणि इतमाम शाबूत ठेवण्याचें आश्वासन संस्थानी खात्याने दिल्यामुळे, संस्थानिकांनी विलिनीकरणाचा मार्ग चोखाळला असें अनेक उदाहरणांवरून प्रत्ययास येतें. द. म. संस्थानांचें विलिनीकरण झाल्यानंतर ज्या संस्थानांचें विलिनीकरण करण्यांत आलें, त्याबाबतींत सरदार वल्लभभाईंनी आपलें एक विशिष्ट धोरण ठेवल्याचें दिसते. या धोरणाचे अवलंबन करतांना, त्यांनी लोकमत अजमावण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. बडोद्याच्या महाराजांची विलिनीकरणास कशी संमति घेण्यांत आली याचें पुढीलप्रमाणे वर्णन श्री. मेनन यांनी आपल्या पुस्तकांत केलें आहे.

"On one occasion while he was relating his (Maharaja's) woes to me, I broached the subject of Baroda's merger with Bombay. I told him that having granted responsible government, he had become merely the constitutional head of the State. His State was not a homogeneous unit but consisted of several straggling bits of territory intercepted between Gujarat and Kathiawar. Baroda could undoubtedly be treated as a viable unit of administration; but the fact had to be faced that, while he himself was a Maratha the vast majority of his subjects was Gujarati. one could not be sure that linguistic rivalries, might not flare up at any time, and, if it did, his position would be far from secure......and I advised him, therefore, to agree to the merger of Baroda with Bombay, in which case the Government of India would look after his privy purse, his privileges and his position."

श्री. मेनन यांनी गुजराथी प्रजा व मराठा राजा हा जो संबंध जोडला, तो एक मुत्सद्देगिरीचाच डाव होय. बडोद्याच्या महाराजांना वरील कोटिक्रम पटला अगर पटवून घ्यावा लागला आणि त्यांनी विलिनीकरणास संमति दिली. हें उदाहरण देण्याचा उद्देश एवढाच की, भारताच्या संस्थानी खात्याने विलिनीकरणाबाबत कशी कारवाई केली तें लक्षांत यावें. याच पद्धतीने निरनिराळ्या कोटिक्रमांचा अवलंब करून मोठ्या मुत्सद्दीपणाने सरदार पटेलांनी संस्थानिकांची विलिनीकरणास संमति मिळविली.

संस्थानिक भारताचे सह-शिल्पकार

संस्थानिकांची विलिनीकरणास संमति मिळविण्यासाठी, सरदार पटेलांनी जास्त प्रमाणांत त्यांना तनखा दिला, अशी टीका सरदार पटेलांच्यावर पुढे करण्यांत आली. यावर घटना समितींत बोलतांना, ते म्हणाले कीं "संस्थानिकांनी राजसंन्यास घेऊन व आपलीं संस्थानें भारतांत विलिनीकरणास संमति देऊन मोठा त्याग केला आहे. संस्थानिकांना हिंदुस्थानांत गडबड करण्यास भरपूर संधि व वाव होता. पण त्यांनी तसें कांही केलें नाही. संस्थानांत जी रक्तहीन क्रांति घडून आली आहे, त्याची खासगी खर्चाच्या रूपाने दिलेली किंमत अल्प आहे. (The capacity for mischief and trouble on the part of rulers, if the settlement with them had not reached, was far greater than could be imagined at this stage.... Need we cavil then at the small—I purposely use the word small — price we have paid for the bloodless revolution which has affected the destinies of millions of our people). एकसंधी भारत होण्याच्या कामीं संस्थानिक हे सह-शिल्पकार (co-architects) आहेत, असा गौरवपर उल्लेख सरदार पटेलांनी केलेला आहे.

दक्षिण महाराष्ट्रांतील बहुतेक संस्थानांच्या बाबतींत अशी कारवाई करण्याचा प्रसंग संस्थानी खात्यावर आलेला नाही. दक्षिणी महाराष्ट्रीय संस्थानांचें विलिनीकरण हें प्रजेने, प्रजापुढाऱ्यांनी व संस्थानिकांनी स्वेच्छेने घडवून आणलेलें आहे; आणि त्याबाबतींत संस्थानी खात्याला श्रेय देणें योग्य होणार नाही. उलट, असें म्हणतां येईल कीं, छोट्या संस्थानांच्या संघराज्याची व विलिनीकरणाची कल्पना प्रसृत करून दक्षिणी संस्थानांतील प्रजापक्षीय चळवळीने इतर संस्थानांना व संस्थान खात्याला एक आदर्श घालून दिलेला होता.

• • •

अनुक्रमणिका


संस्थानी चळवळीचे आद्य जनक



कै. नरसिंह चिंतामण
उर्फ
तात्यासाहेब केळकर



कै. अनंत विनायक
उर्फ
वामनराव पटवर्धन



हुतात्मा अनंत वासुदेव सावडे

हुतात्मा अनंत वासुदेव साबडे

यांच्या


पवित्र स्मृतीस समर्पण

—वि. अ. पटवर्धन


विलिनीकरणाचा उद्घोष करणारा पहिला राजा



कै. श्रीमंत परशुराम पटवर्धन, जमखिंडी



श्री. बाळासाहेब कोरे, सांगली
(सांगली संस्थानचे दीर्घकालीन मंत्री)
(१९४१-४८)



श्री. रत्नाप्पा कुंभार, कोल्हापूर
(एक जबरदस्त संघटक)

दक्षिण महाराष्ट्रांतील

संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा

१

थोडें मागे वळून

(१९४०)

हिंदुस्थान ता. १५ आगस्ट १९४७ रोजीं स्वतंत्र झाल्यावर संस्थानांच्या विलिनीकरणाच्या प्रश्नांत संस्थान खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल यांनी लक्ष घातले. पण तत्पूर्वी एक वर्षापासून, संस्थानी प्रजेचें हित संस्थानी मुलूख खालसा मुलखांत विलीन होण्याने साधणार आहे, असें दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानी कार्यकर्त्यांना वाटल्याने, त्यांनी त्या दृष्टीने प्रचार करण्यास सुरुवात केली होती. अशा तऱ्हेची मोहीम इतरत्र संस्थानी मुलखांत कोणींच तोवर केली नव्हती. १९३९ मध्ये लुधियाना येथे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेचे अधिवेशन झाल्यावेळी, छोट्या संस्थानांचें अस्तित्व, त्यांनी आपापले गट केले तरच राहणार आहे असा ठराव पास करण्यांत आला होता. या ठरावाची अंमलबजावणी होण्याची खटपट द. म. संस्थानी कार्यकर्त्यांनी प्रथमत: केली, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. दक्षिण महाराष्ट्रांतील भागांत कोल्हापूर, अक्कलकोट, औंध, भोर, जमखिंडी, जंजिरा, जत, कुरुंदवाड (थोरली पाती), कुरुंदवाड (धाकटी पाती), मिरज, मिरजमळा (मिरज–धाकटी पाती), मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी व वाडी जहागीर या अठरा संस्थानांचा समावेश होतो. लुधियाना ठरावाप्रमाणे कोल्हापूरव्यतिरिक्त इतर सर्व संस्थानें छोट्या संस्थानांच्या संज्ञेंत (वीस लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेलीं) मोडतात. त्यांचें अस्तित्व राहावयाचें असेल, तर त्यांचा एक गट करणेंच अपरिहार्य आहे, असें दिसून आल्यावर प्रथम दक्षिणी संस्थानांचें संघराज्य करण्याची व पुढे विलिनी-

करण करण्याची योग्य ती सर्व चळवळ १९४० ते १९४७ च्या काळांत मोठ्या हिरिरीने करण्यांत आली. या चळवळी करण्याची कल्पना ही धूमकेतूप्रमाणे अचानक उदित झाली नव्हती, तर तिच्या मागे उत्क्रांतिमय इतिहास होता. १९२१ पासून संस्थानी चळवळीमध्ये कार्य केलेल्या कार्यकर्त्यांची तपश्चर्या होती आणि त्याच तपस्येच्या जोरावर दक्षिणी संस्थानांचें विलिनीकरण व्हावें अशी मागणी संस्थानी प्रजापुढारी करूं शकले आणि या मागणीस डावलणें संस्थानिकांना अशक्य झालें. दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें हीं इतर कित्येक संस्थानांच्या मानाने फारच लहान होतीं. तीं उत्पन्नाने छोटीं होतीं, बडेजावाने ठेंगू होतीं; पण राजकीय दृष्ट्या मात्र त्यांचा दर्जा फार मोठा होता. दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांत जेवढ्या मोठ्या प्रमाणांत राजकीय चळवळ झाली, तेवढ्या प्रमाणांत चळवळ झाल्याचें दृश्य इतर कोणत्याहि संस्थानी भूभागांत दिसत नाही, हें मोठ्या अभिमानाने नमूद करतां येईल. संस्थानांतील राजकीय सुधारणासुद्धा द. म. संस्थानांत, इतर संस्थानांच्या मानाने, जास्त प्रमाणांत व लवकर झाल्या हें नमूद करणें इष्ट वाटतें.

संस्थानी चळवळीचें अपक्षीय धोरण

दक्षिण महाराष्ट्रांतील अठरा संस्थानें हीं पूर्वीच्या मुंबई इलाख्यांत होतीं आणि या सर्व संस्थानांसाठी म्हणून ब्रिटिश सरकारच्या व्हाईसरॉयचा प्रतिनिधि (रेसिडेंट) कोल्हापुरांत राहात असे. हा संस्थानी मुलूख पुणें शहराच्या दक्षिणेस सामान्यतः २५० मैलांच्या टापूंत पसरलेला होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं व विसाव्या शतकाच्या प्रारंभीं पुणें हें भारतीय राजकारणाचें मुख्य केंद्र असल्याने साहजिकच त्याचा प्रभाव इकडील संस्थानी जनतेवर झाला असल्यास नवल नाही. न्यायमूर्ति रानडे, लोकमान्य टिळक व भारतसेवक नामदार गोखले या भारतीय पुढाऱ्यांच्या वास्तव्याने पुणें पुनीत झालें होतें आणि त्यांच्यामुळेच निरनिराळ्या राजकीय व सामाजिक संस्थांचा जन्म पुण्यांत झालेला होता; आणि या चळवळींचें लोण या पुढाऱ्यांचे अनुयायी आपापल्या गावीं पसरवीत असत. इतर अनेक चळवळींप्रमाणे दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानी चळवळीचा जन्म १९२१ मध्ये पुण्यास झाला. टिळकांचे राजकीय वारसदार कै. श्री. नरसिंह चिंतामण केळकर व नामदार गोखले यांच्या भारतसेवक समाजाचे सभासद कै. श्री. अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन यांनी १९२१ मध्ये पुण्यास दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे

पहिलें अधिवेशन भरवून संस्थानांतील राजकीय चळवळीची प्रतिष्ठापना केली. केळकर–पटवर्धन या दोघांचाहि जन्म संस्थानांत झालेला असल्याने, त्यांना संस्थानी प्रजेच्या हलाखीची सम्यक् कल्पना होती व त्यामुळे त्यांना संस्थानांत चळवळ करण्याची आवश्यकता भासूं लागली होती. त्याच सुमारास खालसा मुलखांत मॉंटफर्ड सुधारणा अमलांत येऊन द्विदल राज्यकारभारपद्धति सुरू झाली होती. खालसा मुलखांतील जनतेला जास्त जास्त प्रमाणांत मिळणारे राजकीय हक्क पाहून संस्थानांतील लोकांना आपल्या मागासलेल्या राजकीय जीवनाबद्दल खंत वाटूं लागली असल्यास नवल नाही. संस्थानी राजवटीबद्दल मोठ्या हिरिरीने सांगलीचे प्रसिद्ध वकील कै. प्रो. गणपतराव अभ्यंकर लेख लिहीत असत. दक्षिणी संस्थान प्रजापरिषद् स्थापण्याच्या कामीं अभ्यंकरांचें मोठ्या प्रमाणांत सहाय्य झालें. दक्षिण महाराष्ट्रांतीलच काय, पण भारतीय संस्थानी राजकारणाची चळवळ वाढीस लावण्यासाठी पटवर्धन–केळकर–अभ्यंकर या त्रिमूर्तींचे श्रम फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत झालेले आहेत. संस्थानी चळवळीच्या या संस्थापकांनी आणखी एक पथ्य फार मोठ्या कटाक्षाने पाळलें होतें आणि तें म्हणजे संस्थानी राजकारणांत खालसांतील पक्षीय राजकारणाचा प्रवेश होऊं द्यावयाचा नाही. संस्थानी राजकारण हें संस्थानी कारभार आणि तेथील प्रजेचें हित यापुरतें मर्यादित ठेवलेलें होतें. संस्थानांचे अधिपति हे आपल्याच रक्तामांसाचे असल्याने संस्थानांतील प्रजेलाच काय, पण खालसांतील पुढाऱ्यांनासुद्धा संस्थानशाही नष्ट व्हावी असें वाटत नव्हतें; फक्त संस्थानिकांच्या आधिपत्याखालीं संस्थानांतील कारभार लोकशाही पद्धतीचा व्हावा एवढीच त्यांची मागणी होती. खालसांतील राजकारण वेगळ्या प्रकारचें होतें. ब्रिटिश नोकरशाही नष्ट व्हावी असें म्हणणारा मोठा वर्ग त्या वेळीं होता. खालसांतील जहाल–नेमस्त अगर क्रांतिकारक राजकारण संस्थानी चळवळींत येऊं शकत नव्हतें. त्याचमुळे न. चिं. केळकर व वामनराव पटवर्धन हे खालसांतील राजकारणांत जहाल व नेमस्त या विरोधी पक्षांत असूनहि, ते संस्थानी चळवळीच्या व्यासपीठावर एकत्र येऊं शकत असत. पुढे पांच सात वर्षांनी अखिल भारतीय संस्थान लोकपरिषद स्थापन झाल्यावेळीं सुद्धा असेच धोरण अमलांत आणलें गेल्याने भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या झेंड्याखाली निरनिराळ्या राजकीय मतांचे (खालसापुरते) लोक संस्थानी राजकारणाचा खल एकत्र येऊन करीत असत. महात्मा गांधींचा अशाच तऱ्हेचा आग्रह होता संस्थानांतील स्थानिक कॉंग्रेसने राजकीय पक्ष म्हणून चळवळ करूं नये, तर

स्थानिक प्रजापरिषदांच्या मार्फत संस्थानांतील राजकीय चळवळ चालविण्या-बाबत महात्माजींचा कटाक्ष होता. यावरून दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानी चळवळीचें ध्येय व धोरण ठरवितांना केळकर–पटवर्धन–अभ्यंकर यांनी जो दृष्टिकोण मांडला, तो किती अचूक व व्यवहारी स्वरूपाचा होता, याची कल्पना येते. या धोरणामुळे स्थानिक प्रजापरिषदांच्या निशाणाखाली त्या त्या संस्थानांतील विविध मतप्रणालींचे कार्यकर्ते एकत्र आल्याने प्रजापरिषदांचें सामर्थ्य वाढलें आणि संस्थानांतून राजकीय जागृति थोड्याच काळांत झाली. या स्थानिक प्रजापरिषदांच्या मार्फत संस्थानांतून कोणत्या चळवळी झाल्या, याचा सविस्तर वृत्तान्त देण्याचें हें स्थळ नव्हे. दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानी चळवळीची सुरुवात १९२१ मध्ये झाली, त्यावेळेपासून १९४० पर्यंत झालेल्या चळवळीचा इतिहास १९४० मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘संस्थानी लोकशाहीचा लढा’ या साडेपांचशे पानांच्या पुस्तकांत देण्यांत आलेला आहे. त्यापुढील काळांत म्हणजे १९४० नंतर, दक्षिणी संस्थानांचें संघराज्य करण्यासाठी व विलिनीकरणासाठी १९४८ पर्यंत जी चळवळ येथील कार्यकर्त्यांनी केली, तिची बैठक समजण्यासाठी, येथे १९४० पर्यंतच्या चळवळीचा त्रोटक आढावा घेणें अवश्य आहे.

प्रजापक्षीय चळवळीस सुरुवात

१९२१ मे मध्ये दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचें पहिलें अधिवेशन फलटण व जमखिंडी येथे दिवाणपदाचें काम केलेले कै. श्री. शं. भा. बापट यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आलें. या अधिवेशनास दक्षिणी संस्थानांतील सुमारे २५० प्रतिनिधि हजर होते. या अधिवेशनांत परिषदेचें काम सतत चालण्यासाठी दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा स्थापन करण्यांत आली. या पहिल्या अधिवेश-नांत महत्त्वाचे असे पुढील ठराव पास करण्यात आले:–(१) संस्थानिकांनी संस्थानांत प्रजाप्रतिनिधि संस्था स्थापन करून, त्यांस कायदे करण्याचा अधिकार द्यावा; खासगी खर्चाव्यतिरिक्त संस्थानचें सर्व अंदाजपत्रकास प्रजाप्रतिनिधींची संमति घेतली जावी; (२) नागरिक स्वातंत्र्यावर आघात करणारे कायदे रद्द करण्यांत यावेत; (३) दक्षिणेंतील संस्थानांपैकी बऱ्याच संस्थानांचें उत्पन्न थोडें आहे; पण त्यांना महत्त्वाचे अधिकार आहेत. हे अधिकार चांगल्या तऱ्हेने बजावणें शक्य होण्याकरता मोठ्या पगाराचे व स्वतंत्र अधिकारी असणें इष्ट आहे. याकरतां निरनिराळ्या संस्थानांनी गट करून समाईक खर्चाने असे

अधिकारी नेमून, त्यांजकडून असल्या अधिकारांची, विशेषत: न्यायमनसुबीचीं, कामें करवून घ्यावींत.

या ठरावांवरून द. सं. प्रजापरिषदेचें संस्थानविषयक धोरण काय होतें याची कल्पना येईल. द. सं. हितवर्धक सभेचे चिटणीस म्हणून वामनराव पटवर्धन व न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांची नियुक्ति करण्यांत आली. या जोडीने पुढे सुमारे सतत अठरा वर्षेपर्यंत दक्षिणी संस्थानांत चळवळ करून तिला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सन १९२१ ते १९३८ च्या सतरा वर्षांच्या कालखंडांत दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचीं बारा अधिवेशनें झालीं. यांपैकी सात अधिवेशनें पुण्यास, मुंबई व बेळगाव येथे एकेक, सांगली व जमखंडी संस्थानास नजिक असलेल्या कुपवाड व कुडची येथे प्रत्येकी एकेक, अशीं अकरा अधिवेशनें खालसा मुलखांत भरली. १९३८ मध्ये भरलेलें बारावें अधिवेशन सांगली येथे कै. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली प्रथमच संस्थान हद्दींत भरलें. परिषदांच्या अध्यक्षस्थानीं कै. शं. भा. बापट, वा. रा. गुप्ते, ग. भा. साने (बडोदें), बॅ. जयकर. बा. सी. कामत, प्रो. अभ्यंकर (दोनदा अध्यक्ष), बाबूराव गोखले, श्री. ग. वझे, अण्णासाहेब लठ्ठे, नरिमन व सरदार वल्लभभाई पटेल यांची नियुक्ति करण्यांत आली होती; यांपैकी तीन काँग्रेसपक्षीय, दोन लोकशाही पक्षाचे, चार प्रागतिक तर दोघे अपक्षीय होते. द. सं. प्रजापरिषदेच्या कार्यांत मिरजेचे श्री. बा. वि. शिखरे यांनी १९३२ नंतर बराच भाग घेतला. १९३७ मध्ये कै. श्री. नरिमन यांच्या अध्यक्षतेखाली कुडची येथे भरलेल्या अधिवेशनांत काँग्रेस व काँग्रेसेतर कार्यकर्ते असा फरक पडलेला दिसून आला. अशा तऱ्हेचा भेदभाव संस्थानी चळवळींत असूं नये असा महात्माजींचा दंडक होता, पण त्यांच्या सूचनेकडे पुढे दुर्लक्ष करण्यांत आलें. १९३८ मध्ये सरदार वल्लभभाईसारखा मातबर पुढारी संस्थानी प्रजा-परिषदेला अध्यक्ष मिळूनहि, संस्थानी चळवळीचें पाऊल पुढे पडलें नाही. याचें कारण काँग्रेसचें संस्थानविषयक धोरण हें जरी असलें, तरी परिषदेला पुढे कोणी मार्गदर्शक राहिला नाही. सन १९३८ च्या पूर्वी अभ्यंकर दिवंगत झाले होते, पटवर्धन १९३९ मध्ये देवाधीन झाले आणि केळकर वयोमानाने सार्वजनिक कार्यांतून निवृत्त झाल्यासारखे होते. द. सं. प्रजापरिषदेला योग्य कर्णधार न राहिल्याने पुढे चार पांच वर्षे (१९४३ पर्यंत) द. सं. प्रजापरि-षदेच्या कार्यांत फारशी प्रगति झाली नाही. सन १९४२ च्या अखेरीस

जमखिंडीचे कै. श्री. अनंतराव साबडे यांनी संस्थानी चळवळीचें धुरीणत्व पत्करल्यावर मात्र, परत दक्षिणी संस्थानांतील चळवळीचीं चक्रें जोरांत फिरूं लागलीं.

दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेची १९२१ मध्ये स्थापना झाल्यावर निरनिराळ्या संस्थानांतून राजकीय चळवळीचें बीं रोवलें गेलें आणि त्या वृक्षाची वाढ निरनिराळ्या संस्थानांत कमी अधिक प्रमाणांत थोडक्याच काळांत होऊं लागली. द. सं. हितवर्धक सभेमार्फत १९२६ पासून 'संस्थानी स्वराज्य' वर्तमानपत्र प्रसिद्ध होऊं लागल्याने संस्थानी कारभारांतील हालहवाल प्रकट होऊं लागली आणि संस्थानी राजवटीचीं लक्तरें चव्हाट्यावर येऊं शकलीं. सांगलीचा 'दक्षिण महाराष्ट्र' व 'विजय', सावंतवाडीचा 'वैनतेय', कोल्हापूरचें 'विद्याविलास' यासारख्या कांही वृत्तपत्रांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. १९२१ मध्ये द. सं. प्रजापरिषदेचें पहिलें अधिवेशन झाल्यानंतर, पुढील वर्षींच मिरज, सांगली, भोर वगैरे संस्थानांतून प्रजापरिषदा भरण्यास सुरुवात होऊन संस्थानांत राजकीय-हक्कदानाची मागणी करतांना स्थानिक गाऱ्हाणींहि दरबारांच्या समोर मांडण्यास सुरुवात झाली.

चळवळीची प्रगति आणि परागति

मिरज संस्थान प्रजापरिषदेची १९२२–१९३२ च्या दहा वर्षांच्या काळांत सहा अधिवेशनें झालीं. मिरजेंतील पाण्याची टंचाई आणि सारावाढीचा सत्याग्रह हे दोन प्रश्न मोठ्या हिरिरीने लढले गेले. मिरजेच्या राजकारणांत प्रभावीपणें कार्य केलेली व्यक्ति म्हणजे बा. वि. शिखरे ही होय. त्यांच्यांत संघटना-कौशल्य होतें आणि त्याचा उपयोग त्यांनी मिरज प्रजापरिषद् बळकट करण्याच्या कामीं भरपूर केला. श्री. शिखरे यांना या कामीं बंदिवासहि सोसावा लागला. पण संस्थानाधिपतीच्या प्रजाविन्मुख धोरणामुळे या सर्व चळवळींना यावें तसें यश आलें नाही. १९३१ मध्ये संस्थानाधिपतींनी थोडयाशा राजकीय सुधारणा दिल्या, पण विधिमंडळांतून जे ठराव पास झाले ते स्वीकारण्याची तयारी दरबारने न दाखविल्यामुळे विधिमंडळांतील वक्तव्य हें अरण्यरुदन ठरलें. याचा परिणाम सार्वजनिक कार्यकर्त्यांच्यामध्ये वैफल्याची भावना निर्माण होण्यांत झाला आणि त्यामुळे १९३२ नंतर पुढे सात आठ वर्षेपर्यंत परिषदेचें एकहि अधिवेशन भरलें नाही आणि राजकीय आघाडीवर असलेलें मिरज मागासलेलें झालें.

सांगली संस्थानांत सांगली प्रजापरिषदेचीं १९२२ ते १९४० च्या काळांत पंधरा अधिवेशनें झालीं. सांगलींतील चळवळ संपूर्णपणे सनदेशीर पायावर रचलेली होती. येथील चळवळींत कै. प्रो. अभ्यंकर, कै. वैद्य गोविंदराव बिनिवाले, कै. केशवराव छापखाने, श्री. का. ह. खाडिलकर, कै. अश्वत्थराव महिषी, कै.विष्णुपंत देशपांडे यांचा प्रमुख भाग होता. सांगलीचे अधिपति उदारमनस्क असल्यामुळे सांगली संस्थानांतील राजकीय चळवळींत साराबंदी, कार्यकर्त्यांना तुरुंगवास वगैरे गोष्टी घडल्या नाहीत. सर्व राजकारण संथपणें चाललेलें असे. १९३० मध्ये राजकीय सुधारणांचा पहिला हप्ता देण्यांत आला आणि १९३८ च्या दुसऱ्या हप्त्याने द्विदल राज्यपद्धति स्थापन करण्यांत येऊन पहिले मंत्री म्हणून अश्वत्थराव महिषी यांची नियुक्ति करण्यांत आली.

जमखिंडी संस्थान प्रजापरिषद् ही एक जबरदस्त राजकीय संघटना तेथील कार्यकर्त्यांनी निर्माण केली होती. या कार्यकर्त्यांत कै. श्री. अनंतराव साबडे, डॉ. हुल्याळकर, श्री. शिवाजीराव कुलकर्णी यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. सनदशीरपणें चळवळ करीत असतानाहि, प्रसंग पडेल तेव्हा आपलें तेज प्रकट करण्यास परिषदेने कधी मागे पुढे पाहिलेलें नाही. लढ्याचा धसका बसल्याशिवाय जमखंडी दरबारने एकहि लोकहिताची गोष्ट केली नाही, असें विधान करणें अतिशयोक्तीचें ठरणार नाही. सन १९२७ ते १९३९ च्या बारा वर्षांच्या काळांत जमखिंडी प्रजापरिषदेचीं सात अधिवेशनें झालीं आणि जमखंडी विधिमंडळाची स्थापना १९३४ मध्ये होऊन राजकीय सुधारणांचा पहिला हप्ता प्रजेला मिळाला.

कुरुंदवाडमध्ये (थोरली पाती) १९२७ पर्यंत 'दरबार' भरविण्याची पद्धत असे आणि त्यांत संस्थानच्या राज्यकारभाराबद्दल आढावा घेतला जाऊन प्रजापुढाऱ्यांना आपलें मत प्रदर्शित करण्याची संधि मिळत असे. १९२७ मध्ये संस्थानाधिपतीच्या निधनाने व नवीन अधिपति अज्ञान असल्याने 'दरबार' भरविण्याची प्रथा मागे पडली. कुरुंदवाड प्रजापरिषदेचीं तीन अधिवेशनें (१९३१, १९३२, १९३९) भरविलीं गेलीं. कुरुंदवाड (धाकटी पाती) संस्थानांत प्रजापरिषदेचें रीतसर अधिवेशन १९४० पर्यंत भरलेंच नाही; पण शेतकरी संघाच्या नैमित्तिक मागण्यांवरून शेतसारा कमी झाला आणि १९४० च्या आरंभीं राजकीय सुधारणांच्या घटना समितीचें काम चालू होतें. मिरजमळा संस्थानांत १९४० पर्यंत प्रजापरिषद् जन्मासहि

आली नव्हती, तरी संस्थानाधिपतीने १९३६ मध्ये, बदलतें कालमान ओळखून, संस्थानांत विधिमंडळाची स्थापना केली होती.

फलटण व सावंतवाडी संस्थानांतील कारभार हा प्रजाहितैषी असल्याने तेथे राजकीय चळवळीची गरज भासलीच नसावी. आपल्या प्रजेची मागणी नसतांना फलटणच्या अधिपतींनी १९२९ मध्ये विधिमंडळाची स्थापना करून व संस्थानच्या शासनमंडळांत स्थानिक वकील श्री. दाणी यांचा अंतर्भाव करून लोकपक्षीय मंत्री घेण्यांत फलटणने आघाडी मारली. सावंतवाडी संस्थान प्रजापरिषदेचें पहिलें अधिवेशन १९२८ मध्ये मुंबईस भरलें. त्यानंतर पुढे बारा वर्षांत दुसरें अधिवेशन भरलें नाही. १९४० च्या आधी संस्थानांत सर्वत्र सभा होऊन जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यांत येऊ लागली. संस्थानच्या रीजंट श्री. राणीसाहेब यांनी कालमान ओळखून जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचें आपलें ध्येय असल्याचें जाहीर केलें.

जत संस्थानचा कारभार सामान्यतः बरा असल्यामुळे तेथे १९३८ पर्यंत राजकीय चळवळ झालीच नाही. या वर्षी जत प्रजापरिषदेचें पहिलें अधिवेशन कर्नाटकचे पुढारी कै. गंगाधरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरलें व पुढे दोन वर्षांनी म्हणजे ता. ८-१-१९४० रोजीं विधिमंडळाची स्थापना करण्यांत आली.

आघाडीवरील औंध संस्थान

सर्व दक्षिणी संस्थानांच्या नव्हे तर, भारतीय संस्थानी राजवटींत औंध संस्थान आघाडीवर होतें. संस्थानांत राजकीय सुधारणांचा उच्चार होण्यापूर्वी म्हणजे १९२१ मध्ये औंधचे प्रगमनशील अधिपति कै. श्री. बाळासाहेब पंत-प्रतिनिधि यांनी संस्थानच्या अंदाजपत्रकाबाबत प्रजाधुरीणांचा सल्ला घेण्यास सुरुवात करून राजकीय सुधारणांचा पाया घातला. अशा तऱ्हेची प्रथा सुरू करणारे श्रीमंत बाळासाहेब हेच पहिले संस्थानिक होत; आणि पुढील अठरा वर्षांच्या काळांत आपल्या संस्थानांत संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणारा हा पहिलाच राजा होय. १९३९ मध्ये ग्रामपंचायतीवर अधिष्ठित असलेली संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना करण्यांत येऊन प्रजेला पूर्ण स्वराज्य देण्यांत आलें. श्रीमंत बाळासाहेब औंधकर यांना, त्यांचे सुपुत्र बॅ. आप्पासाहेब पंत यांचें विधायक सहकार्य लाभल्यामुळे राजेसाहेबांना आपल्या संस्थानांत संपूर्ण राज्यपद्धति स्थापन करणें सोपें झालें. औंधच्या राज्यघटनेला

महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू आदि महामनांचा आशीर्वाद लाभलेला होता. औंधांतील हा नवा प्रयोग यशस्वी होईल की नाही याची शंका कित्येकांना वाटत होती, पण ती अनुभवाने फोल ठरली. ग्रामपंचायतींचा कारभार चांगला झाला. औंध संस्थानच्या राजकीय सुधारणांच्या कामीं कै. श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर, पं. सातवळेकर, बॅ. आप्पासाहेब पंत यांचे श्रम कारणीं पडले. औंध प्रातिनिधिक सभांचीं अधिवेशनें वेळेवर होत असूनहि सन १९३१–३७ च्या दरम्यानच्या काळांत औंध प्रजापरिषदेचीं चार अधिवेशनें झालीं आणि लोकांच्या स्थानिक तक्रारींना वाचा फोडण्यांत आली.

दडपशाही करणारी संस्थानें

औंधसारखें प्रगमनशील व आघाडीवर असलेलें एक संस्थान महाराष्ट्रांत असतांना, त्याच प्रदेशांत भोरसारखें प्रतिगामी संस्थान पाहावयास सापडतें. भोरांतील चळवळ १९२१ मध्ये जी सुरू झाली, तीच मुळी सभाबंदीचा कायदा मोडून; आणि हा कायदा कोणीं मोडला तर न. चिं. केळकर व वामनराव पटवर्धन यांच्यासारख्या संस्थानी चळवळीच्या सात्त्विक प्रवर्तकांनी. यावरून भोरांतील राजवट कशा तऱ्हेची होती याची कल्पना येईल. भोरांतील प्रजापक्षीय लढा हा अत्यंत तेजस्वी असून, खालसांतील कोणत्याहि चळवळीस मागे टाकेल, इतका मोठा आणि त्यागी कार्यकर्त्यांच्या जीवनाने भरलेला आहे. कै. गोपिनाथराव पोतनीस व कै. भाऊसाहेब शेटये हे भोरांतील चळवळीचे कर्णधार. या नेत्यांची आपल्या अनुयायांवर इतकी पकड होती की, त्यांच्या हाकेसरशी हजारों मावळे डोंगरकपारी तुडवीत ठरलेल्या ठिकाणीं येत असत. पोतनिसांना भोर दरबारचा अनेक वेळां पाहुणचार घ्यावा लागला. इतरहि अनेक कार्यकर्ते राजबंदी झाले होते. पण या दडपशाहीमुळे भोरची प्रजा नामोहरम झाली नाही. प्रजापरिषदेला विरोधी पक्ष म्हणून ज्यांनी काढला आणि ज्या लोकपक्षास दरबारी पाठिंबा होता, त्या लोकपक्षाच्या धुरीणांस सुद्धा सचिवांच्या कारवाईची इतकी शिसारी आली की, त्यांनी प्रजासभेचा आश्रय घेतला. कै. चंद्रशेखरराव आगाशे व कै. ग. मा. पानसे हे अशांपैकी होत. भोर प्रजापरिषदेचीं १९२२–१९३९ च्या कालखंडांत बारा अधिवेशनें झालीं. १९२८ मध्ये परिषदेच्या दडपणामुळे विधिमंडळ स्थापलें गेलें, पण सचिवांची राजकीय वृत्ति अत्यंत आकुंचित व कृपण असल्यामुळे राजकीय सुधारणांच्या बाबतींत तें मागासलेलेंच राहिलें. आपल्या संस्थानांतील सुबुद्ध, शहाण्या,

संघटनाकुशल अशा पुढाऱ्यांचा सल्ला सचिवांनी घेतला असता, तर भोरचा कायापालट झाला असता. पण तें भाग्य मिळविण्याची पात्रता राजेसाहेबांच्या ठायीं नव्हती. त्यामुळे भोरांत सत्याग्रह व कायदेभंगाचे जेवढे प्रकार घडले आणि दडपशाही झाली, तेवढी द. महाराष्ट्रांतील कोणत्याहि संस्थानांत झाली नाही.

दक्षिण महाराष्ट्रीय संस्थानांत वाडी जहागिरीसकट जीं अठरा संस्थानें आहेत, त्यांत कोल्हापूर हें सर्वांत मोठें संस्थान होय. कोल्हापूर ही छत्रपति शिवाजीमहाराजांची गादी असल्याने कोल्हापूर संस्थानाबद्दल एक विशेष प्रकारचा आदर व आपुलकी कोल्हापुरच्याच काय, पण महाराष्ट्रीय जनमनांत रुजलेली आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं कोल्हापुरांत राजकीय चळवळ झाली, पण दडपशाही करून ती मारून टाकण्यांत आली. या वेळेच्या चळवळींतील प्रमुख बळी म्हणजे कै. प्रो. विजापूरकर, कै. प्रो. वा. म. जोशी व पं. सातवळेकर हे होत. जेव्हा जेव्हा राजकीय जागृति करण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा तेव्हा तो निर्घृणपणें दडपून टाकण्यांत आला. कै. श्री. सर शाहू महाराज छत्रपति हे अत्यंत कर्तबगार होते, पण त्यांना राजकीय जागृतीचें वावडें होतें. कोल्हापुरांत त्यांनी व कै. श्री. सर राजाराम महाराजांनी शिक्षणाचा प्रसार केला, सामाजिक समतावादाचा पुरस्कार केला, पण राजकीय सुधारणांच्या बाबतींत मात्र आपल्या प्रजेला त्यांनी अज्ञानी व मागासलेले ठेवले. इतर महाराष्ट्रीय संस्थानांत थोडच्या फार राजकीय सुधारणा प्रजेच्या पदरांत पडल्या, औंधसारख्या छोटच्या संस्थानांत संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति अंमलांत आणली गेली, पण कोल्हापुरांत मात्र एकजिनसी हुकूमशाहीच छत्रपतींनी चालू ठेवली. कोल्हापूरच्या या निरंकुश राजसत्तेवर सन १९३८ मध्ये फार जोराचा प्रहार भाई माधवराव बागल यांनी केला. ता. ६।२।१९३९ रोजीं जयसिंगपूर येथे कोल्हापूर प्रजापरिषदेची रीतसर स्थापना झाल्यावर पुढे दरबार व परिषद् यांच्यामध्ये झगडा सुरू झाला. श्री. रत्नाप्पा कुंभार या चांगल्या संघटकाचा लाभ कोल्हापूर परिषदेस झाल्यामुळे फारच थोडच्या काळांत कोल्हापूर प्रजापरिषद् ही प्रभावी संस्था झाली. ता. १५-४-१९३९ रोजीं कै. डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर प्रजापरिषदेचें पहिलें अधिवेशन कोल्हापूरपासून तीस मैलांवर सांगलीनजिकच्या कुपवाड माळावर भरलें होतें (संस्थान हद्दींत प्रजापरिषद् भरविण्यास बंदी होती). परिषदेच्या कार्याला आता यश येण्याचें प्रमुख कारण म्हणजे मागीलप्रमाणे राजकीय चळवळीचे पुढारी

ब्राह्मण नव्हते, तर भाई बागलांप्रमाणे छत्रपतींच्या रक्ताचे म्हणजे मराठा होते. भाई माधवराव बागल हे खंदे वक्ते असून त्यांच्या वक्तव्याचा श्रोतृगणावर फारच उत्तम परिणाम होत असे. ते बहुजनसमाजाच्या भाषेंत आणि त्यांच्या जीवनाशीं समरस होता येईल अशा थाटाने बोलत असल्याने, ते थोड्याच काळांत लोकप्रिय पुढारी झाले. सभाबंदीचा हुकूम मोडल्यामुळे ते व त्यांचे सहकारी यांना दरबारी रोषास बळी पडावे लागले. त्याचा परिणाम परिषद जास्तच लोकप्रिय होण्यांत झाला. भाई बागल व श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या जोडीने कोल्हापूरच्या दुर्गम राजसत्तेला खिंडार पाडलें हें निर्विवाद. कोल्हापुरची पहिली प्रजापरिषद् भरविण्याच्या कामीं श्री. शंकरराव देव, ह. मो. जोशी व बा. वि. शिखरे यांनी भाई बागलांना बरीच मदत केली होती.

अक्कलकोट संस्थानांत १९२३, १९२४ व १९२९ या तीन वर्षी प्रजापरिषदांचीं अधिवेशनें झालीं. परिषदेबाबत दरबारचें धोरण सहानुभूतीचें तर नव्हतेंच, उलट दडपशाहीचें होतें. कार्यकर्त्यांना फार त्रास देण्यांत आला. त्यामुळे पुढे बरींच वर्षें परिषद् भरलीच नाही. मात्र १९३८च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर अक्कलकोट दरबारने राजकीय सुधारणा देण्याचें जाहीर केलें.

मुधोळची राजवट दडपशाहीबद्दल प्रसिद्ध. कै. नानासाहेब मसुरकरांसारख्या सत्प्रवृत्त कार्यकर्त्यास या दडपशाहीची चांगलीच झळ बसली होती. त्यावेळचे राजेसाहेब १९३७ मध्ये निधन पावल्यावर मुधोळांतील राजकीय जीवनास प्रारंभ झाला. मुधोळची पहिली प्रजापरिषद ता. १८-४-१९४० रोजीं डॉ. नागनगौडा यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

जंजिरा व सावनूर या दोन मुसलमान अधिपतींच्या संस्थानांपैकी जंजिरा संस्थानांत १९२६, १९२७ व १९२८ मध्ये प्रजापरिषदेचीं तीन अधिवेशनें झालीं. त्यामुळे दरबार खवळून जाऊन तेथें दडपशाही करण्यात आली आणि कार्यकर्त्यांना तुरुंगांत टाकण्यांत आलें. त्यामुळे पुढे चळवळीचें पाऊल मागे पडलें तें पडलेंच. सावनूर संस्थानांत कोणतीच राजकीय चळवळ झाली नाही.

रामदुर्ग चळवळीपासून धडा

रामदुर्गमध्ये १९३८ पर्यंत कसलीहि राजकीय चळवळ नव्हती. या वर्षी अवर्षणामुळे शेतकऱ्यांची पांचावर धारण बसली होती. या दुष्काळी परिस्थितीचा दरबारने सहानुभूतिपर विचार न करतां शेतसाऱ्याची वसुली

करण्याचें धोरण ठरविल्यामुळे शेतकऱ्यांत असमाधान व असंतोष पसरला आणि त्याचा अयोग्य फायदा नव्याने स्थापन झालेल्या रामदुर्ग प्रजासंघाने घेण्याचें ठरविलें. जें विष आजवर संस्थानी चळवळींत विशेषत्वानें आलें नव्हतें, त्याचा प्रसार प्रजासंघाच्या पुढाऱ्यांनी केला. हें विष कोणतें ? तर जातीय व भाषिक वाद. रामदुर्गचे अधिपति ब्राह्मण व मराठी भाषिक, तर प्रजा लिंगायत आणि कानडी भाषिक. रामदुर्ग प्रजासंघाने ब्राह्मण-लिंगायत आणि मराठी-कानडी द्वैताचा फायदा घेऊन रामदुर्ग दरबारविरुद्ध जहरी प्रचार केला; आणि त्याचा परिणाम १९३९ मध्ये भीषण दंगा होण्यांत झाला. दरबार व प्रजा-पुढारी यांच्यामध्ये अनेकदा वाटाघाटी होऊन समझोता झाला, पण प्रत्यक्षांत या समझोत्याच्या उपयोग झाला नाही. सुरक्षा कायद्याखाली पकडलेल्या पुढाऱ्यांना सोडवून घेण्यासाठी लोकांनी तुरुंगावर हल्ला केला, आणि पोलिसांच्या गोळ्याच संपल्यामुळे दंगेखोरांना मोकळें रान सापडलें. त्यांनी तुरुंग जाळला, आठ पोलिसांना जाळलें आणि गावांत लुटालूट केली. लष्कराच्या मदतीने पुढे रामदुर्गांत शांतता निर्माण करण्यांत आली.

पण रामदुर्गच्या दंगलीचे परिणाम फार दूरगामी झाले. या दंगलीमुळे असें दिसून आलें की, छोट्या संस्थानांतील संरक्षण-व्यवस्था फार तोकडी आहे. याचमुळे द. संस्थानांच्या रेसिडेंटने समाईक पोलिस दलाची योजना सर्व संस्थानांवर लादली. रामदुर्गचा धडा इतर संस्थानिकांना फार स्फोटक वाटला आणि त्याचा परिणाम त्यांच्या धोरणांत लगेच दिसून आला. १९३८ ते १९४० च्या काळांत बऱ्याच संस्थानांत शेतसाऱ्यांतून सूट व कपात करण्यांत आली. कांही संस्थानिकांनी राजकीय सुधारणांचें आश्वासन दिलें, आणि चळवळीवर फुंकर मारण्याचा प्रयत्न केला. यावेळेपर्यंत संस्थानांतून ज्या राजकीय चळवळी झाल्या, तेथे जातीय विष अगर भाषिक वाद निर्माण करण्यांत आला नव्हता. पण रामदुर्गच्या चळवळींत प्रजासंघाच्या पुढाऱ्यांनी अयोग्य वाद घुसडून देऊन, राजकारणास अनिष्ट वळण लावलें, व त्याचे पुढे दुष्परिणाम झाले. कोणतीहि चळवळ करतांना, जातीय वा भाषिक वाद डोकावणार तर नाही ना, अशी भीति सदैव कार्यकर्त्यांना वाटूं लागली.

राजकीय प्रगतीचा आढावा

दक्षिणी संस्थानांतील प्रजापक्षीय चळवळीचा वर जो धावता परिचय करून देण्यांत आला आहे, त्यावरून कोणत्या संस्थानांत कशी चळवळ चालू

होती याची सम्यक् कल्पना येऊं शकेल. राजकीय दृष्ट्या दक्षिण महाराष्ट्रांतील अठरा संस्थानांमध्ये कोणती परिस्थिति होती याचा थोडक्यांत आढावा घेणें उपयुक्त ठरेल. औंध संस्थानांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति चालू झालेली होती. फलटण व सांगली या दोन संस्थानांत द्विदल राज्यपद्धति चालू होऊन लोकपक्षीय मंत्री संस्थानच्या शासनांत अंशभागी आले होते. भोर, जमखिंडी, मिरज व मिरजमळा या चार संस्थानांत कमी जास्त अधिकाराचीं विधिमंडळें स्थापण्यांत आलेलीं होतीं. अक्कलकोट, कुरुंदवाड (धाकटी पाती), जत, रामदुर्ग व सावंतवाडी या पांच संस्थानांतून राजकीय सुधारणा देण्याचें आश्वासन देण्यांत आलें होतें, आणि त्या दृष्टीने कारवाई होत होती. कोल्हापूर, जंजिरा, कुरुंदवाड (थोरली पाती), मुधोळ व सावनूर या पांच संस्थानांतून राजकीय सुधारणांचें आश्वासनहि देण्यांत आलेलें नव्हतें. वाडी ही जहागीर असल्यामुळे तेथे राजकीय सुधारणा होण्याची शक्यताच नव्हती.

* * *

२

दुसऱ्या महायुद्धाच्या सावल्या

(१९४०–१९४२)

राजनिष्ठेच्या प्रदर्शनाची संधि

मागील प्रकरणांत १९४० च्या प्रारंभीं द. म. संस्थानांतील राजकीय सुधारणांची परिस्थिति काय होती आणि कोणकोणत्या संस्थानांतून प्रजापरिषदा भरून लोकजागृतीचें कार्य कसें होत होतें याचा धावता आढावा घेण्यांत आलेला आहे. एप्रिल १९३९ मध्ये रामदुर्गांत जो दंगा झाला, त्यामुळे द. महाराष्ट्रांतील बहुतेक संस्थानांतून राजकीय चळवळीची एक लाटच येऊन गेली, पण ती लाट अर्थातच अल्पजीवी ठरली. ता. ३-९–१९३९ रोजीं युरोपिअन महायुद्धांत इंग्लंड सामील झाल्यामुळे हिंदी राजकारणांत फरक पडूं लागला. ब्रिटनचा हिंदुस्थान अंकित असल्यामुळे या महायुद्धांत तो ओढला गेला आणि त्यामुळे जुने प्रश्न मागे पडून नवीन प्रश्न उत्पन्न झाले. या युद्धामुळे संस्थानिकांना ब्रिटनबद्दलची आपली राजनिष्ठा प्रकट करण्यास अपूर्व संधि मिळून संस्थानांतील राजकीय सुधारणांकडे दुर्लक्ष करण्यास निमित्त मिळाले. आधीच उल्हास त्यांत फाल्गुन मास ! युद्धाला मदत करण्यासाठी संस्थानिकांनी आपापल्या संस्थानांतून सैन्यभरती करण्यास सुरुवात करून आपापल्या मगदुराप्रमाणे युद्धनिधीला साहाय्य केलें. युरोपमध्ये हिटलरने लोकशाहीवर जो आघात केला होता, त्यास तोंड देण्यासाठी इंग्लंड या युद्धांत पडलें; पण ज्या लोकशाही-च्या जपवणुकीसाठी संस्थानिक मदत करीत होते, त्याचें वास्तव मूल्य त्यांना न कळल्याने त्यांनी आपापल्या संस्थानांतून मात्र लोकशाहीची राजवट आणण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे त्यांची युद्धाला होत असलेली मदत ही सद्धेतूची निदर्शक होती, असें कोणासच वाटूं शकलें नाही. युद्धकार्यास मदत देण्याच्या बाबतींत काँग्रेस उदासीनच होती, व त्यामुळे संस्थानी जनतेनेहि युद्धकार्यास विशेष मदत केली नाही. इंग्लंडला भारताकडून सक्रिय युद्धसाहाय्य पाहिजे होतें, आणि तें मिळविण्याचा मार्ग म्हटला म्हणजे भारताला राजकीय सुधारणा देऊन तेथील जनतेची आपुलकी संपादन करणें हा होता. म्हणून व्हाईसरॉय लॉर्ड

लिन्‌लिथगो यांनी ता. ७-८-१९४० रोजीं पुढीलप्रमाणे घोषणा केली :— (१) युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानला वसाहतीचें स्वराज्य देणें; (२) व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळावर हिंदी प्रतिनिधि घेणें; (३) युद्धसमाप्तीनंतर नवीन राज्यघटनेचा आराखडा तयार करण्यासाठीं प्रातिनिधिक समिति नेमणें. कॉंग्रेसची संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी असल्याने तिने व्हॉईसरॉयांच्या या घोषणेला अनुकूल प्रतिसाद दिला नाही. यानंतर भारताचा युद्धविरोध दर्शविण्याकरता महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. ही चळवळ केवळ खालसा मुलखापुरतीच मर्यादित होती. संस्थानांत कोणीहि वैयक्तिक सत्याग्रह करूं नये असें बंधन महात्माजींनी घातल्यामुळे या चळवळीचे पडसाद दाक्षिणी संस्थानांत उमटले नाहीत.

‘चले जाव’ ची चळवळ

भारताचें युद्धकामीं सहकार्य मिळविण्यासाठी आणि त्याकरता भारतांतील राजकीय पेंचप्रसंग सोडविण्याची खटपट करण्यासाठी मार्च १९४२ मध्ये सर स्टॅफोर्ड क्रिप्स भारतांत आले होते. इंग्लंड हिटलरशीं प्राणपणाने लढत होतें आणि १९४० मध्ये जी युद्धपरिस्थिति होती, तींत १९४२ मध्ये इंग्लंडच्या बाजूने अनुकूल असा फरक पडत चालला होता. असें जरी असलें, तरीं हिंदुस्थानचें सहकार्य इंग्लंडला पाहिजेच होतें. युद्धकाळांत व युद्धानंतर राजकीय सुधारणांचें स्वरूप काय असावें, याबद्दलची क्रिप्स यांची जी योजना होती, ती त्यांनी येथील राजकीय पक्षापुढे मांडली. पण त्या बाबतींत त्यांचें येथील राजकीय पक्षाशीं मतैक्य होऊं शकलें नाही. कॉंग्रेसला अखंड भारत स्वतंत्र व्हावयास पाहिजे होता, आणि तोहि युद्धकाळांत; तर मुस्लीम लीगला भारताचीं छकलें करून पाकिस्तानची निर्मिति करून घ्यावयाची होती. यामुळे सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांची शिष्टाई अयशस्वी होऊन त्यांना रिक्त हस्तें परत जावें लागलें. ब्रिटनमधील चर्चिल सरकार कांही विशिष्ट अधिकार भारतास देण्यास तयार होतें; पण कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांच्यामध्ये पाकिस्तानच्या मुद्यावर मूलभूत फरक असल्याकारणाने त्यांच्यांत एकमत झालें नाही यांत आश्चर्य नाही. या मतभिन्नतेमुळे येथील राजकीय डाव कुजण्यास मदतच झाली. महात्मा गांधींना अशी राजकीय निष्क्रियतेची परिस्थिति फार दिवस चालू ठेवणें योग्य वाटलें नसल्यास आश्चर्य नाही. त्यांनी आपला ‘चले जाव’ कार्यक्रम कॉंग्रेसपुढे मांडून त्यास भारतीय कॉंग्रेस महासमितीची संमति मिळविली

आणि या चळवळीचे सर्वाधिकारी म्हणून ता. ८ ऑगस्ट १९४२ रोजीं भरलेल्या महासमितीच्या सभेंत त्यांची एका ठरावाने नियुक्ति करण्यांत आली. या ठरावाची कार्यवाही होण्यापूर्वीच ता. ९।८।१९४२ रोजीं हिंदुस्थान सरकारने मोठ्या प्रमाणावर मोठमोठ्या पुढाऱ्यांची सार्वत्रिक धरपकड केली आणि पुढे योग्य नेत्याच्या मार्गदर्शनाच्या अभावीं, ज्याला योग्य वाटेल, त्याप्रमाणे त्याने चळवळ केली. या 'छोडो हिंदुस्थान'च्या चळवळींत अहिंसेला न शोभणारे असे अनेक प्रकार झाले; पण त्याचें विवरण करण्याची ही जागा नव्हे.

संस्थानी मुलखांत काँग्रेसने विशेष चळवळ करूं नये असें महात्माजींचें सर्वसामान्य मत असे. ता. १५।९।१९४० च्या हरिजनमध्ये लिहितांना महात्माजींनी म्हटलें होतें की "संस्थानांत काँग्रेसचे सभासद करून घेऊं नये व संस्थानांना पचतील, एवढ्याच चळवळी संस्थानी प्रजेने कराव्यात." संस्थानविषयक चळवळींबाबत आजवर इतकें सबुरीचें असलेलें महात्माजींचें धोरण 'छोडो हिंदुस्थान'च्या चळवळीच्या वेळीं पार बदललें आणि त्यांनी "संस्थानांवरील ब्रिटिश सत्तेचें सार्वभौमत्व नष्ट करण्याची चळवळ संस्थानी प्रजेने करावी" असा आदेश संस्थानी कार्यकर्त्यांना दिला. संस्थानिकांनी ब्रिटिश सार्वभौमत्व झुगारण्याची मागणी अपवादात्मक अशा संस्थानी प्रजापरिषदांनीं केली, आणि अशा अपवादांत मिरज व कोल्हापूर प्रजापरिषदा होत्या.

भारतीय संघराज्यांत संस्थानांना मिळालेलें स्थान

१९३५ च्या राज्यघटनेप्रमाणे हिंदी संघराज्याची जी घटना व्हावयाची होती, तिच्यांत सामील होण्याची मोकळीक संस्थानिकांना ठेवण्यांत आली होती. अशा तऱ्हेची सवलत पूर्वीच्या सुधारणा कायद्यांत नव्हती. १९०९ च्या मोर्ले-मिन्टो सुधारणा घ्या अगर १९१९ च्या मॉन्टफर्ड सुधारणा पाहा, त्या केवळ खालसा मुलखाकरताच होत्या आणि भारताचा एकतृतीयांश असलेला संस्थानी भूभाग हा या सुधारणांपासून दूर ठेवण्यांत आला होता. १९३५ च्या कायद्याने मात्र प्रथमच संस्थानी आणि खालसा मुलखाची निगरगाठ बसावयाची होती. पण १९३५–१९३९ पर्यंतचा चार वर्षांचा काळ चर्चा, वाटाघाटी, वादविवाद यांनीच व्यापला आणि कोणताच निर्णय घेतला गेला नाही. दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर ब्रिटिश सरकारने ही हिंदी संघराज्याची योजना

युद्धसमाप्तीपर्यंत स्थगित केली. पण १९४५ मध्ये युद्ध संपलें, त्यावेळीं एकंदर राजकीय परिस्थितीचा चेहरा इतका बदलला होता की, ही संघराज्याची योजना कायमची बाजूला सारली गेली.

नालायक कोण–प्रजा कीं राजा ?

मागील प्रकरणांत द. संस्थानांपैकी राजकीय सुधारणा कोणकोणत्या संस्थानांत मिळाल्या याचें दिग्दर्शन करण्यांत आलेंच आहे. १९४० ते १९४२ च्या दरम्यान संस्थानांतून राजकीय सुधारणा होण्याबाबत फारशी प्रगति झाली नाही. युद्ध चालू असल्यामुळे आणि खालसांतील राजकीय वातावरण तंग नसल्यामुळे, संस्थानिकांनी राजकीय सुधारणांबद्दल दिलेलीं आश्वासनें पार पाडण्याच्या कामीं वेळकाढूपणाचें धोरण स्वीकारल्याचें दिसून येतें; पण आपल्यावर असा आरोप केला जाऊं नये म्हणून, राजकीय सुधारणा पेलण्याची प्रजेची लायकी तरी आहे काय, असा प्रश्न संस्थानी दरबारांकडून उपास्थित केला जाऊं लागला. संस्थानिकांचा हा कोटिक्रम त्यांच्या विरुद्ध फार गेला; आणि मग त्यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठविली गेली. संस्थानिकांची तरी राज्य चालविण्याची लायकी काय आहे असा सरळ प्रश्न त्यांना विचारण्यांत येऊं लागला. औंधसारख्या संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुरळीतपणें कार्यवाहींत येऊं शकते, तर त्यापेक्षा किती तरी पटीने जास्त सुशिक्षित व सुधारलेल्या सांगली संस्थानांत हा वाद निर्माण केला जातो, हें आश्चर्य नव्हे काय? यामुळे हा वाद निर्माण करणारांच्याबद्दल कीव आल्याशिवाय मात्र राहात नाही. कोल्हापूरसारख्या साक्षरतेंत पुढारलेल्या संस्थानांत जेव्हा राजकीय सुधारणांचा प्रश्न टांगणीवर टाकला जातो, तेव्हा छत्रपतींची आपल्या प्रजेला विश्वासांत घेण्याची तयारी नाही, असाच त्याचा अर्थ कोणीं काढल्यास त्यांत कोणाचीच चूक होणार नाही. तीच गोष्ट जमखिंडी संस्थानची. मग नालायक कोण ? संस्थानिक कीं प्रजा ? आपल्या संस्थानांतील जाणत्या आणि सुबुद्ध प्रजापुढाऱ्यांबद्दल संस्थानिकांना विश्वास आणि आपुलकी नव्हती, हें असल्या वादाचें खरें मूळ आहे. औंधमध्ये आपल्या प्रजेवर विश्वास टाकणारे राजे श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि होते, तर भारतांत कीर्ति मिळविणाऱ्या प्रो. अभ्यंकरांसारख्या गृहस्थाचा संस्थानच्या हितासाठी फायदा करून घेण्याचा वकूब सांगली दरबारजवळ नव्हता; तद्वत् नेमस्तपणें व सत्यनिष्ठेनें काम करणाऱ्या अनंतराव सावडे यांच्यासारख्या गृहस्थांस संस्थानच्या कल्याणासाठी राबवून घेण्याची बुद्धि जमखिंडीच्या अधिपतींमध्ये नव्हती. औंधप्रमाणे स्थानिक बुद्धि-

सत्तेचा फायदा इतर संस्थानिकांनी करून घेतला असता, तर त्याचा परिणाम संस्थानांच्या राजकीय चित्रपटावर वेगळाच झालेला दिसता. सांगली, मिरज वगैरे संस्थानांमध्ये संस्थानाबाहेरील लोकांची वर्णी लावण्याचें वेडच तेथील संस्थानिकांना लागलेलें होतें. या वेडाबद्दल प्रजापरिषद व विधिमंडळें यांच्याकडून कडाडून टीका होत असे. मिरज प्रजापरिषदेचें सातवें अधिवेशन लक्ष्मेश्वरास ता. २२-७-४० रोजीं भरल्यावेळीं त्या वेळच्या स्वागताध्यक्षांनी आपल्या भाषणांत परस्थ नोकरांबद्दल अगदी जहरी टीका केली आणि "आम्ही आमच्यावर नालायखीचा शिक्का मारून घेण्यास तयार नाहीं व आमचा कारभार आम्हासच करावयाचा आहे" असें त्यांनी स्पष्टपणें बजावलें. खालसांतून सेवानिवृत्त झालेल्या नोकरांमध्ये काम करण्याची धमक नसे आणि उर्वरित आयुष्य कोठे तरी घालविण्यासाठी संस्थानांचें कुरण हें त्यांना चांगलें वाटे. स्थानिक लायक व योग्य माणसांना न राबबण्याची जी वृत्ति संस्थानिकांत निर्माण झाली, त्यांतून परस्थ नोकरांचा वाद जन्मास आला. बरे, हे परस्थ नोकर आपल्या अनुभवाचा फायदा देत असतील असें म्हणावें तर तिकडूनहि निराशाच पदरांत पडत असे. संस्थानाबाहेरील गृहस्थांच्या नेमणुका करून संस्थानिकांनी आपल्या विरुद्ध लोकमत खवळून जाण्यास भरपूर मदत मात्र केली.

संस्थानिकांचा सदुपदेशाकडे कानाडोळा

संस्थानांतील राजकीय सुधारणांबद्दल अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या स्थायी समितीने फेब्रुवारी १९४० मध्ये एक ठराव करून लोकशाहीप्रधान राजकीय सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली, आणि या बाबतींत योग्य कारवाई न झाल्यास संस्थानें भारताच्या स्वातंत्र्याच्या मार्गांतील अडगळ ठरतील असें जाहीर केलें. व्हॉईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी मार्च १९४० मध्ये भरलेल्या नरेंद्रमंडळाच्या बैठकींत संस्थानांतील राजकीय सुधारणांची आवश्यकता प्रतिपादन केली. अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या स्थायी समितीच्या दुसऱ्या एका ठरावांत (जुलै १९४०) म्हटलें आहे की, "संस्थानिकांनी तावडतोब जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी. भविष्यकालीन जागतिक परिस्थितींत हें ध्येयसुद्धा आकुंचित वाटूं लागेल; आणि म्हणून प्रजेने पूर्ण स्वातंत्र्य व संपूर्ण लोकशाही राज्यपद्धति मिळविणें हेंच आपलें ध्येय ठेवलें पाहिजे." महात्माजींनी 'हरिजन'मध्ये एक लेख लिहिला,

त्यांत म्हटलें की "संस्थानिकांनी प्रजेच्या सेवकाची भूमिका घ्यावी. त्यांनी आपला कारभार जर सुधारला, तर कॉंग्रेस त्यांना नष्ट करणार नाही असें मी त्यांना आश्वासन देतों." पण पालथ्या घागरीवर पाणी म्हणतात, त्याप्रमाणे या सर्व सदुपदेशांचा संस्थानिकांवर मुळीच परिणाम झाला नाही. ते बदलत्या काळाची पाउलें ओळखूं शकले नाहीत; त्यामुळे पुढे थोड्याच काळांत संस्थानिकांच्या आधिपत्याखाली जबाबदार राज्यपद्धति मिळविण्याचें ध्येय मागे पडून संस्थानांच्या विलिनीकरणाचा आग्रह सुरू झाला.

राजकीय सुधारणांचा वापर

१९४० च्या एप्रिल, जून व ऑक्टोबर मध्ये जत, रामदुर्ग व कुरुंदवाड दरबारांनी आपापल्या राजकीय सुधारणांचा पहिला हप्ता जाहीर केला. भोरांतील आश्वासित सुधारणा अमलांत आणण्याचे बाबतींत दरबारकडून होत असलेली दिरंगाई पाहून भोर प्रजासभेचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब गुप्ते यांनी "नवीन घटना अमलांत येण्याचे बाबतींत दिनावधि केल्यास पश्चात्तापाची पाळी येईल" असा स्पष्ट इषारा कुरूंजी येथे ता. ४-५-१९४० रोजीं भरलेल्या भोर प्रजापरिषदेच्या तेराव्या अधिवेशनांत आपल्या अध्यक्षीय भाषणांत संस्थानाधिपतींस दिला.

राजकीय सुधारणा देतांना संस्थानिकांची सदिच्छा नसल्याने, त्या अपुऱ्या व लोकांच्या हातांत विशेष अधिकार देणाऱ्या नव्हत्या. असें असूनहि प्रजापरिषदांनी मिळालेले अधिकार राबविण्याचें ठरविलेलें होतें. १९३८ मध्ये सांगलीस लोकपक्षीय मंत्री देण्यांत आला आणि पहिले लोकमंत्री म्हणून कै. अश्वत्थराव महिषी यांची नियुक्ति झाली होती. तीन वर्षांनी म्हणजे १९४१ मार्चमध्ये त्यांनी आपले त्यागपत्र दिल्यावर, त्यांच्या जागीं श्री. बाळासाहेब कोरे यांची नेमणूक दरबारने केली. अपुऱ्या अधिकारामुळे महिषींच्या हातून विशेष काम होऊं शकलें नाही. विधिमंडळाच्या बैठकी वेळच्यावेळीं न घेण्याबाबत संस्थानी दरबारें जागृत असून सांगली संस्थानचें अंदाजपत्रक वेळेवर न मांडण्याच्या निषेधार्थ विधिमंडळाच्या परिषद सदस्यांनी आपल्या जागांचें त्यागपत्र १९४० मध्ये देऊन, दरबारच्या कार्यपद्धतीबद्दलचा आपला रोष व्यक्त केला.

मुधोळची राज्यघटना बदलण्याचा देखावा करण्यांत आला, पण या बदलामुळे वस्तुतः अधिकार कमी झाले म्हणून, मुधोळ विधिमंडळाने या राज्यघटनेच्या विरुद्ध ठराव पास केला.

१९४१ मध्ये फलटण संस्थानांत लोकपक्षीय मंत्री श्री. स. रा. भोसले यांच्या हातीं कांही खातीं देण्यांत येऊन तेथे द्विदल राज्यपद्धतीस आरंभ करण्यांत आला व पुढे एक वर्षाने जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचा कायदा जारी करण्यांत येऊन दुसरा मंत्री घेण्याचें जाहीर झालें. आपल्या प्रजेला जास्त अधिकार देण्यांत फलटण नरेशांचा नंबर दुसरा लागतो. (पहिला नंबर औंध नृपतींचा).

१९४२ मध्ये मिरज संस्थानांत जी द्विदल राज्यपद्धति स्थापन करण्यांत आली, तिचा तोंडवळा सांगली घटनेप्रमाणेच होता. सावंतवाडींत विधिमंडळ स्थापन करण्याचा आपला मनोदय रीजंट राणीसाहेबांनी १९४२ सप्टेंबरमध्ये जाहीर केला. भोर व कुरुंदवाडमध्ये मंत्री घेण्याचें आश्वासन देण्यांत आलें.

१९४१ मध्ये जमखिंडी संस्थानांत द्विदल राज्यपद्धतीस सुरुवात करण्यांत आली, आणि लोकपक्षीय मंत्र्याच्या हातीं कांही खातीं देण्यांत आलीं. परंतु हा मंत्री नेमतांना, बहुसंख्याक प्रजापक्षाचा इसम घेतला नाही, म्हणून प्रजापक्षाने सभात्याग करून आपला विरोध प्रकट केला. १९४२ मध्ये जमखिंडी विधिमंडळाच्या कामाशीं असहकार पुकारतांना, परिषदेने पुढीलप्रमाणे खुलासा केला :— " येथील सुधारणा असमाधानकारक असूनहि, त्या राबविण्याचें ठरविण्यांत आलें. पण दरबारला परिषदेच्या सहकाराची गरज नाही असें दिसून आल्यामुळे आम्हाला असहकाराचा मार्ग स्वीकारावा लागला. मंत्र्याला फारसा पैसा खर्च करण्यास मिळूंच नये अशी एकंदर कायद्याची रचनाच आहे. " भोर घटना समितीची १९४२ फेब्रुवारीमध्ये सभा भरल्यावेळीं १९३८ मध्ये राजेसाहेबांनी जें आश्वासन दिलें होतें, त्याच्या विरोधी सरकारी सभासदांचें वर्तन होऊं लागल्यामुळे घटना समितीच्या सर्व प्रजापक्षीय सभासदांनी असहकार पुकारला. या उदाहरणां-वरून राजे लोकच आपल्या प्रजेचें विरोधी मत बनविण्यास कसे कारणीभूत होत होते तें सहजीं दिसून येतें.

संस्थानी विधिमंडळांच्या कामाचें विहंगमदृष्ट्या जरी अवलोकन केलें, तरी असें दिसून येतें की, प्रजापक्षीय सभासदांनी मिळालेल्या सुधारणांचा लोकहितासाठी जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केला. दिलेलें हक्कदान टाकाऊ व कुचकामी असलें तरी त्यावर संपूर्ण बहिष्कार परिषदांनी घातल्याचें

दिसत नाही; परंतु प्रजेचा हा सहकार्याचा हात संस्थानी दरबारांनी मात्र खिळाडूपणाने स्वीकारावा तसा स्वीकारला नाही; त्यामुळे विधिमंडळांच्या द्वारें अपेक्षित असलेलें लोकहित साधलें गेलें नाही असें दुर्दैवाने म्हणावें लागतें.

संस्थानिकांची अदूरदृष्टि

संस्थानांतून राजकीय सुधारणा व्हाव्यात, याबद्दल व्हाईसरॉयांनासुद्धा अत्यंत आस्था होती, असें त्यांच्या वेळोवेळीं झालेल्या भाषणांवरून दिसतें. १९४२ मार्चमध्ये नरेंद्रमंडळाची बैठक भरल्यावेळीं व्हॉईसरॉयांनी आपल्या भाषणांत पुढीलप्रमाणे नरेशांना सल्ला दिला—

"तुमचे अधिकार तत्त्वतः कितीहि विस्तृत असले, तरी आधुनिक काळास अनुरूप असें वागण्याचा समंजसपणा तुम्ही न दाखवाल, तर तुमचीं संस्थानें शाबूत राहतील कीं नाही याची शंका वाटते."

पण हा बहुमोल सल्ला आमच्या संस्थानिकांना मानवला नाही. त्यांनी नरेंद्रमंडळाच्या त्याच बैठकींत उलट असा ठराव केला की, "आमचे तहकरार बादशहाशीं झाले आहेत. त्यांत फरक करण्याचा अधिकार ब्रिटिश सरकारला नाही." युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थान स्वतंत्र होणार असून संस्थानिकांचें भवितव्य हें संस्थानांतील सुराज्यावरच केवळ अवलंबून आहे याची ब्रिटिश सरकारला जाणीव होती; व म्हणून व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी हिंदी संस्थानिकांना त्यांच्या अस्तित्वाच्या दृष्टीने धोक्याचा तांबडा कंदील दाखविला; पण तिकडे संस्थानिकांनी बुद्धिपुरःसर डोळेझाकच केली आणि आपलें मरण पांच-सहा वर्षांत ओढवून घेतलें. नरेंद्रमंडळांत वरीलप्रमाणे ठराव करतांना संस्थानिकांच्या हें लक्षांत आलें नाही, की इंग्लंडच्या लोकशाही राज्यपद्धतीप्रमाणे बादशहा ही व्यक्ति सरकारव्यतिरिक्त वेगळी, अशी असूंच शकत नाही.

व्हाईसरॉयांचे असे विचार असूनहि, संस्थानाधिपतीच्या अज्ञानावस्थेच्या काळांत व्हाईसरॉयांचा प्रतिनिधि म्हणून जेव्हा रेसिडेंटकडे संस्थानांचा कारभार जातो, तेव्हा संस्थानांत राजकीय सुधारणा करण्याच्या बाबतींत मात्र त्यांची कंजूष वृत्ति असे. अज्ञानावस्थेच्या राजवटींत शासनाचा दर्जा उंचावला जात असे, पण प्रजेला शासनांत सहभागी मात्र विशेषत्वाने केलें जात नसे. मुधोळ, सावंतवाडी, कोल्हापूर वगैरे संस्थानांचा कारभार संस्थानिकाच्या अल्पवयामुळे रेसिडेंटच्या हुकमतीखाली गेल्यावेळीं शासनांत सुधारणा झाली, पण प्रजेला राजकीय हक्क मात्र बहाल करण्यांत आले नाहीत.

पेरींचा कोल्हापुरांतील लोकहितैषी कारभार

१९४० च्या आरंभापासून कोल्हापूर दरबार व प्रजापरिषद् यांच्यामध्ये राजकीय अधिकार संपादण्यासाठी झगडा चालू झालेला होता. परिषदेचे भाई माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार यांच्यासारखे कार्यकर्ते तुरुंगांत डांबले गेले होते. पुढाऱ्यांच्या अटकेमुळे संस्थानांत वरवर शांतता नांदत होती. ता. २६–११–१९४० रोजीं कोल्हापूरचे छत्रपति श्री. सर राजाराम महाराज यांचें निधन झालें आणि कोल्हापूरचा कारभार रेसिडेंटच्या हुकमतीखाली होऊं लागला. रेसिडेंटनें शासनमंडळ स्थापन करून मागील राजवटींतील मुख्य प्रधान कै. रावब. सुर्वे यांनाच शासनमंडळाचे अध्यक्ष नेमले. महाराजांच्या निधनानंतर एक महिन्याच्या आंत शासनमंडळाकडून बहुतेक सर्व राजबंद्यांची मुक्तता करण्यांत आली. भाई माधवराव बागल आदि राजबंदी सुटल्यामुळे तेथील राजकारणाची कोंडी ते कशी फोडतात, इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें. छत्रपति सर राजाराम महाराज हयात असतांना चळवळ करणें निराळें आणि महाराजांच्या निधनानंतर चळवळ करणें वेगळें होतें. या दोन परिस्थितींत फार अंतर होतें. कोल्हापूरच्या गादीस वारस ठरलेला नव्हता. महाराणी अल्पवयी मुलगा दत्तक घेतात अगर कसें आणि तो कोणास घेतात वगैरे सर्व प्रश्न नव्याने निर्माण झाले होते. अल्पवयीन कारकीर्दींत राजकीय सुधारणा अमलांत आणण्याची व्हॉईसरॉयांच्या राजकीय खात्याची वहिवाट नव्हती. तेव्हा कोल्हापूर संस्थानांत छत्रपतींच्या आधिपत्याखाली जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून घेण्यासाठी भाई माधवराव बागल कोणता पवित्रा टाकतात इकडे जनतेचें लक्ष लागलेलें होतें. पण या बाबतींत लोकांची निराशा झाली. काँग्रेसचें सहकार्य आपल्या चळवळीस घेण्याचा त्यांचा मानस नव्हता; कारण त्यांनीच एका भाषणांत जाहीरपणें सांगितलें होतें की "संस्थानी प्रश्न काँग्रेसने हातीं घ्यावा असें आपलें एकाकाळीं असलेलें मत आता बदललें असून संस्थानी प्रजेनेच आपला लढा लढवला पाहिजे, असें आता आपलें मत झालें आहे." कोल्हापूरच्या कार्यकर्त्यांचें एक संमेलन जानेवारी १९४१ मध्ये झाल्यावेळीं पुढील तीन ठराव पास करण्यांत आले :— (१) कोल्हापूर संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत यावी; (२) थोरल्या महाराणी कै. श्री. ताराबाईसाहेब यांना रीजंट नेमावें; (३) प्रजापरिषदेवरील बंदी उठवावी. पण यांपैकी कोणत्याच मागणीस दरबारनें भीक घातली नाही.

कुरुंदवाड, सावंतवाडी वगैरे संस्थानांतून तेथील राण्यांचा रीजन्सी कारभार चालू असतांना, कोल्हापुरांत तशी व्यवस्था करण्यास सरकारला कां अडचण पडली तें कळत नाही. कदाचित् आजवरचा कोल्हापूरचा लौकिक महाराणींना रींजंट करण्याच्या आड आला असला पाहिजे ! शासनमंडळाचे प्रमुख रावब. सुर्वे यांची प्रधानगिरी सुमारें नऊ महिने चालली. त्यांची ही कारकीर्द त्यांच्या पूर्वीच्या कारकीर्दीप्रमाणे जनतेचें मन शासनविरोधी होण्यास उपयोगी पडली. त्यांनी 'विद्याविलास' पत्रावर खटले व जामिनक्यांची इतकी खैरात केली की, त्यामुळे वृत्तपत्रास अपमृत्यूच यावा. कोल्हापूरच्या सुदैवानें लवकरच सुर्वे कारकीर्द संपली आणि सरकारने श्री. पेरी यांची १९४१ आक्टोबरमध्ये पंतप्रधानपदावर नेमणूक केली.

आपल्या पंतप्रधानपदीं आरूढ झाल्याबरोबर श्री. पेरी यांनी कोल्हापूरचें शासन सुधारण्यास जारीने सुरुवात केली आणि त्यामुळे लोकांचा दुवा मिळविला. महाराणींच्या कन्या श्री. पद्माराजे यांच्या नामकरणाच्या निमित्ताने जो समारंभ झाला, त्यावेळीं म्हणजे ता. २४-११-१९४१ रोजीं कोल्हापूर परिषदेवरील बंदी त्यांनी उठविली आणि परिषदेच्या राजकीय कामास वाव दिला. एकूण बत्तीस महिने परिषद बंदिवासांत होती. श्री. पेरी यांच्या राजवटीवर भाई माधवराव बागल खुष झाले होते आणि म्हणून त्यांनी आपली अपेक्षा पुढील शब्दांत व्यक्त केली. ते म्हणतात—

"पेरी मंत्रिमंडळाने सुराज्याची सुरुवात केली आहे; पण सुराज्य म्हणजे लोकशाही नव्हे. लोकशाहीखेरीज प्रजा संतुष्ट होणार नाही. लोकशाहीचे प्रणेते म्हणून ब्रिटन युद्धांत पडलें आहे; तेव्हा तिने आपल्या हाताखालील संस्थानांत लोकशाही स्थापन करावी."

पण अज्ञानावस्थेच्या काळांत मोठ्या राजकीय सुधारणा न करण्याचें सरकारी धोरण असल्याने कोल्हापुरांत लोकशाही स्थापन करणें हें श्री. पेरी यांच्या हातांत नव्हतें; पण प्रजेचें राज्यकारभारांत साहाय्य मिळावें म्हणून त्यांनी कोल्हापूर विधिमंडळाची स्थापना केली. या विधिमंडळाची घटना ही परिषदेच्या दृष्टीने टाकाऊ होती व म्हणून तिने विधिमंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घातला. त्यामुळे परिषदेबाहेरील लोक विधिमंडळावर निवडून आले. कोल्हापूर प्रजापरिषदेने असा बहिष्कार टाकण्यांत चूकच केली आणि त्यामुळे विधिमंडळाच्या द्वारें लोकहित साधण्याची संधि कोल्हापूर प्रजापरिषदेने वाया घालविली असें म्हणणें भाग पडतें. आपल्या विधायक सत्प्रवृत्तीची ओळख

श्री. पेरी यांनी करून दिलेली असतांना कोल्हापूर विधिमंडळाच्या द्वारें आपणास काय काम करतां येतें याचा अनुभव घेतल्यावरच परिषदेने आपलें धोरण ठरवावयास पाहिजे होतें. अशी बहिष्कार घालण्याची चूक दाक्षिणी संस्थानांतील इतर प्रजापरिषदांनी केली नव्हती. ज्यामुळे लोकहित साधून आपल्या चळवळीचें पाऊल पुढे पडेल, अशी प्रत्येक संधि राजकारणांत घेणें आवश्यक असतें. कोल्हापूर प्रजापरिषद वेगळ्याच प्रतिष्ठेच्या मागे लागली आणि तिने लोकहित साधण्याचा योग डावलला. असो. पुढे जुलै १९४२ मध्ये महाराणींना रीजंट म्हणून मान्यता देऊन सरकारने परिषदेचें एक मागणें मान्यकेलें. महाराणींनी ता. १८-११-४२ रोजीं भोसले घराण्यांतील अकरा महिन्यांच्या एका बालकास दत्तक घेतलें.

संस्थानांतून 'चले जाव' चळवळीचे पडसाद

ब्रिटिश सरकारविरुद्ध 'चले जाव हिंदुस्थान'ची जी चळवळ महात्माजींनी सुरू करण्याचें ठरविलें होतें, त्याचा परिणाम कोल्हापूर परिषदेवर विशेषत्वाने झाला. या चळवळीचा एक भाग म्हणून "संस्थानावरील ब्रिटिश सत्तेचें सार्वभौमत्व संस्थानिकांनी झुगारण्याची चळवळ संस्थानी प्रजेने करावी" असा जो आदेश महात्माजींनी संस्थानी कार्यकर्त्यांना दिला होता, त्यास अनुसरून भाई माधवराव बागल यांनी कोल्हापूर दरबारला तीन आठवड्यांचें अंतिमोत्तर पाठवून 'सार्वभौम सत्ता झुगारून द्या, जबाबदार राज्यपद्धति द्या, नाही तर लढा सुरू होईल' असें कळविलें. परिषदेचें हें आव्हान दरबारने पतकरून श्रीं. बागलादि बारा पुढाऱ्यांना स्थानबद्ध करून ठेवलें. मिरज प्रजापरिषदेनेहि राजेसाहेबांना असेंच कळविलें होतें की, "त्यांनी सार्वभौम सत्ता झुगारून द्यावी; जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी व या मागण्या मान्य न केल्यास लढा सुरू करूं." मिरज परिषदेच्या कार्यकर्त्यांना पकडण्यात आलें, पण पुढे तीन महिन्यांच्या आंत परिषद व राजेसाहेब यांच्यांत समेट झाला. त्यान्वयें परिषदेने आपली पहिली मागणी सोडली, व दुसऱ्या मागणीच्या परिपूर्ततेकरतां एक समिति नेमण्याचें राजेसाहेबांनी आश्वासन दिलें. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी राजबंद्यांनी उपवासाचा अवलंब करून दरबारवर दडपण आणलें होतें. राजेसाहेबांनी श्री. बा. वि. शिखरे यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व राजबंद्यांची मुक्तता केली. जमखिंडी व मुधोळ परिषदांच्या कार्यकारी मंडळांनी जबाबदार राज्यपद्धति ताबडतोब स्थापन करण्याबाबतचे ठराव

पास केले. त्यावर जमखिंडीच्या राजेसाहेबांनी "राजकीय सुधारणा देण्याच्या बाबतींत आपण इतर संस्थानांच्या मागे राहणार नसल्याचें" आश्वासन दिल्यामुळे परिषदेने विधिमंडळाच्या कामकाजाशीं पुकारलेला असहकार मागे घेतला. या ऑगस्ट १९४२ च्या 'चले जाव' चळवळींत कोल्हापूरचे श्री. रत्नाप्पा कुंभार वगैरे बऱ्याच कार्यकर्त्यांनी भूमिगत राहून फार मोठा भाग घेतला. खालसा मुलखांतील ही चळवळ चालविण्याकरितां संस्थानी मुलूख हा या सर्व कार्यकर्त्यांना संरक्षणार्थ फार मोठा उपयोगी पडे. या लढ्यांत कोल्हापुरांतील संस्थानी कार्यकर्त्यांनी फार मोठ्या प्रमाणांत खालसा मुलखांतील चळवळींत भाग घेतलेला होता हें विसरून चालणार नाही.

प्रजापरिषदांचें कार्य

सन १९४० मध्ये मुधोळ, सांगली, भोर, जमखिंडी व मिरज या संस्थानांच्या प्रजापरिषदांचीं अधिवेशनें अनुक्रमें डॉ. नागनगौडा, कै. लठ्ठे, श्री. बापूसाहेब गुप्ते, श्री. नेसवी व श्री. भाष्यम् यांच्या अध्यक्षतेखाली झाली. मुधोळास भरलेलें हें पहिलेंच अधिवेशन होय. संस्थानांतील दडपशाहीच्या धोरणामुळे आजवर तेथे प्रजापरिषद् भरली नव्हती. या परिषदेचे उद्घाटक कै. आण्णासाहेब लठ्ठे यांनी आपल्या भाषणांत "आपापल्या संस्थानचा मगदूर पाहून पुढाऱ्यांनी आपल्या मागण्या कराव्या" असा समयोचित व विधायक सल्ला दिला.

१९४१ मध्ये सांगली, जमखिंडी व भोर या संस्थानांच्या प्रजापरिषदा श्री. बुवासाहेब गोसावी, श्री. सिद्धलिंगप्पा व भाई माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली अनुक्रमें भरल्या. संस्थानांतून जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याच्या ठरावाबरोबर दुसऱ्या आणखी एका ठरावास या अधिवेशनांतून प्राधान्य देण्यांत आलें. तो ठराव म्हणजे लहान संस्थानांचा सहकारी तत्त्वावर समायिकीने कारभार चालविण्याचा होय. अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या ठरावाप्रमाणे ५० लक्ष उत्पन्न व २० लक्ष लोकसंख्या नसलेलीं संस्थानें हीं स्वतंत्रपणें भविष्यकाळांत राहणें शक्य नव्हतें. पण जर त्यांनी संघराज्यें निर्माण केलीं तर तीं टिकूं शकतील असा पर्याय सुचविण्यांत आला होता. या पर्यायास अनुसरून दक्षिण महाराष्ट्रांतील कोल्हापूरव्यतिरिक्त इतर सर्व संस्थानें या व्याख्येप्रमाणे लहान असल्यामुळे, त्यांनी सहकारितेच्या तत्त्वावर एकत्र येऊन आपला कारभार करावा, अशाबद्दल ठराव पास करण्यांत आले, हें या परिषदांच्या अधिवेशनांचें वैशिष्ट्य होय.

१९४२ मध्ये मिरज व कोल्हापूर या संस्थानांच्या प्रजापरिषदा भरल्या. मिरज प्रजापरिषदेचे अध्यक्ष या नात्याने बोलतांना भाई माधवराव बागल म्हणाले,

"छोट्या संस्थानांना जगावयाचें असेल, तर त्यांना आपलें संघराज्य निर्माण केल्याशिवाय जगणें अशक्य आहे. पटवर्धन संस्थानांनी आपला एक गट स्थापन केल्यास त्यांना अनेक सुधारणा करतां येतील. संस्थानी दरबारांनी खऱ्याखुऱ्या राजकीय सुधारणा द्याव्यात."

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने बोलतांना श्री. बाळासाहेब खेर म्हणाले की, लहान संस्थानें नजिकच्या खालसा मुलखांत विलीन होणें हें अपरिहार्य आहे. या परिषदेंत कोल्हापुरांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून घेण्याचा ठराव पास होऊन सदरची घटना करण्याकरतां एक समिति परिषदेने नेमली. एखाद्या परिषदेने राज्यघटना तयार करण्यासाठी समिति नेमल्याचा हा पहिलाच प्रसंग होय. या समितीने घटना तयार केली, पण ती पुढे दप्तरीच राहिली.

सावडे समितीचा जन्म

१९३८ मध्ये सांगलीस दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचें १२ वें अधिवेशन झालें आणि त्या वेळेपासून संस्थानी राजकारणाची सोयरिक काँग्रेसच्या राजकारणाशीं जास्त होऊं लागली. या अधिवेशनाचे अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल होते; संस्थानी राजकारणाच्या दृष्टीने त्यांचें त्यापुढील काळांत दक्षिणी संस्थानांना फारसें मार्गदर्शन मिळूं शकलें नाही; आणि यांत अस्वाभाविक असें कांहीच नाही. त्यांचें वास्तव स्थान भारतीय राजकारणांत; शिवाय संस्थानांत काँग्रेसने चळवळ करूं नये असें महात्माजींचें मत असल्यामुळे, सरदार पटेलांना या बाबतींत तितकें लक्ष घालणें शक्य झालें नसावें. काँग्रेसची चळवळ व संस्थानी चळवळ या दोहोंची कायमची सांगड घालणें योग्य नव्हतें आणि महात्माजींनाहि तें अभिप्रेत नव्हतें. संस्थानांतील प्रजेच्या गाऱ्हाण्यांची दाद स्थानिक प्रजापरिषदांनी लावून घेतली पाहिजे, असें भारतीय लोकपरिषदेचें धोरण होतें. गेलीं तीन चार वर्षें स्थानिक संस्थानी प्रजापरिषदा भरविण्याबाबत विशेष उत्साह दाखविला जात नव्हता. 'चले जाव'च्या चळवळींतील पहिला उत्साहाचा भर ओसरल्यावर सर्वत्र निराशाजनक वातावरण निर्माण झालें होतें. कांही संस्थानांतून राजकीय सुधारणा कार्यवाहींत आल्या होत्या, तर सार्वत्रिक

निराशामय वातावरणामुळे कांही संस्थानांचीं आश्वासनें लांबणीवर टाकलीं जात होतीं. दक्षिणी संस्थान लोकसभेचे (सांगली अधिवेशनापासून परिषदेला लोकसभा अशी संज्ञा मिळालेली होती) चिटणीस श्री. बा. वि. शिखरे हे तुरुंगात असल्यामुळे परिषद् भरविणें अवघड होतें. तेव्हा नव्यानें निर्माण झालेल्या सर्व परिस्थितीचा विचार करण्यासाठी संस्थानी कार्यकर्त्यांचें एखादें संमेलन घ्यावें कीं काय असा विचार सुरू झाला. अशा तऱ्हेचें एक संमेलन एप्रिल १९४० मध्ये घेतल्याचा दाखला होता. म्हणून शेवटीं संस्थानी कार्यकर्त्यांचें पूर्वीप्रमाणे एक संमेलन घेण्याचें ठरून तें दि. १३।१२।१९४२ रोजीं सांगलीस जमखिंडीचे कै. अ. वा. साबडे यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आलें. या संमेलनाचें स्वरूप युद्धजन्य परिस्थितीमुळे खाजगी ठेवण्यांत आलें असलें, तरी निरनिराळ्या संस्थानांतील साठ कार्यकर्ते या संमेलनास उपस्थित होते. या संमेलनाचा उद्देश सांगतांना स्वागताध्यक्ष श्री. केशवराव कुलकर्णी (सांगली) आपल्या प्रास्ताविक भाषणांत म्हणाले,

" द्विदल राज्यपद्धतीमुळे खालसांतील राजकारणाला फायदा झाला नाही; पण संस्थानांतील राज्यकर्ते हे आपलेच असल्याने संस्थानांत द्विदल राज्यपद्धति यशस्वी होईल, असा विश्वास श्री. शंकरराव देव यांच्यासारख्या काँग्रेस-पुढाऱ्यांना वाटत होता; पण हा विश्वास आम्हांस प्रत्यक्षांत दिसून आला नाही हें मोठ्या कष्टाने म्हणावें लागतें. संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति हें ध्येय होतें, तर द्विदल राज्यपद्धति हा मधला टप्पा होता. पण बहुतेक संस्थानिकांना जास्त पुढे जाण्याची खरी इच्छाच नसल्याने मधल्या टप्प्यापर्यंत जाण्यास ते वेळ घालवूं लागले. ब्रिटिश सरकार परकी आहे, पण आपले संस्थानिक आपल्याला परके नाहीत. संस्थानी राज्ययंत्राच्या शुद्धिकरणाच्या कामीं काय उपाययोजना करावी, हें सुचविण्यासाठी आपण जमलों आहों."

या संमेलनांत सांगली, जमखिंडी, फलटण व औंध येथील मंत्र्यांनी आपापले अनुभव कथन केले. सांगलीचे मंत्री श्री. कोरे यांनी आपला अनुभव उत्तेजनार्ह असल्याचें सांगितलें, तर फलटणचे श्री. भोसले व जमखिंडीचे श्री. बंगी यांनी निराशाजनक उद्गार काढले. सोपीव खात्याकरता भरपूर रक्कम व अधिकार असल्याशिवाय मंत्र्यांचा कारभार भरीव स्वरूपाचा होणार नाही असें त्यांच्या बोलण्यावरून दिसून आलें. औंधांतील ग्रामपंचायतीचा कारभार यशस्वी झाला असून, त्यामुळे शिक्षणप्रसार वाढला, न्यायालयीन खटले कमी झाले आणि आपलें गाव चांगलें करण्याची ईर्षा गावकऱ्यांत उत्पन्न झाल्याचें औंधचे मुख्य मंत्री बॅ. आप्पासाहेब पंत यांनी सांगितलें. या संमेलनांत श्री. स. ग. फडके यांनी पटवर्धनी संस्थानांचा संघ करण्याचा विचार मांडला;

श्री. कोरे यांनी सर्व दाक्षिणी संस्थानांचें संघराज्य करण्याची कल्पना मांडली. निदान शिक्षण, न्यायदानासारखीं खातीं सांघिक रित्या चालविण्यास अडचण पडणार नाही असा आपला अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. नंतर या संमेलनांत पुढील राजकीय ठराव पास करण्यांत आले: —

दक्षिणी संस्थान संघराज्याची मागणी

(१) हल्लीच्या महायुद्धाने निर्माण झालेल्या जागतिक क्रांतीच्या काळांत लोकसत्तात्मक राज्यपद्धति स्थापन होऊन व्यक्तिस्वातंत्र्य व समाजाची सुव्यवस्थित प्रगति तत्काळ अस्तित्वांत येणें जरूर आहे. यासाठी संस्थानिकांनी निदानपक्षीं पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीचें तत्त्व तत्काळ मान्य करून त्यांस अनुसरून राज्यव्यवस्था अस्तित्वात आणण्याची व्यवस्था करावी, अशी या सभेची मागणी आहे. या बाबतींत कॉंग्रेसने जो संपूर्ण स्वातंत्र्याचा संग्राम सुरू केला आहे, त्यास ही सभा नैतिक सहानुभूति व्यक्त करीत आहे. या ठरावास अनुसरून संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्त्वास मान्यता देऊन त्याप्रमाणे संस्थानिकांनी घोषणा न केल्यास संस्थानांत तीव्र चळवळ सुरू होईल असें या सभेचें मत आहे.

(२) दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें उत्पन्नाने व क्षेत्राने लहान असल्यामुळे त्यांचा कारभार आधुनिक जबाबदार राज्यपद्धतीच्या तंत्राने चालणें अधिक खर्चाचें आहे; व या संस्थानांचा कारभार सुरळीतपणें चालणें शक्य होण्यासाठी संस्थानांची राज्यव्यवस्था समायिकीच्या तत्त्वावर म्हणजे फेडरेशन करून चालली जावी असें या सभेचें मत आहे.

हा ठराव अंमलांत आणण्याची खटपट करण्यासाठी कै. अ. वा. साबडे (अध्यक्ष), श्री. ह. गो. टिळक (चिटणीस), अ. गो. गानू व वि. अ. पटवर्धन यांची समिति नेमण्यांत येऊन तिला जरुरीप्रमाणे अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार देण्यांत आला.

हें संमेलन भरविण्याच्या कामीं सांगलीचे श्री. के. गो. कुलकर्णी, कै. अ. रा. महिषी श्री. ह. गो. टिळक, औंधचे बॅ. पंत व पं. सातवळेकर, जमखिंडीचे कै. अ. वा. साबडे, कुरुंदवाडचे, श्रा अ. गो. गानू, मुधोळचे कै. वि. अ. मसूरकर, फलटणचे श्री. ना. वि. बावडेकर; व श्री. वि. अ. पटवर्धन (पुणें) यांनी पुढाकार घेतला होता.

◆ ◆ ◆

३

साबडे समितीचें यशापयश
(१९४३–१९४५)

संघराज्याची पार्श्वभूमि

मागील प्रकरणाच्या अखेरीस नमूद केल्याप्रमाणे साबडे समितीची स्थापना दि. १३–१२–१९४२ रोजीं सांगलींत भरलेल्या संस्थानी कार्यकर्त्यांच्या संमेलनांत करण्यांत आली आणि या वेळेपासून संस्थानी चळवळींतील नवीन पर्व सुरू झालें. आजवर प्रत्येक संस्थानांतून जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचें प्रजापरिषदांचें ध्येय होतें; आणि त्या दृष्टीनें संस्थानी चळवळीचीं पावलें पडत होतीं. सांगली संमेलनापासून, इकडील छोटया संस्थानांचें संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति असलेलें दक्षिणी संस्थान संघराज्य व समाईक हायकोर्ट व्हावें असा जोरदार विचारप्रवाह सुरू झाला आणि त्याची कार्यवाही करण्याकरता साबडे समिति नेमण्यांत आली.

'डेक्कन स्टेटस् एजन्सी' म्हणून समजल्या जाणाऱ्या इकडील संस्थानांच्या भूभागांत एकूण अठरा संस्थानें होतीं. त्यांपैकी कोल्हापूर सर्वांत मोठें. कोल्हापूरची लोकसंख्या सुमारें अकरा लाख असून उत्पन्न सुमारें साठ लाख होतें. त्याच्या खालोखाल मोठें म्हणजे सांगली संस्थान होय. सांगलीची लोकसंख्या सुमारें तीन लाख असून उत्पन्न सुमारें सतरा लाख होतें. बाकीचीं संस्थानें त्याहून लहान होतीं. कित्येक संस्थानांची लोकसंख्या खालसांतील तालुक्या-एवढीसुद्धा नव्हती. अशा छोट्या संस्थानांचा कारभार आधुनिक लोकशाही राज्यपद्धतीप्रमाणे चालणें अवघडच होतें. लोकशाहीचा कारभार हा खर्चिक असतो आणि एवढा खर्च करण्याची ताकद छोट्या संस्थानांजवळ नसणें स्वाभाविक आहे. लोकशाही तर हवी, पण लोकशाही पेलण्यास लागणारें आर्थिक बळ तर नाहीं, अशा स्थितींत पर्याय कोणता ? तर या छोट्या संस्थानांचें एकत्रीकरण करून आपलें बळ वाढविणें हें होय. संस्थानांचें संयुक्तीकरण केल्याने कारभार-खर्चांत बचत होईल आणि कार्यक्षमता वाढेल असें वाटून संघराज्याची कल्पना निघाली. समाईक हायकोर्टाची

आवश्यकता कां निर्माण झाली याचा थोडासा खुलासा करणें इष्ट आहे. दक्षिणेंतील अठरा संस्थानांपैकी फारच थोड्या संस्थानांतून कायम हायकोर्ट असे. खालसांतील सेवानिवृत्त पहिल्या वर्गाचा जज्ज अगर सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश संस्थानचा हायकोर्ट जज्ज म्हणून नेमण्याची पद्धत रूढ झाली होती. पण हा हायकोर्ट जज्ज कायम स्वरूपाचा नसे. त्याचेपुढे जेवढीं अपिलाचीं कामें येत, तेवढ्या कामांचा निकाल त्याचेकडून केला जाई. एका तऱ्हेने हें हंगामी स्वरूपाचें काम होई. न्यायखात्यावर हायकोर्टाची जी सतत देखरेख ठेवण्याची आवश्यकता असते, ती हंगामी हायकोर्ट जज्जापासून होण्याची अपेक्षा करण अर्थातच चूक ठरणार आहे. असा कोणी आक्षेप घेईल की, संस्थानी न्यायदानासंबंधाने तक्रारी होत्या का? कांही संस्थानांत होत्या, तर कांही संस्थानांत नव्हत्या. पण तात्त्विक दृष्ट्या विचार करतां, न्यायदान खात्यावर देखरेख ठेवणारें कायम हायकोर्ट हवेंच असतें, याबद्दल दुमत होणार नाही. दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें लहान असल्यामुळे प्रत्येक संस्थानला आपलें स्वतंत्र हायकोर्ट ठेवण्याइतकें काम नव्हतें आणि त्यांची तेवढी आर्थिक कुवतहि नव्हती. म्हणून हीं हंगामी हायकोर्टें रद्द करून सर्व द. संस्थानाकरतां म्हणून एकच संयुक्त हायकोर्ट स्थापन करण्याची कल्पना पुढे आली.

समाईक हायकोर्ट व द. सं. संघराज्य यांच्या आवश्यकतेबद्दल सांगली संमेलनापासून आणि साबडे समितीच्या नियुक्तीमुळे जरी विशेष चालना मिळाली असली, तरी हे विषय अगदी नव्याने सुचविले गेले होते, असें मानण्याचें मुळीच कारण नाही. संस्थानी चळवळीच्या प्रारंभीच्या काळांतसुद्धा या कल्पनांचा मागोवा सापडतो.

दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेच्या पुण्यास भरलेल्या अगदी पहिल्या अधिवेशनांत (१९२१) यासंबंधांत पुढील ठराव पास करण्यांत आला होता :—"दक्षिणेंतील संस्थानिकांपैकी बऱ्याच संस्थानिकांचीं संस्थानें लहान असून त्यांचें उत्पन्न थोडें आहे; तथापि त्यांजकडे स्वतंत्रपणें वहिवाटीस असणारे अधिकार महत्त्वाचे असतात. हे अधिकार चांगल्या तऱ्हेने बजावले जाण्यास मोठ्या पगाराचे, सुशिक्षित व स्वतंत्र अधिकारी असणें इष्ट आहे. याकरता निरनिराळ्या संस्थानांनी गट करून समाईक खर्चाने असे अधिकारी नेमून त्यांजकडून असल्या अधिकाराचीं कामें, विशेषतः न्यायमनसुबीचीं कामें करवावींत." यावरून परिषदेच्या संस्थापकांचा किती व्यापक दृष्टिकोण प्रथमपासून होता हें स्पष्ट होतें. द. सं. प्रजापरिषदेच्या बेळगावास भरलेल्या

तिसऱ्या अधिवेशनांत (१९२३) समाईक हायकोर्टासंबंधी पुढील ठराव पास करण्यांत आला होता:—"दिवाणी मुकदम्याकरता सर्व संस्थानांचें एक समाईक मध्यवर्ती हायकोर्ट संस्थानिकांनी स्थापन करावें." हे ठराव पास करून आज ना उद्या संघराज्याची व समाईक हायकोर्टाची मागणी जोराने करण्याची पाळी येणार याचें भविष्य सांगली संमेलनाच्या पूर्वी वीस वर्षें अगोदर केलें गेलें होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेच्या पुढाऱ्यांना जशी सामायिक कारभाराची कल्पना पटलेली होती, तशी कांही संस्थानिकांनाहि फार पूर्वीपासून पटलेली होती. १९२० मध्ये त्यावेळच्या जतच्या अधिपतींनी पोलिटिकल एजंटला पत्र लिहून, सर्व संस्थानांकरता मध्यवर्ती शेतकी केन्द्र व शेतकी विद्यालय, वेड्याचें इस्पितळ, महारोगी गृह, ट्रेनिंग कॉलेज वगैरे संस्था स्थापन करण्याबावत सल्ला विचारला होता. १९३२ मध्ये औंधचे अधिपति कै. श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांनी आपल्या संस्थानिक बंधूंना एक पत्र पाठवून समाईक हायकोर्ट स्थापण्याची आवश्यकता त्यांच्या नजरेस आणली होती. या पत्रांत ते म्हणतात,

"We might consider the feasibility of establishing a common High Court for such smaller States as may choose to join together. As we all know our individual resources are so limited that it is very difficult for most of us to spare on this one department as much as is necessary for a really efficient administration and dispensation of justice".

याबाबतींत पुढे कांही घडलें नाही हा भाग निराळा; पण शहाण्या व समजुतदार संस्थानिकांना राज्यकारभाराच्या कांही खात्यांचा कारभार सहकार्याच्या तत्त्वावर चालविला जावा, असें वाटत असल्याचें स्पष्ट दिसतें.

१९३३ मध्ये भरलेल्या द. सं. प्रजापरिषदेच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना कोल्हापूरचे माजी दिवाण कै. आण्णासाहेब लट्ठे यांनी छोट्या संस्थानांना संघराज्य बनविण्याचा सल्ला दिला होता.

(The rulers of the smaller States—and most of the Deccan States are small—should adopt a federal system of administration among themselves. The judiciary, the po ice etc. can easily be dealt with on a combined or a federal plan)

१९३८ मध्ये सांगलीस सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षते-खाली भरलेल्या द. सं. प्रजापरिषदेच्या बाराव्या अधिवेशनांत "राज्यकार

भाराच्या कांही बाबींपुरता तरी, संस्थानिकांनी स्वतंत्रपणें कारभार न चालवितां सर्व संस्थानिकांनी मिळून एखादी योजना प्रजेला विश्वासांत घेऊन करावी" असा ठराव पास करण्यांत आला होता.

भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या १९३९ च्या लुधियाना परिषदेंतील संघराज्याचा ठराव अगर व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी १९४० नंतर छोट्या संस्थानांचे गट करण्याचा संस्थानिकांना जो सल्ला दिला, त्याचा द. सं. संघराज्य अगर समाईक हायकोर्ट योजनांशी कांही संबंध नाही असें यावरून दिसून येईल. द. सं. प्रजापरिषदेच्या संस्थापकांची व त्यांना सहकार्य देणाऱ्यांची किती दूरदृष्टि होती याची कल्पना वरील जुन्या ठरावांवरून येते. पण या कल्पना जास्त मूळ धरण्यास वीस वर्षांचा काळ गेला हेंहि तितकेंच खरें आहे. सन १८८५ सालीं कॉंग्रेसची स्थापना झाल्यावेळीं ब्रिटिशांचा संबंध सोडण्याचा ठराव पास करण्यांत आला नव्हता हें विसरून चालणार नाही. सन १९२१ मध्येच समाईक राज्यकारभाराच्या तत्त्वाच्या परिपालनासाठी संस्थानांत चळवळ होऊं शकलीच असती असें नाही. कोणतीही मागणी करण्यास काळ जावा लागतोच, याचप्रमाणे संघराज्य मागण्याच्या बाबतीत काळ गेला. आता १९४२ मध्ये औंधांत संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति चालू झाली होती व सांगली, जमखिंडी आणि फलटण या संस्थानांत लोकपक्षीय मंत्र्यांच्या हातीं कांही खात्यांचा कारभार दिल्यानें नवीन पाऊलवाट पडूं लागली होती. या पाऊलवाटेंतील अडचणी अनुभवास येऊं लागल्या होत्या आणि त्यामुळे सांगली संमेलनांत समाईक राज्यकारभाराचा ठराव पास करण्यांत आला. यासंबंधांत सांगलीचे मंत्री श्री. बाळासाहेब कोरे यांनी आपला अनुभव लक्षांत घेऊन शिक्षण, आरोग्य, न्यायदान यांसारखीं लोकोपयोगी खातीं समाइकीनें चालवावीं असें प्रतिपादल्यामुळे वरीलप्रमाणे समाइकीच्या कारभाराचा ठराव पास होण्यास मदत झाली.

जमखिंडीचें क्रांतिकारी अधिवेशन

सांगली संमेलनांत ठरल्याप्रमाणे साबडे समितीने आपल्या कामास लगेच सुरुवात करून प्रत्येक संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति कशी असावी, संघराज्य व समाईक हायकोर्ट यांच्या योजनांचे आराखडे तयार करून ते प्रसिद्ध केले. या योजना संस्थानी दरबारांकडे पाठवून त्यावर अभिप्राय देण्याची विनंती साबडे समितीने त्यांना केली. दि. ७-२-१९४३

रोजीं भरलेल्या सांगली संस्थान प्रजापरिषदेच्या मंगळवेढ्याच्या अधिवेशनांत वरील योजनांस सर्वसामान्यपणें मान्यता देण्याचा ठराव पास करण्यांत आला. वृत्तपत्रांनीहि या योजनांचें चांगलें स्वागत केलें आणि बहुमोल सूचना केल्या. मद्रासच्या 'हिंदु' या मातबर दैनिकाने साबडे समितीच्या योजनेबद्दल फार चांगला अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. (The Sabde Committee plan is federal in character, and unlike the Political Department's hotch potch, is so designed as to take full account of the rights, interests and obligations of all the parties affected—the rulers, the citizens, and the states alike. —20-4-1943.) पण संस्थानी दरबारांनी मात्र साबडे समितीच्या योजनांचा फारसा आदर केला नाही. साबडे समितीची स्थापना एका संमेलनांत झालेली होती; त्यापेक्षा व्यापक संघटनेमार्फत तिचें काम चाललें तर जास्त चांगलें, असें वाटल्यावरून दक्षिणी संस्थान लोकसभेचें तेरावें अधिवेशन ता. ३-५-१९४३ रोजीं जमखिंडी येथें पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आलें. लोकनायक माधवराव अणे यांची अध्यक्ष म्हणून प्रथम नियुक्ति करण्यांत आली होती, पण आयत्या वेळीं ते न येऊं शकल्याने पं. सातवळेकर यांना अध्यक्षस्थान देण्यांत आलें. या अधिवेशनांत द. सं. संयुक्तीकरणाच्या कारभाराची योजना चर्चिली जावयाची असल्याने जमखिंडीस फार मोठ्या प्रमाणांत संस्थानी कार्यकर्ते जमले होते. दक्षिणी संस्थानांपैकी कांही संस्थानांचा मुलूख कानडी भाषिकांत विभागलेला असल्याने संयुक्तीकरण योजनेमुळे आपल्यावर काय परिणाम होणार याबद्दल त्यांना साशंकता वाटत होती. संस्थानें राहावीं असें म्हणणाऱ्यांचा जसा एक मोठा गट होता, त्याप्रमाणेच तीं नष्ट व्हावींत असें म्हणणाऱ्यांचाहि आता एक मोठा गट तयार झाला होता. यामुळे जमखिंडीचें अधिवेशन हें राजकीयदृष्ट्या तप्त वातावरणांत भरलें होतें. जोवर आमचीं छोटीं संस्थानें राहणार आहेत, तोवर त्यांचा कारभार लोकहितदृष्ट्या कसा चालेल ? हा प्रश्न साबडे समितीपुढे होता. ज्या वेळीं भाषावार प्रांतरचना होईल, त्या वेळीं मराठी व कानडी मुलूख त्या त्या राज्यांत समाविष्ट होण्यास साबडे समितीचा विरोध नव्हता; व तशा तऱ्हेचा स्पष्ट खुलासा साबडे समितीचे अध्यक्ष कै. अ. वा. साबडे यांनी अधिवेशनांत केल्यामुळे विरोधकांच्या विरोधांतील वाराच खलास झाला. कांही जाणकारांनी संघराज्य व जबाबदार राज्यपद्धति यांच्या योजनांबाबत कांही विधायक सूचना केल्या.

या सर्व सूचनांचा विचार करण्याकरतां सावडे समितीची वाढ करण्याचें ठरून, त्याप्रमाणे पुढील ठराव पास करण्यांत आला :– (१) प्रत्येक संस्थानांतून ताबडतोब संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति सुरू झाली पाहिजे आणि ती साबडे समितीने तयार केलेल्या योजनेच्या अनुरोधाने झाली पाहिजे. (२) साबडे समितीने द. सं. संघराज्य योजनेचा जो आराखडा तयार केला आहे, त्यांत अनेक दुरुस्त्या करण्याची जरुरी वाटत आहे. या आराखड्यांत योग्य त्या दुरुस्त्या करून तो परिपूर्ण करण्यासाठी या समितींत कै. भास्करराव मराठे (मिरज), कै. वि. अ. मसुरकर (मुधोळ), कै. हणमंतराव कौजलगी व हब्बू (विजापूर) व बी. एन्. दातार (बेळगाव) या सदस्यांची भर साबडे समितींत घालण्यांत येत आहे. शिवाय साबडे समितीस अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार देण्यांत येत आहे. या समितीने चार महिन्यांत आपलें इतिवृत्त सादर करावयाचें आहे. शिवाय फेडरेशनचा एक भाग म्हणून सर्व दक्षिणी संस्थानांचें संयुक्त हायकोर्ट व कांही खात्यांचा संयुक्त कारभार घडवून आणण्यासाठी तत्काळ प्रयत्न करण्यात यावा. (३) सांगली, जमखिंडी, औंध व फलटण या चार संस्थानांतील सोपीव खात्यांचा कारभार लोकनियुक्त मंत्र्यांच्या हातांत आहे. या मंत्र्यांनी आपापल्या संस्थानाधिपतींची सोपीव खात्यांचा कारभार समाइकीने चालविण्याबाबत संमति आहे की नाही, याबद्दल लोकसभेच्या कार्यकारी मंडळाकडे एक महिन्याच्या आंत कळवावें.

लोकसभेचें हें जमखिंडीचें अधिवेशन अनेक तऱ्हेने महत्त्वाचें ठरून विधायक कार्याच्या दृष्टीने पुढे पाऊल टाकण्याच्या बाबतींत निश्चित प्रगति झाली, व याचें सर्व श्रेय पं. सातवळेकर व कै. अनंतराव साबडे यांच्या योजकतेला आहे. या अधिवेशनांत कानडी–मराठीचा भाषिक वाद प्रकर्षाने प्रकट झाला आणि द. संस्थानांचा जो मुलूख दोन्ही भाषिकांत विखुरलेला आहे, तेथे चळवळ करतांना कोणत्या बाबतींत व कशी सावधगिरी बाळगावयास पाहिजे याची जाणीव झाली. अशा नाजुक परिस्थितींत संस्थानी चळवळीला कै. साबडे यांचें लाभलेलें मार्गदर्शन फार मोलाचें ठरलें. या अचूक मार्गदर्शनाचा लाभ संस्थानिकांनी न करून घेतल्यामुळे त्यांनी अपेक्षेपेक्षा आपलें मरण आपल्या हाताने लवकर ओढवून घेतलें असें म्हणणें अप्रस्तुत ठरणार नाही.

संस्थानें टिकविण्यासाठीच संघराज्य

याच सुमारास म्हणजे ता. १५-४-१९४३ पासून पश्चिम हिंदुस्थान व गुजराथमधील वरींचशीं विनाधिकार असलेलीं संस्थानें म्हणजे जहागिऱ्या व्हाइसरॉयांनी नजिकच्या मोठ्या संस्थानांत म्हणजे बडोदें संस्थानांत समाविष्ट केल्या. याच धोरणाची अंमलबजावणी दक्षिणी संस्थानांच्या बाबतींत केली गेली तर, इकडील संस्थानें कोल्हापुरांत सामील होणार असा संशय प्रकट केला जाऊन, दक्षिणी संस्थानांच्या संघराज्याच्या प्रवर्तकांना कोल्हापुरांत इतर संस्थानें विलीन करण्याची इच्छा आहे, अशी कुत्सित टीका करून संघराज्याविरुद्ध वादळ निर्माण करण्याचा डाव टाकण्यांत आला. ही टीका विशिष्ट वर्गाने केली होती; नाहीतर, पं. सातवळेकर, कै. साबडे यांच्या-सारख्यांवर अशी टीका करण्यास दुसरा कोणी धजावणार नाही. आणखी एक गोष्ट टीकाकार सोयीस्करपणें विसरले व ती म्हणजे बडोद्यांत इतर संस्थानांचें सामिलीकरण होण्यापूर्वी अगोदर चार महिने, म्हणजे सांगलीस भरलेल्या संमेलनांत द. स. संघराज्याचा ठराव पास होऊन त्या ठरावाच्या आधारावर एक घटनाहि तयार करण्यांत आली होती. त्या वेळीं दक्षिणेंतील संस्थानें एखाद्या मोठ्या संस्थानांत विलीन करण्याचा प्रश्न नव्हताच. आमच्याकडील सर्व अठरा संस्थानांनी एकमेकांत विलीन होणें म्हणजेच संघराज्य करणें होय. सन १९३९ मध्ये लुधियाना येथे पं. नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या अधिवेशनांत "२० लाखांपेक्षा कमी लोकसंख्या व ५० लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या संस्थानांनी आपली संयुक्त घटना केली, तरच तीं गटरूपाने पुढील काळांत स्वतंत्रपणें जगूं शकतील" असा ठराव पास करण्यांत आला होता. या व्याख्येप्रमाणे कोल्हापूर स्वतंत्रपणें राहण्याइतकें मोठें असून इतर संस्थानांचें संघराज्य झालें तर त्यांचा कोल्हापूर एवढा गट होऊन तीं संघराज्य रूपाने राहूं शकतील असें साबडे समितीला वाटलें. पुढील राजवटींत पं. नेहरूंना कोणतें स्थान मिळणार आहे, याची जाणकारांना चांगली कल्पना होती व म्हणूनच त्यांनी आपल्याकडील संस्थानें जिवंत राहण्यासाठी संघराज्याचा खटाटोप सुरू केला होता. प्रजेला सुनियंत्रित कारभार मिळण्याची व्यवस्था करणें हाच संघराज्याचा उद्देश होता. जमखिंडी अधिवेशनाला द. संस्थानांच्या रेसिडेंटकडून जो शुभसंदेश आला, त्यांतहि दक्षिणी संस्थान संघराज्याच्या योजनेचें स्वागत करण्यांत आलें होतें. दुर्दैव हें कीं

संस्थानिकांनीं मात्र संघराज्य योजनेचें त्या वेळीं स्वागत केलें नाही; याच संस्थानिकांना पुढे तीन वर्षांनी म्हणजे १९४६ मध्ये संघराज्याची पूजा करण्याची पाळी आली, पण त्या वेळीं प्रजा मात्र संघराज्यास कबूल नव्हती. १९४३ मध्येच जर राजे व प्रजापुढारी यांच्या संमतीनें संघराज्याची मागणी व्हॉइसरॉयकडे गेली असती, तर तेव्हाच द. सं. संघराज्य स्थापन होऊन आपल्या त्यागाचा एक आदर्श आमच्या संस्थानिकांना देशापुढे ठेवता आला असता आणि प्रजेचा धन्यवाद मिळविता आला असता. पण हें भाग्य त्यांच्या नशिबीं नव्हतें. 'तेल गेलें, तूप गेलें, हातीं धुपाटणें मात्र आलें' अशी पुढे या राजेरजवाड्यांची स्थिति झाली.

सांगलीच्या अधिपतींची संघराज्यावर टीका

जमखिंडी अधिवेशन ता. ३–५–१९४३ रोजीं पार पडल्यावर आणि साबडे समितीच्या कामास जोराने सुरुवात झाल्यावर, प्रथम सांगलीच्या राजेसाहेबांनी ता. ३१–५–१९४३ रोजीं सांगली विधिमंडळाची सभा भरल्यावेळीं आपल्या भाषणांत सांगली संस्थानच्या दृष्टीने संघराज्य योजनेवर कडाडून हल्ला केला. ते म्हणाले,

"दक्षिणी संस्थानांच्या संभाव्य फेडरेशनला सध्यांचा काळ अनुकूल नाही आणि त्यांतून मार्ग काढण्याच्या बाबतींत फार अडचणी आहेत. लढाईमुळे सरकार अशा योजनांचा विचार करणार नाही. साधनांची फार मोठी अनुकुलता असल्याशिवाय कार्यक्षमता प्राप्त होणारच नाही, अशा पूर्वग्रहाने दूषित झाल्याने, क्षेत्रफळाने संकुचित, साधनांनी तुटपुंजे असलेले लहान घटक कार्यक्षम राज्यकारभार चालविण्यास असमर्थ असतात, अशा कल्पनेने त्यांनी मोठ्यांत विलीन व्हावें असें समजण्यांत येत आहे. या दृष्टीने राज्यकारभार कार्यक्षम करण्यासाठी निरनिराळ्या खात्यांचें एकीकरण करावें असें म्हटलें जातें. संस्थानांचे गट करण्याची कल्पना गुंतागुंतीची व नाजूक आहे. अशी योजना पार पडण्याबाबत संशय वाटतो. १९४२ मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी सहकारी तत्त्वावर संस्थानांच्या संयुक्तीकरणाची योजना मांडली. याबद्दल उत्तर देतांना नरेंद्रमंडळाने असा प्रश्न उपस्थित केला की, ज्या संस्थानांची आर्थिक परिस्थिति चांगली असेल व जेथे लायक नोकरवर्ग नेमण्याची शक्यता संस्थानजवळ असेल त्या संस्थानांच्यावर सहकाराचें तत्त्व लादणें योग्य होईल का ? ज्या संस्थानांना कार्यक्षम नोकरवर्ग नेमतां येणें शक्य नसेल, त्यांनी संयुक्तीकरणाच्या योजनेंत वाटल्यास सामील व्हावें. सामायिक राज्यकारभाराची इष्टता वाटत असेल तर न्याय व पोलीस हीं खातीं समायिकीने चालवावी असें नरेंद्रमंडळाचें म्हणणें आहे.

"पण सुदैवाने या बाबतींत सांगली संस्थानला कोणतीच अडचण भासत नसल्याने, सांगलीनें कोणत्याच संघराज्यांत प्रवेश करण्याचें कारण नाही."

सांगली नरेशांचें वरील भाषण हा अदूरदर्शित्वाचा एक उत्कृष्ट नमुना आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. संघराज्य निर्माण करण्याच्या बाबतींत कोणत्या अडचणी आहेत त्यांचा उल्लेख त्यांनी केला असता, तर त्या सोडविणेचा मार्ग काढतां आला असता; पण तशा विधायक सूचना त्यांनी आपल्या भाषणांत केल्या नाहीत. लढाईची सबब त्यांनी सांगितली, पण तीदेखील मानभावीपणाची होय. याच लढाईच्या काळांत १९४३ मध्ये ओरिसा संस्थानाकरतां एका समाईक हायकोर्टाची योजना सरकारने अंमलांत आणली याचें सांगलीकरांना दुर्दैवाने विस्मरण झालें असावें. याच लढाईच्या काळांत व्हाइसरॉयसारखे हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधि हे छोटया संस्थानांच्या संयुक्तीकरणाचा उघडपणें प्रचार करीत असतांना, तेच संस्थानिकांच्या अशा एखाद्या योजनेस विरोध करतील असें मानणें म्हणजे आपल्या बुद्धिमांद्याचें प्रदर्शन करणें होय. बड्या लाटसाहेबांनी सहकाराचें तत्त्व जें सांगितलें तें केवळ लहान संस्थानांकरता होतें. अखिल भारतीय संस्थानी लोकपरिषदेने अगर पं. नेहरू यांनीसुद्धा केवळ लहान संस्थानांच्या बाबतींत समायिकीच्या कारभाराच्या तत्त्वाचा पुरस्कार केला होता. पण सांगली संस्थानला लायक नोकरवर्ग ठेवण्याबाबत मुळीच अडचण पडणार नाही, इतकें तें मोठें आहे, असा सांगली अधिपतींचा दावा होता. सतरा लाख उत्पन्नाचे आणि अत्यंत विस्कळित असलेलें सांगली संस्थान हें मोठें आहे अशी कल्पना करून घेणें म्हणजे आपलें स्वताचें मूल्यमापन बरोबर न करणें होय. क्षणभर सांगली संस्थान कार्यक्षम अधिकारीवर्ग ठेवण्याइतपत मोठें आहे असें संस्थानाधिपतींचें म्हणणें जरी मान्य केलें, तरी त्यांच्या शेजारील मिरज, मिरजमळा कुरुंदवाड यांसारखीं त्यांचीं स्वकीय संस्थानें तर मोठीं नव्हतीं ! त्यांच्या हिताकरता तरी सांगलीने आपला सहकार्याचा हात पुढे केला असता, तर बिघडलें असतें असें नाही. दुर्दैवाने पुढे तीन वर्षांच्या आंत सांगली नरेशांना संघराज्य व समायिक हायकोर्टाची कास धरावी लागली. या तीन वर्षांच्या काळांत सांगलीला इतकें दारिद्र्य आलें काय, की तें कार्यक्षम अधिकारीवर्ग ठेवण्यास अपात्र झालें ! पण असा कांही चमत्कार झाला नाही. चमत्कार घडला तो भारतीय राजकीय वातावरणांत; आणि त्याबरोबर सांगलीच्या राजेसाहेबांना वाटणारे गुंतागुंतीचे

आणि नाजूक प्रश्न गुप्त झाले आणि आपल्या अस्तित्वासाठी संघराज्याचा खटाटोप करण्याची पाळी त्यांच्यावर आली. परंतु तो खटाटोप संस्थानी प्रजेला पुढे मान्य झाला नाही आणि संघराज्याच्या कल्पनेकडे तीन वर्षांनंतर प्रजेने जी पाठ फिरविली, ती फिरविलीच !

दक्षिणी संस्थानांच्या संघराज्यास (व समाईक हायकोर्ट) जमालगोटा हाणण्याचा सांगलीच्या राजेसाहेबांनी प्रयत्न केला व इतर संस्थानिकांनी काय करावें तें अप्रत्यक्षरीत्या सुचविलें; पण सांगलीची प्रजापरिषद् ही मात्र आपल्या अधिपतींच्या मताशीं मुळीच सहमत नव्हती. परिषदेच्या कार्यकारिणीने यासंबंधांत पुढील ठराव पास केला :—

"लोकशाही ही खर्चिक राज्यपद्धति होय. ज्या संस्थानांना हा खर्च परवडत नाही, त्यांनी अज़िबात नष्ट होण्यापेक्षा एकत्रित येऊन ज़िवंत राहणें जास्त श्रेयस्कर होय. संयुक्तीकरणाने शासनव्यवस्थेंत काटकसर करतां येईल. संयुक्त नोकरवर्गाची उभारणी करणें हें त्रासदायक आहे असें राजेसाहेब म्हणतात, पण तें आम्हास पटत नाही."

सांगलीचे अधिपति हे लोकशाहीचे भोक्ते म्हणवीत असत, पण परिषदेच्या वरील ठरावाची योग्य दखल न घेऊन, त्यांनी आपलें लोकशाही-प्रेम बेगडी असल्याचें सिद्ध केलें असें म्हणणें भाग पडतें.

निदान पटवर्धनी संस्थानांचा गट करा

साबडे समितीच्या संघराज्याच्या योजनेचे वरीलप्रमाणे दुरागत करीत असतांना, सांगली नरेशांनी नरेंद्रमंडळाच्या ठरावाचा आसरा घेण्याऐवजी कै. श्री. र. रा. बखले यांच्यासारख्या त्यांच्या स्नेह्याचा सल्ला घेतला असता तर वरीलप्रमाणे अहंकारयुक्त भाषण त्यांनी केलें नसतें. सांगली संस्थान प्रजापरिषदेच्या मंगळवेढें येथील १७ व्या अधिवेशनांत (७-२-१९४३) अध्यक्षीय भाषण करतांना बखले म्हणाले की, संस्थानिकांनी बादशहा-बरोबर झालेल्या तहकरारांचें भांडवल न करतां प्रजेच्या आत्मीयतेचें भांडवल मिळवावें. छोट्या संस्थानांचें अस्तित्व त्यांच्या संयुक्तीकरणावर अवलंबून आहे. निदान पटवर्धनी संस्थानांनी तरी एकत्र यावें असा सल्ला बखले यांनी आपल्या भाषणांत दिला. या त्यांच्या सल्ल्याचा उपयोग झाला नाही हें दुर्दैवाने म्हणावें लागतें; आणि त्यांत आणखी दुर्दैवाचा भाग असा की, बखले हे सांगली, मिरज व मिरजमळा या संस्थानाधिपतींचे निकट स्नेही व सल्लागार असूनहि त्यांचा स्नेह संघराज्यासारखी उपयुक्त योजना पार पाडण्याच्या

कामीं उपयोगी ठरला नाही. पटवर्धनी संस्थानांचा गट एकत्र यावा व त्यांचा तरी कारभार समायिकीने चालविला जावा अशी पुष्कळांची इच्छा होती. सांगली येथील स्टेट पीपल्स सोसायटीने आपल्या 'विजय' वर्तमानपत्रामार्फत या कल्पनेचा प्रचार केला होता, पण तो मूळ धरूं शकला नाही. दक्षिण महाराष्ट्रांतील अठरा संस्थानांपैकीं जमखिंडी, कुरुंदवाड (थोरली व धाकटी पाती), मिरज (थोरली व धाकटी पाती), सांगली व वाडी जहागीर हीं सात संस्थानें पटवर्धन कुटुंबियांचीं आहेत. ह्या सात संस्थानांचें उत्पन्न सुमारें ४१ लाख रुपये होतें. भाऊबंदांच्या वाटणीमुळे या सात संस्थानांचा मुलूख सांगली, सोलापूर, बेळगाव व धारवाड जिल्ह्यांत विखुरलेला असून कोठें कोठें तो बऱ्याचशा प्रमाणांत सलग होता. या पटवर्धनी संस्थानांचा कारभार समायिकीच्या तत्त्वावर चालविला गेला असता तर राज्यकारभाराचा खर्च बऱ्याच प्रमाणांत कमी झाला असता. या सर्व संस्थानांत सांगली हें वडीलकीच्या व उत्पन्नाच्या मानाने मोठें संस्थान होय. त्याने या बाबतींत पुढारपण घेतलें असतें तर पटवर्धनी संस्थानांचा कारभार जास्त चांगला चालला असता. अक्कलकोट, भोर, जंजिरा, जत, मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सावनूर आणि सावंतवाडी या संस्थानांचे मुलूख सलग असल्याने त्यांना पटवर्धनी संस्थानांच्या मानाने राज्यकारभाराचा खर्च कमी येत असे. राज्यखर्च कमी करण्याच्या दृष्टीने जी गोष्ट पटवर्धनी संस्थानांना करणें सहजीं शक्य होतें, ती सुद्धा झाली नाही हें कटु सत्य आहे.

साबडे समितीचें प्रचारकार्य

सांगली नृपतींच्या वरील वक्तव्यामुळे साबडे समितीला मुळीच निराशा वाटली नाही. औंध, सांगली, फलटण व जमखिंडी या संस्थानांतील मंत्र्यांच्याकडे जीं खातीं तोडून देण्यांत आलीं होतीं, त्या बाबतींत एकसारखेपणा नसल्याचें दिसून आलें व या बाबतींत त्या त्या संस्थानिकांची समाइकीने कारभार होण्याबाबत संमति मिळण्याची शक्यता कमी दिसल्यावर, मंत्र्यांच्या हाताखालील खात्यांचा कारभार समाइकीने चालविण्याचा विचार सोडून द्यावा लागला. साबडे समितीने जमखिंडी अधिवेशनांत सुचविल्याप्रमाणें संघराज्य व समाईक हायकोर्टाच्या आपल्या घटनेंत योग्य त्या दुरुस्त्या करून घेतल्यावर, आपल्या योजना लोकमत अजमावण्याकरतां प्रसिद्ध केल्या. आपल्या योजनांस पाठिंबा मिळविण्यासाठी साबडे समितीच्या सभासदांनी मिरज, मुधोळ, मिरजमळा, सांगली, भोर, कोल्हापूर, जमखिंडी, औंध, कुरुंदवाड, फलटण,

कुरुंदवाडी (धाकटी पाती) व सावंतवाडी या बारा संस्थानांत दौरा काढून त्या त्या संस्थानांचे अधिपति अगर दिवाण व स्थानिक लोकपुढारी यांच्याशीं चर्चा केली व ठिकठिकाणीं सभा घेतल्या. जमाखिंडी, औंध, फलटण, मिरज व मिरजमळा या संस्थानाधिपतींनी समाईक हायकोर्टास संमति दर्शविली. औंधांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन झालेली असतांनादेखील तेथील आधिपति व प्रजापुढारी यांनी संघराज्यास पाठिंबा दिला हें विशेष होय. ठिकठिकाणच्या प्रजापुढाऱ्यांनी संघराज्य व समाईक हायकोर्ट योजनांचें स्वागत केलें. कोल्हापूरसारखें मोठें संस्थान व जेथे स्वतंत्र हायकोर्ट चालू होतें, त्या संस्थानचे पंतप्रधान श्री. पेरी यांनीसुद्धा समाईक हायकोर्टाच्या योजनेस आपला पाठिंबा दिला. सांगली व जमाखिंडी प्रजापरिषदांचीं कार्यकारी मंडळें व सांगलीचा वकीलवर्ग यांनी समाईक हायकोर्टास पाठिंबा देणारे ठराव पास केले. प्रसिद्ध कायदेपंडित श्री. के. एम्. मुनशी यांनीहि दक्षिणी संस्थानांसाठी एक समाईक हायकोर्ट असावें असा आपला अभिप्राय व्यक्त केला.

समाईक हायकोर्टास कोल्हापूरची संमति

अशा तऱ्हेने समाईक हायकोर्टासाठी अनुकूल भूमि तयार झाली, तरी पुढचें पाऊल टाकण्याच्या बाबतींत नवीनच अडचणी निर्माण झाल्या. समाईक हायकोर्ट योजनेंत येण्यास कोल्हापूर तयार आहे हें पंतप्रधान श्री. पेरी यांनी जाहीर केल्यामुळे या प्रश्नाला अगदी नवीन स्वरूप अभावितपणें प्राप्त झालें. साबडे समितीस कोल्हापूरसह एकच हायकोर्ट झालें तर पाहिजे होतें; कारण त्यामुळे या कामीं होणारा खर्च बऱ्याच प्रमाणांत कमी झाला असता. पण कोल्हापूर संस्थान अशा योजनेस संमति देईल अशी प्रथम कल्पना नव्हती. असें वाटण्याचीं कारणें दोन—(१) छत्रपतींच्या अल्पवयीपणामुळे तेथे चालू असलेला रेसिडेंटचा कारभार; (२) संस्थान खरोखर इतकें मोठें की, तें स्वतंत्र हायकोर्ट ठेवूं शकेल इतकी त्याची असणारी लायकी. पण पंतप्रधान श्री. पेरी यांनी समाईक हायकोर्टास संमति दिल्याने कोल्हापूरसह एकच हायकोर्ट असावें असा विचार सुरू झाला. आजवरची परंपरा, समज वा गैरसमज वगैरे अनेक कारणांमुळे कांही संस्थानिक कोल्हापूरसह होणाऱ्या समाईक हायकोर्टांत यावयास तयार नव्हते. यांतूनच कोल्हापूर वगळून इतरांचें एक समाईक हायकोर्ट करावें, नाही तर कोल्हापूरसह समाईक हायकोर्ट बोकांडी बसेल अशी भीति वाटून, कोल्हापूरव्यतिरिक्तची समाईक हायकोर्टाची कल्पना कांही संस्थानिकांकडून पुढे आली. या आंदोलनाच्या परिस्थितीमुळे चर्चा,

विचारविनियम करण्यांत बराच काळ गेला. शेवटीं समाईक हायकोर्ट अपरिहार्य आहे असें दिसल्यावर सांगली–फलटण अधिपतींनी यासंबंधींची एक योजना करण्याचें काम कै. डॉ. एस्. आर्. जयकर यांच्याकडे सोपविलें. साबडे समितीची योजना या संस्थानिकांनी हातीं घेतली असती तर वेळ आणि पैसा वांचला असता. पण असें झालें असतें तर, त्यामुळे संस्थानिक साबडे समितीला शरण गेल्याचा भास निर्माण होण्याची धास्ती संस्थानिकांना वाटल्यामुळे की काय न कळे, त्यांनी जयकरांच्याकडे याबद्दलची कामगिरी सोपविली. जयकर-प्रणीत समाईक हायकोर्ट योजना ही साबडे योजनेपेक्षा निश्चितपणें कमी दर्जाची होती. साबडे योजना व जयकर योजना यांतील फरक दाखविण्याचें आता कारण नाही. पण एका महत्त्वाच्या विशेषाचा उल्लेख करणें इष्ट वाटतें. साबडे समितीची समाईक हायकोर्टाची योजना, ही संस्थानांतील न्यायखातें बरेंचसें समाईक व्हावें अशा हेतूने केलेली होती; ही योजना मान्य केल्याने संस्थानांतील सर्वच न्यायदानपद्धति सुधारण्यास मदत झाली असती. या तपशिलाच्या बाबी चर्चा करून सोडविता आल्या असत्या, पण संस्थानिकांनी जयकर योजना अंमलांत आणण्याचें धाडस दाखविलें नाही. जयकर योजना अंमलांत आणली असती तरी, प्रजेने तक्रार केली असती असें नाही.

संस्थानिकांची युद्धाची पेटंट सबब

जुलै १९४३ च्या पहिल्या आठवड्यांत दाक्षिणी संस्थानिकांची एक सभा पुण्यांत झाल्यावेळीं हिंदुस्थान सरकारकडून ‘समाईक हायकोर्ट व समाईक पोलीस दल’ स्थापण्याबाबत ज्या सूचना आल्या होत्या, त्यांचा विचार होऊन, याबद्दलचा निर्णय युद्धसमाप्तीपर्यंत स्थगित करावा असें सरकारला कळविण्याचें ठरलें. खरोखर युद्धाचा व संस्थानिकांचा काय संबंध ? कांहींनी प्रजेकडून सक्तीने वसूल केलेला युद्धफंड सरकारला दिला असेल एवढाच काय तो संबंध ! कोणी संस्थानिक लढाईवर गेल्याचें नमूद नाही. महत्त्वाचे प्रश्न लांबणीवर टाकण्याकरता युद्ध हें एक निमित्त होतें. यासंबंधांत केसरीकार म्हणतात, “पुणें येथील श्रीमंत राजेसाहेब भोर यांच्या निवासस्थानांत दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानिकांची एक बैठक या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत भरली होती. बैठकींत हिंदुस्थान सरकारकडून ‘समाईक

हायकोर्ट व पोलिसदल' यासंबंधी आलेल्या सूचनांचा विचार झाला. या प्रश्नांवर बरीच भवति न भवति होऊन महायुद्धाच्या समाप्तीनंतरच वरील योजनांचा विचार व्हावा असा निर्णय करण्यांत आला! संस्थानांतील कांही बाबींचें संयुक्तीकरण करून नसा राज्यकारभार चालविण्याचें संस्थानिकांनी ठरविल्यास खर्चाच्या दृष्टीनेहि तें सोईस्कर होईल असा भरवसा असल्याने दक्षिण महाराष्ट्रांतील कांही पुढाऱ्यांनी तशी एक योजनाहि सुचविली आहे. पण पुणें येथे भरलेल्या बैठकींत सर्वच ओंफस झालें, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय! लहान संस्थानांचा कारभार कार्यक्षम होत नसल्याचें साम्राज्य सरकारच्या निदर्शनास आल्याने त्यांनी लहान संस्थानांचें एकीकरण करण्याची एक व्यापक योजना संस्थानिकांपुढे ठेवली आहे. या योजनेचा अंमल ओरिसा प्रांतांतील संस्थानें व काठेवाडमधील कांही संस्थानें यांच्यांत सुरू झाला आहे. या योजनेंत संस्थानिकांचा दर्जा कमी न होतां, प्रजेचें हित साधण्यास संधि मिळत असल्याने संस्थानिकांनी या व तत्सम दुसऱ्या सामाईक योजनांचा विचार जरूर करावयास पाहिजे. असली महत्त्वाची बाब महायुद्धाच्या सबबीवर कालावधीवर टाकणें अनुचित होय. महायुद्धां-नंतर होणाऱ्या पुनर्घटनेंत संस्थानिकांना आपले अधिकार अढळ राहावेत असें वाटत असल्यास त्यांनी संयुक्तीकरणाच्या या मर्यादित योजनेला आताच संमति देऊन आपले हक्क बळकट करावे यांतच त्यांचें कल्याण आहे. तसें न केल्यास भविष्यकाळीं कोणत्या घटनेपुढे त्यांना मान वाकवावी लागेल, कोणीं सांगावें?" युद्धकाळांत काय करावें अगर न करावें याची काळजी सरकारपेक्षा आपल्यालाच जास्त आहे असा आव या संस्थानिकांनी आणला. पण व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांचें संस्थानिकांच्या असल्या धोरणामुळे कांही समाधान झालें नाही. त्यांनी १९४३ च्या आक्टोबरांत नरेंद्रमंडळापुढे भाषण करतांना 'मध्यम दर्जाच्या संस्थानिकांनी समाइकीने कारभार करावा. नाही तर, त्यांच्या उत्पन्नाचा विचार करतां, त्यांचें अर्धवट स्वातंत्र्य टिकविण्याचे प्रयत्न अयथार्थ आहेत' असा परत स्पष्ट इषारा दिला. हिंदुस्थानचें युद्धसमाप्तीनंतरचें राजकीय स्वप्न व्हाईसरॉयांच्या डोळ्यांना दिसत होतें आणि म्हणून त्यांनी बादशहाचे प्रतिनिधि या नात्याने संस्थानिकांना आपला राज्यकारभार सुधारण्याचा योग्य तो सल्ला दिला; पण आमच्या अदूरदृष्टीच्या संस्थानिकांना त्यांचा सल्ला मानवला नाही, हें त्यांचें दुर्दैवच होय!

भोर संस्थानाधिपति फार कल्पक ! समाईक हायकोर्ट चुकून आलेंच, तर मग त्यांचे अधिकार काय राहणार ! या धास्तीने त्यांनी भोरांत प्रिव्ही कौन्सिल स्थापन करून हायकोर्टाच्या निकालावरील अपिलें ऐकण्याची सोय करून ठेवली आणि त्यामुळे समाईक हायकोर्टामुळे त्यांचे जाणारे संभाव्य अधिकार शाबूत राहण्याची सोय त्यांनी करून घेतली.

सावडे समितीची संस्थानिकांच्या मतपरिवर्तनाची खटपट चालूच होती आणि त्याचा थोडथोडा अनुकूल परिणाम होत होता. पेरी यांच्या जागीं श्री. मिचेल हे मार्च १९४४ मध्ये कोल्हापूरचे पंतप्रधान झाले; आणि त्यांनी समाईक हायकोर्टाच्या योजनेंत इतर संस्थानांप्रमाणे समान पातळीवर व समान भूमिकेवर येण्याची कोल्हापूरची तयारी असल्याचें जाहीर केलें. अशा परिस्थितींत सांगली अधिपतींनी आपल्या संस्थान विधिमंडळासमोर ता. ५–६–१९४४ रोजीं केलेल्या भाषणांत आपल्या गतवर्षीच्या व्यक्तव्याचा पुनरुच्चार केला. पण असा पुकारा करीत असतांना त्यांनी समाईक हायकोर्टाची योजना करून देण्याचें काम डॉ. जयकरांकडे कां सोपविलें, त्याचा खुलासा मात्र त्यांनी केला नाही. ता. २७–६–१९४४ रोजीं फलटणाधिपतींच्या पुढारीपणाने संस्थानिकांची एक सभा भरली, त्या वेळीं मिरज, मिरजमळा, फलटण, रामदुर्ग, जत, सावनूर, अक्कलकोट, भोर, औंध व कुरुंदवाड (थोरली पाती) या दहा संस्थानिकांनी जयकरकृत समाईक हायकोर्टाची योजना कार्यवाहींत आणण्याचा निर्णय घेतला. पण या निर्णयाचीहि पुढे प्रगति झाली नाही. चर्चा आणि विचारविनिमयाच्या मंथनांतच १९४४ वर्ष संपून गेलें.

समाईक हायकोर्टांत कोल्हापूर नको !

कोल्हापूरच्या समाईक हायकोर्टांतील प्रवेश हा कांही संस्थानांना मान्य होणारा नव्हता, त्याचा पुरावा जमखिंडी विधिमंडळाच्या बैठकींत (ऑगस्ट १९४५) यासंबंधी पास झालेल्या पुढील ठरावांत मिळतो :— संस्थानांत न्यायदानाची व्यवस्था चोख व आक्षेपरहित असणें अवश्य आहे. परंतु अशी व्यवस्था करणें प्रत्येक दक्षिणी संस्थानास शक्य नाही. यासाठी सर्वांनी मिळून एकच हायकोर्ट स्थापावें. कोल्हापूरसह एकच हायकोर्ट स्थापावें, असें म्हणणारांचा एक गट आहे. परंतु या व्यवस्थेने पुढे मागे बाकीचीं संस्थानें राजकीयदृष्ट्या कोल्हापुरांत विलीन होण्याची भीती वाटते. म्हणून कोल्हापूरसह एकच हायकोर्ट झाल्यास त्यास आमचे

राजेसाहेबांनी संमति देऊं नये. कोल्हापूर वगळून इतर सर्व दाक्षिणी संस्थानांचें हायकोर्ट खर्चाच्या व कामाच्या दृष्टींनी स्वयंपूर्ण व कार्यक्षम होण्याजोगें आहे. सबब अशी व्यवस्था झाल्यास आमच्या संस्थानने दुसऱ्या योजनेंत सामील होणें हितावह आहे." या ठरावास कै. श्री. साबडेव्यतिरिक्त प्रजापरिषदेच्या इतर सर्व सदस्यांनी पाठिंबा दिला होता. कोल्हापूरसह समाईक हायकोर्टास जमखिंडीप्रमाणे इतरत्रहि पण कांही संस्थानांत विरोध होता. या ठरावावरून कोल्हापूरबद्दल कसा अविश्वास वाटत होता याची प्रचीति येते. कै. साबडे यांना मात्र कोल्हापूरसह एकच समाईक हायकोर्ट हवें होतें.

दोन समाईक हायकोर्टास विरोध

कोल्हापूर रेसिडेन्सींत संस्थानिकांची सभा झाल्यावेळीं रेसिडेंट टॉमसन यांनी समाईक हायकोर्टाचा प्रश्न चर्चेस काढल्यावेळीं कोणीच विरुद्ध बोलले नाहीं; त्याचा अर्थ एवढाच की, समाईक हायकोर्टाची योजना तत्त्वतः मान्य आहे. पण या सभेचा कार्याच्या दृष्टीने फारसा उपयोग झाला नाही. समाईक हायकोर्टास शह देण्यासाठी सांगलींत स्वतंत्र हायकोर्ट बेंच स्थापन करण्यात आलें. कोल्हापूरसह समाईक हायकोर्ट योजनेस जास्त पाठिंबा मिळत असल्याचें दिसूं लागतांच सांगली अधिपतींनी जमखिंडीप्रमाणे त्यांना मिळूं शकणाऱ्या संस्थानांचा एक गट स्थापन केला आणि या गटाचे एक निराळें समाईक हायकोर्ट स्थापण्याचें ठरविलें. संस्थाना-संस्थानांमधील शह कांटशहाची ही कल्पना प्रजा-पुढाऱ्यांना मुळीच पसंत नव्हती. कै. अ. वा. साबडे यांनी त्यांच्या मताविरुद्ध जमखिंडी विधिमंडळांत ठराव पास झाल्यामुळे आपला विधि-मंडळाच्या सभासदत्वाचा राजिनामा दिला होता. दक्षिणी संस्थान लोकसभेचे कार्याध्यक्ष पं. सातवळेकर यांनीहि कोल्हापूरसह एकच हायकोर्ट झाल्यास खर्च कमी येऊन कार्यक्षमता वाढण्याचा विश्वास निःसंदिग्ध शब्दांत जाहीर केला. दोन हायकोर्टांबाबत औंधचे अधिपति कै. बाळासाहेब पंतप्रतिनिधि म्हणतात—

"दक्षिणी संस्थानांच्या राष्ट्रवर्धक खात्यांचा कारभार सामुदायिकरित्या चालविण्याच्या बाबतींतील पहिली पायरी म्हणजे समाईक हायकोर्ट ही होय दोन अगर अधिक हायकोर्टें करणें म्हणजे मूळच्या सामुदायिकत्वाच्या कल्पनेवर घाव घालणें होय. संस्थानांचें क्षेत्र, लोकसंख्या व उत्पन्न यांचा विचार न करतां सर्वच संस्थानांना समतेचें व सहकार्याचें तत्त्व लागू केल्यावर, योजना अमलांत आणण्याच्या बाबतींत कोणतीच अडचण येण्याचें कारण नाही. रस्ते, कालवे, वैद्यकीय साहाय्य वगैरे

खातीं अशीं आहेत की, त्यामध्ये प्रत्येक संस्थानाला स्वतंत्रपणें कांही विशेष करतां येणार नाही. पण सामुदायिकरीत्या या सर्व खात्यांच्या बाबतींत पुष्कळच विधायक कार्य करतां येईल. लोकशाहीच्या सध्याच्या काळांत वैयक्तिक प्रतिष्ठा व सत्ता या-संबंधीच्या कल्पनांच्या जागीं आता बहुजनसमाजाचें कल्याण व हित या गोष्टी आल्या पाहिजेत. आमच्या द. संस्थानांकरता दोन हायकोर्टें म्हणजे अनावश्यक व महागाईची चैन करण्यासारखें आहे. शिवाय, दोन्ही हायकोर्टांना भरपूर काम मिळेल असेंहि पण नाही. समाईक हायकोर्टाची योजना ही द. संस्थानांच्या इतिहासांत नवीन युग सुरू करणारी आहे. पूर्वग्रहित दृष्टीने न पाहणाराला ही योजना निःसंशय स्वागतार्ह वाटली पाहिजे. "

दक्षिणी संस्थानांकरता दोन गटांचीं दोन हायकोर्टें स्थापन करणें हें योग्य होणार नाही, असा अभिप्राय कै. अ. बा. लठ्ठे यांनी व्यक्त केला होता. ते म्हणतात, " It appears that the two groups of the Deccan States cannot reconcile, whatever their differences may be, in the matter of the establishment of a common High Court for all of them. As far as I know, the principal difficulty which has been preventing the union of all the Deccan States for the creation of one common High Court is the desire of some to maintain a separate identity, and thereby win an importance which they suppose they will have to forego. It would be, in the interest of the people of the Deccan States, if one High Court working in a fairly large collection of States is established rather than two equally starving courts to satisfy the vanity of some of them. "

कोल्हापूर, मिरजमळा व औंध विधिमंडळांनी एकच हायकोर्ट असावें असे ठराव पास केले; त्याचप्रमाणे मुधोळच्या वकील मंडळीने एकाच समाईक हाय-कोर्टास पाठिंबा देणारा ठराव पास केला. मिरजमळा विधिमंडळाने तर जेवढीं संस्थानें अनुकूल असतील, त्यांचेसुद्धा समाईक हायकोर्ट स्थापावें असें सुचविलें. या योजनेस पाठिंबा देतांना संस्थानी चळवळींचे आद्य संस्थापक कै. न. चिं. केळकर म्हणाले,

" अशा योजनेकरता पांच दहा टक्के खर्च जास्त झाला तरी हरकत नाही. मोठ्या संस्थानिकांनी कृपण बुद्धि न ठेवता, आपल्या मोठेपणाचा व आर्थिक सुस्थितीचा फायदा आपल्यापेक्षा लहान असलेल्या संस्थानांकरता करावा; यांतच त्यांचें खरें मोठेपण आहे. आपल्या मोठेपणाच्या कल्पनेमुळे जर एखादें संस्थान समाईक हाय-कोर्टाच्या योजनेंत आले नाही, तरी त्याचा फारसा विचार न मानता इतर संस्थानिकांनी हा प्रयोग करून पाहावा. "

शेवटीं दोन हायकोर्टांचा निर्णय

शेवटीं दोन समाईक हायकोर्टें स्थापन होण्याचें १९४५ अखेर ठरलें गेलें. या सर्व वाटाघाटींतून कोल्हापूर गटांत कोल्हापूर, जत, फलटण, औंध, मिरज, मुधोळ, सावंतवाडी, जंजिरा व कुरुंदवाड (धाकटी पाती) हीं नऊ संस्थानें आलीं, आणि सांगली गटांत सांगली, मिरजमळा, जमखिंडी, रामदुर्ग, अक्कलकोट, सावनूर, कुरुंदवाड (थोरली पाती) व भोर हीं आठ संस्थानें आलीं. या सर्व संस्थानांच्या रेसिडेंटला एकच समाईक हायकोर्ट मान्य होतें, पण कोणावरहि दडपण न आणण्याचें त्याने ठरविल्यामुळे दोन हायकोर्टांच्या योजना ठरल्या गेल्या. रेसिडेंटने जर याबाबत विधायक दृष्टि दाखविली असती, तर दोन हायकोर्टांचा आग्रह धरण्याचें सामर्थ्य संस्थानिकांत नव्हतें. पण अशा तऱ्हेचा आग्रह रेसिडेंटने कां धरावा? ब्रिटिश सरकारच्या संस्थानप्रजाविषयक धोरणांत संस्थानिकांवर सक्ति करणें बसत नव्हतें, तर केवळ सल्ला देण्याचें काम ते करीत. म्हणून बड्या लाटसाहेबांनी छोट्या संस्थानिकांना राज्यकारभाराचें संयुक्तीकरण करण्याचा फक्त सल्ला दिला, पण त्याबाबत सक्तीचा आग्रह धरला नाही. हें ब्रिटिश सत्तेचें राजकारण होय.

राजकीय सुधारणांचा वापर

समाईक हायकोर्टाच्या योजनेबाबत विचारविनिमय आणि चर्चा-मंथन चालू असतांना, ज्या संस्थानांतून विधिमंडळें अस्तित्वांत आलीं होतीं, अगर सुधारणा करण्याचें आश्वासन देण्यांत आलें होतें, तेथे १९४३-४५ च्या कालखंडांत कितपत प्रगति झाली हें पाहणें अगत्याचें आहे.

मिरजमळा विधिमंडळाची बैठक पांच वर्षांच्या विश्रांतीनंतर ता. २३-११-४३ रोजीं भरल्यावेळीं राजेसाहेबांनी एक वर्षानंतर मंत्री देण्याचें आश्वासन दिलें व या आश्वासनाची परिपूर्ति श्री. जरिमल्ली यांची मंत्रिपदावर नेमणूक करून करण्यांत आली. कुरुंदवाड विधिमंडळाची नव्याने स्थापना ता. ८-१०-१९४३ रोजीं होऊन श्री. शंकरराव घोरपडे यांची मंत्री म्हणून नेमणूक करण्यांत आली. जत विधिमंडळाचें उद्‌घाटन ता. १२-१-१९४३ रोजीं झाल्यावेळीं राजेसाहेबांनी मंत्री घेण्याचें आश्वासन दिलें, तर फलटणच्या मंत्र्यांचे अधिकार वाढविण्याची घोषणा ता. २९-३-४३ रोजीं भरलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनांत करण्यांत आली. पुढे थोड्याच काळांत म्हणजे ता. १–५–१९४४ पासून फलटण संस्थानांत दोन मंत्री नेमण्यांत येऊन संस्थानचा बहुतेक सर्व राज्यकारभार त्यांच्या हातीं

सोपविण्यात आला. फलटणांत कोणतीहि लोकपक्षीय चळवळ नसतांना, तेथे झालेलें सत्तादान हें विशेष कौतुकास्पद आहे. औंधनंतर जबाबदार राज्य-पद्धति स्थापन करणारें महाराष्ट्रांतील फलटण हें दुसऱ्या क्रमांकाचें संस्थान होय. पण हें सत्तांतर फार दिवस फलटणला लाभलें नाही. मंत्री श्री. स. रा. भोसले यांनी आपल्या पदाचा गैरवाजवी फायदा घेतल्यामुळे, त्यांना बडतर्फ करण्यांत आलें. फलटणांतील लोकशाहीला हा मोठाच धक्का बसला. यानंतरच्या काळांत फलटणांतील राजकारणास घसरगुंडी लागली आणि त्याचा परिणाम मार्च १९४५ मध्ये राज्यघटनाच तहकूब करण्यांत झाला.

१९४३ मध्ये कोल्हापूर विधिमंडळाची स्थापना संस्थानचें पंतप्रधान श्री. पेरी यांनी जाहीर करून, कोल्हापुरांत प्रातिनिधिक राजवटीचें बीज रोवलें. कोल्हापुरांतील अज्ञान राजवटीमुळे तेथील राज्यघटना इतर संस्थानांच्या मानाने फारच मागासलेली होती, म्हणूनच तीवर बहिष्कार टाकण्याचा आदेश कोल्हापूर प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी दिला. त्यामुळे कोल्हापूर विधिमंडळांत प्रजापरिषदेचे प्रतिनिधि निवडून येऊं शकले नाहीत. परिषदविरोधी अगर अपक्षीय मंडळी विधिमंडळांत निवडून आली. कोल्हापूर विधिमंडळ स्थापन करण्याच्या कामीं श्री. पेरी यांची सदिच्छा असल्याने तेथील आमदार सभासदांना मर्यादित क्षेत्रांत पण बरेंच उपयुक्त कार्य करतां आलें. लोकांच्या गाऱ्हाण्यांना सभासदांनी वाचा फोडली आणि त्यांचें निरा-करण करण्याचा प्रयत्न दरबारने केला. विधिमंडळांत पास झालेल्या एका ठरावानुसार १९४५ मध्ये नवीन सुधारणांचा आराखडा तयार करण्यासाठी दरबारने एक घटना समिति नेमली.

मिरज दरबारची विधिमंडळाबाबतची वृत्ति विलक्षणच होती. १९३८ मध्ये संस्थानांत द्विदल राज्यपद्धति स्थापन करण्याचें आश्वासन राजेसाहेबांनी दिलें, पण १९४३ पर्यंत या बाबतींत पुढचें पाऊल टाकण्यास दरबारच्या पंचांगांत मुहूर्तच सापडला नाही. १९४३ मध्ये कै. श्री. र. रा. बखले यांच्या अध्यक्षतेखाली राज्यघटना तयार करण्याकरता एक समिति नेमली गेली. या समितीला दिलेले अधिकार व कार्यक्षेत्र आणि नोव्हेंबर १९४२ मध्ये राजबंद्यांची सुटका करण्याच्या वेळीं प्रजापरिषदेला राज्यसुधारणा करण्याच्या बाबतींत दिलेलें आश्वासन, यांत तफावत पडल्याने परिषदेने बखले समितीवर बहिष्कार टाकला. हा बहिष्कार पूर्ण यशस्वी झाल्यामुळे, १९४४ जुलै मध्ये

बखले समितीचें विसर्जन करणें दरबारला भाग पडलें. बखले समिति बरखास्त करतांना दरबारने जी आज्ञापत्रिका काढली, तिच्यांत प्रजेच्या लायकी–नालायकीचा प्रश्न उपस्थित केला व त्यामुळे प्रजेंतील असंतोष वाढण्यास मदतच झाली. पुढे ता. १२–१–१९४५ रोजीं संस्थानांत द्विदल राज्यपद्धतीची घोषणा करण्यांत आली व यानंतर झालेल्या निवडणुकींत प्रजापरिषदेचे सभासद बहुसंख्येने निवडून आले, व त्यांपैकी श्री. कुरणे यांना मंत्रिपद देण्यांत आलें. नंतरच्या विधिमंडळाच्या भरलेल्या बैठकींत भाषण करतांना, मिरजेच्या राजेसाहेबांनी आपल्या प्रजेला झाल्या गेल्या गोष्टी विसरून जाऊन दरबारला सहकार्य करण्याचें आवाहन केलें.

भोरांत लोकशाहीचें विडंबन

भोरांतील सर्वच प्रकार न्यारा, असा अनेक वेळा अनुभव आलेला आहे. भोर विधिमंडळाच्या बहुतेक सर्व जागा भोर प्रजासभेने जिंकल्या. यशस्वी उमेदवारांविरुद्ध पडेल उमेदवारांनी तक्रार अर्ज केले, आणि योगायोग असा कीं या सर्व तक्रार–अर्जांचा निकाल पडेल उमेदवारांच्या बाजूने लागून, मतदारांनी निवडून दिलेले उमेदवार भोर न्यायासनाने पराभूत ठरविले. लोकशाहीची अशा तऱ्हेची झालेली विटंबना भोराशिवाय जगांत कोठेहि पाहावयास मिळणार नाही. भोर राजकारणांतच हें एक अद्भुत तंत्र पाहावयास मिळालें. भोरच्या राजेसाहेबांनी प्रजेचा पाठिंबा नसलेले श्री. शिंगरे यांची मंत्रिपदावर नेमणूक करून द्विदल राज्यपद्धति स्थापन केल्याचें नाटक केलें. श्री. शिंगरे यांनी आपल्या पुतण्याच्या नांवें धान्यपुरवठ्याची एजन्सी घेतल्यामुळे, त्यांच्या कारभाराच्या पावित्र्याबद्दल टीकेची झोड उठली व त्यामुळे त्यांना आपल्या मंत्रिपदाचा राजिनामा देणें भाग पडलें.

सांगली विधिमंडळाची बैठक ता. २१–१२–१९४४ रोजीं झाल्यावेळीं, नवीन मंत्र्यांचीं नांवें अगोदर जाहीर करणें कायद्याप्रमाणे आवश्यक असतां, तशीं तीं केलीं नाहीत म्हणून परिषदेच्या चोवीस सभासदांनी अधिवेशनांतून सभात्याग करून, दरबारबद्दलचा निषेध व्यक्त केला. याचा सुपरिणाम म्हणजे विशेष दिनावधि न होतां, श्री. बाळासाहेब कोरे व श्री. केशवराव कुलकर्णी यांची मंत्रिपदावर नेमणूक झाल्याचें जाहीर करण्यांत आलें, आणि तेथील वाद मिटला.

जमखिंडी दरबार बडगा दाखविल्याशिवाय वठणीवर येत नाही असा

आजवरचा दाखला आहे. परिषदेच्या अधिकारी मंडळाने संस्थानच्या शासन-मंडळांतील दोष न काढल्यास, मंत्र्यास राजिनामा द्यावा लागेल असें कळविलें. ऑगस्ट १९४४ मध्ये जमखिंडी विधिमंडळाची बैठक भरल्यावेळीं गांधी टोपी घालून येण्यास दरबारने मनाई केली. या मनाईच्या निषेधार्थ परिषदेचे सर्व सभासद (मंत्र्यासह) राजेसाहेबांच्या भाषणास गैरहजर राहिले. या निदर्शनाचा इष्ट परिणाम होऊन परिषदेच्या बऱ्याचशा मागण्या राजेसाहेबांना मान्य झाल्या आणि शासनमंडळ स्थापन करण्यांत आलें. पण या सुधारणा करतांना, जमखिंडी दरबारची कितपत सदिच्छा होती हा संशयाचा नेहमींच भाग असे. मंत्र्याला विश्वासांत घेण्यास जमखिंडी दरबार फारसें उत्सुक नसे. दरबारचें एकंदर आडमुठेपणाचें धोरण पाहून जमखिंडी प्रजापरिषदेने दरबारला दिलेलें सहकार्य माघारी घेण्याचें ठरविलें आणि त्यामुळे श्री. बंगी यांनी आपल्या मंत्रिपदाच्या राजिनामा दिला. असा पेचप्रसंग निर्माण झाल्यावर दरबार जागें झालें आणि परिषदेचे अध्यक्ष श्री. दासाप्पा यांना पाचारण करून परिषदेशीं दरबारला समेट करावा लागला.

सावंतवाडी संस्थानांत राजकीय सुधारणा करण्याचें १९४५ मध्ये जाहीर करण्यांत आलें.

औंधचा उत्कृष्ट आदर्श

औंधांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन होऊन १९४४ मध्ये पांच वर्षे पूर्ण झालीं. या पांच वर्षांचा विचार करतां, तेथील लोकशाहीचा कारभार फार चांगला चालल्याचें अनुभवास आले. या पांच वर्षांत लोकांची राजकीय व सामाजिक प्रगति होऊन ग्रामपंचायतींनी आर्थिक स्वराज्य निर्माण करण्याचा चंग बांधलेला असल्याचें दिसलें. शिक्षण, आरोग्य व लोकांच्यामधील नीतिमत्ता या बाबतींत वाढ झाली व न्यायालयांतील कामे मोठ्या प्रमाणांत कमीं झाली. औंधांतील या प्रयोगाबद्दल भारतीय लोकसभेचे अध्यक्ष कै. श्री. दादासाहेब मावळंकर यांनी पुढीलप्रमाणे उद्गार काढले :—

" औंधांतील क्रांति ही संस्थानिकांनी केलेली आहे, लोकांनी केलेली नाही आणि असें उदाहरण जगांत कोठें सापडणार नाही. "

रामदुर्ग संस्थानने १९४३ मध्ये कागदाच्या टंचाईच्या सबबीखाली विधिमंडळाची बैठक बोलावली नाही. पण असा अपवाद सोडल्यास, सर्व-साधारणतः विधिमंडळाच्या बैठकी वेळेवर भरत आणि प्रजापक्षीय सभासद

आपली कामगिरी जबाबदारीनें पार पाडीत असल्याचें दिसत असे. मंत्र्यांचा कारभारहि त्यांच्या मर्यादित क्षेत्रांत बरा चालविला जाई; आणि अधिकाराचा वापर करण्यास प्रजा सामान्यतः लायक असल्याचें दिसून आलें.

ज्या संस्थानांतून नव्याने विधिमंडळें स्थापन झालीं, त्यांतील सरकार-नियुक्त सभासद अगर विधिमंडळांचे अध्यक्ष नेमण्याबाबत एक चांगली प्रथा संस्थानिकांनी अमलांत आणली होती. संस्थानांतील मान्यवर कार्यकर्ते अगर खालसांतील सन्माननीय व्यक्ति यांना या जागा देण्यांत येत असत. अशा मान्यवरांत श्री. नानासाहेब चापेकर, दिवाणबहाद्दूर कुलकर्णी, कै. बखले, कै. श्री. ग. वझे, कै. पंडिताप्पा चिडोडी, श्री. लेले, बॅ. राजा, कै. साबडे यांच्यासारख्यांचा समावेश झालेला होता. त्यांचें मार्गदर्शन स्थानिक विधिमंडळांना व सभासदांना उपकारक ठरलें आणि विधिमंडळाचा दर्जा वाढण्यास मदत झाली.

प्रजापरिषदांचें कार्य

१९४२ च्या 'चले जाव' चळवळींत कोल्हापूर प्रजापरिषदेने धडाडीने भाग घेतला होता व त्याचा परिणाम तेथील कार्यकर्त्यांच्या बंदिवासांत झाला. पंतप्रधान श्री. पेरी यांना राजकारणांतील कोंडी फोडावयाची होती म्हणून त्यांनी १९४३ मे च्या दुसऱ्या आठवड्यांत प्रजापरिषदेच्या प्रमुख पुढाऱ्यांची मुक्तता केली; पण याचा फारसा उपयोग झाला नाही. परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांची सुटका झाल्याखेरीज (निदान सभेच्या कामापुरती) दरबार व परिषद् यांच्यामध्ये समेटाचा मार्ग काढणें अशक्य असल्याचें कार्याध्यक्ष श्री. बागलांनी जाहीर केलें.

भोरचे पुढारी कै. श्री. गोपीनाथराव पोतनीस हे शेतकऱ्यांत असंतोष पसरवितात, म्हणून दरबारने त्यांना १९४३ मध्ये अटक केली. पण त्यांच्यावर खटला भरण्याचें धैर्य दरबारने दाखविलें नाही. या स्थानबद्धतेबद्दल भोर दरबारविरुद्ध जोराची टीका होऊं लागली आणि अशा तऱ्हेने लोकमत प्रक्षुब्ध होत असलेलें पाहून, दरबारने त्यांना बंधमुक्त केलें; परंतु कोठल्यातरी जुन्या सांदीकोपऱ्यांत पडलेल्या एका प्रकरणावरून त्यांच्यावर खटला भरून, त्यांना त्रास देण्याचा अश्लाघ्य प्रयत्न भोर दरबारने सुरू केला. पण तोहि उद्योग सोडून देणें अखेर भोर दरबारास शहाणपणाचें वाटलें.

१९४३ मध्ये सांगली प्रजापरिषदेचें अधिवेशन कै. बखले यांच्या अध्यक्षतेखाली भरलें होतें.

१९४४ मध्ये जमखिंडी, मिरज व सांगली या संस्थानांच्या प्रजापरिषदांचीं अधिवेशनें अनुक्रमें श्री. दासाप्पा, खेर व भाई बागल यांच्या अध्यक्षतेखालीं झालीं. जमखिंडी परिषदेचे अध्यक्ष श्री. दासाप्पा यांनी खालसा मुलखांत संस्थानें विलीन होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. मिरज प्रजापरिषदेच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना श्री. बाळासाहेब खेर यांनी सर्व संस्थानी प्रजापरिषदांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्याची आवश्यकता प्रतिपादन करून संस्थानी चळवळीस कॉंग्रेस पाठिंबा देईल असें आश्वासन दिलें. लहान संस्थानांच्या संयुक्तीकरणाच्या कारभाराचा (विशेषतः न्यायदान, पोलीस, करपद्धति वगैरे) आग्रह सरकारकडून धरला जाईल, असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. मिरज प्रजापरिषदेने पं. सातवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमून राज्यघटनेची योजना तयार केली.

वरील प्रजापरिषदांशिवाय दोन संमेलनें भरविण्यांत आलीं. यांपैकी एक संमेलन एप्रिल १९४४ मध्ये पं. सातवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली कुरुंदवाडास भरविण्यांत आलें. त्यांत पुढील ठराव पास करण्यांत आले:—
(१) प्रत्येक संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें; (२) द. संस्थानांचें संयुक्तीकरण करणें; (३) प्रजेची संमति न घेतां, प. हिंदुस्थान व गुजराथमधील छोटीं संस्थानें मोठ्या संस्थानांत समाविष्ट केल्याबद्दल सरकारचा निषेध; (४) प्रजेची संमति न घेतां समाईक हायकोर्टाची योजना करण्याचें काम डॉ. जयकरांकडे सोपविल्याबद्दल दक्षिणी संस्थानिकांचा निषेध.

ता. ७-१२-१९४४ रोजीं सांगलीस श्री. खेर यांच्या अध्यक्षतेखाली दुसरें संमेलन भरविण्यांत आलें. प्रजापरिषदा वर्गनिरपेक्ष, जातिनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष बनाविल्या जाऊन जातीय संघटनांपासून त्या दूर ठेवल्या पाहिजेत, असा बहुमोल सल्ला त्यांनी दिला.

१९४५ मध्ये मिरजमळा (कै. श्री. न. वि. गाडगीळ, अध्यक्ष), भोर व जमखिंडी (कै. श्री. बाळासाहेब खेर, अध्यक्ष), फलटण (श्री. शंकरराव देव, अध्यक्ष), सांगली (श्री. डी. पी. करमरकर, अध्यक्ष), व सावंतवाडी (भाई बागल, अध्यक्ष) या संस्थानांच्या प्रजापरिषदांचीं अधिवेशनें भरलीं. या अधिवेशनांतून जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें, संस्थानिकांस खाजगी खर्चासाठी उत्पन्नाचा दहावा हिस्सा देणें, समाईक हायकोर्टाची

स्थापना करणें हे महत्त्वाचे ठराव पास झाले. भोरांत खेर गेल्यावेळीं त्यांना दरबारकडून अपमानकारक वागणूक देण्यांत आल्याबद्दल दरबारचा निषेध करण्यांत आला. वरील परिषदांपैकी मिरजमळा व फलटण या संस्थानांच्या परिषदांचीं पहिलींच अधिवेशनें होतीं.

सांगली प्रजापरिषदेच्या ध्येयांत बदल

भारतांतील राजकीय घडामोडींचा परिणाम संस्थानावर जोरानें व्हावयास लागला व त्याचें प्रतिबिंब ता. २८–१२–१९४५ रोजीं सांगलीस भरलेल्या सांगली संस्थान प्रजापरिषदेच्या अधिवेशनांत उमटलेलें दिसतें. आजवर संस्थानाधिपतीच्या आधिपत्याखाली जबाबदार राज्यपद्धति मिळविणें हें परिषदेचें ध्येय होतें; पण या परिषदेंत हें ध्येय बदलण्यांत येऊन संस्थानच्या विलिनीकरणाचें ध्येय ठरविण्यांत आलें. यासंबंधीचा पुढील ठराव पास करण्यांत आला :—“ अखंड व स्वतंत्र भारताच्या संयुक्त राज्यघटनेंत प्रांताचा अविभाज्य भाग म्हणून हल्लींच्या सांगली संस्थानचें विलीन व्हावें, हें परिषदेचें अंतिम ध्येय आहे. याची सुरुवात म्हणून सांगली संस्थानांत संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति त्वरित मिळविणें हा या परिषदेचा आजचा कार्यक्रम राहील. ”

द. सं. लोकसभेचें भोर अधिवेशन

ता. ११–२–१९४५ रोजीं सावडे समिति, लोकसभेची कार्यकारिणी व कांहीं कार्यकर्ते यांची सभा सांगलीला होऊन पुढीलप्रमाणे पुढील कामाची दिशा आखण्यांत आली— (१) लोकसभेचें अधिवेशन भोरास भरविणें; (२) संस्थानांची घटनात्मक परिस्थिति पाहणें व लोकांवरील अन्यायाची चौकशी करणें; (३) जयकर योजनेपेक्षा सावडे–समिति प्रणीत समाईक हायकोर्टाची योजना जास्त चांगली असल्याने तिचा पुरस्कार करणें; (४) संघराज्य स्थापन होण्यासाठी खटपट करणें.

वरील ठरावाप्रमाणे द. सं. लोकसभेचें १४ वें अधिवेशन भोर येथे ता. १२–५–१९४५ रोजीं कै. श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली टोलेजंगरीत्या भरलें गेलें. श्री. खेरांचें भाषण फारच सडेतोड झालें. “प्रजेच्या हक्कांचें प्रतिपालन न झाल्यास राजाला पदच्युत करण्याचा लोकांना हक्क आहे ” असें त्यांनी संस्थानिकांना बजावलें. या अधिवेशनांत पुढील ठराव

पास करण्यांत आले:—(१) इंग्लंडच्या राजाप्रमाणे संस्थानिकांस अधिकार असलेली पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून घेणें; (२) समाईक हायकोर्ट सुरू होणें; (३) स्वतंत्र भारताच्या घटना समितींत संस्थानी विधिमंडळांनी निवडलेले प्रतिनिधि असावेत; (४) विकृत द्विदल राज्यपद्धतीचा निषेध; (५) द. संस्थानांच्या संघराज्याच्या योजनेचा पुनर्विचार करण्याकरता कै. खेर, कै. वझे, श्री. शं. रा. दाते, श्री. भा. म. गुप्ते, कै. साबडे व वि. अ. पटवर्धन यांची समिति नेमणें.

सांगलीच्या सभेंत ठरल्याप्रमाणे संस्थानी कारभाराची चौकशी करण्याचें ठरून, त्याची कार्यवाही करण्याची जबाबदारी सांगलीचे श्री. ह. गों. टिळक वकील यांच्यावर चिटणीस म्हणून सोपविण्यांत आली. भोरांतील राजवटीबद्दल फार तक्रारी होत्या आणि विशेषतः विधिमंडळाच्या निवडणुकांबाबत जो खेळखंडोबा केला गेला होता, त्यामुळे भोरची चौकशी करणें आवश्यकच झालें होतें. या चौकशीसाठी कै. श्री. दादासाहेब मावळंकर (अध्यक्ष), श्री. नानासाहेब चापेकर, शं. रा. दाते, कै. अ. वा. साबडे व श्री. वि. अ. पटवर्धन (चिटणीस) यांची समिति नेमण्यांत आली.

साबडे समितीची नेमणूक झाल्यापासून दक्षिणी संस्थानांतील राजकीय चळवळीला कसें तेज चढत चाललें व समाईक हायकोर्ट योजना शेवटीं संस्थानिकांना कशी मान्य करावी लागली, याचा वृत्तान्त मागील पानांतून देण्यांत आलाच आहे. १९४३-१९४५ मध्ये बऱ्याच संस्थानांतून राजकीय सुधारणा अंमलांत येऊन प्रजापुढाऱ्यांना राज्यकारभारांत भागीदार करून घेतले गेले. विधिमंडळांचा कारभारहि वरच्या दर्जाने चालविला जाण्याच्या कामीं साबडे समिति फार जागरूक असे. साबडे समितीने तयार केलेला राज्यघटनेचा मसुदा जर संस्थानी दरबारांनी मान्य केला असता, तर किती तरी मोठा कालापव्यय थांबला असता आणि प्रजापरिषदा आणि दरबारें यांच्यांत जें वितुष्ट आलें, तें आलें नसतें; पण तेवढा समंजसपणा संस्थानी दरबारांकडून दाखविला गेला नाही, हें दुर्दैव होय.

भारताच्या स्वातंत्र्याची पहाट

१९४५च्या प्रारंभीं युरोपीय महायुद्ध संपण्याच्या सावल्या पडल्या होत्या तर वर्षअखेर भारताच्या स्वातंत्र्याची पहाट दिसूं लागली. ता. ७–५–१९४५ रोजीं युरोपांतील युद्ध संपलें आणि इंग्लंडचा जय झाला. अमेरिकेने जपानी

शहरावर संहारक बॉंब फेकल्यामुळें जपान सरकारला ता. १४–८–४५ रोजीं शरणागति पत्करावी लागली. ज्याप्रमाणे हिंदी पुढाऱ्यांची कारावासांतून मुक्तता झाली, त्याचप्रमाणे संस्थानांतील श्री. शिखरे, पोतनीस यांची बंदिवासांतून मुक्तता झाली. इंग्लंडांतील नवीन निवडणुकीमध्ये मजूर पक्षाचा विजय झाला आणि तो तेथे सत्तारूढ झाला. श्री. क्लेमंट ॲटली व श्री. पेथिक लॉरेन्स हे इंग्लंडचे पंतप्रधान व भारतमंत्री झाले. मजूर पक्ष सत्तारूढ झाल्यामुळे भारत लवकरच स्वतंत्र होईल अशी आशा वाटण्यास जागा निर्माण झाली.

भारत लवकरच स्वतंत्र होणार आणि स्वतंत्र भारताची घटना ठरविण्याकरता एक घटना समिति नेमली जाणार, असें दिसल्याबरोबर द. सं. लोकसभेच्या भोर अधिवेशनांत भारतीय घटना समितींत विधिमंडळांनी निवडलेले संस्थानांचे प्रतिनिधि घेतले जावे अशी मागणी करण्याचा पहिला मान द. सं. लोकसभेलाच पोचतो. ता. १५–११–४५ च्या औंध विधिमंडळाच्या बैठकींत अशाच तऱ्हेचे उद्गार तेथील पंतप्रधान श्री. आप्पासाहेब पंत यांनी काढले होते.

आगामी भारतीय राजकारणांत संस्थानी प्रश्नास कोणतें स्थान मिळणार, हें कळण्यासाठी संस्थानी प्रजा उत्सुक होती. भारताची भावी राजकीय घडण ठरवितांना आपलाहि हातभार लागला पाहिजे असें प्रजेला वाटत होतें आणि म्हणूनच भारतीय घटना समितींत संस्थानी प्रजेला स्थान देण्याची मागणी करण्यांत येऊं लागली. आगामी राजकारणांत पं. जवाहरलाल नेहरूंना असामान्य स्थान मिळणार होतें आणि ते संस्थानी प्रजेच्या बाबतींत कोणतें धोरण स्वीकारतात हा प्रश्न होता. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देतांना संस्थानिकांना हाताशीं धरून ब्रिटिश सरकार कोणते कोलदांडे घालील याची कल्पना नव्हती. संस्थानी प्रजेच्या आजवरच्या लढ्यांना कॉंग्रेसचा विशेष पाठिंबा नव्हता, हें खरें; पण अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेचे अध्यक्ष पं. नेहरू हेच असल्याने संस्थानी प्रजेला आपल्या भवितव्याबद्दल थोडीबहुत आशा वाटत होती; आणि त्यामुळे पंडितजींच्या संस्थानविषयक वक्तव्याबाबत प्रजा फार जागरूक होती. जयपूर संस्थान प्रजापरिषदेच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना पंडितजी म्हणाले :—

"संस्थानें नष्ट करण्याचें **आज तरी** कॉंग्रेसचें धोरण नाही. पण तीं जगणार कीं मरणार हें संस्थानिकांच्या सत्तात्यागावर अवलंबून आहे. ते सनदशीर राजे म्हणून

राहिले, तर त्यांना मान्यता दिली जाईल. तसें न झाल्यास, त्यांची सत्ता हिरावून घेतली जाईल. संस्थानिकांनी आपलें धोरण जर न बदललें, तर कॉंग्रेसला आपल्या संस्थानविषयक धोरणाचा फेरविचार करावा लागेल. प्रजेच्या दृष्टीने विचार करतां संस्थानिकांच्या बाबतींत आम्हीं तटस्थतेचें धोरण स्वीकारणें अशक्य आहे. मोठ्या संस्थानांना स्वतंत्र भारतांत स्थान राहूं शकेल. पण लहान संस्थानांना, त्यांना आपापले गट केल्याशिवाय, स्वतंत्र अस्तित्व राहणें हें अगदी अशक्य आहे. ''

लहान संस्थानांनी आपलें संघराज्य करण्याबद्दल पंडितजींनी जी सूचना केली, तशाच तऱ्हेचें आवाहन दक्षिणेंतील संस्थानिकांना तेथील लोकसभा १९४२ पासून करीत आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. याच संदर्भांत कॉंग्रेसचे सेक्रेटरी श्री. शंकरराव देव म्हणाले :

"संस्थानिकांनी भारतीय संघराज्यांत गेलें पाहिजे. लहान संस्थानांची उत्क्रांति व्हावी म्हणून त्यांनी संघराज्यें बनविलीं पाहिजेत. छोटीं संस्थानें मोठ्या संस्थानांत अगर खालसा मुलखांत समाविष्ट करतांना केवळ संस्थानिकांची नव्हे, तर संस्थानी प्रजाजनांची पण संमति घेतली पाहिजे."

नवीन राजकीय वातावरणांत संस्थानें कोणत्या परिस्थितींत जिवंत राहूं शकतील याचा मागोवा पं. नेहरू व श्री. शंकरराव देव यांच्या वरील उद्गारांवरून दिसून येत आहे. व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी घोषणा करून घटना समितींत संस्थानांचे प्रतिनिधि घेतले जातील असें जाहीर केलें. पण हे प्रतिनिधि संस्थानी प्रजेचे येणार काय, कीं संस्थानी विधिमंडळातर्फे निवडलेले जाणार की संस्थानिक नियुक्त करणार, याचा कांहीच खुलासा त्यांनी केलेला नव्हता. १९४५ च्या डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत हिंदुस्थानांतील राजकीय पेंचप्रसंग सोडविण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटचे एक शिष्टमंडळ हिंदुस्थानला पाठविण्यांत येणार असल्याचेंहि ब्रिटिश सरकारने जाहीर केलें.

• • •

४
संघराज्य कीं विलिनीकरण ?
(१९४६)

प्रजेच्या हक्काची सनद

१९४५ च्या अखेरीस भारताच्या राजकीय जीवनांत लवकरच फार मोठें स्थित्यंतर घडून येणार असल्याचें दिसूं लागून हिंदुस्थान लवकरच स्वायत्त होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. स्वायत्त भारतांत, संस्थानी भारताचा एक वेगळा कप्पा राहणार की काय, असा यक्ष प्रश्न निर्माण झाला. अशा परिस्थितींत सांगली प्रजापरिषदेने आपल्या घटनेंत फरक करून संस्थानाच्या विलिनीकरणाचें ध्येय ठरविलें. अशा दोलायमान परिस्थितींत जानेवारी १९४६ मध्ये नरेंद्रमंडळाची बैठक भरल्यावेळीं व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी ‘ संस्थानिकांचे बादशहांशीं जे तहनामे व करार झाले आहेत, त्यांत बदल करण्याचा सरकारचा विचार नसल्याचें ’ जाहीर करून ‘भारताच्या घटना समितीशीं संस्थानिकांनी सहकार्य करून भारताच्या प्रगतीच्या आड न येण्याचा ’ सल्ला दिला आणि लहान संस्थानांचीं संघराज्यें निर्माण करण्याची सूचना केली. या बदलत्या परिस्थितीचा नरेंद्रांच्यावर परिणाम होऊन, नरेंद्रमंडळाने प्रजेच्या हक्काच्या सनदेचा मसुदा जाहीर केला. या मसुद्यांत पुढील बाबी होत्या :— (१) प्रजेला नागरिकत्वाचे मूलभूत हक्क उपभोगतां येतील; (२) बहुसंख्याक लोकनियुक्त सभासद असलेलीं विधिमंडळें स्थापण्यांत येतील; (३) खासगी व दौलतीचा खर्च वेगळा ठेवून उत्पन्नापैकी कांही ठराविक अंश खासगी खर्चासाठी घेतला जाईल; (४) स्वतंत्र न्यायखातें निर्माण केलें जाईल; (५) उत्पन्नाचा मोठा भाग राष्ट्रसंवर्धक खात्याकडे खर्च केला जाईल.

नरेंद्रमंडळाला आताच अशा सनदेचा विचार करण्याची गरज कां वाटली, हा कांही मोठासा अवघड प्रश्न नाही. खालसाच्या पुढाऱ्यांच्या तोंडावर कांही तुकडा टाकतां यावा आणि आपल्या प्रजेने आपल्या पाठीशीं राहावें, असा संस्थानिकांचा स्वार्थी हेतु होता. वरील घोषणा जरी केली गेली, तरी या सनदेची अंमलबजावणी करण्याच्या कामीं संस्थानिकांनी उत्सुकता दाखविली नाही.

ब्रिटिश त्रिमंत्र्यांचें आगमन व भारतीय स्वातंत्र्याची पूर्वतयारी

ब्रिटिश पार्लमेंटांत जाहीर झाल्याप्रमाणे भारतमंत्री लॉर्ड पेथिक लॉरेन्स, सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स व श्री. ए. व्ही. अलेक्झांडर या तीन मंत्र्यांचें शिष्टमंडळ ता. २४–३–४६ रोजीं हिंदुस्थानांत आलें. ' सर्वपक्षीय तडजोड घडवून आणून हंगामी सरकार अस्तित्वांत आणणें ' हें या त्रिमंत्री शिष्टमंडळाचें कार्य होतें. भारताला स्वातंत्र्य देण्याचें ब्रिटिश सरकारने ठरविलें असून हिंदुस्थानची राज्यघटना येथील जनतेने करावी, असेंहि पण सरकारने ठरविलें होतेंच. या शिष्टमंडळाचा हिंदुस्थानांत तीन महिने मुक्काम होता. या शिष्टमंडळाने सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करून तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला, पण हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. त्रिमंत्र्यांनी हिंदुस्थानची जी योजना ठरविली होती, त्यामध्ये (१) परराष्ट्र, संरक्षण व वाहतूक या तीन खात्यांचें खालसांतील प्रांत व संस्थानें यांचें फेडरेशन करणें, व (२) शेषाधिकार प्रांताकडे व संस्थानाकडे राहणें, अशी दोन मुख्य कलमें होतीं. मुस्लीम लीगला पाकिस्तानच केवळ पाहिजे होतें, तर कॉंग्रेसला अखंड भारत ठेवण्याची इच्छा होती. त्यामुळे हिंदुस्थानांतील कॉंग्रेस व मुस्लीम लीग या दोन प्रमुख राजकीय पक्षांत एकमत होऊं शकलें नाही. त्रिमंत्रिमंडळ शेवटीं निराश होऊन जून १९४६ अखेर परत स्वदेशीं गेलें. त्रिमंत्रिमंडळाचा घटना समिति अंमलांत आणण्याच्या उद्देश सफल झाला, पण हंगामी मंत्रिमंडळ बनविण्याचा उद्देश त्यावेळीं सफल झाला नाही. ही कामगिरी व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्याकडे सोपविल्याचें जूनच्या अखेरीस प्रसिद्ध झालें. संस्थानिकांवरील सरकारचें सार्वभौमत्व नष्ट होत असल्याने व सार्वभौमत्वाचा वारसा भावी भारत सरकारकडे देण्यांत येणार नसल्याने नरेंद्रमंडळास त्रिमंत्री योजना मान्य होती.

त्रिमंत्र्यांनी आपल्या वाटाघाटी करतांना, संस्थानी प्रजेकडे संपूर्ण दुर्लक्ष केलें, याबद्दल भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या स्थायी समितीने नापसंति-दर्शक ठराव पास केला. कॉंग्रेस कार्यकरिणीने देखील याबद्दल केलेल्या ठरावांत म्हटलें कीं " त्रिमंत्री योजनेंत संस्थानांचा प्रश्न बराच संदिग्ध ठेवलेला आहे. घटना समितीचा बनाव हा विसदृश घटकांनी केलेला असतां कामा नये. घटना समितीवरील प्रतिनिधि ज्याप्रमाणे प्रांतीय विधिमंडळें निवडणुकीने पाठविणार आहेत, त्याचप्रमाणे संस्थानांच्या प्रतिनिधींची निवडहि संस्थानी विधिमंडळांनी करावी. "

घटना समिति कशी निवडली जाणार ?

काँग्रेस कार्यकारिणीचा असा जरी ठराव होता, तरी तो किती संस्थानांत अंमलांत आला गेला असता? दक्षिण महाराष्ट्रांतील बऱ्याच संस्थानांत कमीजास्त अधिकाराचीं लोकनियुक्त विधिमंडळें अस्तित्वांत तरी होतीं; पण इतरत्र फारच थोड्या संस्थानांत विधिमंडळें अस्तित्वांत होतीं. नरेंद्रमंडळने संस्थानी प्रजेच्या हक्काची सनद जाहीर केल्यावरहि संस्थानांतून विधिमंडळें स्थापन करण्याची काळजी घेतली गेली नाहीं; व म्हणून घटना समितीवरील संस्थानांचे प्रतिनिधि निवडतांना, भारतीय: संस्थान लोकपरिषदेच्या स्थायी समितीनें "ज्या संस्थानांत विधिमंडळें नसतील पण प्रजापरिषदा असतील तेथील परिषदेच्या साधारण सभेने प्रतिनिधींची निवड करावी" असा पर्याय सुचविला.

कोल्हापूर गटाच्या समाईक हायकोर्टास सुरुवात

त्रिमंत्र्यांच्या वाटाघाटी चालू असतांना, निरनिराळ्या प्रांतांत काँग्रेस पक्षाने सत्तारोहण केलें. मुंबई प्रांतांत कै. बाळासाहेब खेर यांच्या मुख्यमंत्रिपदाखालीं काँग्रेस सरकारने राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. १९४५ च्या अखेरीस ठरल्याप्रमाणे कोल्हापूर गटांतील संस्थानांच्या समाईक हायकोर्टाची सुरुवात ता. १–३–१९४६ पासून सुरू झाली. या गटांत कोल्हापूर, जत, औंध, फलटण, मिरज, सावंतवाडी, मुधोळ, कुरुंदवाड (धाकटी पाती) व भोर हीं नऊ संस्थानें होतीं. सावडे समितीने ज्या समाईक हायकोर्टाच्या योजनेचा पुरस्कार १९४३ पासून केला होता, त्यास तीन वर्षांनंतर मर्यादित फळ मिळालें. सांगली गटाचें समाईक हायकोर्ट पुढे कधीच अंमलांत आलें नाही. विचार, चर्चा, वाटाघाटी आणि स्वप्रतिष्ठेच्या कल्पना यांच्या जंजाळांत सांगली गटांतील संस्थानिक घोटाळतच राहिले.

विलिनीकरणाचा पुरस्कार

दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांचें संघराज्य व्हावें अशी संस्थानी प्रजेची मनीषा होती व औंध संस्थानाधिपतींनी म्हटल्याप्रमाणे समाईक हायकोर्ट ही संघराज्याची पहिली पायरी होती. पण यापैकी कोणतीच गोष्ट करण्यासाठी संस्थानिक सक्रिय भाग घेत नव्हते. नुसतीं आश्वासनें देऊन, 'तत्त्व मान्य, पण तपशील अमान्य' म्हणत वेळकाढूपणाचा डाव टाकला जात होता. या राजकारणास प्रजापुढारी विटून गेले. शिवाय भारतीय राज-

कारणाचा रंग लक्षांत घेतां, संस्थानांचें विलिनीकरण होणेंच बरें असें पुढाऱ्यांना वाटू लागलें. संस्थानिकांचे व संस्थानांचे कट्टर अभिमानी, संघराज्याचे पुरस्कर्ते, व द. सं. लोकसभेचे कार्याध्यक्ष पं. सातवळेकर यांनी एप्रिल १९४६च्या दुसऱ्या आठवड्यांत वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतींत विलिनीकरणाचा जोराने पुरस्कार केला. ते म्हणतात—

" दक्षिणी संस्थानांचें संघराज्य व्हावें व त्यांना भारतीय घटनेंत मानाचें स्थान मिळावें, या मताचा मी होतों. यासाठी गेलीं चार पांच वर्षें सतत खटपट केली. पण त्याबद्दल संस्थानिकांनी अनुकूल मतहि प्रदर्शित केलें नाही. आता माझें मत असें झालें आहे कीं, हीं संस्थानें मुंबई इलाख्यांत विलीन व्हावीं. कोणत्याहि परिस्थितींत त्यांना स्वतंत्र राहतां येणार नाही. इतकेंच नव्हे तर, अखंड भारताच्या दृष्टीने संस्थानें अस्तित्वांत न राहणें हेंच अत्यंत आवश्यक झालें आहे. एके काळीं संस्थानें राहावींत असें म्हणणारा मी आता तीं नष्ट व्हावीत असे म्हणत आहें."

साबडे समितीचे अध्यक्ष कै. अनंतराव साबडे व त्यांचे सहकारी श्री. वि. अ. पटवर्धन यांनीसुद्धा आपल्या 'संस्थानी स्वराज्य' वर्तमानपत्रांतून संस्थानें खालसा करावींत असा जोराचा प्रचार एप्रिल १९४६ पासून सुरू केला. औंध संस्थान विधिमंडळाचे अध्यक्ष व सेवानिवृत्त मुन्सफ श्री. नानासाहेब चापेकर यांनी एप्रिल १९४६ च्या दुसऱ्या आठवड्यांत एक मुलाखत दिली, त्यावेळीं ते म्हणाले :—

" संस्थानांनी भारतांत विलीन होणें हाच उत्तम मार्ग आहे. त्यांना आधुनिक राज्ययंत्राच्या खर्चाचा ताण सहन होणार नाही. संघराज्यापासून स्वास्थ्य लाभेल असें वाटत नाही. संस्थानी विधिमंडळांचें तात्त्विक दृष्ट्या कितीहि जरी समर्थन केलें, तरी प्रत्यक्षांत ती केवळ थट्टेची बाब आहे. एकाच व्यक्तीच्या ज्ञानाचें प्रदर्शन होतें."

संघराज्याचा संस्थानिकांना पुळका आला !

आता संस्थानी प्रजा संघराज्य व समाईक हायकोर्ट या योजनांपासून मागे फिरली, तर दक्षिणी संस्थानिकांना संघराज्याच्या प्रेमाचा उमाळा आल्याचा भास निर्माण करण्यांत आला. हा भास म्हणण्याचें कारण एवढेंच की, याहि बाबतींत याहि वेळेला संस्थानिकांनी मोठी धडाडी दाखविली असें नाही. मे १९४६ मध्ये संस्थानी दिवाणांची एक सभा कोल्हापूर रेसिडेन्सीमध्ये झाली व तींत संघराज्याबद्दल विचार होऊन तें स्थापन करण्याचें ठरलें. या संघराज्य योजनेंत औंध, जत, जमखंडी, फलटण, सांगली, मिरज, मिरजमळा, कुरुंदवाड (थोरली व धाकटी पाती), रामदुर्ग व भोर या अकरा संस्थानांनी

येण्याचें कबूल केलें. या संघराज्य योजनेचें पुढीलप्रमाणे स्थूल स्वरूप होतें :— (१) सर्व संस्थानिकांचें एक राजमंडळ स्थापलें जाईल व त्याची हुकमत सर्व संस्थानांवर चालेल; (२) सर्व संस्थानांना समान हक्क राहतील; (३) एक मंत्रिमंडळ व एक विधिमंडळ राहील; (४) सर्व संस्थानांचा एक खजिना राहून नोकऱ्या समाईक राहतील; (५) भिन्न सरहद्दी राहणार नाहीत; (६) घटना तयार करण्याकरता सर्व संस्थानांची एक घटना समिति निवडली जाईल.

वरील संघराज्य योजनेला पाठिंबा देताना कै. तात्यासाहेब केळकरांनी उद्गार काढले कीं, ‘ दक्षिणी संस्थानिकांनी हिंदुस्थानच्या प्रगतीला पोषक व ज्यांत लोकमताला अधिक वाव मिळेल अशी ही संघराज्याची कल्पना हातीं घेतली आहे. ’ रेसिडेंट हार्वे (कोल्हापूर) म्हणाले कीं, दक्षिणी संस्थानिकांचा संघराज्य स्थापण्याचा निर्णय हा केवळ स्थानिक महत्त्वाचा असून, त्यास अखिल भारतीय महत्त्व आहे. ’ औंधच्या अधिपतींनी ‘ द. सं. संघराज्य हें स्वतंत्र भारतांत अबाधित राहील, इतकेंच नव्हे तर, एक मोठा आदर्श राज्य संघ म्हणून भारतांत इतरत्र होणाऱ्या राज्यसंघांना आदर्शभूत होईल. ’ असा आपला असलेला विश्वास प्रकट केला.

संघराज्य करण्याची आता आमच्या संस्थानिकांना बुद्धि कां झाली ? याचें उत्तर पं. जवाहरलाल नेहरूंच्या एका मुलाखतींत सापडतें. या मुलाखतींत ते म्हणाले, “ लहान संस्थानिकांना स्वतंत्रपणें जगतां येणें अशक्य असल्याने त्यांची सत्ता काढून घेऊन त्यांना पेन्शन द्यावें; त्यांनी आपापले गट केल्यास फेडरेशनमध्ये त्यांना घेतां आल्यास घ्यावें. फक्त १५–२० संस्थानांना फेडरेशमध्ये स्वतंत्र स्थान मिळेल. ” ज्या वेळेस त्रिमंत्र्यांची राजकीय पेचप्रसंग सोडविण्याची खटपट चालू होती, त्यावेळीं नेहरूंनी दिलेली ही मुलाखत आहे. त्रिमंत्र्यांच्या वाटाघाटींमध्ये पंडितजींना कोणतें स्थान दिलें जात होतें तें संस्थानिकांनी आता ओळखलें होतें. तेव्हा त्यांच्या मताप्रमाणे आपण आपलें संघराज्य निर्माण केल्यास भारताच्या फेडरल राज्यघटनेमध्ये आपणास स्थान मिळेल, नाही तर आपली हकालपट्टी होईल, या भीतीने दक्षिणी संस्थान संघराज्याची आवश्यकता त्यांनी उचलून धरली असावी. कोल्हापूर मोठें संस्थान असल्याने तें स्वतंत्रपणें हिंदुस्थानचा घटक होऊं शकत होतें. बाकी राहिलेल्या संस्थानांचा विस्तार कोल्हापूर एवढा होत असल्याने कोल्हापूरव्यतिरिक्त इतर द. संस्थानांचें संघराज्य करण्याची कल्पना निघाली असावी. या कल्पनेचा जाहीर उद्घोष सांगलीच्या अधि-

पतींनी ता. २७-५-१९४६ रोजीं भरलेल्या संस्थान विधिमंडळाच्या बैठकींत केला. तेव्हा ते म्हणाले :—

"साधारण समान दर्जाच्या संस्थानिकांनी (म्हणजे कोल्हापूरव्यतिरिक्त) एकत्र येऊन प्रजेच्या आकांक्षा व गरजा यांच्या अनुरोधाने आधुनिक पद्धतीची राज्यघटना तयार करावयाची आहे. घटना समितीची योजना करण्याकरता जी कमिटी नेमण्यांत आली आहे, तिला प्रजेचें सहकार्य घेण्याबद्दल सुचविण्यांत आलें आहे. संघराज्याच्या कल्पनेस निश्चित स्वरूप आल्याबरोबर या विधिमंडळाला त्यावर चर्चा करण्याची संधि दिली जाईल. राजकीय प्रगतीचें उद्दिष्ट ठरल्यावर व विशेषतः संघराज्य होत असतांना, विशिष्ट कालमर्यादा दुय्यम दर्जाची ठरते. राजमंडळाची सत्ता मर्यादित असावी व सर्व राज्यकारभार लोकमंत्र्यांकडे सोपविण्याबाबत एकमत आहे. अशा परिस्थितींत सांगलीने जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी असें वाटत नाही."

संस्थानिकप्रणीत संघराज्यास विरोध

संघराज्याची प्रवर्तक म्हणजे साबडे समिति; पण तिलाहि विश्वासांत घेण्याची जरुरी राजमंडळाला वाटली नाही, यावरून प्रजेचें खरें सहकार्य राजमंडळाला नको होतें असाच अर्थ केला गेला आणि संघराज्याविरुद्ध लोकमत बनलें जाण्यास संस्थानिकांनी यशस्वी मदत केली. आता दाक्षिण महाराष्ट्रांतील बऱ्याच संस्थानांत विधिमंडळें अस्तित्वांत आलेलीं होतीं आणि कांहीं संस्थानांत लोकमंत्र्यांच्या हातीं कांही खात्यांचा कारभार सोपविण्यांत आलेला होता. सांगलीप्रभृति नरेशांना आपल्या विधिमंडळांचा व मंत्र्यांचा, संघराज्यासारखी महत्त्वाची घडामोड होत असतांना, सल्ला घेण्याची इच्छा झाली नाही; त्यामुळे विधिमंडळांना अगर मंत्र्यांना या घडामोडीबद्दल आस्था वाटूं नये असेंच या संस्थानिकांचें धोरण होतें असें म्हणावें लागतें. त्यामुळे संस्थानिकप्रणीत संघराज्य योजनेस प्रजेचा पाठिंबा मिळण्याचा संभव कमी कमी होऊं लागला.

सावंतवाडी परिषदेचे कार्याध्यक्ष श्री. भे. द. शिरोडकर, मुधोळ परिषदेचे अध्यक्ष श्री. नेसवी, सांगली परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. देशपांडे यांनी संघराज्यविरोधी आपलीं मतें प्रदर्शित केलीं. संस्थानिकांच्या संघराज्याच्या कल्पनेबाबत लोकांना कसा अविश्वास वाटत होता, त्याचें प्रत्यंतर श्री. रंगराव दिवाकर यांच्या पुढील वक्तव्यांत सापडणार आहे.

"आपलें अस्तित्व टिकविण्याच्या कामीं संघराज्याची निर्मिति करणें हा संस्थानिकांचा एक प्रयत्न आहे. जनतेच्या संमतीशिवाय गटराज्यें निर्माण करण्यांत आलीं, तर तीं आम्ही मानणार नाही. कर्नाटकांत कानडी संस्थानें विलीन व्हावीं."

भाषावार प्रांतरचनेच्या आड संघराज्यें येतील असा कानडी पुढाऱ्यांचा अकारण समज झाला होता आणि या गैरसमजाच्या भांडवलावर कानडी पुढारी संघराज्यास विरोध करीत होते. भाषिक प्रांतरचना होईल, त्या वेळीं मुंबई प्रांताचेसुद्धा तुकडे पडलेच असते. जेव्हा क्रांतिकारक फरक होईल, तेव्हा संघराज्याचासुद्धा फेरविचार होईलच कीं नाही ? पण एवढा विचार कोण करतो ? वरील तऱ्हेच्या संघराज्याच्या विरोधकांना जमखिंडीच्या राजेसाहेबांनी आपल्या विधिमंडळापुढे ता. १३–७–१९४६ रोजीं केलेल्या भाषणांत चोख उत्तर दिलें आहे. ते म्हणतात:

संघराज्य निर्माण केल्यानेच भारताच्या घटना समितींत आपल्या संस्थानांना प्रतिनिधि पाठवितां येतील. हें संघराज्य कर्नाटक एकीकरणाच्या विरुद्ध जाईल असा आक्षेप घेतला जात आहे, पण भाषावार प्रांतरचना होईल तेव्हा संघराज्याकडून विरोधी धोरण स्वीकारलें जाईल असें मानण्याचें कारण नाही. संस्थानांच्या एकीकरणाने संस्थानिकांची सत्ता बलवत्तर होईल हा आक्षेपहि बरोबर नाही. जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्यावर या आक्षेपांत अर्थच उरत नाही. खालसा मुलखांत विलीन होऊन जाण्यापेक्षा संघराज्यांत जास्त फायदे आहेत. प्रजेचा सल्ला घेतल्याशिवाय आम्ही ही योजना मुक्रर करणार नाहीं. संस्थानें नष्ट करण्याची कल्पना ही लोकपरिषदेच्या ध्येयाविरुद्ध आहे. ”

लोकपरिषदेच्या ध्येय-धोरणाचा हवाला एखाद्या राजाने देणें हें एक आश्चर्यच म्हटलें पाहिजे. आजवर किती संस्थानिकांनी परिषदेला सन्मानाने वागविलें, याचा विचार जमखिंडी नरेशांनी केला असता तर फार बरें झालें असतें. संघराज्यामुळे संस्थानी प्रजेचें हित होईल, या निःस्सीम आत्मविश्वासाने सांगली, जमखिंडी संस्थानाधिपतींच्यापुढे लोकसभेच्या साबडे समितीने तीन वर्षांपूर्वी आपली संघराज्याची योजना मांडली होती, पण त्या वेळीं त्याचा विचार करण्याची इच्छासुद्धा त्यांना झाली नाही. भारतीय राजकारणाचा रंग बदलणार असें पाहतांच संघराज्याचा संस्थानिकांना उमाळा आला.

नेहरूंचा संघराज्यास आशीर्वाद

आपले स्थानिक पुढारी, कार्यकर्ते, प्रजापरिषदा यांचा संघराज्यास होत असलेला वाढता विरोध पाहून, या संस्थानिकांना कॉंग्रेसश्रेष्ठींची मनधरणी करण्याची इच्छा झाली. संघराज्याचे पुरस्कर्ते श्री. शंकरराव देव यांच्या मध्यस्थीने भावी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल यांची ता. १० व ११ जुलै १९४६ रोजीं संस्थानिकांनी

भेट घेऊन आपली संघराज्याची कल्पना त्यांच्यासमोर मांडली. या कल्पनेस शुभचिंतन करतांना पंडितजी म्हणाले:—

संस्थानें नष्ट झालीं पाहिजेत असा माझा आग्रह नाही. पण तेथे लोकशाही सुरू झाली पाहिजे. एकतंत्री राजवट असलेल्या संस्थानांना संयुक्त घटनेंत स्थान मिळणार नाही. प्रजा अननुभवी असल्याने कांही निर्बंध घालण्यास हरकत नाही. लहान संस्थानांनी आपले संघ निर्माण केल्यास त्यांस घटना समितींत स्थान मिळेल. दक्षिणी संस्थानांच्या संघराज्याची योजना ही प्रगतिपर असून दुसऱ्यांना अनुकरणीय ठरणारी आहे.

लोकमत अजमावण्याकडे दुर्लक्ष

नंतर पुढे कांही दिवसांनी पंडितजी परत म्हणाले की, "ज्या संस्थानांनी एकीकरणाचें कार्य सुरू केलें आहे, त्यांनी प्रथम आपापल्या संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति चालू करावी आणि एकीकरण करावयाचें कीं नाही याचा निर्णय प्रजाप्रतिनिधीवर सोपवावा." लोकशाहीच्या दृष्टीने पंडितजींचा हा सल्ला योग्यच होता आणि त्याची सूत्ररूपाने अंमलबजावणी तावडतोब करणें हें आमच्या संस्थानिकांस मुळीच अशक्य नव्हतें. संस्थानी विधिमंडळांच्या आणि प्रजापरिषदांच्या कार्यकारी मंडळांच्या सभा बोलावून संस्थानिकांना संघराज्याबद्दलचा कौल घेता आला असता. जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याच्या बाबतींत कुरुंदवाड संस्थानाधिपतींनी मांडलेला दृष्टिकोण बरोबर होता. "संघराज्य येणार नसेल अगर संस्थानें विलीन करण्याचें धोरण हंगामी भारत सरकार अवलंबणार नसेल, तरच जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचा खटाटोप करावा" असा आपला असलेला अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. याबाबत एक गोष्ट निश्चित होती व ती म्हणजे आपल्या प्रजेचें मत काय आहे, तें अजमावणें ही होय; आणि याच बाबतींत संस्थानिकांनी जेवढी दक्षता घ्यावयास पाहिजे होती तेवढी घेतली नाही. ता. २८-७-४६ महात्माजींची भेट औंध-फलटणादि पांच संस्थानिक, न. चिं. केळकर, श्री. देव यांनीं घेतल्यावेळी त्यांनी संघराज्य विरोधी मत प्रदर्शित केलें.

जुलै १९४६च्या अखेरीस सांगलीच्या अधिपतींनी 'संघराज्य कीं विलिनीकरण' या प्रश्नाच्याबाबत विचारल्यावेळीं, कार्याध्यक्ष डॉ. देशपांडे यांनी सांगितलें कीं, "परिषदेचें ध्येय विलिनीकरण आहे. त्यामुळे संघराज्याला मान्यता देतां येत नाही, मग तें कोल्हापूरसह असो अगर कोल्हापूरविरहित असो." सांगली विधिमंडळाच्या आमदार सभासदांनी निराळयाच कारणास्तव संघराज्यास विरोध दर्शविला. या वेळीं खुलासा करतांना राजेसाहेब म्हणाले, "राजकीय खात्याच्या प्रेरणेवरून संघराज्याची कल्पना निघाली असें जें महात्माजी

म्हणतात तें बरोबर नाही. नरेंद्रमंडळांत भाषण करतांना व्हॉईसरॉयांनी छोट्या संस्थानांचे गट करण्याची सूचना केली. त्यामुळे संघराज्याचा विचार सुरू झाला." पण अशा तऱ्हेचें मत बडे लाटसाहेब गेलीं तीन वर्षें मांडीत असूनहि, त्याबद्दलचा विचार करण्याची बुद्धि राजेसाहेबांना तेव्हा कां झाली नाही याचा त्यांनी खुलासा केला असता तर बरें झालें असतें.

लोकसभेला विश्वासांत घेतलें

अशा परिस्थितींत संस्थानिकांनी संघराज्याचा प्रथम पुकारा केल्यापासून तब्बल चार महिन्यांनी म्हणजे ता. ८ आक्टोबर १९४६ रोजीं, संस्थानिकांनी दक्षिणी संस्थान लोकसभेचे पदाधिकारी व इतर पुढारी यांची सभा पुण्यास घेऊन त्यांना विश्वासांत घेतलें. या सभेस श्री. शंकरराव देव, भाई बागल, श्री. शिखरे, श्री. अनंतराव गानू, कै. अनंतराव साबडे, श्री. एस्. डी. श्रेष्ठी, आणि संस्थानांचे दिवाण हे उपस्थित होते. या सभेंत अकरा संस्थानांचें संघराज्य स्थापन करण्याचें एकमताने ठरलें आणि ज्या आणखी संस्थानांना संघराज्यांत येण्याची इच्छा असेल, त्यांना ता. ३०–११–१९४६ पर्यंत मुदत देण्यांत येऊन, त्यांच्यावर या मुदतीच्या आंत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून हंगामी मंत्रिमंडळें नेमण्याची अट घालण्यांत आली.

देवांचें मार्गदर्शन निरुपयोगी ठरलें

ता. ३०–११–४६ च्या तारखेपर्यंत आणखी कोणी संस्थानिकांनी संघराज्यांत येण्याचा मानस व्यक्त केला नाही; आणि हंगामी मंत्रिमंडळें स्थापन न करून संस्थानिकांनीच पुण्याच्या सभेंत पास केलेला ठराव अमलांत आणला नाही. औंध संस्थान विधिमंडळाची ता. १–११–४६ रोजीं बैठक भरून संघराज्यास पाठिंबा देण्यांत आला, पण इतर संस्थानी विधिमंडळांतून संघराज्याबद्दलचा ठराव आणला गेला नाही. संघराज्याचा विचार करण्याकरता ता. १-१२-१९४६ रोजीं सांगलीस द. सं. लोकसभेमार्फत संस्थानी कार्यकर्त्यांचें एक संमेलन भरविण्यांत आलें. या संमेलनास लोकसभेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद, प्रजापरिषदांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद व इतर कार्यकर्ते मिळून १५० लोक उपस्थित होते. ही मंडळी कोल्हापूर, सांगली, मिरज, मिरजमळा, औंध, भोर, फलटण, अक्कलकोट, रामदुर्ग, जत, जमखंडी, कुरुंदवाड व सावंतवाडी या तेरा संस्थानांतून आली होती. याशिवाय श्री. शंकरराव देव, रंगराव दिवाकर, डी. के. कुंटे, बापूसाहेब गुप्ते, निजलिंगाप्पा वगैरे कॉंग्रेस पुढारी उपस्थित होते. सभापति

म्हणून श्री. निजलिंगाप्पा यांची निवड झाली. लोकसभेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत 'संघराज्याच्या इष्टानिष्टतेचा निर्विकार मनाने विचार करावयाचा असून, आपण कोणासहि वचनबद्ध झालों नाहीं' असा खुलासा केला. नंतर श्री. शंकरराव देव संघराज्याचा पुरस्कार करतांना म्हणाले :

"सध्या काँग्रेस व ब्रिटिश सरकार यांच्यामध्ये पुढील राजकीय स्वातंत्र्याच्या भविष्याबद्दल वाटाघाटी चालू आहेत. आजचें काँग्रेसचें धोरण ब्रिटिशांना घालविण्याचें नसून, केवळ सत्ता मिळविण्याचें आहे. त्यामुळे संस्थानें नष्ट करण्याचें काँग्रेसचें धोरण नाही. संस्थानें राहणारच आहेत. तीं कोणत्या स्वरूपांत राहावयाचीं एवढाच काय तो प्रश्न असून, हा प्रश्न प्रजेने सोडवावयाचा आहे. प्रत्येक संस्थानांत जबाबदार राज्य-पद्धति स्थापन करून घेणें हें पहिलें काम जरी असलें, तरी लहान संस्थानांचें काय भवितव्य ठरूं शकेल हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. लहान संस्थानें स्वतंत्रपणें राहणें अशक्य असल्याने, त्यांतून संघराज्याची कल्पना निघाली. संस्थानें जर नष्ट होणार नाहीत तर मग तीं संघरूपाने राहिलीं म्हणून कोठें बिघडलें? व म्हणून माझा या संघराज्यास पाठिंबा आहे. संघराज्याची घटना, घटना समितीने बनवावयाची असून, संघराज्याकडे सर्व सत्ता जावयाची आहे. या अटी संस्थानिकांनी मान्य केलेल्या आहेत. संघराज्यामुळे प्रजेचे हात बळकट होतील. मोठ्या संघराज्यापेक्षा लहानांचें संघराज्य अधिक यशस्वी होईल. या प्रश्नाकडे विरोधी पूर्वग्रह करून घेऊन पाहणें बरोबर नाही."

श्री. देवांच्या भाषणानंतर पुढे या ठरावावर जी चर्चा झाली, त्यांत कर्नाटकस्थ संस्थानी प्रजेचा बराच विरोध दिसून आला. कर्नाटकाचे पुढारी श्री. निजलिंगाप्पा यांचा पुढील कारणास्तव संघराज्यास विरोध होता :— "(१) प्रजेचा विचार न घेतां ही योजना आखण्यांत आली; (२) संस्थानांचें सलग क्षेत्र नाही; (३) संघराज्याचें आर्थिक उत्पन्न कमी पडेल; (४) प्रजा कानडी-मराठी असल्याने, त्यांच्यामध्ये एकभाषिकत्व नाही; (५) संघराज्याचा प्रयत्न अव्यवहार्य आहे; (६) आपलें अस्तित्व कायम ठेवण्याचा संस्थानिकांचा हा खटाटोप आहे." कांहींनी विलिनीकरणाचा आग्रह धरून, संघराज्यास विरोध केला. आजवर हरएक बाबतींत संस्थानिकांनी जो दुराग्रह दाखविला आणि जो वेळकाढूपणाचा खेळ केला, त्यामुळे त्यांच्यावर विश्वास न राहिल्याचा परिणाम इतरांच्या विरोधांत झाला. वरील सभेंत कोणताहि ठराव पास जरी करण्यांत आला नाही, तरी सामान्यतः बहुमत संघराज्याच्या बाजूचें होतें असें म्हणावयास हरकत नाही.

संघराज्याची कल्पना मूर्त स्वरूपांत येण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यावर संस्थानांतील कानडी प्रजाजनांनी रबकवीस एक परिषद् भरविली, त्यांत संघराज्यविरोधी ठराव पास करण्यांत आला. या सभेस साबडे उपस्थित होते, व त्यांनी असा ठराव पास न होण्याबद्दल खटपट केली, पण ती यशस्वी झाली नाही. जमखिंडीच्या अधिपतींनी ज्याप्रमाणे भाषावार प्रांतरचना व कानडी मुलूख याबद्दलचा खुलासा स्पष्ट शब्दांत केला, तसा खुलासा संघराज्याच्या राजमंडळाने अधिकृतपणें न केल्याने कानडी प्रजाजनांचा संघराज्याबद्दलचा गैरसमज वाढण्यास मदत झाली.

केळकरांचा संघराज्यास आशीर्वाद

श्री. तात्यासाहेब केळकर संघराज्याचे पुरस्कर्ते होते. ‘ या संघराज्यांत कोल्हापूरने पण यावें. प्रांतांत संस्थानें विलीन व्हावीं, या अतिरिक्त मागणीचा जोर कमी व्हावा म्हणून जबाबदार राज्यपद्धति सुरू करण्यांत येत आहे, हें पाहून मला आनंद वाटतो,’ असा आपला अभिप्राय त्यांनी एका मुलाखतींत व्यक्त केला.

राजकीय सुधारणांची प्रगति

सन १९४६ मध्ये सावंतवाडी संस्थानांत नव्याने विधिमंडळाची स्थापना करण्यांत आली. प्रातिनिधिक संस्थांची मागणी आजवर न झाल्याने विधिमंडळ स्थापन केलें गेलें नाही, असा टोमणा श्री. राणीसाहेब रीजंट यांनी आपल्या उद्घाटनाच्या भाषणांत प्रजापुढाऱ्यांना दिला. रामदुर्गमध्ये श्री. गदग यांना मंत्रिपद देण्यांत आलें. भोर, मुधोळ, कुरुंदवाड वगैरे कांही संस्थानांतील विधिमंडळांस जास्त अधिकार देण्यांत आले. सांगलीच्या अधिपतींनी दसऱ्याच्या मुहूर्तावर ता. ५–१०–४६ रोजीं संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्याचें जाहीर करून श्री. कोरे, कुलकर्णी, पाटील व कदम या चार मंत्र्यांची नेमणूक केली व त्यांच्याकडे सर्व राज्यकारभार सोपविला. कोल्हापूर व संघराज्य याबद्दल बोलतांना राजेसाहेब म्हणाले :

“ कोल्हापूर स्वतंत्र राहण्याइतकें मोठें आहे. शिवाय कोल्हापूरच्या मानाने इतर संस्थानें इतकीं लहान आहेत कीं, तीं कोल्हापूरपुढे निःष्प्रभ ठरतील. संघराज्यांतून कोल्हापूर वगळण्याच्या अटीवरच, संघराज्यांत प्रवेश करण्याचें दरबारने ठरविलें आहे. दुर्दैवाने लोकमताच्या उदासीनतेमुळे संघराज्य लांबणीवर पडत आहे. स्थानिक लोकमत असें होतें कीं, प्रथम जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी. ही गोष्ट आम्ही आता केली आहे. आता नव्या मंत्रिमंडळाने संघराज्याचा नेटाने पुरस्कार करावा. संघराज्यांतच लहान संस्थानांचा तरणोपाय आहे ! ”

सांगलीच्या अधिपतींना हा वरील शोध लागावयास फार काळ लागला. साबडे समितीने १९४३ सालींच लहान संस्थानांच्या उद्धाराचा व तरणोपायाचा संघराज्य हा एकच मार्ग असल्याचें संस्थानिकांच्या कानींकपाळीं ओरडून सांगितलें होतें, पण त्या वेळीं त्यांना तें पटलें नाही. आता सांगलीच्या नृपतींना हा जो प्रकाश दिसला, त्याचें मूळ त्यांचे स्नेही रामदुर्गचे अधिपति यांनी विधि-मंडळापुढे ता. २९–७–४६ रोजीं केलेल्या भाषणांत सापडतें. ते म्हणतात :

"त्रिमंत्री घोषणेमुळे संघराज्य निर्माण करण्याचा व प्रजेला राज्यकारभारांत सह-भागी करण्याचा निश्चय राजे लोकांना करावा लागला. छोटीं संस्थानें व त्यांचे अधिपति जिवंत राहावयाचे असतील, तर संघराज्य करणें हा एकच मार्ग होता, व तो त्यांनी चोखाळण्याचें ठरविलें."

तेव्हा संघराज्याचा मार्ग ठरवितांना प्रजाहितबुद्धि होती असें नव्हे, तर जिवंत राहण्याचा हा एक प्रयत्न होता, असें या भाषणावरून स्पष्टपणें दिसतें.

मागील प्रकरणांत उल्लेखलेला फलटणांतील पेचप्रसंग न सुटल्यामुळे तेथे नवीन निवडणुका घेण्याचें ठरलें. भोरांतील विधिमंडळांतील सभासद हे कोर्टाच्या मागल्या दाराने आलेले होते आणि त्याबाबत मावळंकर समितीने दरबारच्या न्यायदेवतेवर फार जोराची टीका केली होती. या मावळंकर अहवालामुळे जी परिस्थिति निर्माण होणार होती, तिचा शहाणपणाने विचार करून दरबारने विधिमंडळ बरखास्त केलें व ता. ६-२-४६ रोजीं कांही राजकीय सुधारणा जाहीर केल्या आणि शासनमंडळाचे अध्यक्ष म्हणून न. चिं. केळकरांची नेमणूक केली. ज्या नवीन निवडणुकी घेण्यांत आल्या त्यांत प्रजासभेचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून आले.

प्रजापरिषदांचा प्रचार

१९४६ मध्ये सावंतवाडी व मिरज (श्री. रावसाहेब पटवर्धन अध्यक्ष), मुधोळ (श्री. नेसवी अध्यक्ष), जत व अक्कलकोट (भाई बागल अध्यक्ष), कुरुंदवाड व जंजिरा (कै. न. वि. गाडगीळ अध्यक्ष) या संस्थानांच्या प्रजापरिषदांचीं अधिवेशनें झालीं. जत प्रजापरिषदेंत विरोधी पक्षाने हुल्लड माजविण्याचा प्रयत्न केल्यामुळे, अधिवेशनाचें काम यशस्वीपणें तडीस गेलें नाही. या अधिवेशनांतून जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचे ठराव पास करण्यांत आले. निरनिराळ्या अध्यक्षांनी आपापल्या भाषणां-तून संघराज्य कीं विलिनीकरण या प्रश्नाबद्दल चर्चा केली. जबाबदार राज्यपद्धति दिल्यावर हा प्रश्न संस्थानी प्रजेच्या संमतीने ठरावण्यांत

यावा असाच कौल सर्वत्र देण्यांत आला; भारताच्या घटना समितीवर संस्थानांचे प्रतिनिधि म्हणून जे जावयाचे आहेत, ते प्रजेने निवडलेले असावेत अशा आशयाचें ठराव पास झाले. दक्षिणी संस्थानांतील विधिमंडळांतील आमदारांचें एक संमेलन लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली भरून त्यांत पुढील ठराव पास करण्यांत आले :—(१) घटना समितींत फक्त प्रजेचे प्रतिनिधि घेण्यांत यावे; (२) प्रजेला विचारल्याशिवाय कोणताहि घटनात्मक बदल (संस्थानाबद्दल) भावी घटनेंत केला जाऊं नये; (३) संस्थानी प्रजेतर्फे संस्थानिकांना बोलण्याचा अधिकार नाही. त्यांनी आपापल्या हितसंबंधापुरते फक्त बोलावे.

कोल्हापूर प्रजापरिषदेमार्फत ता. २९–७–४६ रोजीं सर्व संस्थानभर सभा घेण्यांत येऊन घटना समितीवर जावयाचा प्रतिनिधि हा प्रजेने निवडलेला असावा अशी मागणी करण्यांत आली.

कोल्हापुरांतील उदासीन राजकारण

कोल्हापूरच्या बाल छत्रपतींचें ता. १-१०-१९४६ रोजीं निधन होऊन तेथील रीजन्सी कौन्सिल बरखास्त झालें आणि शासनमंडळाच्या मार्फत राज्यकारभार पाहिला जाऊं लागला. सर थॉमस ऑस्टिन यांची पंतप्रधान म्हणून सरकारने नेमणूक केली. प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी कोल्हापूर दरबारला अंतिमोत्तर पाठवून डिसेंबर अखेरच्या आंत हंगामी सरकार अस्तित्वांत न आल्यास प्रजापरिषद् चळवळ सुरू करील असें कळविलें. या अंतिमोत्तराचा दरबारवर कांहीच परिणाम झाला नाही. या प्रश्नांच्या बाबतींत भारतीय संस्थान लोकपरिषदेकडे परवानगी मागण्यांत आली होती, पण तिने लढा सुरू करण्याची परवानगी दिली नाही. त्याचें कारण असें देण्यांत आलें की, "कोल्हापुरांत सज्ञान दत्तक घेतला जाणार असल्याने सध्या हंगामी सरकार स्थापन करणें उचित ठरणार नाही." आपल्याच राजाविरुद्ध लढा पुकारणें हें कित्येकांस पसंत नव्हतें आणि त्यामुळे कोल्हापूर प्रजाप्ररिषदेंत यावेळीं दोन गट पडल्याचें दिसून आलें.

दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांतून राजकीय सुधारणांचें पाऊल पुढे पडत असतां, कोल्हापूरचें पाऊल मात्र पुढे पडत नव्हतें. भाई माधवराव बागल कोल्हापुरांत जिवंत राजकारण निर्माण करूं शकले नाहीत. कोल्हापूरच्या घटना समितीच्या कामांत विशेष प्रगति होत नव्हती. कोल्हापूरचा वारस न ठरल्याने तेथील दरबार व प्रजा हीं दोन्हीं सर्व बाबतींत उदासीनच होतीं.

भोरची न्यायदेवता राजेसाहेबांची बटिक

भोर संस्थानांतील राज्यकारभाराबद्दल चौकशी करण्यासाठी १९४५ सालीं द. सं. लोकसभेने हिंदी पार्लमेंटचे स्पीकर कै. श्री. दादासाहेब मावळंकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली होती. या मावळंकर समितीने संस्थानच्या कारभाराची व विशेषत: विधिमंडळाच्या निवडणुकांच्या तक्रार-अर्जांची चौकशी करून आपला सविस्तर रिपोर्ट तयार केला. " खाई त्याला खवखवें " या न्यायाने राजेसाहेबांना आपल्या करणीची बोच वाटूं लागली असावी, व म्हणून रिपोर्ट प्रसिद्ध न होण्यासाठी राजेसाहेबांनी खूप खटपट केली, पण त्याचा उपयोग झाला नाही. हा रिपोर्ट ता. १-८-४६ रोजीं प्रसिद्ध करण्यांत आला व त्याच्या प्रसिद्धीमुळे भोरचे राजेसाहेब कै. श्री. बाबासाहेब पंतसचिव यांनी संस्थानी न्यायदेवतेला आपली बटिक करून पवित्र न्यायक्षेत्रांत कसा हैदोस घातला याचें हिडिस प्रदर्शन झालें. यामुळे सर्वत्र भोरच्या राजवटीबद्दल उपहास व धिक्कार प्रकट होऊं लागला. या आपत्तींतून बाहेर पडण्याकरता राजेसाहेबांनी संस्थानी चळवळीचे संस्थापक व त्यांचे स्नेही कै. श्री. तात्यासाहेब केळकर यांचा धावा करून त्यांना फेब्रुवारी १९४६ पासून भोरच्या शासनमंडळाचे अध्यक्ष नेमले व त्यांच्याकडे संस्थानचा कारभार सोपविला. कै. केळकरांनी ही जागा पत्करावयास नको होती, असें लोकांचें मत होतें. आपल्या दोषांवर पांघरूण घालण्यासाठी राजेसाहेबांना केळकरांसारखा मोहरा खर्ची घालण्याचा प्रसंग यावा ही राजेसाहेबांना नामुष्कीची आणि लाजिरवाणी गोष्ट होय. केळकरांनी आपल्या अधिकारांत असलेल्या बाबींत शासनाला योग्य वळण लावण्याचा प्रयत्न केला. सुमारे अठरा महिने म्हणजे भोरांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन होईपर्यंत (ता. १८-८-१९४७) केळकरांनी भोर शासनमंडळाचे अध्यक्ष या नात्याने काम पाहिलें.

भारतांत हंगामी सरकार स्थापन

ब्रिटिश सरकारची त्रिमंत्री योजना जरी फसली होती, तरी घटना समिति अस्तित्वांत येण्याचें ठरलें. त्रिमंत्री हिंदुस्थानांत असतांना हंगामी सरकार अस्तित्वांत जरी येऊं शकलें नाही, तरी व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्या खटपटीने कॉंग्रेसपक्षाचें हंगामी सरकार ता. २-९-१९४६ रोजीं सत्तारूढ झालें. या वेळीं मुस्लीम लीग हंगामी सरकारांत आली नाही, पण पुढे दीड

महिन्याच्या आंतच लीगला आपला विचार बदलावासा वाटला आणि ता. १५–१०–१९४६ पासून कॉंग्रेस–लीग पक्षांचें संमिश्र मंत्रिमंडळ हंगामी सरकार या नात्याने हिंदुस्थानचा कारभार पाहूं लागलें. पं. जवाहरलाल नेहरू हे भारताचे पंतप्रधान झाले आणि तेच भारतीय संस्थान लोकपरिषदेचे अध्यक्ष असल्याने, संस्थानी प्रजेचें भविष्य उजळणार असा विश्वास संस्थानी प्रजेला वाटूं लागला. भारतीय घटना परिषदेस ता. ९–१२–१९४६ पासून कै. बाबू राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली सुरुवात झाली.

संभ्रमावस्था–संघराज्य कीं विलिनीकरण ?

सन १९४६ च्या अखेरीस कोल्हापूर सोडून बाकीच्या दक्षिणी संस्थानांचें संघराज्य होणार काय, हा यक्ष प्रश्न उभा होता. कोल्हापूर, वाडी जहागीर व जंजिरा हीं संस्थानें वगळून बाकी १५ संस्थानांच्या संघराज्याची योजना होती. या पंधरा संस्थानांचें क्षेत्रफळ ७२९४ चौ. मैल असून लोकसंख्या १५,८७,८०३ होती. हीं संस्थानें पूर्ण सत्ताधारी होतीं. कांही संस्थानांचें समाईक हायकोर्ट स्थापन झालेलें होतें. संघराज्याच्या योजनेप्रमाणे खाजगी खर्च नरेंद्रमंडळाच्या शिफारशीप्रमाणे ठरविला जावयाचा होता. आजवर संघराज्यांत अकरा संस्थानें सामील व्हावयाचीं असें ठरलें असून त्यांच्या घटना समितीची संख्या ३३ राहावयाची होती. प्रत्येक संस्थानाधिपतीचा एक प्रतिनिधि व विधिमंडळांनी १४ प्रतिनिधि निवडून द्यावयाचे होते. [औंध, जमखिंडी, जत, कुरुंदवाड (धाकटी व थोरली पाती), मिरज, मिरजमळा, फलटण व रामदुर्ग यांना प्रत्येकी १, भोर २ व सांगली ३–लोकसंख्येच्या प्रमाणांत ही वाटणी केलेली आहे); पांच तज्ज्ञ (त्यांपैकी एक अध्यक्ष), शिवाय मुसलमान, स्त्रिया व हरिजन यांस प्रत्येकी एक] बाकी राहिलेलीं चार संस्थानें संघराज्यांत समाविष्ट झाल्यास घटना समितीची संख्या वाढली असती.

ज्या ११ संस्थानिकांनी संघराज्यास संमति दिली, त्यांनी आपापल्या विधिमंडळांतून संघराज्याच्या योजनेस मान्यता मिळविली असती, तर १९४६ अखेर द. सं. संघराज्याचें हंगामी सरकार अस्तित्वांत आलें असतें. पण विलंब आणि दिरंगाईचें धोरण संस्थानी दरबारांच्या रोमरोमीं भिनलें असल्यामुळे त्यांच्या हातून तें कांही झालें नाही. त्यामुळे दक्षिणी संस्थानांचें संघराज्य होणार कीं प्रजेचा कौल विलिनीकरणाकडे जास्त जास्त झुकणार, अशा संभ्रमावस्थेंत १९४६ वर्ष संपलें.

• • •

५

संस्थानांचें विलिनीकरण झालें

(१९४७ ते १९४९)

संघराज्याची कासवाची गति

सन १९४६ च्या अखेरीस दक्षिणी संस्थानांचें संघराज्य होणार कीं विलिनीकरण होणार असा संभ्रम निर्माण होण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली होती. संस्थानिक संघराज्यास अनुकूल झाले होते, तर प्रजापुढाऱ्यांमध्ये या प्रश्नाच्या बाबतींत दोन भिन्न मतप्रवाह वाहत होते. १९४३ ची परिस्थिति आता राहिलेली नव्हती. त्या वेळीं प्रजा संघराज्यास आसावलेली होती, पण संस्थानिकांच्या आजवरच्या प्रतिगामी व उदासीन धोरणामुळे, तिला आता आपल्या अधिपतींबद्दल आपलेपणा वाटेनासा झाला होता. अशाहि परिस्थितींत द. सं. लोकसभेच्या कार्यकारी मंडळाने संघराज्यास पाठिंबा दिला होता, व त्यास पं. नेहरूंचा आशीर्वाद मिळाला होता. अशा अनुकूल परिस्थितींत संस्थानी विधिमंडळें आणि प्रजापरिषदांचीं कार्यकारी मंडळें यांचा कौल घेण्याची खटपट झाली असती, तर विलिनीकरणवादी पुढाऱ्यांना संघराज्याच्या पुरस्कर्त्यांच्यापुढे माघार घ्यावी लागली असती; आणि जेवढीं संस्थानें संघराज्यांत येण्यास तयार होतीं, त्यांचें हंगामी सरकार बनवून, त्याच्या हातीं राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें दिलीं गेलीं असतीं, तर संघराज्यापासून फटकून राहूं इच्छिणारीं संस्थानें सुद्धा पुढे संघराज्यांत आलीं असतीं. यामुळे संस्थानिकांच्या संघराज्य-प्रेमाचा आणि खऱ्या प्रामाणिकपणाचा पुरावा प्रजेला मिळाला असता. संघराज्य-पुरस्कर्त्या संस्थानिकांनी स्वतःच्या स्वार्थाकरता तरी, धडाडीने पुढे पाऊल टाकावयास पाहिजे होतें. याच काळांत नजिकच्या खालसा मुलखात किती झपाट्याने राजकीय क्रांतीचीं पावलें ब्रिटिश सरकार टाकीत होतें, हें संस्थानिकांनी ओळखावयास पाहिजे होतें. त्यांची संघराज्याची कल्पना बैलगाडीच्या वेगानेच चालली होती. संस्थानिकांच्या कालहरणाच्या धोरणास अनुलक्षून पंडित सातवळेकर म्हणाले की, संस्थानिक सत्तात्यागाची भाषा बोलत असले, तरी त्यांची खरी इच्छा तशी दिसत नाही. प्रजेकडे सर्व सत्ता आल्याशिवाय संघराज्य होतां कामा नये, असा आपला असलेला अभिप्राय त्यांनी व्यक्त केला.

जबाबदार राज्यपद्धति बहाल

१९४७ च्या सुरुवातीपासून दक्षिणी संस्थानांत राजकीय सुधारणा करण्याची जणू काय, अहमहमिका सुरू झाली होती. संघराज्य निर्माण करावयाचें तर घटक संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याची आवश्यकता पं. नेहरूंनी प्रतिपादन केली होती. त्यामुळे संस्थानांतून प्रथम जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें हें संस्थानिकांना अवश्यकच झालें होतें. आता दिनावधि करून चालणार नव्हता. द. सं. संघराज्यांत तेरा संस्थानें येण्यास कबूल होतीं. यांपैकी औंध, फलटण व सांगली या तीन संस्थानांतून फक्त जबाबदार राज्यपद्धति १९४६ अखेर चालू होती आणि तेथील कारभार लोकमंत्र्यांच्या स्वाधीन होता. ता. ५-३-१९४७ रोजीं जत संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून तिची घटना सांगलीप्रमाणे केली गेली. ता. २८-५-१९४७ पासून जमखिंडी अधिपतींनी आपल्या संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून श्री. जत्ती, होर्ती व कांबळे या मंत्र्यांच्या हातीं कारभार दिला. मुधोळांत अल्पवयीन राजामुळे रेसिडेंटच्या हुकमतीखाली कारभार चालत होता. रेसिडेंट मि. हार्वे यांनी सार्वमत पद्धतीने निवडून आलेल्या श्री. टंकसाळी व सोन्नद या मंत्र्यांच्या हातीं बराचसा कारभार दिला. पुढे मुधोळचे राजे गादीवर आल्यावर, त्यांनी जबाबदार राज्यपद्धति स्थापण्याचें व दोन मंत्र्यांच्याकडे कारभार सोपविण्याचें आश्वासन दिलें. मिरजमळा व मिरज संस्थानांत एप्रिल १९४७ मध्ये जबाबदार राज्यपद्धति अमलांत आली. मिरजमळ्यांत श्री. जरिमल्ली व कोरदूर आणि मिरजेंत डॉ. वि. म. गोखले, द. ना. गाडगोळी व मा. ह. महाडिक यांची मंत्री म्हणून नियुक्ति करण्यांत आली. रामदुर्गमध्ये ता. १–६–१९४७ पासून जबाबदार राज्यपद्धति अमलांत आली आणि श्री. जोग व गदग मंत्री झाले. भोरांत ता. १८-८-४७ पासून जबाबदार राज्यपद्धति अमलांत येऊन कै. गोपिनाथराव पोतनीस, श्री. शंकरराव लिमये, वाळिंबे व डी. आर्. पोतनीस यांना मंत्रिपद देण्यांत आलें. याच तारखेपासून श्री. न. चिं. केळकरांनी शासन-मंडळाचें अध्यक्षपद सोडलें. कुरुंदवाड (थोरली पाती) संस्थानांत मे १९४७ मध्ये श्री. हब्बू यांना मंत्रिपद देण्यांत आलें. फलटणांतील पेचप्रसंग श्री. शहा व बावडेकर यांना मंत्रिपद दिल्याने सुटला. कुरुंदवाड (धा. पाती) मध्ये श्री. व्ही. एस्. पाटील यांना मंत्रिपद देण्यांत आलें.

कोल्हापुरांत आक्टोबर १९४७ मध्यें राजकीय सुधारणा होऊन वसंतराव

बागल मंत्रिमंडळ सत्तारूढ झालें. सावंतवाडींत राजेसाहेब व प्रजापरिषद् यांच्यांत वाटाघाटी होऊन ता. २० जानेवारी १९४८ पासून जबाबदार राज्यपद्धति व हंगामी मंत्रिमंडळ स्थापन करण्याचें ता. १४–१२–१९४७ रोजीं ठरलें.

संस्थानी विधिमंडळांच्या बैठकी होऊन द. सं. संघराज्य घटना समितीवरील सभासद निवडण्यांत आले. राजकीय सुधारणा जाहीर होतांना, कांही कटकटी झाल्याच नाहींत असें मात्र नाही. संस्थानांतून मंत्रिमंडळें स्थापन झाल्यावर त्यांचा तेथील कारभार निर्लेप होता असें म्हणतां येणार नाही. भोरांतील धान्यपुरवठा खात्याच्या कारभाराबद्दल तक्रारी झाल्या. कोल्हापुरांतील बागल मंत्रिमंडळाचा कारभार फारच थोड्या अवधींत टीकेस पात्र होण्याच्या लायकीचा झाला. मंत्रिपदावर आरूढ झालेल्या व्यक्ति त्या स्थानास लायक होत्याच असा प्रत्यय येईनासा झाला. श्री. शंकरराव देव यांनी ता. २७-३-१९४७ रोजीं पाली येथे भरलेल्या भोर प्रजापरिषद्‌च्या अध्यक्षीय भाषणांत दिलेला इषारा जनतेच्या प्रत्ययास आला. हा इषारा कोणता ? तर " लोकांची चळवळ करणारा पुढारी राज्यकारभार चालविण्यास पात्र असेलच असें समजूं नये. " याचा प्रत्यय भोरांत प्रकर्षानें आला आणि श्री. गोपिनाथपंत पोतनिसांवर विधिमंडळाच्या सभासदांनी अविश्वास असल्याचें राजेसाहेबांना पत्र लिहून कळविलें.

संस्थानी प्रजापरिषदांचीं अधिवेशनें

सांगली संस्थान प्रजापरिषदेचें २० वें अधिवेशन कोडोली येथे श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ता. १७–१–१९४७ रोजीं भरलें होतें. विषयनियामक समितींत संघराज्याचा ठराव फेटाळण्यात आला, पण खुल्या अधिवेशनांत भारतीय लोकपरिषदेच्या सल्ल्याने या बाबतींत काय तें धोरण ठरवावें असें ठरलें. पुढे लोकपरिषदेने संघराज्यास पाठिंबा देण्याचा आदेश दिला.

भोर संस्थान प्रजापरिषदेचें १६ वें अधिवेशन पाली येथे ता. २७–३ १९४७ रोजीं श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली भरलें. या अधिवेशनास सचिव हजर होते. त्यांनी आपल्या भाषणांत यापूर्वी आमच्या हातून ज्या चुका झाल्या असतील, त्या विसरून जाण्याबद्दल याचना केली. या अधिवेशनांत संघराज्यास पाठिंबा देण्याचा ठराव पास झाला.

जंजिरा प्रजापरिषदेचें पांचवें अधिवेशन ता. ११–५–१९४७ रोजीं जंजिरा येथे श्री. द. का. कुंटे यांच्या अध्यक्षतेखाली भरलें.

ता. २४-५-१९४७ रोजीं कोल्हापूर प्रजापरिषदेचें तिसरें अधिवेशन कै. न. वि. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली भरल्यावेळीं जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून हंगामी मंत्रिमंडळ अंमलांत आणण्याबाबत ठराव पास झाले.

कुरुंदवाड (धाकटी पाती) संस्थानांत प्रजापरिषदेची स्थापना करण्यांत आली. ऑगस्ट १९४७ मध्ये परिषदेच्या विद्यमाने ठिकठिकाणीं सभा घेण्यांत येऊन कुरुंदवाडने कोल्हापूर गटांत न जातां संघराज्यांत सामील होण्याचा ठराव पास करण्यांत आला. सप्टेंबर १९४७ मध्ये सावंतवाडी संस्थानांत सर्वत्र सभा घेण्यांत येऊन विलिनीकरणास पाठिंबा देण्यांत आला.

ता. २१-१२-४७ रोजी जमखिंडी प्रजापरिषदेचें खास अधिवेशन श्री. दोडमेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली भरून विलिनीकरणाचा ठराव पास करण्यांत आला.

रामदुर्ग संस्थान प्रजापरिषदेचें अधिवेशन ता २३-१-१९४८ रोजीं श्री. निजलिंगाप्पा यांच्या अध्यक्षतेखाली होऊन विलिकरणाचा ठराव पास करण्यांत आला.

ता. १४-२-१९४८ रोजीं सावंतवाडी प्रजापरिषद श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली भरून विलिनीकरणाचा ठराव पास करण्यांत आला.

संघराज्याचा आराखडा ठरला

द. सं. लोकसभेचें कार्यकारी मंडळ (प्रादेशिक मंडळ) आणि संस्थानिक यांच्यामध्ये झालेल्या करारास ता. २१–१–१९४७ रोजीं कोल्हापुरास रेसिडेन्सीमध्ये भरलेल्या सभेंत संस्थानिकांनी संमति दिली. या कराराची कलमें पुढीलप्रमाणें होतीं :—(१) संघराज्य घटना समिति सार्वभौम राहील; (२) घटना समितीवर संस्थानिकांचे प्रतिनिधि असणार नाहीत; (३) संघराज्यास संपूर्ण सत्ता; (४) संस्थानिकांचा खासगी खर्च व खास हक्क ठरविण्याकरता भारतीय लोकपरिषदेचे अध्यक्ष, काँग्रेसाध्यक्ष, श्री. शंकरराव देव, व संस्थानिकांचे दोन प्रतिनिधि यांची समिति नेमणें. या सर्व वाटाघाटींमध्ये संघराज्याच्या जो आराखडा तयार झाला, त्याला काँग्रेसच्या पुढाऱ्यांची सर्वसाधारण संमति घेण्यांत आली. ज्या वेळीं भाषावार प्रांतरचना होईल, त्या वेळीं कर्नाटक व महाराष्ट्र भागांत तो तो मुलूख दिला जाईल असें

ठरलें. या आराखड्याच्या गुणावगुणाबद्दल विशेष चिकित्सा झाली नाहीं; कारण आता विलिनीकरणाबद्दल जास्त आस्था वाटूं लागली होती. या संघराज्य योजनेंत आता सांगली, जमखिंडी, जत, मिरज, मिरजमळा, कुरुंदवाड (थोरली व धाकटी पाती), रामदुर्ग, भोर, फलटण, औंध, मुधोळ व सावंतवाडी हीं तेरा संस्थानें येण्याचें ठरलें. या संघराज्याचें उत्पन्न सुमारें एक कोट रुपये असून लोकसंख्या चौदा लाख होती. अशा तऱ्हेने सर्व अनुकूल वातावरण जरी निर्माण झालें तरी, संघराज्य स्थापनेस खरा मुहूर्त लाभतच नव्हता. या परिस्थितीचा उल्लेख औंध संस्थान विधिमंडळाच्या ता. २६–४–१९४७ च्या बैठकींत बॅ. आप्पासाहेब पंत यांनी मोठ्या परखड शब्दांत केला. ते म्हणाले :

बॅ. पंतांची परखड टीका

" भारतीय घटना समितीचें काम सुरू झालें आहे, पण द. संस्थानांच्या संघराज्याची निर्णायक योजना तयार होत नाही. याचें कारण म्हणजे राजे लोक मुस्लीम लीगप्रमाणे काळाचा अपव्यय करीत आहेत हें होय. ते आपल्या सल्लागारांवर अवलंबून राहतात. ते पांच हजार रुपये फी घेतात आणि ' जरा थांबा ' असा सल्ला देतात. "

बॅ. आप्पासाहेब पंत हे औंधचे राजकुमार असून शिवाय त्या संस्थानचे मुख्य प्रधान असल्याने त्यांच्या या वक्तव्यास बरेंच महत्त्व आहे हें निःसंशय.

साबडे यांचा निर्घृण खून

संघराज्यांत येणें सोपे व्हावें म्हणून निरनिराळ्या संस्थानांत जास्त राजकीय सुधारणा सुरू होत होत्या आणि मंत्र्यांच्या हातीं जास्त राज्यकारभार दिला जात होता. यास अनुसरून जमखिंडी संस्थानांत संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापण्याची मार्च १९४७ मध्ये घोषणा होऊन, २८ मे पासून त्याची अंमलबजावणी व्हावयाची होती. द. सं. लोकसभेचे एक ध्येयनिष्ठ व व निःसीम कार्यकर्ते श्री. अनंतराव साबडे हे जमखिंडीचे पहिले मुख्य मंत्री होणार, हें जवळजवळ ठरल्यासारखेंच झालें होतें. भारतीय घटना समितीवर द. संस्थानांच्या (कोल्हापूर सोडून) वाट्यास लोकप्रतिनिधीकरता एक जागा आली होती, त्यासाठी साबडे हे एक उमेदवार म्हणून होते आणि त्यांच्या यशाची खात्री होती. साबडे यांच्यावर असा जरी संस्थानी प्रजेचा विश्वास होता, तरी जमखिंडी दरबारचा त्यांच्यावर रोष झालेला होता. ते आपल्या ' संस्थानी स्वराज्य ' वर्तमानपत्रांतून जमखिंडीच्या राज्यकारभारावर

टीका करीत होते. जामिनक्या मागून ' संस्थानी स्वराज्या'स त्रास देण्याचा प्रयत्न सतत होत होता. पण अशा त्रासास साबडे भीक घालीत नाहीत असें दिसत होतें; आणि तेच आता दोन दिवसांत जमखिंडी संस्थानचे मुख्य मंत्री होणार होते. अशा परिस्थितींत ता. २५-५-१९४७ रोजीं त्यांच्यावर मारेकरी घालण्यांत आले व या खुनी हल्ल्यास ते ता. २५ रोजीं बळी पडले. साबडे यांचें संस्थानी चळवळींतील स्थान फार मोठें आहे. जमखिंडी संस्थान परिषद् सामर्थ्यवान् करण्याची त्यांनी यशस्वी खटपट केली. १९४२ च्या अखेरीस साबडे समितीचें अध्यक्षपद पतकरल्यावर, त्यांनी दक्षिणी संस्थानांत सर्वत्र दौरा काढून संघराज्य व समाईक हायकोर्टाच्या योजनांचा जोराने प्रचार केला, आणि सर्व दक्षिणी संस्थानांचे पुढारी झाले. त्यांची ध्येयनिष्ठा जबर होती आणि त्यांच्या सोज्ज्वळ वागणुकीने ते अजातशत्रु होते. आपल्या त्यागवृत्तीचा आणि बुद्धिकौशल्याचा उपयोग त्यांनी संस्थानी प्रजेकरता केला. ते सत्याचे अभिमानी होते, एवढेंच नव्हे तर, त्यांची सत्यप्रियता हरघडी प्रत्ययास येत असे. अशा तऱ्हेच्या सत्त्वस्थ गृहस्थाचा खून त्याच्या कर्मभूमींत व्हावा, हें दुर्दैव होय. त्यांच्या खुनामुळे संस्थानी प्रजा हादरून गेली असल्यास नवल नाही. त्यांच्या मृत्यूमुळे संस्थानांच्या संघराज्याचा अभिमानी दिवंगत झाला. त्यांच्या खुनी इसमाचा पत्ता लावण्याबाबत दरबारने योग्य कोशीस केली नाही, असा उघडपणें दरबारवर आरोप करण्यांत येऊं लागला, आणि काय विलक्षण योगायोग ! साबडे यांच्या खुनानंतर पुढील तीन महिन्यांच्या आंत जमखिंडीचे अधिपति श्री. शंकरराव आप्पासाहेब पटवर्धन यांचें ता. २२-८-४७ रोजीं देहावसान झालें, आणि याच जमखिंडीचे पुढील अधिपति कै. परशुरामराव पटवर्धन यांनी छोट्या संस्थानांच्या विलिनीकरणाचा पुरस्कार गादीवर आल्या दिवसापासून करावयास सुरुवात केली.

छत्रपतींनी समाईक हायकोर्टास खो दिला

कोल्हापूरचे माजी अधिपति कै. श्रीमंत सर राजाराम महाराज यांच्या निधनानंतर श्रीमंत ताराबाई महाराणीसाहेब यांनी एका अल्पवयीन बालकास दत्तक घेतलें होतें. त्या बालकास छत्रपतिपद मुळीच मानवलें नाही आणि तें लवकरच देवाघरीं गेलें. त्यामुळे कोल्हापूरच्या गादीच्या वारसाचा प्रश्न परत निर्माण झाला. बऱ्याच दिवसांच्या वाटाघाटीनंतर महाराणींनी आपल्या भाच्यास (देवासचे अधिपति) यांस ता. ३१-३-१९४७ रोजीं दत्तक घेतलें. नवीन

छत्रपति श्री. शहाजी राजे लवकरच संस्थानचा कारभार पाहूं लागले. द. संस्थानांपैकी मराठा राजमंडळाची निर्मिति करावी अशी कल्पना मांडली जाऊन स्वाभाविकपणेंच या राजमंडळाचें पुढारपण कोल्हापूरच्या श्री. शहाजी राजांच्याकडे आलें. १ मार्च १९४६ पासून कोल्हापुरास कांही संस्थानांचें जें समाईक हायकोर्ट निर्माण झालें होतें, त्यांतून बाहेर पडण्याचें महाराजांनी ठरविलें आणि समाईक हायकोर्टाला खो दिला. त्यामुळे हायकोर्टांत सामील झालेल्या इतर संस्थानांना बाहेर पडणेंच भाग पडलें. या समाईक हायकोर्टाचें जीवित सोळा महिन्यांचें ठरलें आणि ता. १-७-१९४७ पासून कोल्हापूरचें स्वतंत्र हायकोर्ट सुरू झालें व समाईक हायकोर्ट दिवंगत झालें.

संघराज्याचा पक्का आराखडा करण्याचें काम प्रसिद्ध कायदेपंडित श्री. कन्हयालाल एम्. मुनशी यांच्याकडे सोपविण्यांत आलें होतें व तें काम अजून पुरें व्हावयाचें होतें. अशा स्थितींत द. संस्थानांतील मराठा राजांचें पुढारीपण कोल्हापूरने घेतल्यामुळे तेरा संस्थानांच्या संघराज्यास तडा जाण्याची भीति निर्माण झाली.

भारतीय स्वातंत्र्याची ब्रिटनची घोषणा

दक्षिणी संस्थानांतील राजकारणांत अशीं स्थित्यंतरें होत असतांना, खालसा मुलखांतील राजकारणांत झपाट्याने क्रांति होत होती. ब्रिटिश सरकारला खरोखरच सत्तात्याग करावयाचा आहे कीं नाही, या प्रश्नाचा निकाल इंग्लंडमधील मजूर मंत्रिमंडळाने ता. २०-२-१९४७ रोजीं पार्लमेंटमध्ये एक घोषणा करून केला. या घोषणेने ब्रिटिश सरकारने असें जाहीर केलें कीं जून १९४८ नंतर ब्रिटिश 'राज्यकर्ते' म्हणून हिंदुस्थानांत राहणार नाहीत, तर ते संपूर्ण सत्तादान हिंदी लोकांच्या हातीं यापूर्वी सुपूर्त करणार. हें सत्तादान व्यवस्थित होण्यासाठी 'नवी विटी, नवें राज्य' या म्हणीप्रमाणे लॉर्ड मौंटबॅटन यांची व्हाईसरॉय म्हणून नेमणूक करण्यांत आली आणि हिंदुस्थानांतील पेचप्रसंग सोडविण्यासाठी आजवर खटपट केलेल्या लॉर्ड वेव्हेल या व्हाईसरॉयांना परत बोलविण्यांत आलें. लॉर्ड मौंटबॅटन यांनी दुसऱ्या महायुद्धांत महत्त्वाची कामगिरी बजावलेली होती. त्यांचा इंग्लंडच्या राजघराण्याशीं निकटचा संबंध होता. त्यांच्यांत मुत्सद्याचे सर्व गुण होते, कल्पनेची भरारी होती, कामाची धडाडी होती, आणि विरुद्ध पक्षीयांस आपलेसे करून घेण्याची कला होती. या सर्व गुणांचा उपयोग लॉर्ड मौंटबॅटन यांनी

हिंदुस्थानांत आल्यावर केला आणि अवघ्या चार महिन्यांच्या आंत हिंदी स्वातंत्र्याची योजना पूर्ण केली, एवढेंच नव्हे तर, ता. १५ ऑगस्ट १९४७ पासून ती अमलांतहि आणली. इंग्लंडचे पंतप्रधान श्री. क्लेमंट ॲटली यांनी सत्तात्यागाची तारीख १९४८ जून अखेर ठरविली होती, तर ही तारीख १०॥ महिन्यांनी अगोदर आणण्याचें श्रेय लॉर्ड मौंटबॅटन यांना आहे; आणि त्यामुळे हिंदुस्थानचा किनारा सोडतांना मौंटबॅटन यांचा गांधी-नेहरूंप्रमाणे लोकांनी आपण होऊन सन्मान केला. लॉर्ड मौंटबॅटन हा हिंदुस्थानांतील २६ वा व शेवटचा व्हॉईसरॉय होय.

'घटना समितींत न याल, तर शत्रु ठराल'— नेहरू

लॉर्ड मौंटबॅटन यांना, हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याबाबत पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करण्याचा संपूर्ण अधिकार देण्यांत आला होता आणि त्रिमंत्री योजना पुरी बारगळली गेली. संस्थानांबाबतचा ब्रिटनला असलेला सार्व-भौमत्वाचा अधिकार हिंद सरकारला मिळणार नसल्याचें ॲटली यांनी जाहीर केलें. ब्रिटिश सरकारच्या घोषणेमुळे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळण्याची तारीख नक्की झाली, आणि काँग्रेस पुढाऱ्यांच्या वक्तव्याला एक प्रकारची धार आली. यानंतर एका प्रसंगीं बोलतांना सरदार वल्लभभाई पटेल संस्थानां-बद्दल म्हणाले :

" संस्थानिकांना नष्ट करण्याची आमची इच्छा नाही. पण चुकीच्या रस्त्याने जाऊन ते आपला आत्मघात करून घेत आहेत. घटना समितींत त्यांनी भाग घ्यावा आणि त्यांनी प्रजेचे प्रतिनिधि पाठवावे, तरच त्यांचा निभाव लागेल. "

ग्वाल्हेर येथे भरलेल्या अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेच्या अधिवेशनांत बोलतांना पं. नेहरू म्हणाले :

" घटना समितींत जीं संस्थानें सामील होणार नाहीत, त्यांस शत्रु मानलें जाईल. गत वर्षीं नरेंद्रमंडळाने संस्थानांतील सुधारणांसंबंधी व प्रजेच्या हक्काच्या सनदेची जी घोषणा केली, ती माझ्या अपेक्षेप्रमाणे नव्हती, तरी मीं तिचें स्वागत केलें. पण ही घोषणा सुद्धा संस्थानांनी अमलांत आणली नाही. घटना परिषदेवर संस्थानी प्रजापरिषदांना आपले प्रतिनिधि स्वतंत्रपणे पाठवितां येणार नाहीत; कारण, घटना समिति ही त्रिमंत्री योजनेच्या चौकटींत बसविलेली आहे व त्यामुळे याबाबतींत माझ्या इच्छेचा कांही उपयोग नाही. या योजनेप्रमाणे संस्थानिकांतर्फे प्रजेचे प्रतिनिधि येऊं शकतील. संस्था-निकांनी घटना समितींत यावें म्हणून त्यांच्या कांही अटी नाइलाजाने मान्य कराव्या लागल्या. व्यापक देशहिताकडे लक्ष देऊन पंजाबची फाळणी करण्याचा सौदा मुस्लीम लीगशीं करावा लागत आहे."

या ग्वाल्हेर परिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभिसीतारामय्या म्हणाले :

" जबाबदार राज्यपद्धति देण्याची तारीख संस्थानिकांनी जाहीर करून राष्ट्रीय वृत्तीने वागावें. लहान संस्थानांना स्वतंत्रपणें राहणें शक्य नसल्याने त्यांनी आपले गट करावे आणि सांधिक पद्धतीने कारभार चालवावा आणि तेंहि शक्य नसल्यास विलिनीकरणास तयार व्हावें. "

कॉँग्रेस पुढाऱ्यांची ही भाषा सामदामदंडभेदाची होती. त्याचा परिणाम नरेंद्रमंडळांत फूट पडण्यांत झाला आणि बिकानेर महाराजांचा गट घटना समितीशीं सहकार्य करण्यास तयार झाला. एप्रिल १९४७ च्या चवथ्या आठवड्यांत घटना समितीची सभा झाल्यावेळीं आठ संस्थानांचे सोळा प्रतिनिधि हजर राहिले. नरेंद्रमंडळाचे चॅन्सेलर भोपाळचे अधिपति यांचें म्हणणें असें होतें कीं, कॉँग्रेस–मुस्लीग लीग यांच्यांत समेट होईपर्यंत घटना समितींत जाऊं नये; व त्यामुळे इतर संस्थानांनी घटना परिषदेशीं सहकार्य केलें नाही.

या घटना घडत असतांना व्हॉईसरॉय लॉर्ड मौंटबॅटन हे हिंदुस्थानांतील कॉँग्रेस व मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करीतच होते. उभय पक्षांना मान्य होईल असा अखंड भारताच्या स्वातंत्र्याच्या पर्यायाचा शोध ते करीत होते, पण त्यांत त्यांची निराशा झाली. मुस्लीम लीग पाकिस्तानचा म्हणजे भारताचे तुकडे पाडून आपले मुसलमानी राज्य स्थापन करण्याचा आग्रह धरून बसली होती आणि या मागणीबाबत एक तसूभरहि मागेपुढे सरकण्यास ती तयार नव्हती; आणि अखंड हिंदुस्थानचा आग्रहच धरला गेल्यास काय होईल याची कल्पना कलकत्ता, लाहोर वगैरे ठिकाणीं दंगे करून मुसलमान सरकारला आणून देत होते. बंगालांतील नौखोली भागांत निहिंदु करण्याचें सत्र जें मुसलमानांनी १९४६ च्या अखेरीस आरंभलें होतें, त्याची पूर्तता अजून झालेली नव्हती आणि तेथील हिंदूंना धीर देण्यासाठी महात्माजींनी नौखोलींत पदयात्रा चालविलेली होती.

भारताच्या विच्छेदनाची घोषणा

अखंड भारताचा आग्रह धरणें म्हणजे जातीय दंग्यांचें बीज कायमचें ठेवणें, असें दिसून आल्यामुळे भारताचें विच्छेदन करून हिंदुस्थान व पाकिस्तान अशीं दोन राष्ट्रें निर्माण करणें हाच एकमेव उपाय असल्याचे व्हाइसरॉयांना दिसून आल्यावर, त्यांनी त्या तऱ्हेने कॉँग्रेस पुढाऱ्यांशीं बोलणीं केलीं. पं. नेहरू, सरदार पटेल वगैरे मातबर पुढाऱ्यांना मुस्लीम लीगची

आडमुठेपणाची वृत्ति दिसतच होती; आणि देशांत शांतता नांदावयाची असेल, तर भारताची फाळणी करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही असें त्यांनाहि दिसूं लागलें असावें. या सर्वांचा परिपाक म्हणजे लॉर्ड मौंटबॅटन यांची ता. ३–६–१९४७ ची भारताच्या फाळणीची आणि हिंदुस्थान व पाकिस्तान या दोन राष्ट्रांच्या निर्मितीची घोषणा होय.

संस्थानांवरील सार्वभौमत्वास ब्रिटनची तिलांजलि

ही घोषणा करतांना संस्थानांच्याबद्दल ते म्हणाले :

" ब्रिटिश सरकारने या दोन राष्ट्रांना त्यांच्या त्यांच्या मुलखापुरते संपूर्ण सत्तादान करण्याचें ठरविलें आहे. ब्रिटिश सार्वभौम सत्ता नाहीशी झाल्यावर कोणत्या राष्ट्राच्या घटना समितींत संस्थानांनी प्रवेश करावयाचा हें संस्थानिकांनी ठरवावयाचें आहे. या बाबतींत त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळणार आहे. ब्रिटिशांनी सत्तात्याग केल्यावर संस्थानांवरील सार्वभौमत्व हें आम्ही त्यांचें त्यांना परत करणार आहों. हिंदुस्थान अगर पाकिस्तान या राष्ट्रांकडे संस्थानावरील आधिपत्य दिलें जाणार नाही. संस्थानिकांना हिंदुस्थानांतील राजकीय पक्षाशीं वाटाघाटी करावयाच्या असतील तर त्या कामीं मी त्यांना मदत करूं शकेन. सध्या अस्तित्वांत असलेल्या अगर नव्याने अस्तित्वांत येणाऱ्या घटना समितीवर आपले प्रतिनिधि पाठविण्याचे अगर न पाठविण्याचे बाबतींत संस्थानिकांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. असें जरी असलें तरी संस्थानिकांनी कोणत्या तरी एका घटना समितींत जावेंच असा माझा त्यांना मित्रत्वाचा सल्ला आहे. कोणत्या घटना समितींत सामील व्हावयाचें याबद्दलचा निर्णय घेतांना, त्यांनी संस्थानांच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करणें आवश्यक आहे. "

लॉर्ड मौंटबॅटन यांनी या वेळीं सत्तादानाचें वेळापत्रक बदलून ता. १५ ऑगस्ट १९४७ ला हिंदुस्थान व पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांची निर्मिति करण्याचें ठरविलें. ब्रिटनचे पंतप्रधान मि. क्लेमंट ॲटली यांनी सत्तादानाची तारीख जून १९४८ अखेर ठरविली होती, तर लॉर्ड मौंटबॅटन यांनी सत्तादानाची तारीख साडे दहा महिन्यांनी अगोदर आणली.

संस्थानें स्वतंत्र राहण्याबाबत सार्वमत घ्या

ता. १५ ऑगस्ट १९४७ पासून आपण स्वतंत्र राजे होणार याबद्दल संस्थानिकांना आनंद झाला असल्यास नवल नाही. लॉर्ड मौंटबॅटन यांची संस्थानांच्या स्वातंत्र्याची घोषणा कॉंग्रेस कार्यकारिणीला मुळीच मंजूर झाली नाही. तिने या बाबतींत पुढीलप्रमाणे ठराव करून आपलें यासंबंधीचें धोरण जाहीर केलें :—

“ संस्थानिकांना आपलें स्वातंत्र्य जाहीर करण्याचा व आपला सवता सुभा ठेवण्याचा हक्क आहे, हें काँग्रेसला मान्य नाही. हिंदी सरकार व संस्थानें यांचेमधील संबंध कायमचे राहणार असल्याने संस्थानांच्या स्वातंत्र्याची कल्पना चुकीची आहे. स्वातंत्र्य पुकारण्याचा हक्क प्रजेला आहे; संस्थानिकांना नाही. ब्रिटिश सार्वभौमत्व नष्ट झाल्याने प्रजेच्या या हक्काला बाध येत नाही. संस्थानिकांनी आपापल्या संस्थानांत प्रजासत्ताक राज्य स्थापन केलें नाही याबद्दल काँग्रेसला खेद वाटतो. परिस्थितीचें महत्त्व ओळखून संस्थानिक हिंदी संघराज्यांत सामील होतील अशी आशा आहे. ”

भारतीय संस्थान लोकपरिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांनी संस्थानांनी संघराज्यांत राहावें कीं स्वतंत्र राहावे याबद्दल प्रजेचें सार्वमत घ्यावें आणि सार्वमताचा कौल काँग्रेस मानावयास तयार असल्याचें जाहीर केलें.

प्रसिद्ध घटनाशास्त्रज्ञ डॉ. भीमराव आंबेडकर याबद्दल बोलतांना म्हणाले—

“ संस्थानांवरील हिंदुस्थानचें सार्वभौमत्व हिरावून घेणारा कायदा करण्याचा ब्रिटिश पार्लमेंटला हक्क नाही, आणि त्याला हिंदुस्थानची मान्यता मिळणार नाही. संस्थानांचें स्वातंत्र्य पुरें पांच वर्षेंहि टिकणार नाही.”

मुस्लीम लीगचे अध्यक्ष व पाकिस्तानचे निर्माते बॅ. जिना मात्र म्हणाले की, “ संस्थानिकांचें सार्वभौमत्व कायम राहणार आहे. ते कोणत्याहि घटना समितींत जातील अगर स्वतंत्र राहतील.” बॅ. जिनांचें हें मत हें त्यांच्या आजवरच्या राजकीय भूमिकेस साजेसेंच आहे. पण हिंदुस्थानांतील शेकडों संस्थानांचीं स्वतंत्र राज्यें निर्माण झालीं, तर देशाचा राज्यकारभार कसा चालेल ? सरदार वल्लभभाई पटेलांनी संस्थानिकांनी सहकार्य दिलें नाही तर देशांत अराजक माजण्याचा धोका व्यक्त केला. कांही संस्थानांच्या प्रमुख दिवाणांनी संस्थानिकांच्या सार्वभौमत्वास विरोध करून सर्व संस्थानें स्वतंत्र झालीं, तर देशाचे तुकडे तुकडे होतील, अशी भीति व्यक्त केली. प्रागतिक परिषदेचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध घटनाशास्त्रज्ञ श्री. व्यंकटरमण शास्त्री यांनी आपला अभिप्राय व्यक्त करतांना सांगितलें की, ‘ भारतीय राज्यघटनेपासून संस्थानिकांना अलग राहतां येणार नाही; आणि भारतीय संघराज्यांत राहण्यांतच त्यांचा फायदा आहे. ’

संस्थानिकांनी भारतीय घटना समितींत जर प्रवेश केला, तर पुष्कळ प्रश्न सुटण्यास आपोआप मदत होणार होती. पण ते प्रवेश करतीलच अशी खात्री

वाटत नव्हती. हिंदी संस्थानांचा प्रश्न कसा सोडवावयाचा हा एक कूट प्रश्न होता. हा प्रश्न सोडविण्यासाठी जुलै १९४७ मध्ये 'संस्थान खातें' काढण्यांत येऊन तें सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे देण्यांत आलें; या खात्याचें चिटणीसपद कै. श्री. व्ही. पी. मेनन या हुषार व मुत्सद्दी नोकराकडे सोपविण्यांत आलें.

हिंदी स्वातंत्र्याचें बिल ता. १२-७-४७ रोजीं ब्रिटिश पार्लमेंटपुढे मांडतांना पंतप्रधान श्री. ॲटली यांनीहि संस्थानिकांना पुढील शब्दांत अमोल सल्ला दिला. ते म्हणाले :

" संस्थानिकांनी हिंदुस्थान अगर पाकिस्तान घटना समितींत सामील व्हावें. हा मार्ग न पतकरता ते जर आपलें स्वातंत्र्य पुकारण्याच्या विचारांत असतील तर त्यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा आणि वसाहत सरकाराबाहेर राहूं नका असा सल्ला मी त्यांना देईन. "

या आवाहनाचा परिणाम म्हणून असो अगर संस्थानिकांना सुविचार वाढत्या प्रमाणांत सुचूं लागल्यामुळे असो, पण ता. १४–७–१९४७ रोजीं भरलेल्या घटना समितीच्या बैठकींत ३७ संस्थानी प्रतिनिधि हजर होते.

घटना समितींतील प्रवेशाच्या अटी

घटना समितींत संस्थानिकांनी कोणत्या अटीवर सामील व्हावें याबद्दल कॉंग्रेस पुढारी व संस्थानिकांच्यामध्ये वाटाघाटी झाल्या, त्यांत पुढील गोष्टी ठरल्या :—(१) हिंद संघराज्यांत सामील होण्याबाबत संस्थानिकांवर सक्ति केली जाणार नाही; (२) मुलखाची अदलाबदल एकमेकाच्या संमतीने केली जाईल; (३) ब्रिटनची सार्वभौम सत्ता नष्ट झाल्यावर तिचा वारसा दुसऱ्या कोणाकडे जाणार नाही; संस्थानिक सार्वभौम होतील; (४) हिंद संघराज्याकडे संरक्षण, परराष्ट्र संबंध व वाहतूक हीं खातीं सोपविलीं गेल्यावर बाकी खात्यांचा कारभार सार्वभौम हक्काने संस्थानिक पाहूं शकतील.

लॉर्ड मौंटबॅटन यांची बहुमोल कामगिरी

याच सुमारास सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपल्या एका भाषणांत संस्थानिकांना घटना समितींत येण्याचें आवाहन करून, संस्थानांच्या अंतर्गत कारभारांत ढवळाढवळ न करण्याचें आश्वासन दिलें; पण या आश्वासनावर संस्थानिकांचा विशेष विश्वास बसला नसल्यास आश्चर्य नाही. कारण, आजवर सरदार वल्लभभाई पटेल आदि कॉंग्रेस पुढाऱ्यांचीं भाषणें संस्थानें नष्ट करावींत, अशा आशयाचीं होतीं. त्यामुळे घटना समितींत सामील होणाऱ्या संस्थानांची

संख्या जोरांत वाढत नव्हती. अशा परिस्थितींत काय करावें, हा संस्थान खात्यापुढे पेच पडला होता. हिंद संघराज्यांत जर संस्थानें आलीं नाहीत, आणि त्यांनी आपलें स्वातंत्र्य पुकारलें, तर भारताचा राज्यकारभार सुरळितपणें चालण्याच्या बाबतींत अनंत अडचणी उत्पन्न होण्याची भीति होती, आणि हा एक चिंतेचा प्रश्न उत्पन्न झाला होता. अशा आणीबाणीच्या वेळीं व्हॉईसरॉय लॉर्ड मौंटबॅटन संस्थान खात्याच्या मदतीला धावून आले आणि त्यांनी संस्थानिकांचें मतपरिवर्तन करून त्यांना घटना समितींत प्रवेश करण्यास प्रवृत्त केलें. पटेलांची मनधरणी संस्थानिकांनी मानली नाही, पण लॉर्ड मौंटबॅटन यांच्या सूचना त्यांना मान्य करणें भाग पडलें. ता. २५–७–४७ रोजीं लॉर्ड मौंटबॅटन यांनी दिल्लीच्या ऐन उन्हाळयांत संस्थानिकांचा दरबार भरविला आणि आपल्या संस्थानी मुलखास नजिक असलेल्या हिंद अगर पाक संघराज्यांत सामील होण्याचा त्यांना सल्ला दिला. यावेळीं त्यांनी केलेल्या भाषणांत संस्थानिकांची विनवणी होती, सामील न झाल्यास संभाव्य परिणामांची धमकी होती; व ब्रिटिश सरकारचें सार्वभौमत्व नष्ट होणार असल्याने त्यांना कोणाच्या तरी पाठिंब्याची आवश्यकता कशी होती याचें विवेचन होतें; आणि संरक्षण, परराष्ट्रसंबंध व वाहतूक या तीन प्रश्नांबाबतचे सर्व अधिकार हिंद संघराज्याकडे सुपूर्त करण्याची सूचना होती. लॉर्ड मौंटबॅटन यांचे हें भाषण फारच प्रभावी झालें आणि त्याचा परिणाम संस्थानिकांवर उत्कटत्वाने झाला. शिवाय लॉर्ड मौंटबॅटन हे हिंदुस्थानच्या बादशहाचे निकटचे आप्त आणि त्यांचे हिंदुस्थानांतील प्रतिनिधि. जे संस्थानिक घटना समितींत जाण्याबाबत टंगळमंगळीचें धोरण स्वीकारीत होतें, त्यांच्यावर आपलें वैयक्तिक दडपण आणून संस्थानिकांना हिंद संघराज्यांत सामील होण्यास त्यांनी भाग पाडलें. जें संस्थान खात्यास साधलें नाही, जें सरदार पटेलांना जमलें नाही, तें घडवून आणण्याच्या कामीं संस्थान खात्याचे चिटणीस मेनन यांनी लॉर्ड मौंटबॅटन यांना प्रवृत्त केलें. त्यामुळे भारत स्वतंत्र होण्याच्या दिवशीं म्हणजे ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं काश्मीर, जुनागड व हैद्राबाद या तीन संस्थानांशिवाय बाकी सर्व संस्थानें परराष्ट्र, वाहतूक व संरक्षण या खात्यांचा कारभार हिंद अगर पाक सरकारकडे सोपवून आपापल्या हिंद अगर पाक सरकारच्या घटना समितींत प्रविष्ट झालीं. कोल्हापूर संस्थानातर्फे कै. श्री. अ. बा. लठ्ठे, इतर संस्थानांतर्फे लोकनायक माधवराव अणे यांची निवड संस्थानिकांनी भारतीय घटना समितीवर केली आणि प्रजेतर्फे रामदुर्गचे श्री. मुनवळी यांची निवडणूक झाली.

संस्थानांचे नामधारी सार्वभौमत्व

ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारत स्वतंत्र झाला आणि ब्रिटिश सरकारने आपल्या सार्वभौमत्वाच्या हक्काचा संन्यास घेतल्यामुळे, भारतांतील सर्व संस्थानिक सार्वभौम राजे झाले. याचा इकडील संस्थानांत झालेला दृश्य परिणाम म्हणजे गेलीं सात आठ वर्षें कोल्हापूर रेसिडेंटच्या ताब्यांत असलेली वाडी जहागिर स्वतंत्र झाली आणि कोल्हापूर संस्थानांतील इचलकरंजीचे जहागिरदार म्हणून कै. श्री. विनायकराव घोरपडे (तेथील दत्तक मुलगा बाजूस ठेवून) यांची प्रतिष्ठापना छत्रपतींनी केली. ब्रिटिश सरकारने आपल्या सार्वभौमत्वाचा वारसा हिंद सरकारकडे दिला नाही, याबद्दल टीका होत होती. पण ब्रिटिश सरकारचें हें धोरण खरोखरच मुत्सद्दीपणाचें होतें यांत संशय नाही. जर सार्वभौमत्वाचा वारसा हिंद संघराज्याकडे आला असता तर संस्थानांतर्गत बंडाळी विरुद्ध संस्थानिकांचें संरक्षण करणें हें तहकरार· नाम्याप्रमाणे हिंद सरकारचें कर्तव्य ठरलें असतें. पण तो वारसा न आल्याने संस्थानिकांना प्रजापक्षीय चळवळीच्या प्रक्षोभास आपल्या हिमतीवर टक्कर द्यावी लागणार होती, आणि अशी टक्कर देण्याचें सामर्थ्य किती संस्थानिकांत होतें? फारच थोडे. प्रजापक्षीय चळवळीने पेट घेतल्यास, संस्थानाधिपतीला आपल्या मुलखांत शांतता राखण्यासाठी हिंद सरकारचीच मदत घ्यावी लागली असती आणि ती मदत आपल्या अटी घालूनच सरकारने दिली असती. त्यामुळे सार्वभौमत्वाची जबाबदारी हिंद संघराज्यावर टाकली गेली नाही, हा 'अमूर्त प्रसाद' (Blessing in disguise) ठरला आणि प्रजेने संस्थानांच्या विलिनीकरणाची उग्र चळवळ केल्याबरोबर, संस्थानाधिपतीस शांततारक्षणार्थ मदत घेतांना, हिंद सरकारच्या अटी मान्य करणें भाग पडलें.

कोल्हापूरचे एक ध्येयवादी कार्यकर्ते श्री. रत्नाप्पा कुंभार हे १९४२ च्या चळवळीपासून भूमिगत होते; पण भारताच्या स्वातंत्र्य दिनीं ते प्रकट झाले आणि पुढे त्यांनी संस्थानांच्या विलिनीकरणाच्या चळवळींत हिरिरीने भाग घेतला.

संघराज्यास गळती

कोल्हापूरचे महाराज श्री. शहाजी राजे यांनी गादीवर आल्यापासून आपला मराठामंडळाचा एक सवता सुभा निर्माण करण्याची इच्छा धरली होती आणि ती थोडथोडी साकार होत होती. सांगली–फलटण गटाच्या खटपटीने निर्माण होणाऱ्या संघराज्यांत तेरा संस्थानें सामील होणार होतीं; पण यांपैकी

कांही संस्थानें कोल्हापूरमुळे फुटलीं आणि त्यामुळे मोठ्या संघराज्याची कल्पना ढासळली. या घटनेबद्दल बोलतांना संस्थानी चळवळीचे आद्य जनक आणि संस्थानांचे अभिमानी न. चिं. केळकर म्हणाले, " मोठें संघराज्य होणें अशक्य असल्याने, आता लोकांना विलिनीकरणच जास्त पसंत पडेल. संस्थानी मंत्रिमंडळांनी जनमत अजमावावें. " पण जनमत अजमावण्याच्या बाबतींत मंत्र्यांनी अगर संस्थानिकांनी कोणतीहि हालचाल मात्र केली नाही.

प्रसिद्ध विधिज्ञ श्री. के. एम्. मुनशी यांनी तयार केलेला दाक्षिणी संस्थानांच्या संघराज्याचा करारनामा प्रसिद्ध होऊन त्यांत इतर संस्थानांनी सामील व्हावें, असें आवाहन करण्यांत आलें. पूर्वीच्या संघराज्यास लागलेली गळती सात संस्थानांवर थांबली. आता सांगली, फलटण, औंध, भोर, कुरुंदवाड (धाकटी पाती), मिरजमळा व रामदुर्ग या सात संस्थानांचें संघराज्य होण्याचें निश्चित झालें, पण या संघराज्यास प्रजेचा मात्र मुळीच पाठिंबा नव्हता. विधिमंडळें व प्रजापारिषदा यांना प्रजेला अंधारांत ठेवलेल्याचा हा परिणाम होय. त्याचप्रमाणे संस्थानिकांवरील विश्वास डळमळत चालल्याचाहि हा परिपाक होता. संस्थानांतील मंत्र्यांनी तरी संघराज्याबाबत आपापल्या विधिमंडळांचा कौल घ्यावयाचा की नाही ? पण तेंहि घडलें नाही. संघराज्य स्थापन झाल्यावर आपल्या हातीं काही सत्ता राहणार नाही, हें ध्यानीं घेऊन कांही संस्थानिकांनी आपल्या हितसंबंधियांस बक्षिसें देण्यास सुरुवात केल्याने संस्थानिक-प्रणीत संघराज्यास होत असलेला विरोध वाढत चालला. ता. २४–९–१९४७ रोजीं द. सं. लोकसभा कार्यकारी मंडळाची सभा होऊन संघराज्यास पाठिंबा देण्याचें ठरलें : एका समितीने संघराज्य योजना तपासावी, संस्थानी लोकप्रतिनिधींची सभा बोलवावी व या सभेंत जो निर्णय होईल, तो अ. भा. सं. लोकपरिषदेला कळवावा, असें ठरविण्यांत आलें. या ठरावाप्रमाणे संघराज्यास आशीर्वाद दिलेल्यांपैकी कॉंग्रेसचे एक मातबर पुढारी व भारतीय संस्थान लोकपरिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली संस्थानी कार्यकर्त्यांचें एक संमेलन घेण्याचें द.सं. लोकसभेच्या कार्यकारी मंडळाने ठरविलें.

जमखिंडी नरेशांची विलिनीकरणाची घोषणा

याच सुमारास म्हणजे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत जमखिंडीचे नवे अधिपति कै. श्री. परशुरामराव पटवर्धन यांनी एक भाषण करून भारताच्या एकात्मतेच्या दृष्टीने संस्थानांचें विलिनीकरण होणें चांगलें असल्याचें जाहीर केलें. ते म्हणाले :

" सध्यांच्या काळांत लहान संस्थानें स्वतंत्रपणें जगूं शकणार नाहीत. संस्थानांतील प्रजेच्या व भारताच्या एकात्मतेच्या दृष्टीने मी संस्थानांचें विलिनीकरण होणें जास्त पसंत करतों. याच दृष्टीने एक पाऊल म्हणून माझ्या संस्थानांतील पोलीस व न्याय या खात्यांचा कारभार मुंबई सरकारमार्फत चालविण्याच्या बाबतींत मी मुंबई मंत्रिमंडळाशीं सहकार्याचा करार करण्याचा विचार करीत आहे. संयुक्त दक्षिणी संस्थानांच्या संघराज्याची योजना चांगली असून त्यामुळे राज्यकारभारक्षमता वाढेल यांत संशय नाही. कोल्हापूरसह संयुक्त संघराज्य होईल तर तें अधिक कार्यक्षम होईल संघराज्यांत जावें अगर कसें याबद्दल प्रजा जो निर्णय घेईल तो मला मान्य आहे. खाजगी खर्च उत्पन्नाच्या शेकडा १० टक्के घेणार आहे. पण याहि बाबतींत प्रजा जो निर्णय देईल तो मी मान्य करावयास तयार आहें."

जमखिंडीच्या २१ वर्षांच्या तरुण अधिपतींचें हें भाषण एखाद्या प्रजापुढाऱ्याला लाजेने मान खाली घालावयास लावील असें होतें. जमखिंडी अधिपतींच्या या भाषणाने सर्वत्र खळबळ उडून गेली. संस्थानांचें विलिनीकरण व्हावें असें म्हणणारा जमखिंडीचा तरुण अधिपति हा पहिलाच राजा होय. कित्येक वयस्क राजेरजवाड्यांनी या भाषणाची 'बालिश बडबड' म्हणून संभावना केली. भारताच्या एकात्मतेच्या दृष्टीने विचार करणारा आणि त्याप्रमाणे कृति करणारा श्री. परशुरामराव पटवर्धन हा पहिलाच संस्थानिक होय. आपली प्रजा संघराज्यांत जावयास तयार असेल, तर संघराज्य मान्य करणारा अगर प्रजेला विलीन होणें पसंत असेल, तर विलीन होण्यास तयार असलेला जमखिंडीचा अधिपति हा पहिलाच व शेवटचा नरेश ठरला. राज्यसत्तेचें उगमस्थान प्रजेमध्ये आहे असें केवळ वरपांगी जाहीर न करतां, त्या तत्त्वाची पाळवणूक करणारा जमखिंडीचा अधिपति हा अलौकिक वाटला गेला.

भाई बागलांचें विलक्षण मतपरिवर्तन

जमखिंडी अधिपतींच्या वरील भाषणामुळे ता. ११–१०–१९४७ रोजीं द. सं. लोकसभेच्या विद्यमानें डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली जे ३०० संस्थानी कार्यकर्त्यांचें संमेलन झालें, तें विफल ठरलें. संस्थानें नष्ट झालीं पाहिजेत असा हिरिरीने प्रचार करणारे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल हे ता. १५ ऑगस्ट १९४७ पासून त्यांचें कोल्हापूर संस्थान सार्वभौम झाल्याने आता वेगळी भाषा बोलूं लागले होते. त्यामुळे संमेलनाची सुरुवात करतांना, त्यांनी जें संघराज्यपूरक भाषण केलें, तें उपस्थितांना पटूं शकलें नाही. ते म्हणाले :

" द. सं. लोकसभेच्या कार्यकारी मंडळाने सुचविलेल्या सूचना राजमंडळाने मान्य केल्या तर संघराज्य आम्ही घेऊं. स्वतः होऊन संस्थानिक करीत असलेला स्वार्थत्याग अपूर्व आहे. विलिनीकरणाचा ठराव मंजूर होत नाही म्हणून आपण संघराज्य घेतलें पाहिजे. कोल्हापूर गट संघराज्यांत गेला तर मला अभिमान वाटेल. कोल्हापूर ही शिवाजी महाराजांची गादी आहे, म्हणुन केवळ कोणी त्या गटांत जाऊं नये. कोल्हापूरने सत्तात्याग करून संघराज्यांत गेलें पाहिजे. "

डॉ. पट्टाभिकृत संस्थानिक-प्रशस्ति

भाई बागलांच्या भाषणानंतर संमेलनाध्यक्ष डॉ. पट्टाभि यांनी संघराज्याच्या बाजूने मोठें प्रभावी भाषण केलें. संघराज्याची योजना त्यांना पसंत पडली होती आणि संस्थानिकांनी खासगी खर्चाच्या बाबतींत श्री. शंकरराव देव, काँग्रेसाध्यक्ष व संस्थान लोकपरिषदाध्यक्ष यांचा निवाडा मान्य करण्याचें मान्य केलें होतें. अशा प्रकारची त्यागवृत्ति भारतांतील इतर कोणाहि संस्थानिकाने अगर संस्थानिकांच्या समूहाने दाखविलेली नव्हती. त्यामुळे दाक्षिणी संस्थानिकांच्या प्रगमनशील धोरणाबद्दल व भारतीय व्यापक वृत्तीबद्दल डॉ. पट्टाभि यांची खात्री पटली होती. सांगली, फलटण, औंध संस्थानिकांशीं झालेल्या संघराज्याच्या वाटाघाटींत त्यांनी प्रमुखपणें भाग घेतला होता. त्यांच्यावर विश्वासून राजे लोकांनी ज्या घाटाघाटी झाल्या, त्या जर निष्फळ ठरल्या, तर संस्थान लोकपरिषदेचे अध्यक्ष या नात्याने त्यांना कमीपणा येणार होता. संघराज्य विरोधकांना समजाविण्याचा त्यांनी आपल्या भाषणांत कळकळीचा आणि आवर्जून प्रयत्न केला. ते म्हणाले :

" संघराज्य योजना म्हणजे बिकट भारतीय प्रश्न सोडविण्याचा विधायक प्रयत्न आहे. याकरतां आम्ही (डॉ. पट्टाभि, श्री. शंकरराव देव, रंगराव दिवाकर व निजलिंगाप्पा) खूप खटपट केली आहे. राजशाही व आधुनिक लोकशाही यांच्या संयोगाची संघराज्य योजना आहे. जेव्हा आवश्यकता पडेल तेव्हा कानडी व मराठी भाषिकांना संघराज्यांतून बाहेर पडण्याची मुभा आहे. नरेंद्रमंडळांत भोपाळ संस्थानाधिपतीचा जो गट आहे, त्याचा विचार करतां दक्षिणी संस्थानिकांनी संघराज्याकरता केलेला त्याग अपूर्व आहे. या राजेरजवाड्यांनी आपापल्या संस्थानांतून जबाबदार राज्यपद्धति स्थापन केली आहे, संस्थानांच्या सरहद्दी नष्ट केल्या, वैयक्तिक राजेपण सोडलें आणि ते सर्व हिंद संघराज्यांत सामील झाले. यापेक्षा आणखी त्यांनी जास्त काय करावयास पाहिजे होतें ? अशा परिस्थितींत दक्षिणी संघराज्यास विरोध करणें अप्रयोजकपणाचें ठरेल. सध्यांच्या संघराज्य योजनेंत दोष नाहीत असें नाही. ते अनुभवाने दूर होतील. ही संघराज्य योजना

मान्य करतांना संस्थानिकांना किती तरी त्याग करावा लागला आहे. प्रजेला कांहीच त्याग करावा लागलेला नाही, उलट तिचा फायदाच आहे. ”

संघराज्य–विरोधकांना हा युक्तिवाद पटण्याजोगा असूनहि, तो पटला नाही हें मात्र खरें. संघराज्याची मूळ कल्पना प्रजेची, पण संस्थानिकांनी याबाबत अतिशय उपेक्षा वृत्ति दाखविल्यामुळे संघराज्याबद्दलचा त्यांचा उत्साह नष्ट झाला होता. संस्थानांचें संयुक्तीकरण व समाईक हायकोर्ट या योजनांचे प्रणेते हुतात्मा अनंतराव साबडे यांच्या झालेल्या खुनामुळे संघराज्य योजनेंतील जादू खलास झाली होती. शिवाय वरील संमेलन बोलावण्याबाबत कार्याध्यक्ष व चिटणिसांनी जो घोटाळा केला होता, त्यामुळे त्यांच्यावर खूप टीका होऊन, सभेचा बेरंग झाला. अशा परिस्थितींत सभा चालविणें निरर्थक आहे असें वाटून डॉ. पट्टाभि यांनी कोणताहि निर्णय न घेतां संमेलन बरखास्त केलें.

ही घटना मोठी शोचनीय होय यांत संशय नाही. डॉ. पट्टाभिसारखा मोहरा उपस्थित असतांना, अशा रीतीने संमेलनाचें सूप वाजलें जावें, ही खरोखरच लाजिरवाणी गोष्ट होय. संघराज्य-विरोधकांच्या विरोधापेक्षा संमेलनाच्या पुरस्कर्त्यांच्या गोंधळामुळे या संमेलनाचा बोजवारा उडाला असें म्हणणेंच सयुक्तिक होणार आहे. या संमेलनांत कोणताच ठराव पास न झाल्याने, विरोधकांना आपला जय झाला असें वाटणें स्वाभाविक आहे. विलिनीकरणासंबंधांत न. चिं. केळकर यांनी पुनः अनुकूल उद्गार काढले. ते म्हणतात,

“ संघराज्याबद्दल एक वेळ प्रेम वाटे, पण आता मात्र वाटत नाही. साठ लाख उत्पन्नाचें संघराज्य फार तर दोनतीन वर्षे टिकेल. मग या संघराज्याच्या सात घटक संस्थानिकानी आताच विलीन होण्यास कां म्हणून संमति देऊं नये ? लहानसें संघराज्य असलें, तरी प्रत्येक संस्थानच्या प्रजेच्या संमतीवाचून कांहीहि ठरवूं नये.”

संघराज्याची स्थापना झाली

पण केळकरांच्या या सल्ल्याचा उपयोग करून घेतला गेला नाही. प्रत्येक संस्थानी विधिमंडळांत संघराज्यास पाठिंबा देणारे ठराव पास करून घेण्यांत आले नाहीत, आणि अशा विरोधाच्या वातावरणांत ता. १७–१०–१९४७ रोजीं भोर येथे संघराज्याच्या करारनाम्यावर आठ संस्थानिकांनी (औंध, भोर, फलटण, मिरज, मिरजमळा, सांगली, कुरुंदवाड व रामदुर्ग) सह्या करून

दक्षिणी संस्थानांच्या संघराज्याची प्रतिष्ठापना केली. औंधचे वयोवृद्ध अधिपति श्री. भवानराव पंतप्रतिनिधि यांना राजप्रमुखाचा यथार्थ मान देण्यांत आला; परंतु न्यायदेवतेला आपली बटिक करणाऱ्या आणि सूक्तासूक्त राज्यकारभारक्षमता न पाळणाऱ्या भोरच्या पंतसचिवांना उपराजप्रमुखत्व देण्यांत आलें याबद्दल मात्र सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

वरीलप्रमाणे आठ संस्थानांचें संघराज्य अंमलांत आल्यावर, त्याबद्दल परस्परविरोधी मतें प्रदर्शित होऊं लागलीं. अखिल भारतीय संस्थान लोक-परिषदेच्या स्थायी समितीने संघराज्याचें स्वागत करतांना, संस्थानांच्या विलिनीकरणाची मागणी राजा व प्रजा या दोन्ही घटकांनी करण्याची आवश्यकता असल्याचें जाहीर केलें. कर्नाटकस्थ संस्थानी प्रजाजनांनी संघराज्यविरोधी ठराव पास करून घटना समितिवरील व विधिमंडळांतील सभासदांना आपापल्या जागांचे राजिनामे देण्याचा आदेश दिला. या विरोधी आघाडींत श्री. मुनवळी व निजलिंगाप्पा यांनी प्रमुखत्वाने भाग घेतला होता. संघ-राज्याचा करारनामा सदोष होता, तरी त्याकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाही. याचें कारण प्रजेचें लक्ष आता संघराज्याच्या ऐवजी विलिनीकरणावर जास्त केंद्रित झालें होतें.

संघराज्याच्या वाटचालीबाबत असंतोष

संघराज्याची वाटचाल सुरू व्हावी म्हणून लोकसभेचे चिटणीस श्री. बा. वि. शिखरे यांनी संघराज्याच्या आठ घटक संस्थानांच्या प्रजापरिषदांच्या कार्यकारी मंडळांची सभा घेऊन, त्यांत सोळा सदस्यांची एक तात्पुरती समिति नेमून घेतली. श्री. कमलनयन बजाज यांच्या अध्यक्षतेखाली एक पार्लमेंटरी बोर्ड नेमण्याचा ठराव पास करण्यांत आला. या बाबतींत ज्या तऱ्हेने एकंदर कारवाई करण्यांत आली, त्याबद्दल असंतोष प्रकट होऊं लागला. श्री. कमलनयन बजाज यांनी सांगली वगैरे ठिकाणीं जाऊन संघराज्यास अनुकूल असा प्रचार करण्याचा प्रयत्न केला. संघराज्याच्या हंगामी मंत्रिमंडळाच्या बनावाबाबत ज्या कांहीं प्राथमिक वाटाघाटी सुरू केल्या, त्याहि बाबतींत कार्यकर्त्यांच्या तक्रारी सुरू होऊन शिखरे-बजाजाविरुद्ध लोकमत प्रकट होऊं लागलें.

पटेल—'विलिनीकरणाबाबत प्रजेचें मत कळवा'

संघराज्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू होण्याचा विचार चालू असतांना, जमाखिंडीच्या राजेसाहेबांनी संस्थान खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल

यांना एक पत्र लिहून आपलें संस्थान विलीन करून घेण्यास आपण तयार आहों असें कळविल्यामुळे विलिनीकरणाच्या प्रश्नास जोर चढला. सरदारांनी प्रजेचें तसें मत असल्यास आपण संस्थान विलीन करून घेऊं शकूं, असें राजेसाहेबांस कळविलें. १९४७च्या डिसेंबर महिन्यांत ओरिसा संस्थानांत कांही दंगल चालू झाली होती आणि ती आवरणें तेथील संस्थानिकांना अवघड झालें होतें. या कामीं भारत सरकारची या संस्थानिकांना मदत पाहिजे होती आणि त्याकरता सरदार पटेल व व्ही. पी. मेनन हे ओरिसांत गेले होते. शांतता रक्षणासाठी द्यावयाची मदत विलिनीकरणाच्या मोबदल्यांत दिली जाणार होती. सरदार पटेलांचा या संस्थानिकांना विलिनीकरणाचा सल्ला होता व त्यांना तो मानणें भाग पडत होतें. शिवाय ओरिसांतील हीं संस्थानें पूर्ण सत्ताधारी नव्हतीं. जमखिंडी संस्थानांत तशी कांहीच परिस्थिती नव्हती. संस्थानांत कोणतीहि चळवळ चालूं नव्हती; शिवाय जमखिंडी संस्थान पूर्ण सत्ताधारी होतें. जमखिंडी नरेशांना विलिनीकरणाच्या बाबतींत लोकमत अजमावण्याबद्दल सरदार पटेलांचें पत्र आल्याबरोबर त्यांनी संस्थान प्रजापरिषदेला विश्वासांत घेऊन परिषदेचें खास अधिवेशन घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ता.२१-१२-१९४७ रोजीं बनहट्टी येथे श्री. दोडमेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन घेण्यांत आलें. या अधिवेशनास जमखिंडीचे राजे श्रीमंत परशुरामराव पटवर्धन हे हजर राहिले आणि सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे जमखिंडी संस्थान मुंबई प्रांतांत विलीन करण्याचा ठराव एकमताने पास झाला.

शिखरे-बजाजांना विरोध

श्री. शिखरे व कमलनयन बजाज हे संघराज्याचें भावी स्वप्न रंगवीत असतांना निरनिराळ्या संस्थानांच्या प्रजापरिषदांच्या कार्यकारी मंडळांतून विलिनीकरणाबद्दलचे ठराव पास करण्यात येत होते. ता. १४-१२-१९४७ रोजीं द. सं. लोकसभेच्या कार्यकारी मंडळाची सभा झाल्यावेळीं संस्थानें मुंबई प्रांतांत विलीन करण्याचा ठराव पास करण्यांत आला. असें प्रखर संघराज्य-विरोधी वातावरण तापलें जात असतांना, आठ संस्थानिकांना आपल्या संघराज्याचें काय होणार याची चिंता वाटूं लागली असल्यास नवल नाही. त्यांनी महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल यांच्या भेटी घेतल्या. यावेळीं महात्माजी व सरदार म्हणाले कीं, "विलिनीकरणाबाबत राजा व प्रजा यांचें ऐकमत्य असेल, तर युक्तायुक्ततेचा प्रश्न असत नाही. पण राजे लोकांचा जेव्हा विरोध असतो, तेव्हा प्रजेने संस्थानच्या

विलिनीकरणाची आवश्यकता पटवून दिल्याशिवाय सरकारचें संस्थान खातें, अशा मागणीस पाठिंबा देणार नाही." पंडितजींनी 'संघराज्य चालू तर करा आणि काय काय घडतें तें पाहा' असा सारवासारवीचा सल्ला दिला. पंडितजी आता सरकारच्या अधिकारपदावर होते; ते केवळ आता पुढारी नव्हते. त्यामुळे त्यांना कोणताहि सल्ला देणें अवघडच वाटलें असावें. ओरिसांतील संस्थानें विलीन करतांना, तेथील प्रजेचें मत सरदार पटेल यांनी अजमावल्याचें प्रसिद्ध झालेलें नाही. केवळ संस्थानिकांच्या सक्तीच्या खुषीच्या संमतीने तेथील संस्थानें खालसा करण्यांत आलीं. संस्थानें नष्ट न करण्याच्या काँग्रेसच्या धोरणांत संस्थान खात्याचें ओरिसांतील संस्थानांचें विलिनीकरण कसें काय बसलें हा प्रश्नच आहे.

संघराज्याचा अपमृत्यु

दक्षिणी संस्थानांच्या संघराज्याचें व घटनासमितीचें औपचारिक उद्‌घाटन ता. २०–१२–४७ रोजीं मिरज येथे श्री. कमलनयन बजाज यांच्या अध्यक्षतेखाली करण्यांत आलें. या समारंभाचा सोहळा फारच मामुली पद्धतीने पार पडला. काँग्रेस पुढाऱ्यांच्या संमतीने संस्थानिकांनी संघराज्याचा बनाव घडवून आणतांना, संस्थानी विधिमंडळांचें मत अजमावलें नाही अगर प्रजेला विश्वासांत घेतलें नाही याचें शल्य पुष्कळांना बोचत होतें. त्यामुळे या समारंभाबद्दल औत्सुक्य तर नव्हतेंच, उलट एक प्रकारची उदासीनता होती. संघराज्याच्या विरोधकांनी काळीं निशाणें दाखवून आपला विरोध प्रकट केला. उद्‌घाटक श्री. कमलनयन बजाज यांचें भाषणहि दुटप्पी होतें. त्यांनी जमखिंडीच्या राजेसाहेबांच्या विलिनीकरणाच्या इच्छेबद्दल त्यांचें अभिनंदन केलें, आणि त्याचबरोबर संघराज्य म्हणजे एक तऱ्हेनें विलिनीकरणच होय, असा मुलामा फासून रंगसफेती केली. त्यामुळे त्यांच्या भाषणाबद्दल संघराज्याच्या पुरस्कर्त्यांनासुद्धा आनंद वाटला नाही. याच वेळीं संघराज्याचे मुख्य मंत्री म्हणून श्री. बाळासाहेब कोरे व घटना समितीचे अध्यक्ष म्हणून बॅ. श्री. आप्पासाहेब पंत यांची निवड करण्यांत आली. या समारंभाच्या वेळीं प्रदर्शित झालेलें लोकमत आणि पुढें मंत्रिमंडळाच्या बनावाबाबत प्रकट झालेली असूया पाहून, राजमंडळास विलिनीकरणाचा पुरस्कार करणेंच इष्ट वाटलें असावें, असें ता. २१–१२–४७ रोजीं झालेल्या पुढील ठरावावरून स्पष्टपणें दिसून येणार आहे. हा ठराव म्हणतो—

" नवीन घडलेली घटना व एकंदर लोकमत अजमावतां, असा ठराव करण्यांत येत आहे कीं, संघराज्याची घटना तयार करीत न बसतां, मुंबई प्रांतांत विलीन होण्याची जर-संघराज्यांतील संस्थानी जनतेची इच्छा असेल तर संस्थानिक त्यांच्या मार्गांच्या आड येणार नाहीत. "

या राजमंडळाच्या सभेस भोरशिवाय इतर सात संस्थानांचे आधिपति हजर होते.

विलिनीकरणाचा ठराव पास

वरील ठराव पास झाला, त्याच दिवशीं रात्रीं ९ वाजतां घटना समितीची सभा श्री. कमलनयन बजाज यांच्या अध्यक्षतेखाली होऊन पुढील ठराव पास करण्यांत आले:—(१) आठ संस्थानांचें मुंबई प्रांतांत विलिनीकरण होण्यास संमति दिल्याबद्दल राजमंडळाचें अभिनंदन; (२) घटना समितीस संस्थानांचें विलिनीकरण मान्य आहे; (३) ताबडतोब विलीन होण्याबाबत संस्थानी प्रजेने आपलें मत व्यक्त करावें; (४) विलिनीकरण होणार असल्याने हंगामी मंत्रिमंडळाची जरुरी नाही; (५) या ठरावांची कार्यवाही श्री. बाळासाहेब कोरे यांनी करावी.

अशा तऱ्हेने दाक्षिणी संस्थानांच्या संघराज्याचा जन्म आणि मृत्यु चोवीस तासांच्या अंतराने झाला. संघराज्य निर्माण केल्याचा आनंद चोवीस तासमुद्धा उपभोगावयास मिळाला नाही. याच तारखेस (२१-१२-१९४७) जमखिंडी प्रजापरिषदेची बैठक राजेसाहेबांच्या उपस्थितींत होऊन राजा व प्रजा यांच्या उभयतांच्या संमतीने जमखिंडी संस्थान मुंबई प्रांतांत विलीन करण्याचा ठराव पास झाला, हाहि एक योगायोगच होय. अशा तऱ्हेने दाक्षिण महाराष्ट्रांतील १८ संस्थानांपैकी नऊ संस्थानें राजा व प्रजा यांच्या संमतीने विलिनीकरणास तयार झालीं, ही विशेष गोष्ट आहे. दक्षिणी संस्थानांचें संघराज्य होण्याबाबत औंध व फलटणचे आधिपति यांची तीव्र मनीषा होती. संघराज्य व समायिक हायकोर्ट या योजनांचा त्यांनी प्रथमपासूनच पाठपुरावा केला होता; पण त्यांना त्यांच्या संस्थानिक बंधूंपासून योग्य त्या प्रमाणांत साथ मिळाली नाही, यामुळे या योजनांचें भिजत घोंगडें फार दिवस पडून राहिलें होतें. संघराराज्याच्या बाबत सांगलीचे मंत्री श्री. बाळासाहेब कोरे व फलटणचे दिवाण श्री. बापूसाहेब गोडबोले यांनीहि खूप खटपट केली होती. इतक्या खटपटीने अस्तित्वांत आलेलें संघराज्य हें चोवीस तासांच्या

आंत रद्द करण्याची परिस्थिति निर्माण झाल्याबद्दल, त्यांना वाईट वाटणें साहजिकच आहे. 'हें फल काय मम तपाला' असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले असल्यास आश्चर्य नाही. असो. वरील घटनांवरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, या नऊ संस्थानांचें विलिनीकरण हें संस्थान खात्याच्या अगर सरदार वल्लभभाईंच्या इच्छेने झालेलें नसून तें केवळ लोकांच्या इच्छेने झालें आहे. महात्माजींच्या खुनामुळे दक्षिणी संस्थानांचे विलिनीकरण झालें असें केलें जाणारें विधानहि बरोबर नाही हें वरील हकीकतीवरून सहजी दिसून येणार आहे.

द. सं. संघराज्य पटेलांना अमान्य

वरीलप्रमाणे नऊ संस्थानांचें विलिनीकरण मुंबई प्रांतांत होण्याचें जरी ठरविण्यांत आलें, तरी ही पद्धत संस्थान खात्याला म्हणजे सरदार पटेलांना मान्य नव्हती. श्री. बाळासाहेब कोरे सरदारांना याबाबत भेटण्यासाठी दिल्लीस गेल्यावेळीं, सरदार पटेलांनी त्यांना सांगितलें कीं :

"ता. १५ ऑगस्ट १९४७ पासून सर्व संस्थानें स्वतंत्र झालीं आहेत. संस्थान खातें हें संयुक्त दक्षिणी संघराज्य मानूं शकत नाही. प्रत्येक संस्थानाशीं वैयक्तिक वाटाघाटी कराव्या लागतील. संस्थानांचें विलिनीकरण करणें हें आमचें ध्येय नाही. विलिनीकरणाबाबत राजा व प्रजा हे दोन्हीहि घटक आमच्याकडे आल्यास मी या प्रश्नाचा विचार करीन.

याचबरोबर संस्थान खात्याने कळविलें कीं, 'प्रत्येक संस्थानच्या प्रजापरिषदेने विलिनीकरणाबाबत निर्णय घ्यावा आणि या सर्व ठरावांचा संकलित विचार करून संघराज्य घटना समितीने आपला अभिप्राय संस्थान खात्यास कळवावा.' आता या सर्व गोष्टी केवळ मामुली आणि कायदेशीर स्वरूपाच्या होत्या. द. सं. लोकसभा कार्यकारी मंडळाची ता. ६-१-४८ रोजीं सभा झाल्यावेळीं भाई बागलांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव पास करण्यांत आला. त्यांच्या जागीं श्री. रत्नाप्पा कुंभार आले, व पुढील ठराव पास करण्यांत आले :–(१) संस्थानी प्रजापरिषदांनी विलिनीकरणास पाठिंबा द्यावा; (२) अक्कलकोट, जत, जंजिरा व मुधोळ येथील चळवळीस सहाय्य करावें; (३) घटना समिति सार्वभौम असल्याने तीच विलिनीकरणाचा निर्णय घेऊं शकेल. संघराज्याच्या घटक संस्थान प्रजापरिषदांच्या कार्यकारी मंडळांनी संस्थानांच्या विलिनीकरणासंबंधी ठराव पास केले आणि ता. २६-१-१९४८ रोजीं संघराज्य घटना समितीची बैठक बॅ. आप्पासाहेब पंत यांच्या अध्यक्षतेखाली

झाल्यावेळीं पक्षनेते श्री. बाळासाहेब कोरे; यांनी विलिनीकरणासंबंधी मांडलेला पुढील ठराव पास करण्यांत आला:—

"राजमंडळ व संबंधित प्रजापरिषदांचे ठराव लक्षांत घेतां, सांगली, फलटण, भोर, मिरज, मिरजमळा, कुरुंदवाड, व रामदुर्ग हीं सात संस्थानें मुंबई प्रांतांत विलिन करावीं. हिंद सरकारबरोबर पुढील वाटाघाटी करण्याचा अधिकार श्री. कमलनयन बजाज यांना देण्यांत येत आहे. संस्थानांतील शिल्लक रकमा त्या त्या संस्थानच्या उन्नतीकरतां खर्च व्हाव्यात."

हा ठराव पास झाल्यावर घटना समिति बरखास्त करण्यांत आली. नंतर संस्थानिकांच्या राजमंडळाची बैठक होऊन संघराज्य बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यांत आला.

अक्कलकोटांतील दंगल

जीं संस्थानें विलिनीकरणास तयार नव्हतीं व ज्यांना कोल्हापूर छत्रपतींचा पाठिंबा आहे असें वाटत होतें, अशा अक्कलकोट, जंजिरा, मुधोळ व जत या चार संस्थानांत क्रांतिकारी चळवळ करण्याचें आणि प्रजापरिषदा भरविण्याचें श्री. रत्नाप्पा कुंभार यांनी ठरविलें. १९४२ च्या लढ्यांतील ते एक निष्णात क्रांतिवीर व जबरदस्त संघटक होते. अक्कलकोटचे अधिपति तेथील प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना छळीत असल्याचें पाहून श्री. रत्नाप्पांनी आपला पहिला हल्ला ता. १-१-१९४८ रोजीं अक्कलकोटवर चढविला. अक्कलकोट दरबार व श्री. कुंभार यांच्यामध्ये तडजोड होऊं शकली नाही; आणि म्हणून सत्याग्रह सुरू झाला. मिरवणुकीवर गोळीबार करण्यांत आला, आणि त्यामुळे अस्वस्थतेची परिस्थिति निर्माण झाली. संस्थानांत शांतता प्रस्थापित करण्यासाठी राजेसाहेबांनी सोलापूर कलेक्टरची मदत मागितली. ता. ५-१-४८ रोजीं विलिनीकरणास आपली तयारी असल्याचें राजेसाहेबांनी कळविल्यावर, सोलापूर जिल्ह्याधिकाऱ्याने मदत पाठवून शांतता प्रस्थापित केली. श्री. रत्नाप्पांची दुसरी आघाडी जत संस्थानांत उघडली जावयाची होती; पण अक्कलकोटांतील वरील प्रकार लक्षांत घेऊन, तत्पूर्वीच जतच्या राजेसाहेबांनी ता. १७-१-१९४८ रोजीं आपण विलिनीकरणास तयार असल्याचें संस्थान खात्याचे प्रादेशिक कमिशनर यांना कळविलें. मुधोळच्या राजेसाहेबांनी सरदार पटेलांना त्यांच्या मुंबईच्या बैठकींत आपण विलिनीकरणास तयार असल्याचें सांगितलें.

औंधचें वैशिष्ट्यपूर्ण स्थान

ता. ३०–१–१९४८ रोजीं महात्मा गांधींचा खून झाला. तत्पूर्वी सांगली, मिरज, मिरजमळा, फलटण, रामदुर्ग, भोर, कुरुंदवाड, जमखिंडी,

अक्कलकोट, जत, मुधोळ व कुरुंदवाड (धाकटी पाती) या बारा संस्थानांचें विलिनीकरण राजा व प्रजा यांच्या संमतीने होण्याचें ठरलें. सावनूर व वाडी येथे कसलीच चळवळ नव्हती आणि तेथे विलिनीकरणास विरोध होण्याचा संभव नव्हता. कोल्हापूर, सावंतवाडी, जंजिरा व औंध या संस्थानांनी विलिनीकरणास अजून संमति दिली नव्हती. औंधची राज्यघटना ग्रामपंचायतीवर अधिष्ठित असल्याने आणि गेलीं नऊ वर्षे औंध संस्थानचा कारभार ग्रामपंचायतींच्या साहाय्याने यशस्वी चालत असल्याने औंधचे अधिपति व प्रजा यांना आपलें वैशिष्ट्य राखण्याची इच्छा असल्यास नवल नाही. औंधचे अधिपति हे जुन्या जमान्यांत वाढलेले होते व त्यांना संस्थानिक वर्गाचा अभिमान होता. त्याबरोबरच त्यांच्यामध्ये भरपूर राष्ट्रीयत्व व व्यापक दृष्टि होती. कोणत्याहि चांगल्या योजनेस त्यांचा पाठिंबा असे. त्यामुळे त्यांचा व त्यांच्या प्रजेचा औंध संस्थान स्वतंत्र ठेवण्याचा आग्रह समजणें अशक्य नव्हतें. औंधांत सार्वमत घेऊन विलिनीकरणाबाबतचा निर्णय घेतला जाईल असें औंधच्या राजेसाहेबांनी ता. २९-१-१९४८ रोजीं जाहीर केलें, पण दुसऱ्याच दिवशीं महात्माजींचा अमानुष वध झाल्यावर हा सार्वमत घेण्याचा आग्रह धरण्यांत आला नाही आणि त्यांनी विलिनीकरणास संमति दिली.

प्रजापुढाऱ्यांचाहि त्याग

ज्या बारा संस्थानांच्या अधिपतींनी व प्रजापरिषदांनी विलिनीकरणास संमति दिली, त्यांपैकी बहुतेक सर्व संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति चालू होऊन लोकमंत्र्यांच्या हातीं कारभार आलेला होता. पण हे सर्व रायआवळे एकत्र केले तरी त्यांची मोट डोंगरी आवळ्यांच्या पासंगास लागणार नव्हती. संघराज्य केलें तरी तें छोटेंच होणार आणि तेथे जबाबदार राज्यपद्धति व्यवस्थितपणें चालणें अवघड वाटून आणि स्वतंत्र भारताचा एकसंधीपणा असण्याची आवश्यकता लक्षांत घेऊन, प्रजापुढाऱ्यांनी विलिनीकरणास संमति देऊन मोठा त्याग केला होता. संस्थानिकांनी अधिकारत्याग जसा केला, तसा प्रजेच्या प्रतिनिधींनी त्यांना मिळणाऱ्या मंत्रिपदाचा त्याग केला होता. कोल्हापूर, सावंतवाडी व जंजिरा या संस्थानांचे अधिपति मात्र आपल्या राजेशाहीच्या धुंदींत होते आणि त्यामुळे ते विलिनीकरणास तयार नव्हते. महात्मा गांधींचा वध झाल्या दिवशीं दक्षिणेंतील बहुतेक सर्व संस्थानें आपण होऊन विलिनीकरणाच्या उंबरठ्यावर

होतीं आणि याबद्दल योग्य ती कारवाई करण्यास संस्थान खात्यास जेवढा वेळ लागेल, तेवढाच वेळ संस्थानिक व मंत्री यांना आपला अधिकार उपभोगण्यास मिळणार होता.

गांधीवधानंतरची गुंडगिरी

विलिनीकरणाच्या ठरावामुळे संस्थानिक काय अगर मंत्री काय, आपलें स्थान सोडण्याच्या मनस्थितींत असतांना, महात्मा गांधींचा खून ता. ३०–१–४८ रोजीं एका ब्राह्मण तरुणाने केला; म्हणून सांगली, कुरुंदवाड, भोर, मिरज, रामदुर्ग, वगैरे संस्थानांतील ब्राह्मणवर्गाचें जास्तींत जास्त नुकसान गुंडांनी केलें. घरांची राखरांगोळी झाली, मालमत्तेची लूट असंख्य प्रमाणांत झाली आणि जबाबदार राज्यपद्धति चालू असलेल्या संस्थानांतून कायद्याची व्यवस्था पार कोलमडून पडली. मंत्र्यांच्या हातीं कारभार असल्याने संस्थानिक कांही करूं शकले नाहीत. मंत्री दुर्बल ठरले आणि त्याचा परिणाम ब्राह्मण प्रजेला भोगावा लागला. विलिनीकरणाच्या ठरावामुळे संस्थानिक व मंत्री हे लवकरच स्थानभ्रष्ट होणार असल्याने त्यांची मनःस्थिति टणक नसणें साहजिक आहे. शिवाय होणार असलेल्या विलिनीकरणास त्यांचा शंभर टक्के मानसिक पाठिंबा असेल, असें मानणेंहि चुकीचें आहे. अशा मानसिक दौर्बल्याच्या परिस्थितींत मंत्री गुंडगिरीस आळा घालूं शकले नाहीत. जमखिंडीचे तरुण अधिपति कै. श्रीमंत परशुरामराव पटवर्धन यांनी मात्र या प्रसंगीं जी धडाडी व प्रसंगावधान दाखविलें, त्यामुळे जमखिंडी संस्थानांत कोठेंहि दंगा झाला नाही आणि दंगलीपासून तें अगदी अलिप्त राहिलें. कोल्हापुरांतील छत्रपति व मंत्रिमंडळ यांना कोल्हापूर विलीन होण्याचा त्यावेळीं धोका नव्हता; पण तेहि कोल्हापुरांतील गुंडगिरीस आळा घालूं शकले नाहीत, उलट बागल मंत्रिमंडळाने ब्राह्मणांवरील गुंडगिरीस उत्तेजन देऊन आपलें नांव बदनाम करून घेतलें असा उघड आरोप त्यांच्यावर केला गेला आणि त्याचा परिणाम त्यांना पुढे एक वर्षाच्या आंत भोगावा लागला. जमखिंडीसारख्या संस्थानांत जी शांतता राहूं शकली, ती सांगली अगर कोल्हापूरसारख्या मोठ्या संस्थानांत राहूं शकली नाही ही त्या त्या संस्थानी दरबारांना काळिमा आणणारी गोष्ट झाली यांत संशय नाही.

विलिनीकरणाच्या करारनाम्यावर सह्या

महात्मा गांधींच्या वधानंतर निरनिराळ्या दंगलग्रस्त संस्थानी भागांत मुंबई प्रांताच्या अधिकाऱ्यांचा अंमल सुरू होणें अपरिहार्य झालें.

ता. १९–२–१९४८ रोजीं मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली अक्कलकोट, जत, फलटण, कुरुंदवाड (थोरली व धाकटी पाती), सांगली, रामदुर्ग, मिरज, मिरजमळा, मुधोळ, सावनूर, वाडी, औंध, भोर व जमखिंडी या पंधरा संस्थानांच्या अधिपतींची सभा होऊन विलिनीकरणाच्या करारनाम्यावर संस्थानाधिपतींच्या सह्या झाल्या. कोल्हापूर, जंजिरा व सावंतवाडी या संस्थानांच्या विलिनीकरणाचा निर्णय लागावयाचा असल्याने तेथील अधिपति हजर नव्हते.

सावंतवाडी व जंजिऱ्यांत प्रतिसरकार

सावंतवाडी संस्थान प्रजापरिषदेचें अधिवेशन ता. १४-२-४८ रोजीं श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली होऊन विलिनीकरणाचा ठराव पास करण्यांत आला. सावंतवाडी संस्थानाधिपतीने प्रजेची ही मागणी लक्षांत न घेतल्यामुळे परिषदेने ता. २३–२–१९४८ रोजीं प्रतिसरकारची स्थापना करून सावंतवाडींतील अधिकाऱ्यांना एक दिवस कुडाळास कैदेंत नेऊन ठेवलें व संस्थानांत दंगल माजली. राजेसाहेबांनी बेळगांव जिल्हाधिकाऱ्याची मदत मागितली आणि सरदार पटेलांना विलिनीकरणास तयार असल्याचें कळविलें. २५-२-१९४८ रोजीं विलिनीकरणाच्या करारनाम्यावर राजेसाहेबांची सही झाली. बेळगांव जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिस कुमक पाठवून सावंतवाडींत शांतता निर्माण केली. श्री. नाना पुरोहितांच्या पुढारीपणाखाली जंजिरा संस्थानांत जानेवारी १९४८ मध्ये जंगल सत्याग्रह चालू झाला होता, आणि पुढे तेथे प्रति-सरकार स्थापन झालें. त्यामुळे संस्थानांतील कारभार बंद पडल्यासारखा झाला. मुंबई प्रांताचे पोलीस संस्थानांत आले होते. एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन जंजिऱ्याच्या नबाबांनी विलिनीकरणाचा निर्णय घेतला आणि ता. ४-३-१९४८ रोजीं जंजिरा संस्थानचा ताबा मुंबई प्रांताने घेतला.

मुंबई प्रांताने संस्थानांचा ताबा घेतला.

ता. ८-३-१९४८ रोजीं दक्षिणी संस्थानांपैकी कोल्हापूरव्यतिरिक्त बाकीचीं सर्व संस्थानें कारभारदृष्ट्या मुंबई प्रांतांत अधिकृतरीत्या सामील झालीं. ज्या जिल्ह्यांत जें संस्थान समाविष्ट करण्यांत आलें, तेथील जिल्हा-धिकाऱ्यांच्या हस्तें तिरंगी झेंडा फडकविण्यांत येऊन मुंबई प्रांतांत संस्थानें सामील केल्याचें जाहीर करण्यांत आलें. ता. ८–३–१९४८ पासून संस्था-निकांची सत्ता गेली, पण त्यांचे मानमरातब राखण्याचें आश्वासन हिंद सरकारने दिलें. त्याचबरोबर १९४५–४६ च्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम संस्थानिकांच्या खासगी खर्चासाठी देण्याचा करार करण्यांत आला.

कोल्हापूरचें विलिनीकरण

इतर संस्थानांतून वरीलप्रमाणे राजकीय घडामोडी होत असतांना कोल्हापूर संस्थान विलिनीकरणाच्या वावटळीपासून अलिप्त कसें राहिलें हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कोल्हापुरांत प्रजापरिषदेची ताकद मोठी होती व कार्यकर्तेहि जबरदस्त होते. भाई माधवराव बागलांच्यासारखा समाजवादी पुढारी परिषदेच्या कार्याध्यक्षपदीं होता. संस्थानांच्या अस्तित्वाविरुद्ध त्यांनी अनेकवेळा भाषणें केलीं होतीं. पण ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं कोल्हापूर संस्थान सार्वभौम राज्य झाल्याबरोबर त्यांच्यांत मतांतर झालें. हिंद वसाहत राज्याचा स्वतंत्र घटक राहण्याची कोल्हापूरची लायकी होती. भारतीय लोकपरिषदेंत ज्या संस्थानांचें उत्पन्न ५० लाखांपेक्षा जास्त आहे, अशीं संस्थानें जिवंत राहूं शकतील असें ज्या लुधियाना ठरावांत म्हटलें होतें, त्या ठरावाप्रमाणे कोल्हापूरच्या अस्तित्वाला धोका येणार नव्हता. कोल्हापूरचे अधिपति मराठा, प्रजा मराठा आणि पुढाऱ्यांपैकी बरेचसे मराठा; यामुळे विलिनीकरणाची कल्पना कोल्हापुरांत रुचण्याजोगी नव्हती. तेथे जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्यावर पुढाऱ्यांचें समाधान झालें असतें.

ता २४-१०-१९४७ रोजीं (दसरा) छत्रपतींनी संपूर्ण सत्तादानाची घोषणा करून (१) सैन्य, (२) खासगी खर्च, (३) इनामें, (४) शांतताभंगावेळचे खास अधिकार, (५) अल्पसंख्याकांचें संरक्षण, (६) हिंदी संघराज्य व इतर संस्थानांशीं संबंध, एवढींच खातीं राखीव राहण्याचें नमूद केलें. घटना तयार करण्याकरता घटना समिति निवडली जाईल आणि १९४७ च्या कायद्याप्रमाणे निवडणुका झाल्यावर मंत्रिमंडळ बनविलें जाईल असें छत्रपतींनी जाहीर केलें. पण येवढ्याने कोल्हापूर प्रजापरिषदेचें समाधान होणें शक्य नव्हतेंच. छत्रपतींचे राजकीय सल्लागार श्री. लठ्ठे यांनी 'परिषदेने सुधारणा राबवाव्या; लढा सुरू केल्यास नाहक नुकसान होईल ' असा सल्ला दिला. परिषदेचे पुढारी व छत्रपति यांच्यांत पुढे वाटाघाटी होऊन दिवाळी पाडव्यापासून हंगामी मंत्रिमंडळ आस्तित्वांत आणण्याचें व सैन्याचा उपयोग प्रजेविरुद्ध न करण्याचें आश्वासन देण्यांत आल्यावर परिषद् व दरबार यांच्यांत तडजोड झाली. संस्थानच्या शासनमंडळांतील तीन व परिषदेचे चार असे सात मंत्री घेण्याचें ठरलें. मंत्रिमंडळाच्या खातेवाटपाबाबत भाई माधवराव बागल व श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्यांत तीव्र मतभेद होऊन त्याचें पर्यवसान कुंभार

गटाने परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे राजिनामे देण्यांत झालें. भाई माधवराव बागल यानींहि स्वतःकडे मंत्रिपद घेतलें नाही; पण त्यांचे बंधु श्री. वसंतराव बागल यांच्या प्रमुखत्वाखाली श्री. टी. एस. कारखानीस, डी. एस. खांडेकर व ना. तु. सरनाईक यांचें मंत्रिमंडळ बनविण्यांत आलें. या हंगामी मंत्रिमंडळाचा ता. १९–११–४७ रोजीं शपथविधि झाला. इतर संस्थानांत संघराज्यविरोधी आणि विलिनीकरणाच्या बाजूने मतप्रचार चालू असतांना, कोल्हापुरांत जबाबदार राज्यपद्धतीचा कारभार चालू झाला. भाई माधवराव बागल हे जातीनें मंत्रिमंडळांत नसले तरी तेच राज्यकारभारचे खरे सूत्रधार होते. कोल्हापूरच्या महाराजांचे आताचे सल्लागार व पहिल्या काँग्रेस मंत्रिमंडळांतील अर्थमंत्री श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांनी एका मुलाखतींत विलिनीकरणासंबंधाने फार महत्त्वाचे उद्गार जानेवारी १९४८ च्या पहिल्या आठवड्यांत काढले. ते म्हणाले :

विलिनीकरणाच्या सार्वमताबद्दल मतभिन्नता

"हिंदी संघराज्याचा कोल्हापूर हा पुरेसा मोठा घटक असल्याने तो स्वतंत्रपणें राहूं शकतो. कोल्हापूरच्या गादीबद्दल जनतेत विशेष प्रेम व जिव्हाळा असल्यामुळे येथे सार्वमत घेतलें गेल्यास, तें विलिनीकरणाच्या बाजूने पडणार नाही. भाषावार प्रांतरचनेच्या वेळींहि कोल्हापूरवर विशेष परिणाम होणार नाही; याचें कारण कोल्हापूरची बहुतेक सर्व जनता मराठी भाषिक आहे."

पण कोल्हापूरच्या सार्वमताबद्दल श्री. लठ्ठे यांनी दिलेला दिलासा श्री. रत्नाप्पा कुंभार यांना मुळीच मान्य नव्हता. ते म्हणाले :

"सर्वच संस्थानें विलीन व्हावयास पाहिजेत. कोल्हापूरसुद्धा विलीन होणें जरूर आहे. पण अशी भाषा निघाल्यास, कोल्हापुरांत जातीय दंगा होईल असे बागल बंधु म्हणतात. जातीय दंगलीची कल्पना, तसा लढा करणारांच्या डोक्यांतून निघाली आहे. प्रजेला विलिनीकरणच पाहिजे आहे."

कोल्हापूर प्रजापरिषदेच्या भाई बागलांचें वर्चस्व असलेल्या कार्यकारी मंडळाच्या ता. २३–२–४८ रोजीं भरलेल्या बैठकींत कोल्हापूरचें विलिनीकरण होऊं नये असा ठराव पास झाला असल्यास त्यांत आश्चर्य नाही.

कोल्हापूर परिषदेच्या मध्यवर्ती समितीची ता. ९–३–४८ रोजीं सभा होऊन भाई बागलांच्यावर अविश्वासाचा ठराव पास करण्यांत आला, व त्यांच्या जागीं तात्पुरते कार्याध्यक्ष म्हणून श्री. रत्नाप्पा कुंभार यांची नियक्ति झाली. ता. ९–३–४८ रोजीं परिषदेचें खास अधिवेशन श्री. शंकरराव

मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पन्हाळा येथें झाल्यावेळीं भाई बागलांच्यावरील विश्वासाचा व विलिनीकरणास विरोध करणारा असे दोन ठराव पास झाले. पन्हाळा अधिवेशनापासून परिषदेंत दोन मोठे गट पडले. दुसऱ्या गटाचे प्रमुख श्री. रत्नाप्पा कुंभार यांनी संस्थानभर सभा घेऊन विलिनीकरणाचा प्रचार केला.

बागलांचें अकांडतांडव

महात्मा गांधींच्या वधानंतर जे अत्याचार कोल्हापूर संस्थानांत झाले, त्याच्याबद्दल खूप तक्रारी मध्यवर्ती सरकारकडे गेल्याने संस्थान खात्यास त्यांची दखल घेणें भागच होतें. संस्थान खात्याचे सचिव कै. श्री. व्ही. पी. मेनन हे १९४८ मार्चच्या दुसऱ्या आठवड्यांत कोल्हापुरास आल्यावेळीं त्यांनी सर्व चौकशी करून बागल मंत्रिमंडळ बडतर्फ करण्यांत येईल आणि प्रशासक नेमला जाईल असें जाहीर केलें. या निर्णयाविरुद्ध परिषदेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी पं. नेहरू, सरदार पटेल आदि काँग्रेस श्रेष्ठींना निषेधाच्या तारा पाठवून सरकारचा वरील निर्णय हा लोकशाहीविरोधी आणि बेसनदशीर असल्याचें कळविलें. याबद्दल काढलेल्या ता. १९-३-४८च्या पत्रकांत ते म्हणतात,

"मंत्री वाईट निघाले तर त्यांना काढून टाकण्याचा अधिकार प्रजेला आहे. हा अधिकार जर कोणीं काढून घेतला, तर प्रतिकार करूं. कोल्हापूर मुंबई प्रांतांत सामील होतां कामा नये. हिंद राज्याचा तें स्वतंत्र घटक राहील व तसा तो ठेवण्याचा आमचा अढळ निश्चय आहे."

मंत्रिमंडळाच्या बडतर्फीची वाट न पाहतां, परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार मंत्र्यांनी आपले राजिनामे सादर केले.

प्रशासक लादला

भाई बागलांच्या वरील धमकावणीचा मुळीच उपयोग झाला नाही. हिंद सरकारने कॅ. व्ही. नंजाप्पा यांची कोल्हापूरचे प्रशासक म्हणून नेमणूक केली, आणि त्यांच्याकडे सोपीव खात्याचा कारभार सोपविला. महाराजांच्या राखीव खात्यांचा कारभार रावब. सुर्वे पाहात होते. कॅ. नंजाप्पा ता. २२-३-४८ रोजीं कोल्हापुरास गेल्यावेळीं परिषदेच्या आदेशानुसार हरताळ पाळण्यांत आला. ता. २३-३-१९४८ पासून त्यांनी आपल्या हातीं कारभार घेतला आणि थोड्याच अवधींत त्यांनी संस्थानांत शांतता प्रस्थापित करून दहशतवादाचें उच्चाटन केलें. प्रशासकाच्या नेमणुकीबाबत छत्रपतींचे राजकीय सल्लागार श्री. लठ्ठे म्हणतात :

‘मंत्रिमंडळ दोषी’ इति लठ्ठे

“गांधीवधानंतरच्या परिस्थितीचा बागल मंत्रिमंडळाने गैर रीतीने फायदा करून घेतला. या मंत्रिमंडळाविरुद्ध बऱ्याच तक्रारी होत्या म्हणून महाराजांनी आपण होऊन कांही करावें अशी सरकारची इच्छा होती. त्या दृष्टीने महाराजांनीं पावलें टाकतांच परिषदेने ‘महाराजांना सत्तेचा लोभ सुटत नाही व दंगल परिस्थितीचा फायदा घेऊन ते मंत्रिमंडळ बरखास्त करीत आहेत’ अशी ओरड सुरू केली. म्हणून महाराजांनी, हा आरोप टाळण्यासाठी, सर्व गोष्टी सरकारकडे सोपविल्या व त्यामुळे प्रशासक आला.”

कॅ. नंजाप्पांनी कोल्हापूरचा कारभार हातीं घेतल्याबरोबर कोल्हापूरचें अप्रत्यक्ष विलिनीकरण झालें असें म्हणण्यास हरकत नाही. भाई बागलांनी या घटनेविरुद्ध प्रथम सत्याग्रहाची आरोळी ठोकली, पण शेवटीं त्यांना आपला बेत बदलावा लागला. कॅ. नंजाप्पांनी दंगलीमध्ये भाग घेणाऱ्यांना मोठ्या प्रमाणांत अटक केली, त्यांत दोन मंत्री होते. भाई बागलांनाहि सुरक्षा कायद्याखाली दोन महिने बंदिवासांत टाकण्यांत आलें. मंत्रिमंडळाच्या कृत्याची चौकशी करण्यासाठी न्या. कोयाजी यांचें कमिशन नेमण्यांत आलें.

दंगलीमागे बागलांचा हात

या कोयाजी कमिशनचें काम ता. १७-६-४८ ते ७-९-४८ पर्यंत गुप्त रीतीने चाललें. या कमिशनने सात मंत्र्यांपैकी दरबारनियुक्त तीन मंत्री (श्री. सर्जेराव माने, बॅ. माने, श्री. जाधव) यांना दोषमुक्त केलें, पण परिषदनियुक्त चार मंत्र्यांनी ‘दंगलीला प्रोत्साहन देऊन गुंडांच्या गुन्ह्याकडे बुद्धिपुरस्सर कानाडोळा केला’ असें म्हणून त्यांना दोषी ठरविलें. भाई बागलांनी ब्राह्मणविरोधी भावना भडकावल्यामुळे गांधीवधानंतरच्या दंगलींत फक्त ब्राह्मणांची हानि झाली.

भाई माधवराव बागल हे केव्हा तरी सार्वमताशिवाय विलिनीकरण होता कामा नये असें म्हणत, पण त्यांत आतां जीव राहिला नव्हता. त्यांना स्वतः लढा करण्याची हिंमत नसावी व श्री. रत्नाप्पा कुंभारासारखा संघटक त्यांच्या समवेत नव्हता. ता. ५-१-१९४९ रोजीं घटना परिषदेंत बोलतांना संस्थानी खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलें की, “ज्या संस्थानांत एका गटाकडून मोठ्या प्रमाणावर हिंसक कृत्यें घडून येण्याने सर्वसाधारण जनतेला दहशतवादाची भीति आहे अशा ठिकाणीं सार्वमत घेणें सुलभ नाही.”

विलिनीकरणास महाराजांची संमति

कोल्हापूरच्या विलिनीकरणाबाबत संस्थानी प्रजेकडून संस्थान खात्याकडे सारखी मागणी येत होती, आणि या मागणीच्या निर्णयार्थ सार्वमत घेण्याची सूचना केली जात होती. पण असें सार्वमत घेतल्यास प्रादेशिक वाद निर्माण होईल अशी भीति वाटत होती. महाराजांच्या संमतीने या प्रश्नाचा निकाल करावा असें संस्थान खात्याने ठरविलें. मेनन यासंबंधी आपल्या पुस्तकांत म्हणतात :—

"The unique position of Kolhapur and the possibility that any precipitate action would give rise to a regional controversy decided against the idea of a plebiscite. We felt also that without the free consent of the Maharajah no merger could take place."

फेब्रुवारी १९४९ मध्ये महाराजांच्या बरोबर ज्या वाटाघाटी झाल्या त्यांत त्यांनी विलिनीकरणास संमति दिली आणि त्यांना दहा लाख रुपये खासगी खर्चासाठी देण्याचें सरकारने मान्य केलें. श्री. शहाजीराजांच्या दत्तकाबाबत एक अर्ज सरकारकडे आला होता व त्याची माहिती महाराजांना असल्याने, त्यांनी विलिनीकरणास संमति दिली असावी. (The fear that his title to the *gadi* might be questioned may have hastened his decision). अशा रीतीने कोल्हापूरच्या छत्रपतींनी आपल्या प्रजापरिषदेस डावलून विलिनीकरणास संमति दिली व प्रजेच्या संमतीची वाट न पाहतां संस्थान खात्याने कोल्हापूरचें मुंबई प्रांतांत विलिनीकरण करणाचें ठरविले. ता. १ मार्च १९४९ रोजीं प्रत्यक्ष विलिनीकरण करण्याचा समारंभ मुंबई प्रांताचे मुख्य मंत्री कै. श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळीं बोलतांना "छत्रपतींनी विलिनीकरणास संमति दिल्यावर सार्वमत घेण्याची आवश्यकता राहिली नाही. जनता केव्हाहि लोकशाहीविरोधी असूं शकत नाही; आणि मग सार्वमत कां घ्यावयास पाहिजे" अशा गोड शब्दांत श्री. खेर यांनी सार्वमतवाल्यांची बोळवण केली.

कोल्हापूरच्या विलिनीकरणाने दक्षिणी संस्थानांचें संपूर्ण विलिनीकरण झालें.

◆ ◆ ◆

६

विलिनीकरणाची फलश्रुति

विलिनीकरणाचा जाळपोळीशीं संबंध नाही

ता. ८ मार्च १९४८ रोजीं दक्षिण महाराष्ट्रांतील सतरा संस्थानांचें व ता. १ मार्च १९४९ रोजीं कोल्हापूर संस्थानचें मुंबई प्रांतांत विलिनीकरण होऊन मुंबई प्रांताचे मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या मंत्रिमंडळाची राजवट त्या त्या तारखांपासून दक्षिणी संस्थानांत सुरू झाली.

ता. ३० जानेवारी १९४८ रोजीं महात्मा गांधींचा खून झाल्यावर संस्थानी मुलखांत जी दंगल माजली, तीमुळे संस्थानांचें विलिनीकरण झालें असा जो समज झालेला आहे तो चुकीचा आणि घडलेल्या घटनांच्या विरुद्ध निर्वाळा देणारा आहे. जी जाळपोळ दक्षिणी संस्थानांतून झाली, ती अपवादात्मक नव्हती. पुणें, सातारा वगैरे संस्थानी मुलूख नसलेल्या खालसांतील ठिकाणींहि गुंडांनी ब्राह्मणांच्या घरांची जाळपोळ करून मालमत्तेची लुटालूट केली व त्यामुळे तेथील राज्यकारभारहि एक आठवडाभर गोंधळाचाच झाला होता. म्हणून कांही पुणें-सातारा जिल्ह्यांचा कारभार प्रांतिक सरकारकडून काढून घेऊन मध्यवर्ती सरकारने आपल्या हातीं घेतला नव्हता ! त्याचप्रमाणे संस्थानांतील निरनिराळ्या गावीं गांधीवधोत्तर उठलेल्या वावटळीमुळे जी गुंडगिरी माजली, त्यामुळे प्रांतिक सरकारने आपल्या हातीं तेथील कारभार घेतला असें म्हणणेंहि बरोबर ठरणार नाही. दंगल शमविण्यासाठी शेजारील जिल्ह्यांतील पोलिसांची अगर लष्कराची कुमक मागविली जाते, त्याचप्रमाणे संस्थानग्रस्त दंगल भागांत शांतता राखण्यासाठी मुंबई सरकारची मदत मागण्यांत आली व ती दिली गेली. याचा अर्थ असें नव्हे कीं, गांधीवधाने द. महाराष्ट्रांतील संस्थानांचें विलिनीकरण झालें. विलिनीकरणासंबंधांत प्रजेची व राजांची तयारी नसती तर, दंगल ओसरल्यावर व शांतता प्रस्थापित झाल्यावर, परत या सर्व भागांत संस्थानी राजवट सुरू झाली असती. महात्माजींचा खून व्हावयाच्या अगोदर चार दिवस संघराज्य घटना समितींत कायदेशीर दृष्टया या संस्थानांच्या विलिनीकरणाचा ठराव राजे व प्रजा यांच्या संमतीने पास

झाला होता. वास्तविक पाहतां महात्माजींचा खून होण्यापूर्वी अगोदर सव्वा महिना द. सं. संघराज्य घटना समितीने आणि राजमंडळाने विलिनीकरणाचा निर्णय घेतलेलाच होता. हा इतिहास लक्षांत घेतां, गांधीवधोत्तर झालेली दंगल आणि विलिनीकरण या घटनांचा समन्वय बसूं शकत नाही हें कोणाच्याहि लक्षांत येईल. गांधीवधोत्तर ज्या दंगली झाल्या, त्या झाल्या नसत्या तरी या संस्थानांचें विलिनीकरण अटळच होतें आणि तें घडूनहि पण आलें असतें. विलिनीकरणाबाबतची राजे व प्रजा यांची झालेली तयारी पाहिल्यावर हिंद सरकारच्या संस्थान खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्याबद्दलची योग्य ती कारवाई करण्यास वेळ लावला असता असेंहि मानण्याचें कारण नाही. गांधीवध झाल्यामुळे जी अस्थिर परिस्थिति निर्माण झाली, त्यामुळे विलिनीकरणास थोडा जास्तच काळ लागला असें म्हणावयास हरकत नाही. तसें नसतें तर यापेक्षा थोड्याच काळांत दक्षिणी संस्थानांचें विलिनीकरण झालें असतें.

संस्थानी मंत्रिमंडळावर नालायकीचा अकारण आरोप

गांधीवधानंतर भोर, सांगली, मिरज, मिरजमळा, कुरुंदवाड वगैरे संस्थानांतून जी दंगल माजली, तिचा बंदोबस्त करण्याच्या कामीं स्थानिक पोलिस खातें व मंत्रिमंडळें आणि अधिकारी अपुरे पडले, आणि त्यामुळे त्यांच्यावर जो नालायकीचा शिक्का मारला गेला, तो बरोबर नाही. खालसांतील पुणें–सातारचे जिल्हाधिकारी जर कार्यक्षम होते, तर तेथे तरी दंगे कां झाले आणि त्यांना लष्कराची मदत कां बोलवावी लागली ? लष्करी मदत बोलावल्याने हे अधिकारी जर अकार्यक्षम ठरत नाहीत, तर संस्थानांतील मंत्रिमंडळें तरी कां ठरावींत ? संस्थानी कारभाराकडे पाहण्याचा जो सामान्य जनतेचा दृष्टिकोण होता, त्यामुळे संस्थानी मंत्रिमंडळांवर नालायकीची टीका झाली. पण हा दोषारोप बरोबर आहे असें वाटत नाही.

कोल्हापुरावर विलिनीकरणाची सक्ति

गांधीवधोत्तर संस्थानांत जी दंगल झाली, त्यामुळे संस्थानांचें विलिनीकरण झालें असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून कसें आहे, तें कोल्हापूरच्या उदाहरणावरून सहजीं दिसणार आहे. सांगली, भोर, मिरज या संस्थानांप्रमाणें कोल्हापूर संस्थानांत लोकांचें मंत्रिमंडळ राज्यकारभार चालवीत होतें आणि तेथेंहि ब्राह्मण प्रजाजनांच्या मालमत्तेची फार मोठ्या प्रमाणांत लुटालूट करण्यांत आली. पण कोल्हापूर संस्थानचें विलिनीकरण करण्याचा प्रश्न इतर संस्थानांप्रमाणे येथे उत्पन्न झाला नाही आणि याचें कारण म्हणजे कोल्हापूर प्रजापरिषद् अगर

कोल्हापूरचे अधिपति यांनी विलिनीकरणाबाबत कोणताच ठराव केला नव्हता, हें होय, व याच कारणास्तव केंद्र सरकारने कोल्हापूरच्या विलिनीकरणाचा प्रश्न इतर संस्थानांच्याप्रमाणे उपस्थित केला नाही. कोल्हापूर संस्थानांत शांतता नांदावी व दहशतवादाचा जोर कमी व्हावा म्हणून छत्रपतींच्या विनंतीवरून सरकारने कॅ. नंजाप्पा यांची कोल्हापूरचे प्रशासक म्हणून नेमणूक केली. कोल्हापुरास झालेल्या दंगलींत बागल मंत्रिमंडळाचा हात असल्याचें न्या. कोयाजी कमिशनने म्हटल्यामुळे, आणि शिवाय मंत्रिमंडळाचा कारभार चालू असतांना, तो कलंकित असल्याचें दिसून आल्याने, सरदार वल्लभभाई पटेलांना कोल्हापूरच्या विलिनीकरणाचा विचार करणें भाग पडलें असावें. कोल्हापूरच्या विलिनीकरणाच्या कामीं कोल्हापूर प्रजापरिषदेची संमति नव्हती, उलट तिचा विरोध असल्याचें परिषदेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी जाहीर केलें होतें. छत्रपति श्री. शहाजीराजे यांच्या दत्तकाबाबत कांही कुरबूर होती. त्यामुळे त्यांनी विलिनीकरणास संमति देऊन आपल्या दत्तकाबद्दलचा समझोता संस्थान खात्याशीं केला असावा. सरदार वल्लभभाई पटेल यांनी कोल्हापूरच्या विलिनीकरणाबाबत लोकमत अजमावलें नाही. गांधीवधोत्तर दंगलीपूर्वी व नंतर, बागल मंत्रिमंडळाचा कारभार धुतल्या तांदळासारखा स्वच्छ असता, तर कोल्हापूर संस्थान विलीन झालेंच असतें असें नाही. यावरून हें दिसेल की, कोल्हापूर सोडून बाकी सतरा संस्थानें हीं राजा व प्रजा यांच्या संमतीने विलीन झालीं, तर संस्थानखात्याच्या दडपणामुळे छत्रपतींना कोल्हापूरच्या विलिनीकरणास संमति द्यावी लागली. लढ्याची भाषा सदैव बोलणारे भाई माधवराव बागल कोल्हापूरच्या विलिनीकरणाच्या वेळीं मात्र चूपचाप राहिले. कॅ. नंजाप्पांनी आपल्या हातीं कोल्हापूरचीं राज्यसूत्रें घेतल्यावर, छत्रपतींची सत्ता जवळजवळ संपुष्टांतच आली होती आणि त्यांनी इचलकरंजी जहागिरीवर प्रस्थापित केलेल्या जहागिरदारासुद्धा आपलें स्थान सोडावें लागलें.

संस्थानी नोकरांबद्दल तुच्छता

विलिनीकरणानंतरचा काळ हा सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्याकरिता गेला. जसजशी सर्वत्र स्थिरस्थावरता निर्माण झाली, तसतशी संस्थानी राज्यकारभाराची पुनर्घटना होऊं लागली. संस्थानी नोकरांचें भवितव्य काय होणार, संस्थानी शाळा मुंबई सरकार चालविणार कीं नाही, वगैरे अनेक प्रश्न उत्पन्न झाले. मुंबई प्रांतांत आजवर जी राज्यकारभाराची घडी

बसविली गेली होती, तिचा निकष संस्थानी नोकर व इतर बाबतींत लावण्यांत येऊं लागला. या निकषास संस्थानी नोकर उतरण्याची खात्री नव्हती व त्यामुळे नोकरवर्गांत घबराट उत्पन्न झाली. याशिवाय सर्वांत वाईट गोष्ट होती, ती ही की, मुंबई प्रांतांतून जे नोकर संस्थानी मुलखांत बदल्या होऊन आले, ते स्थानिक संस्थानी नोकरांकडे तुच्छतेने पाहात असत. यामुळे संस्थानी नोकर व जनता यांच्यामध्ये असंतोषाचें वातावरण निर्माण झालें. 'पदरीं पडलें आणि पवित्र झालें' या न्यायाने संस्थानी नोकर बदलत्या परिस्थितीशीं जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत असत. विशेषतः ज्यांची बरीच नोकरी होऊन गेली आहे, त्यांना नव्या परिस्थितीशीं जमवून घेणें अवघड वाटत असें. संस्थानी विद्यालयें चालविण्याच्या बाबतींतहि सरकार विशेष उत्सुक नव्हतें, त्यामुळे हीं विद्यालयें बंद पडण्याचा प्रसंग आला. अशा वेळीं स्थानिक लोकांनी आपलीं विद्यामंडळें स्थापन करून, त्यामार्फत आपलीं स्थानिक संस्थानी विद्यालयें चालविण्याची योजना केली. उदाहरणार्थ भोर, मिरज येथील विद्यालयें खाजगी शिक्षणसंस्थांच्या मार्फत चालविलीं जात आहेत. या बाबतींत वारस सरकार या नात्याने मुंबई सरकारने आपली जबाबदारी पार पाडली असें म्हणता येणार नाही.

नवीन राजवटीबद्दल असंतोष

संस्थानांचें विलिनीकरण झाल्यानंतर तीन महिन्यांनी दिलेल्या एका मुलाखतींत सांगलीचे भूतपूर्व मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब कोरे म्हणाले :

"विलीन संस्थानांत कायदा व सुव्यवस्था या खात्यांव्यतिरिक्त इतर दुसऱ्या कोणत्याहि खात्याचा कारभार समाधानकारकपणें चालू असल्याचें दिसत नाही. दंगे होण्यापूर्वीच विलिनीकरणाचा निर्णय झाला आहे. पण विलिनीकरणापासून प्रजेला कोणताहि फायदा झालेला दिसत नाही. यामुळे विलिनीकरणाचा फायदा काय ? असें लोक विचारीत आहेत. नोकरांना आपल्या भवितव्याबद्दल साशंकता वाटत असल्यानें, त्यांचें आपल्या कामांत लक्ष नाही."

श्री. कोरे यांच्या मनांतील व्यथा वरील उद्गारावरून स्पष्टपणें दिसून येत आहे. केवळ श्री. कोरे यांची अशी भावना होती, असें नव्हे तर, विलिनीकरणाचा प्रचार करणारांचीसुद्धा कमी जास्त प्रमाणांत अशीच भावना झाली होती.

संस्थानी राजवटींत कित्येक संस्थानांतून शैक्षणिक अगर वैद्यकीय बाबतींत ज्या सवलती होत्या, त्या नवीन राजवटींत नष्ट झाल्या. उदाहरणार्थ,

जमखिंडी संस्थानांतील शिक्षण खातें विद्यार्थ्यांकडून फी घेत नसे; पण नवीन राजवटींत ही सवलत रद्द झाली. मुंबई प्रांतांत फीचें जें प्रमाण होतें, तें सर्वत्र लागू करण्यांत आलें आणि त्यामुळे संस्थानांतील लोकांना शिक्षणासाठी जास्त खर्च येऊं लागला. मुंबई प्रांतांतील विविध कायदे विलीन प्रदेशांना लागू करण्यांत आले, आणि त्यामुळे करांचे नवीन बोजे प्रजेवर बसले तथापि हें होणें अपरिहार्य आहे; पण त्याबरोबर ज्या जबाबदाऱ्या आल्या, त्या पार पाडण्याबाबत विशेष जागरूकता दाखविली गेली नाही. मुंबई प्रांताच्या मानाने संस्थानी मुलूख मागासलेला अशी राज्यकर्त्यांची समजूत, पण या 'मागासलेल्या मुलखा'ची उन्नति करण्याची कोणतीहि विशेष खटपट मुंबई सरकारने केली नाही. मुंबई प्रांतांत नवीन संस्थानी मुलूख समाविष्ट झाल्यावर जिल्ह्यांची पुनर्घटना करणें भाग पडलें. भोरचा मुलूख पुणें जिल्ह्यांत गेला; औंध-फलटणचा मुलूख सातारा जिल्ह्यांत गेला; जमखिंडी विजापूर जिल्ह्यांत गेलें; रामदुर्ग जिल्ह्याचा भाग बेळगावांत गेला; सावनूर व पटवर्धनी संस्थानांचा कानडी मुलूख धारवाड जिल्ह्यांत समाविष्ट झाला; सांगली, मिरज, मिरजमळा, वाडी, यांचा स्वतंत्र जिल्हा मुख्यत्वें करून करण्यांत आला. या जिल्ह्याला सांगली नांव देणें उचित असतांना सरकारने त्याची संभावना ' दक्षिण सातारा ' या नांवाने केली. सांगली जिल्ह्याचें असें अयोग्य व वस्तुस्थितीला सोडून नामकरण केल्याने, सांगलींतील लोकांच्या भावना दुखविण्याचें कृत्य सरकारने केलें. मुंबई विधिमंडळांत कोल्हापूरचे आठ व इतर संस्थानांचे तेरा मिळून एकवीस प्रतिनिधि दक्षिणी संस्थानांच्या वाटणीस आले. लोकशाहीच्या तत्त्वानुसार या प्रतिनिधींची निवडणूक वास्तविक व्हावयास पाहिजे होती, पण तसा कांही खटाटोप न करतां प्रांतिक सरकारच्या शिफारशीनुसार हिंदुस्थान सरकारने त्यांची नेमणूक केली. मुंबई मंत्रिमंडळांत दक्षिणी संस्थानांचा एक मंत्री घेण्यांत आला आणि तो मान फलटणच्या राजेसाहेबांना मिळाला. या सर्व संस्थानांतून विलिनीकरणापूर्वी जबाबदार राज्यपद्धति चालू असतांना, संस्थानांच्या मंत्रिमंडळांपैकीं एखादा मंत्री न निवडतां एका संस्थानिकास निवडण्यांत मुंबई मंत्रिमंडळाने लोकशाहीच्या तत्त्वांची पाळवणूक केली असें म्हणणें धाष्टर्याचें ठरेल.

खेरांचें असमाधानकारक भाषण

संस्थानांतील प्रजेच्या गैरसोयी होत असल्याच्या तक्रारी मुंबई प्रांताचे मुख्य मंत्री कै. श्री. बाळासाहेब खेर यांच्याकडे गेल्या होत्या. या तक्रारींना

उद्देशून नामदारसाहेबांनी कुरुंदवाड येथे ता. ३०-१०-१९४९ रोजीं भाषण करतांना पुढील उद्गार काढले—

"Now that the merged areas have become part of the Bombay Province. People of this area should give up their narrow outlook which is found in certain quarters and develop national spirit. Merger was good not only to people in the States but to the whole country. The days of feudalism are numbered and real democracy will provide in India...... It might have caused some inconvenience to the States During the transitional stage some inconvenience and hardship, were inevitable; but the people of States have had emerged out of slavery and were now sovereign."

नामदार खेरांचे वरील उद्गार दक्षिणी संस्थानांतील प्रजेला दिलासा देणारे मुळीच नव्हते. दक्षिणी संस्थानांत गुलामगिरी नव्हती, तर जबाबदार राज्यपद्धति स्थापन झालेली होती. असें असूनहि केवळ राष्ट्रीयत्वाच्या भावनेने संस्थानी प्रजेने विलिनीकरणाची मागणी केली. सौराष्ट्रासारखें संघराज्य दक्षिणी संस्थानांत येत असतांनाहि, स्थानिक अभिनिवेश बाजूस ठेवून, विलिनीकरणाचा आग्रह धरणाऱ्या लोकांना ना. खेरांनी संकुचितपणा सोडण्याचा उपदेश करण्याची आवश्यकताच नव्हती. 'सांगली' नांवाबद्दल घृणा दाखवून मुंबई प्रांताच्या राज्यकर्त्यांनीच आपल्या संकुचित वृत्तीचें मात्र प्रदर्शन केलें होतें; आणि संस्थानांचें विलिनीकरण होऊन तब्बल दीड वर्ष झाल्यावरहि, संस्थानी प्रजेला सोसाव्या लागणाऱ्या गैरसोयी अपरिहार्य आहेत, असें म्हणणें म्हणजे आपल्या अकार्यक्षमतेवर रंगसफेती करणें होय. अशा तऱ्हेच्या भाषणाची नामदार खेरांच्याकडून लोकांची अपेक्षा नव्हती.

लोकसभेची उदासीनता

विलिनीकरणानंतरच्या काळांत संस्थानांत ज्या तक्रारी निर्माण झाल्या, जीं गाऱ्हाणीं दिसूं लागलीं तिला वाचा फोडणारी संस्था राहिला नाही. संस्थानांचें विलिनीकरण झालें आणि संस्थानी प्रजापरिषदांचें आयुष्य साहजिकच संपुष्टांत आलें. दक्षिणी संस्थान लोकसभेच्या पदाधिकाऱ्यांनी याबद्दलची आपली जबाबदारी पार पाडली नाही हें मोठ्या खेदाने म्हणावें लागतें.

प्रजेची निराशा

विलिनीकरणामुळे आपली परिस्थिति सुधारेल अशी संस्थानी प्रजेची मनोधारणा होती. संस्थानांतील लाचलुचपत, राजशाहीचा लहरीपणा, सत्ताधारी वर्गाचा जुलूम यांपासून आपली मुक्तता होईल अशी आशा संस्थानी प्रजेला होती; पण त्याहि बाबतींत निराशाच पदरीं पडली. स्वातंत्र्यानंतरच्या काळांत नोकरशाहीमध्ये लाचलुचपत बोकाळली, राजेरजवाड्यांची जागा मंत्र्यांनी घेतली आणि सत्ताधारी पक्ष आपली हुकमत सर्वत्र गाजवूं लागला. स्वातंत्र्यानंतरच्या काळांत निरनिराळ्या विकास योजना केल्या गेल्या, पण त्यांचा विशेष फायदा संस्थानांसारख्या 'मागासलेल्या' मुलखाला मिळालेला दिसत नाही. संस्थानी मुलखांतील उद्योगधंदे वाढण्यास विशेष मदत झाली आहे असेंहि पण नाही. महात्मा गांधी व पं. जवाहरलाल नेहरू यांनी ज्या औंध संस्थानांतील ग्रामपंचायतीवर अधिष्ठित असलेल्या राज्यघटनेची स्तुति केली आणि ज्याची अंमलबजावणी यशस्वी झाली होती, त्या राज्यघटनेची भारताच्या स्वातंत्र्ययुगांत शोकांतिका झाली.

आपण होऊन आपल्या संस्थानचें विलिनीकरण करा असें म्हणणारे जमखिंडीचे अधिपति कै. श्री. परशुरामराव पटवर्धन यांना विलिनीकरणाच्या यशस्वितेबद्दल विचारतां, त्यांनी दिलेलें उत्तर मोठें उद्बोधक आहे. ते म्हणतात :

"विलिनीकरण झालें हें योग्यच झालें. स्वतंत्र भारत एकजिनसी व्हावा असें कोणाहि सुज्ञ भारतीयाप्रमाणे कांही संस्थानिकांना वाटलें व म्हणूनच बरींचशीं संस्थानें विलीन होऊं शकलीं. पण या विलिनीकरणामुळे नफा झाला कीं तोटा झाला याचा विचार करतां व आजची परिस्थिति लक्षांत घेतां, जनतेचा विशेष फायदा झाला आहे असें मला वाटत नाही. उलट त्यांना ज्या थोड्या सवलती मिळत होत्या त्या गेल्या व कराचा भार मात्र वाढला आहे. 'फायदे नष्ट झाले व तोटे पदरीं आले' अशी दक्षिणेंतील विलीन संस्थानी प्रजेची मनस्थिति असावी असें मला वाटतें. संस्थानिकांना विलिनीकरण फायद्याचें झालें कीं तोट्याचें झालें तें मला सांगतां येत नाही, पण माझ्या तरी तें फायद्याचेंच झालें आहे. विलिनीकरणाऐवजी कोल्हापूर गटांत अगर सांगली गटांत मला पडावें लागलें असतें तें वांचलें."

विलिनीकरणानंतरच्या प्रथमच्या काळांत जरी संस्थानी प्रजेमध्ये नैराश्याचें व उदासीनतेचें वातावरण पसरलें होतें, तरी आस्ते आस्ते ती भावना नष्ट होत चालली आहे. ज्या मोठमोठ्या योजना आज राज्य सरकारें हातीं घेत

आहेत, तशा तऱ्हेच्या प्रकल्पांचा विचार करणें हें सुद्धा संघराज्यांना अगर संस्थानांना शक्य झालें नसतें. राष्ट्रजीवनाच्या विविध प्रांगणांत आज जो कोणाहि व्यक्तीस भाग घेता येत आहे, तो संस्थानांच्या संकुचित वातावरणांत वाढलेल्या व्यक्तीस घेता आला असता काय याबद्दल शंकाच आहे. विनामूल्य शिक्षणाच्या ज्या सोयी होत आहेत, त्या संस्थानांना करता आल्या नसत्या. तेव्हा राष्ट्राच्या दृष्टीने व्यापक विचार करतां, संस्थानांचें झालेलें विलिनीकरण हें योग्य मार्गावर पडलेलें पाऊल आहे, याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाही.

संस्थानिकांना स्वास्थ्य

संस्थानिकांना खाजगी खर्चाची रक्कम चांगल्या प्रमाणांत मिळाल्याने त्यांची गैरसोय झाली नाही. त्यांचे मानमरातबहि सरकारने राखले आहेत. औंधचे राजकुमार बॅ. आप्पासाहेब पंत यांना पं. नेहरू यांनी परराष्ट्रीय वकील म्हणून अनेक ठिकाणीं पाठविलें आणि त्यांनी सर्व ठिकाणीं चांगला लौकिक मिळविला. फलटणच्या अधिपतींनी काँग्रेस पक्षांत सामील होऊन प्रथम मंत्रिपद आणि नंतर आमदारकी मिळविली. जतच्या अधिपतींनी प्रथम स्वतंत्र आणि नंतर काँग्रेसपक्षीय होऊन खासदारकी मिळविली. सांगलीच्या माजी राजेसाहेबांनी आपला अभिजात खानदानीपणा टिकवून आणि संस्थानी मुलखांतील कोणत्याहि कार्यास सक्रिय मदत करून प्रजेचा संतोष मिळविला. इतर संस्थानिकांचें आयुष्य हें सुखवस्तुपणाचें केवळ झालें.

संस्थानी चळवळींत महाराष्ट्रीय राजे व प्रजा आघाडीवर

संस्थानांतील राजकीय चळवळ ही केवळ २८ वर्षांची (१९२१–४८). संस्थानी राजकारणाचा जन्म दक्षिणी संस्थानांकरिता पुण्यांत झाला आणि दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा १९२१ मध्ये स्थापन करण्यांत आली. कै. तात्यासाहेब केळकर, वामनराव पटवर्धन व प्रा. ग. र. अभ्यंकर यांनी संस्थानी चळवळीची मशागत केली. द. सं. हितवर्धक सभेच्या कार्यालयांतच अखिल भारतीय संस्थानी लोकपरिषद् स्थापण्याची वाटाघाट होऊन श्री. मणिशंकर त्रिवेदी, बळवंतराव मेथा, रंगीलदास कपाडिया, जयनारायण व्यास यांच्या सहकार्याने अखिल भारतीय संस्थान लोकपरिषद् स्थापन होऊन पुढे तिची निरनिराळ्या ठिकाणीं अधिवेशनें झालीं. छोट्या संस्थानांचें संघराज्य करण्याची खटपट पं. सातवळेकर, साबडे वगैरे पुढाऱ्यांनी प्रथम केली.

सरदार वल्लभभाई पटेल यांनी ही कल्पना उचलून धरून भारत स्वतंत्र झाल्यावर सलग संस्थानी भागांत—सौराष्ट्र, राजपुताना, मत्स्य, विंध्याचल वगैरे भागांत—संघराज्यें निर्माण केलीं आणि तीं भाषावार प्रांतरचना होईपर्यंत म्हणजे १९५६ पर्यंत चालू होतीं. दक्षिण महाराष्ट्रांत मात्र संघराज्य स्थापन होऊं शकलें नाही. भारत स्वतंत्र होणार असें दिसल्याबरोबर दक्षिणी संस्थानांतील प्रजाजनांनी विलिनीकरणाचा झेंडा फडकाविण्याचा पहिला मान मिळविला, आणि याच भूमींत जमखिंडीचा एक राजा असा निघाला की, ज्याने आपण होऊन विलिनीकरणाची मागणी मध्यवर्ती सरकारच्या संस्थान खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे केली. राजा व प्रजा यांच्या समायिक मागणीने भारतांतील दक्षिणी संस्थानें फक्त विलीन झालीं आहेत. इतरत्र संस्थानांचें विलिनीकरण करतांना, ते केवळ संस्थानिकांची संमति घेऊन करण्यांत आलें. संस्थानिकांची संमति नसेल, तर मात्र प्रजेच्या मताचा हक्क निर्माण करण्यांत आला. याचा अनुभव जुनागडांत पाहावयास मिळतो. जुनागडचे अधिपति हिंद संघराज्याविरुद्ध असल्याने तेथे फक्त सार्वमत घेण्यांत आलें. बाकी इतर कोणत्याहि संस्थानांत विलिनीकरणाबाबत अगर संघराज्याबाबत संस्थान खात्याकडून सार्वमत घेण्यांत आलें नाही. संस्थानिकांच्याच केवळ अनुमतीने सरदार पटेलांनी संस्थानांचें विलिनीकरण केलें अगर संघराज्य बनविलें. संस्थानें नष्ट न करण्याचें काँग्रेसचें ध्येय होतें, पण संस्थानांचें विलिनीकरण करतांना, संस्थान खात्याला या ध्येयाचा विसर पडला असावा. एकसंध भारत करण्यासाठी पडलेला हा विसर क्षम्य ठरण्याजोगा आहे. त्याचबरोबर देशाचा व्यापक दृष्ट्या विचार करून विलिनीकरणाचा प्रश्न प्रथम उपस्थित करण्याचें श्रेय दक्षिणी संस्थानांतील प्रजापुढाऱ्यांना व राजेरजवाड्यांना आहे हें दृष्टिआड करणें अराष्ट्रीयत्वाचें ठरेल.

* * *

परिशिष्ट १

दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें

दक्षिण महाराष्ट्रांतील भूभागांत सतरा संस्थानें व एक जहागिर होती. हीं संस्थानें पूर्वीच्या मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या जिल्ह्यांत विखुरलेलीं होतीं. या संस्थानांची लोकसंख्या, उत्पन्न, क्षेत्रफळ व असलेलीं खेडीं यांची आकडेवारी खाली दिली आहे :—

संस्थानचें नांव	लोकसंख्या	क्षेत्रफळ चौ. मैल	उत्पन्न	खेड्यांची संख्या
१ कोल्हापूर	१०,९२,०४६	३२१७	५९,९३,५७८	१०५७
२ अक्कलकोट	१,०३,९०३	४७०	६,८५,१४५	१०७
३ औंध	८८,७२३	५०१	३,२२,०००	७३
४ भोर	१,५५,९६१	९१०	८,८३,६३८	४८०
५ जमखिंडी	१,२६,२७२	५२४	८,४८,०००	७९
६ जंजिरा	१,०३,५५७	३७९	८,०६,०००	३२५
जत	१,०७,०३६	९८०	३,४८,७४४	११९
८ कुरुंदवाड (थोरली पाती)	५५,५५२	१८२	२,३४,१२८	६१
९ कुरुंदवाड (धाकटी पाती)	४६,६०९	११६	२,४३,६९६	३७
१० मिरज	१,०८,५४७	३४२	६,३१,०००	६४
११ मिरजमळा (मिरज धा. पाती)	४६,२३५	१९६	३,२८,३९०	३६
१२ मुधोळ	७२,४४७	३६८	४,६४,३३६	८१
१३ फलटण	७१,४७३	३९७	१५,१४,०००	७३
१४ रामदुर्ग	४०,११४	१६९	१,७९,९७४	४०
१५ सांगली	२,९३,३८१	११३६	१६,८०,२४४	२८५
१६ सावनूर	२२,४४०	७३	१,५८,९९१	३८
१७ सावंतवाडी	२,५२,०५०	९३०	६,४०,०००	२२५
१८ वाडी (जहागिर)	२०२२	१२	९०००	२
	२७,८५,४२८	१०,९०२	१,६०,५१०६८	३,१८२

संस्थानें विलीन होण्यापूर्वी दक्षिणी संस्थानांच्या रेसिडेंटच्या हुकमतीखाली वरील संस्थानें होतीं. संस्थानें विलीन झाल्यावर तीं नजिकच्या जिल्ह्यांत समाविष्ट करण्यांत आलीं. कोल्हापूरचा स्वतंत्र जिल्हा करण्यांत आला; अक्कलकोट सोलापूर जिल्ह्यांत गेलें; औंध व फलटणचा समावेश सातारा जिल्ह्यांत झाला; भोर पुणे जिल्ह्यांत, जमखिंडी व मुधोळ विजापूर जिल्ह्यांत, आणि जंजिरा कुलाबा जिल्ह्यांत गेलें. जत, मिरज, मिरजमळा (बुधगाव), सांगली व वाडी यांचा द. सातारा जिल्हा झाला; कुरुंदवाड (थोरली पाती) कोल्हापूर जिल्ह्यांत समाविष्ट झालें; कुरुंदवाड (धाकटी पाती) व रामदुर्ग बेळगाव जिल्ह्यांत घालण्यांत आलें. सावनूर धारवाड जिल्ह्यांत जाऊन सावंतवाडी रत्नागिरी जिल्ह्यांत समाविष्ट झालें.

या संस्थानांपैकी कोल्हापूर, अक्कलकोट, जंजिरा, जत, मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सावनूर व सावंतवाडी या संस्थानांचा मुलूख सलग होता. बाकी राहिलेल्या औंध, भोर, जमखिंडी, कुरुंदवाड (थोरली व धाकटी पाती), मिरज (थोरली व धाकटी पाती), व सांगली या संस्थानांचा मुलूख विखुरलेला होता; त्यामुळे त्यांना सलग मुलखी संस्थानांपेक्षा जास्त खर्च येत असे. वरील संस्थानांपैकी जमखिंडी, मुधोळ, रामदुर्ग, सावनूर हीं चार संस्थानें कर्नाटकांत व कानडी भाषिक होतीं; सांगली, मिरज (थोरली व धाकटी पाती), कुरुंदवाड (थोरली व धाकटी पाती) या संस्थानांचा मुलूख महाराष्ट्र व कर्नाटकामध्ये होता; व त्यांत मराठी व कानडी भाषिक प्रजा होती. भाषावार प्रांतरचना झाल्यावर दक्षिण महाराष्ट्रांतील कानडी भाषिक संस्थानें अगर त्यांचा मुलूख कर्नाटकांत गेला. जमखिंडी, मुधोळ, रामदुर्ग व सावनूर हीं संस्थानें सर्वस्वी कर्नाटकांत गेलीं, तर मिश्र भाषिक संस्थानांतील कानडी भूप्रदेश कर्नाटकांत घालण्यांत आला.

अखिल भारतीय संस्थानी लोकपरिषदेच्या लुधियाना ठरावाप्रमाणे ५० लक्ष उत्पन्न व २० लाख लोकसंख्या असलेलीं संस्थानें स्वतंत्र घटक म्हणून राहण्याच्या लायकीचीं होतीं. या कसोटीस फक्त कोल्हापूर उतरत होतें. या कसोटीस न उतरणाऱ्या छोट्या संस्थानांचीं संघराज्यें करावींत, अशी लोकपरिषदेची सूचना होती. म्हणून दक्षिणेंतील संस्थानी कार्यकर्त्यांनी कोल्हापूर वगळूनसुद्धा इतर संस्थानांचें संघराज्य होण्याची खटपट केली. या संघराज्याबाबत एक मोठा दोष होता व तो म्हणजे संस्थानांचा मुलूख सलग नव्हता. मध्ये मध्ये खालसा मुलखाचा भाग होता.

• • •

परिशिष्ट २

संस्थानी प्रजापरिषदांचा आढावा

दक्षिण महाराष्ट्रांतील भूभागांत जीं अठरा संस्थानें होतीं, तेथील किती संस्थानांतून प्रजापरिषदा स्थापन होऊन, लोकजागृतीचें कार्य झालें तें पाहणें बोधप्रद ठरणार आहे. संस्थानी चळवळीचा काळ म्हणजे १९२१–१९४८ हा २८ वर्षांचा. १९२१ मध्ये संस्थानी चळवळ सुरू झाली तेव्हापासून तों संस्थानांचें विलिनीकरण होईपर्यंत म्हणजे १९४८ पर्यंत प्रजापरिषदांचीं जीं अधिवेशनें भरलीं, त्यांचा तपशील पुढे दिला आहे.

दक्षिण संस्थान प्रजापरिषद्:—

१९२१ ते १९३८ पर्यंत बारा अधिवेशनें झालीं. १९४५ मध्ये भरलेलें १४ वें अधिवेशन हें शेवटचें होय.

सांगली : १९४० मध्ये पंधरावें, १९४७ मध्ये २० वें (शेवटचें)

कोल्हापूर : १९३९ मध्ये पहिलें व १९४८ मध्ये चवथें (शेवटचें)

अक्कलकोट : १९२९ मध्ये तिसरें व १९४६ मध्ये चवथें (शेवटचें)

जत : १९३८ मध्ये पहिलें व १९४६ मध्ये दुसरें (शेवटचें)

मुधोळ : १९४० मध्ये पहिलें व १९४६ मध्ये दुसरें (शेवटचें).

सावंतवाडी : १९२८ मध्ये पहिलें व १९४८ मध्ये चवथें (शेवटचें).

जंजिरा : १९२८ मध्ये तिसरें व १९४७ मध्ये पांचवें (शेवटचें).

औंध : १९३७ मध्ये चवथें (शेवटचें).

भोर : १९४० मध्ये तेरावें व १९४७ मध्ये सोळावें (शेवटचें).

जमखिंडी : १९४० मध्ये आठवें व १९४७ मध्ये बारावें (शेवटचें).

कुरुंदवाड : १९३९ मध्ये तिसरें व १९४६ मध्ये चवथें (शेवटचें).

कुरुंदवाड (धाकटी पाती) : परिषद् १९४७ मध्ये स्थापन झाली. व ठिकठिकाणीं सभा घेतल्या गेल्या.

मिरज : १९४० मध्ये सातवें व १९४६ मध्ये दहावें (शेवटचें)

मिरजमळा : १९४५ मध्ये पहिलें व १९४६ मध्ये दुसरें (शेवटचें)

फलटण : १९४५ मध्ये पहिलें (शेवटचें)

रामदुर्ग : १९४८ मध्ये पहिलें (शेवटचें)

दक्षिण महाराष्ट्रांतील अठरा संस्थानांपैकी पंधरा संस्थानांत प्रजापरिषदेचें किमान एक तरी अधिवेशन झालें. कुरुंदवाड (धाकटी पाती), सावनूर आणि वाडी जहागिर यांमध्ये एकहि परिषद् भरली नाही. इतर संस्थानांतून प्रजा-परिषदा स्थापन होऊन लोकजागृतीचें कार्य कमीजास्त प्रमाणांत झालें. सांगली संस्थानांत सर्वांत जास्त म्हणजे वीस अधिवेशनें झालीं. त्या खालो-खाल भोरचा क्रमांक लागतो. भोरांत १६ अधिवेशन झालीं. नंतर जमखिंडी १२, मिरज १०, जंजिरा ५, कोल्हापूर, सावंतवाडी, अक्कलकोट, औंध व कुरुंदवाड प्रत्येकी ४, जत, मुधोळ व मिरजमळा प्रत्येकी २ आणि फलटण व रामदुर्ग प्रत्येकी १.

औंध संस्थानांत १९३९ मध्ये संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन झाल्यामुळे व प्रातिनिधिक सभेच्या बैठकी वेळेवर होत असल्याने, तेथे प्रजा-परिषदेचीं अधिवेशनें भरविण्याची आवश्यकताच भासली नसावी.

संस्थानांत भरलेल्या अधिवेशनांच्या संख्येवरून, त्या त्या संस्थानांत लोकजागृति किती झाली, याचें स्थूल गमक अजमावता येईल. सांगली, भोर, जमखिंडी या संस्थानांतून लोकजागृतीचें काम विशेष सातत्याने झालें, असें म्हणावयास हरकत नाही. मिरज, जंजिरा व कोल्हापूर या संस्थानांतून विशिष्ट काळांत विशेष कार्य झालें. इतर संस्थानांतून प्रजापरिषदांचें काम वाढीस लागलें नाही, त्याचें कारण तेथील जनतेला आपल्या हक्कांची विशेष जाणीव झालेली नसावी.

● ● ●

परिशिष्ट ३

विलिनीकरणाचा करारनामा

कोल्हापूरव्यतिरिक्त सतरा संस्थानिकांशीं जो करारनामा भारत सरकारने केला, त्याचा आशय पुढीलप्रमाणे आहे.

१. संस्थान व जनता यांच्या हिताच्या दृष्टीने संस्थानचा कारभार मुंबई प्रांताच्या कारभारांत समाविष्ट करणें इष्ट असल्यामुळे हा विलिनीकरण–करार करण्यांत येत आहे.

२. संस्थानांतील न्यायदान व इतर सर्व कारभार यांविषयीचे संपूर्ण अधिकार हिंदुस्थान सरकारकडे सोपविण्यांत येत आहेत. हिंदुस्थान सरकारने आता कारभार योग्य वाटेल त्या पद्धतीने चालवावा.

३. संस्थानिक व त्यांचें कुटुंब यांचा खाजगी खर्च व त्यांचा खाजगी नोकरवर्ग, निवासस्थानें, लग्न वगैरे समारंभ याविषयीचा खर्च यासाठी संस्थानिकाला दरसाल संस्थानाच्या उत्पन्नांतून विशिष्ट रक्कम मिळेल. या रकमेवर कर द्यावे लागणार नाहीत. कोणत्याहि कारणास्तव ही रक्कम कमी किंवा अधिक करण्यांत येणार नाही. ही रक्कम चार सारख्या हप्त्यांत म्हणजे दर तिमाहीच्या सुरुवातीस संस्थानिकाला मिळेल. त्यासाठी त्याने संस्थानी किंवा हिंदुस्थान सरकार सांगेल त्या दुसऱ्या ट्रेझरीकडे आपलीं बिलें सादर करावींत.

४. कराराच्या दिवशीं संस्थानिकाच्या मालकीच्या असलेल्या सर्व खाजगी मालमत्तेसंबंधी मालकी व इतर सर्व अधिकार त्यांच्याकडेच राहतील.

५. आपली सर्व स्थावर मिळकत, कर्जरोखे व रोकड शिल्लक या मालमत्तेची पूर्ण: यादी संस्थानिकाने हिंदुस्थान सरकारला सादर करावी. एखादी मालमत्ता संस्थानच्या मालकीची आहे की संस्थानिकाच्या खाजगी मालकीची आहे, याविषयी वाद उत्पन्न झाल्यास तो हिंदुस्थान सरकारने नेमलेल्या एका अधिकाऱ्याकडे निर्णयासाठी सोपविण्यांत येईल. राजा, राणी, राजमाता, युवराज व युवराज्ञी यांचे १५ ऑगस्टच्या वेळीं असलेले सर्व वैयक्तिक खास अधिकार कायम राहतील.

६. संस्थानिकाचे वैयक्तिक अधिकार, दर्जा व पदव्या त्याचप्रमाणे कायदा व रूढि यानुसार गादीसंबंधीच्या वारसाचे अधिकार कायम राखण्याची हमी हिंदुस्थान सरकार घेत आहे.

संस्थानी खात्याचा खुलासा

७. राजा व राणी यांना हत्यारांचा कायदा लागू राहणार नाही. संस्थानिक आपल्या कुटुंबियाच्या दर्जास साजेल अशा रीतीने त्यांच्याविषयीची आपली रूढि व कायदेशीर कर्तव्यें पार पाडील अशी हिंदुस्थान सरकारची उमेद आहे.

८. संस्थानची जी रोकड शिल्लक हिंदुस्थान सरकारकडे सुपूर्त होईल ती होता होईल तो त्या संस्थानी मुलखाच्या हितासाठीच खर्च करण्यास मुंबई सरकारने मान्यता दिली आहे.

९. संस्थानांतील नोकरवर्ग ज्या शर्तीवर १ डिसेंबर १९४७ पूर्वी नोकरीवर होता त्या शर्तीवरच तो शक्यतोवर कायम ठेवला जाईल.

१०. इतर उरलेल्या मुद्यांसंबंधीचा निर्णय हिंदुस्थान सरकार शक्य-तितक्या लवकर घेईल.

११. संस्थानिकास संस्थानच्या १९४५–४६ च्या उत्पन्नाच्या १५ टक्के हिस्सा खाजगी खर्च म्हणून मिळणार आहे."

● ● ●

कोल्हापूर महाराजांच्याशीं जो करार करण्यांत आला, त्यांत आणखी कांही जास्त कलमें आहेत. त्यांपैकी महत्त्वाचा भाग पुढील आशयाचा आहे:—

(अ) हा करारनामा झाला नसता, तर महाराजांचे जे वैयक्तिक अधिकार, मानमरातब, आणि सन्मान कायम राहिले असते, त्यांस या करारनाम्याने बाध येणार नाही. (ब) वार्षिक दहा लाख रुपये तनखा मिळेल. (क) महाराज तक्तारूढ असतांना, त्यांच्या हातून वैयक्तिक अगर इतर कोणत्याहि नात्याने कांही गोष्टी घडल्या असतील अगर नसतील, त्याबद्दल त्यांच्याविरुद्ध हिंदुस्थान सरकार कोणतीहि चौकशी करणार नाही. (ड) कायम नोकरांना नोकरींत ठेवले जाईल अगर कोणताहि तोटा होऊ न देतां, नुकसान भरपाई दिली जाईल. त्याचप्रमाणे महाराजांनी दिलेली पगारी रजा अगर पेन्शनें, तशींच पुढे चालू ठेवलीं जातील.

● ● ●

दक्षिण महाराष्ट्रांतील विलीन झालेल्या अठरा संस्थानिकांना मुंबई सरकारमार्फत पुढीलप्रमाणे तनखे दिले जातात:—

(१) कोल्हापूर	१०,००,००० रु.	(९) मिरज	८५,००० रु.
(२) भोर	८९,०४२ रु.	(१०) रामदुर्ग	३२,४८६ रु.
(३) जमखिंडी	९१,१६३ रु.	(११) सावनूर	३०,३१६ रु.
(४) कुरुंदवाड (थोरली पाती)	४९,९२४ रु.	(१२) सावंतवाडी	१,०७,५०० रु.
(५) औंध	७५,२१२ रु.	(१३) जंजिरा	१,३३,५०० रु.
(६) फलटण	१,४०,४४२ रु.	(१४) मुधोळ	५५,३०० रु.
(७) मिरजमळा	५०,४५४ रु.	(१५) अक्कलकोट	७३,७८३ रु.
(८) कुरुंदवाड (धाकटी पाती)	५६,००० रु.	(१६) सांगली	२,६२,६३९ रु.
		(१७) वाडी	६,००० रु.
		(१८) जत	४९,९२४ रु.

(कोल्हापूरच्या छत्रपतींना जादा एक लाख रुपये त्यांच्या हयातींत मिळावयाचे आहेत.)

● ● ●

भोर संस्थानचे अधिपति

कै. रघुनाथराव शंकरराव

ऊर्फ

बाबासाहेब पंतसचिव

यांच्या प्रोत्साहनामुळे १९४४ सालीं सुरू झालेली

श्री लक्ष्मी टेक्स्टाईल मिल्स लि.,

|

आणि

ज्याप्रमाणे विलिनीकरण होऊन संस्थानें आणि प्रजा यांचा कायापालट होऊन संस्थानचा भूभाग आणि प्रजा स्वतंत्र-लोकशाही-भारतांत आपली प्रगति करूं लागली त्याप्रमाणेच वरील

" श्री लक्ष्मी टेक्स्टाईल मिल्स लि., "

या गिरणीचें रूपांतर लोकशाहीयुगास अनुसरून सहकारी क्षेत्रांत एक नाविन्यपूर्ण प्रयोग म्हणून भोर संस्थानचे विधानसभेचे माजी आमदार व महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेचे विद्यमान आमदार

श्री. नामदेवराव ऊर्फ मामासाहेब मोहोळ


आणि त्यांचे एक सहकारी आमदार

श्री. शंकरराव भेलके

यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हिंदुस्थानांत एकमेव अशी कामगारांच्या मालकीची व कामगारांनी चालविलेली

" श्री शिवाजी कामगार सहकारी सूत गिरणी लिमिटेड "

प्रगतिपथावर चालू आहे.


मोठे पंप
छोटे पंप ...
समुद्रांतल्या माशांचे प्रकार अनेक तसे पंपांचेहि प्रकार अनेक. किर्लोस्कर पंप म्हणजे अनेकविध पंपांचें आगरच! विविध शक्तीच्या आणि विविध उपयोगांच्या छोट्या मोठ्या किर्लोस्कर पंपांचा खेड्यापासून शहरापर्यंत आणि लहानशा बागायतीपासून विस्तीर्ण सहकारी शेतीपर्यंत सर्वत्र यशस्वीरीत्या वापर होत आहे.
दर्जा, विश्वसनीयता आणि कार्यक्षमता म्हणजेच किर्लोस्कर पंप.
किर्लोस्कर
* ज्यांच्या पंपाचा आज विचार
पंप निर्मितींत गेलीं ५० वर्षे अग्रेसर
किर्लोस्कर ब्रदर्स, लि., किर्लोस्करवाडी, जि. सांगली.
STUSA KM 5/65